# बालविकास

## इयत्ता १२ वी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास २११६ / (प्र.क्र. ४३/१६) एसडी - ४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# बालविकास

## इयत्ता १२ वी



२०२०

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४**

K1W7Z2

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजीटल पाठ्यपुस्तक व त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**बालविकास विषय समिती**

डॉ. विनिता धनंजय आपटे : **अध्यक्ष**

श्रीमती मनीषा अष्टपुत्रे : **सदस्य**

श्री. ज्ञानदेव प्रभाकर चाबुकस्वार : **सदस्य**

श्रीमती सीतालक्ष्मी एस. : **सदस्य**

श्रीमती मंदा गजानन मैंदरकर : **सदस्य**

श्रीमती सुधा नेमीचंद पाटणी : **सदस्य**

श्रीमती वासवी व्ही. जोशी : **सदस्य**

श्रीमती अनुपमा जी. नेने : **सदस्य**

डॉ. जयाशिला बसवंत मनोहर : **सदस्य**

श्रीमती दीप्ती कुलकर्णी : **सदस्य**

श्रीमती अर्पिता चंदा गुप्ता : **निमंत्रित**

डॉ. श्रीमती तुलसी भारत भूषण **(सदस्य सचिव)**

**समन्वयक**

**डॉ. श्रीमती तुलसी भारत भूषण**

**अक्षरजुळणी**

**निहार ग्राफिक्स , मुंबई**

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे**

**मुख्य निर्मिती अधिकारी**

**श्री. प्रभाकर परब**

**निर्मिती अधिकारी**

**श्री. शशांक कणिकदळे**

**सहायक निर्मिती अधिकारी**

**मुखपृष्ठ**

**श्री. भटू रामदास बागले**

**चित्रांकन**

**श्री. भटू रामदास बागले**

**श्रीमती वृषाली करंबळेकर**

**पेपर :** ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**प्रिंटिंग :**

**प्रिंट ऑर्डर :** .

**भाषांतरकार**

**श्रीमती मनीषा अष्टपुत्रे**

**श्रीमती वासवी व्ही. जोशी**

**श्रीमती दीप्ती कुलकर्णी**

**समीक्षक**

**डॉ. विनिता धनंजय आपटे**

**प्रकाशक**

**श्री. विवेक उत्तम गोसावी**

**नियंत्रक**

महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,

प्रभादेवी मुंबई –२५

# भारताचे संविधान

## उद्‌देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्‌धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**प्रिय विद्यार्थी,**

इयत्ता १२ वीमध्ये तुमचे मनापासून स्वागत. नवीन अभ्यासक्रमावर आधारित 'बालविकास' विषयाचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे. गतवर्षी बालविकास या विषयाची तुम्हाला ओळख करून दिली आहे. हा विषय शास्त्रीय ज्ञान देणारा व अनेक विषयांशी म्हणजेच जीवशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, सांस्कृतिक अभ्यास, समाजशास्त्र आणि मेंदूशास्त्र अशा विषयांशी संलग्न आहे.

या विषयामध्ये प्रामुख्याने लहान बालकांच्या सर्वांगीण विकासावर व सर्वंकष विकासावर लक्ष केंद्रित केले आहे.

तुम्हाला पूर्वबाल्यावस्थेचे महत्त्व समजावे आणि त्यांच्या विकासाविषयी तुम्हाला अधिक ज्ञान मिळावे यासाठी सदर पुस्तक तुम्हाला मदत करते. शिवाय या पुस्तकातून बालकाभोवतीच्या अनुकूल वातावरणाचा व बालककेंद्रित कृतींचा त्याच्या विकासावर कसा प्रभाव असतो, ती विकासाची महत्त्वाची अंगे याविषयी तुम्हाला आकलन होईल.

निरनिराळे शिक्षणतज्ञ, तत्त्ववेत्ते यांनी मांडलेल्या मतांमधून आणि विचारांमधून लहान बालकांचा विकास वेगवेगळ्या वयात आणि अवस्थेत कसा होतो हे समजणे सोपे जाईल. वैयक्तिक फरकांचा स्वीकार करून सर्वसमावेशनाची गरज तुम्ही समजू शकाल.

बालविकास विषयातील संकल्पना, तत्त्वे अभ्यासण्यासाठी आम्ही काही कृती अशा दिल्या आहेत की त्या सोडवताना तुम्ही तुमच्या दैनंदिन जीवनाशी त्याचा संबंध जोडू शकाल. प्रत्येक प्रकरणात त्या त्या प्रकरणाशी निगडीत काही तथ्य आणि माहिती चौकटीत दिलेली आहे. ती माहिती वाचून, कृती सोडवून निश्चितच तुमचे विषयज्ञान समृद्ध होण्यास मदत होईल.

बालविकास हा अत्यंत विस्तृत विषय आहे. परंतु आम्ही सदर पुस्तकाद्वारे विषयातील महत्वाच्या बाबी तुमच्यापर्यंत पोहोचवल्या आहेत. काही माहिती 'क्यू आर कोड' (QR CODE) यामध्ये वाचायला मिळेल. यामध्ये तुम्हाला काही दृकश्राव्य माहितीद्वारे तुमचे ज्ञान अधिकाधिक सखोल होण्यास मदत होईल. याचबरोबर काही प्रश्न, कृती असतील ते सोडविल्याने तुमचे विषयज्ञान अधिक समृद्ध होण्यासाठी, तुम्हाला अभ्यास करणे सुलभ होण्यासाठी मदत होईल.

तुम्ही तुमची मते आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा, जेणेकरून आम्ही शक्य असेल तेवढी माहिती तुमच्यापर्यंत पोहोचवू शकू.

तुम्हाला आम्हा सर्वांकडून नवीन पुस्तक अभ्यासण्यासाठी सदिच्छा !


**विवेक गोसावी**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे


**पुणे**
**दिनांक :** २१ फेब्रुवारी, २०२०
**भारतीय सौर :** २ फाल्गुन १९४१

# इ.१२ वी बालविकास
# क्षमता विधाने

**विद्यार्थी करू शकेल**

१. व्यक्तिच्या आयुष्यातील सुरुवातीच्या वर्षांचे महत्त्व समजेल.

२. बालविकास विषयाची उद्दिष्टे आणि व्याप्ती समजेल.

३. बालकांच्या गरजांबद्दल ज्ञान मिळाले.

४. वाढ व विकास या संकल्पनांचे स्मरण झाले.

५. विकासाची अंगे व विकासाच्या अवस्था यांची यादी देता आली व स्पष्टीकरण देता आले.

६. बालकांच्या प्रत्येक वैकासिक अवस्थेच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करतो.

७. विकासाच्या तत्त्वांचे स्मरण करतो.

८. वाढ व विकासावर परिणाम करणारे घटक माहित होतील.

९. परिपक्वता व अध्ययन याचे महत्व समजेल.

१०. अर्भकावस्थेतील विकासाची अंगे समजतील.

११. पूर्वबाल्यावस्थेतील वैशिष्ट्यांची यादी करू शकेल.

१२. बालकांच्या लवकरच्या वयातील गरजा समजू शकेल.

१३. बालहक्कांबद्दल सविस्तर सांगू शकेल.

१४. शारीरिक व कारक विकासाची अंगे समजतील.

१५. दोन वर्षे ते सहा वर्षे या कालावधीमध्ये होणारे शरीररचनेमधील व कारक बदल ओळखेल व समजेल.

१६. लवकरच्या वयातील स्थूल स्नायू कौशल्ये व सूक्ष्म स्नायू कौशल्ये यातील भेद सांगू शकेल.

१७. विविध मानसिक प्रक्रिया निश्चितपणे सांगता येतील.

१८. लवकरच्या वयातील बोधात्मक विकासाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

१९. उद्दीपनाचे महत्त्व सांगता येईल.

२०. भाषाविकासाच्या पायऱ्या समजतील.

२१. भाषा कशी प्राप्त होते हे सांगता येईल.

२२. शब्दसंपत्तीचा विकास कसा होतो याचे आकलन करता येईल.

२३. वाचादोष व वाचाविकृती यातील फरक समजेल.

२४. लवकरच्या वयातील सामाजिक-भावनिक विकास समजू शकेल.

२५. बालकांच्या भावना, त्यांचे अविष्कार आणि हाताळणी माहित होईल.

२६. सामाजिकरणाच्या प्रक्रियेचे महत्व समजेल.

२७. सामाजिकरणाच्या संस्थांचा प्रभाव माहित होईल.

२८. सामाजिक वर्तन प्रकारांचे वर्णन करता येईल.

२९. शिस्तीचे महत्त्व समजेल.

३०. खेळातून सर्वांगीण विकास ही संकल्पना समजेल.

३१. खेळाची गरज आणि महत्त्व याबाबत जागरूकता येईल.

३२. खेळाच्या पायऱ्या सांगून त्याबद्दल सविस्तर सांगू शकेल.

३३. खेळांच्या प्रकारांचे वर्णन करू शकेल.

३४. खेळण्यांची निवड कशी करायची हे समजेल.

३५. खेळाला प्रोत्साहन देण्यामध्ये पालकांची भूमिका कोणती याचे ज्ञान मिळेल.

३६. लहान बालकांच्या विविध वर्तन समस्यांबद्दल जाणीव होईल.

३७. वर्तन समस्या हाताळणी समजेल.

३८. पालक व शाळा यांच्या सहयोगाचे महत्व समजेल.

३९. पालक व शाळा यांच्या सहयोगाच्या विविध पद्धती माहित होतील.

४०. विशेष गरजांची व्याख्या करता येईल.

४१. विशेष गरजांचे वर्गीकरण करता येईल.

४२. विशेष गरजांच्या प्रकारांचे वर्णन करता येईल.

४३. सर्वसमावेशनाची गरज असण्याची कदर करेल.

४४. बालसंगोपन व बालशिक्षण याचा इतिहास माहित होईल.

४५. बालकेंद्रांची उद्दिष्टे व गरज समजेल.

४६. उपलब्ध असणाऱ्या विविध बालकेंद्रांविषयी वर्णन करता येईल.

# शिक्षकांसाठी

बालविकास या विषयाला आजच्या काळात खूप महत्त्व येऊ लागले आहे. बालकांच्या स्वास्थ्यासाठी, उत्तम जडण घडणीसाठी बालकांमध्ये गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे याचीही जाणीव झालेली आहे.

बालविकास हा विषय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासविषय म्हणून ठेवण्यामागे प्रमुख उद्दीष्ट आहे ते म्हणजे बालकांच्या सुरुवातीच्या काळात जास्तीत जास्त वाढ विकास होण्यासाठी समृद्ध आणि अनुकूल वातावरण निर्माण कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थ्यांना हा विषय शिकण्यातून समजावे.

अध्ययन – अध्यापन प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची इच्छा व गोडी निर्माण होऊन त्यांनी नुसत्या मिळालेल्या माहितीच्याही पलीकडे जाऊन आत्मपरीक्षण करणे, प्रोत्साहन देणे, निरीक्षण करणे, तुलना करणे, चर्चा करणे व विद्यार्थ्यांनी त्यांचे विचार मांडणे या गोष्टी कराव्यात.

जे प्रकरण पुस्तकातून शिकायचे आहे त्याविषयीचे विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान तपासणे हे प्रामुख्याने महत्त्वाचे आहे. त्यांना विषयाकडे नेणे हे शिक्षक म्हणून आपण करायला हवे. यासाठी शिक्षकांना स्वतःच्या नवनवीन कल्पना, सर्जनशीलता वापरून अनुभवातून माहिती पुरवता येईल आणि संकल्पना दृढ करता येतील.

बालविकास विषयाच्या पुस्तकात आश्चर्यकारक, लक्षवेधी माहिती मुद्दाम दिली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचा कल चिरंतन राहील.


अत्यंत स्नेहपूर्ण, मैत्रिपूर्ण, अनौपचारिक व कोणत्याही प्रकारे विद्यार्थ्यांची तपासणी न करण्याच्या हेतूने शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी नाते निर्माण केले तर विद्यार्थी अत्यंत हिरीरीने व स्वेच्छेने अध्ययन – अध्यापन प्रक्रियेत सहभागी होतील.

विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रश्न, शंका विचारावेत म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्याने विद्यार्थ्यांच्या विषय शिकण्यामध्ये अधिक स्पष्टता व अचूकता येईल.

'क्यू आर कोड' (QR code) यामध्ये अधिक माहिती, संबंधित वाचन याकरिता दृकश्राव्य माध्यमांच्या लिंक्स दिलेल्या आहेत.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | बालविकासाची ओळख | १ |
| २ | विकासाची तत्त्वे | १० |
| ३ | पूर्वबाल्यावस्थेची ओळख | २० |
| ४ | पूर्वबाल्यावस्थेतील शारीरिक व कारक विकास | ३० |
| ५ | बोधात्मक विकास व भाषाविकास | ४० |
| ६ | भावनिक व सामाजिक विकास | ५३ |
| ७ | खेळाद्वारे सर्वांगीण विकास | ७० |
| ८ | वर्तनसमस्या | ८२ |
| ९ | पालक व शाळा सहयोग | ९५ |
| १० | विशेष गरजा असलेली बालके | १०५ |
| ११ | बालकांसाठी केंद्रे | ११७ |
| * | संबंधित कृती व प्रकल्प | १३३ |
| * | संदर्भग्रंथ सूची | १४१ |
| * | वेबलिंक्सची संदर्भसूची | १४३ |



*All the world is a laboratory*
*to the inquiring mind*

- ***Martin H. Fischer***

चौकस बुद्धीसाठी सारे विश्व एक प्रयोगशाळा

# १ बालविकासाची ओळख




'बालविकास' हा शब्द मनात आला तर कोणती गोष्ट सर्वप्रथम तुम्हाला जाणवते? 'बाल' म्हणजेच अर्भक, शिशु की शालेय अवस्थेतील बालक? तुम्हाला माहित आहेच की गर्भधारणा ते मृत्यु या कालावधीमधील वैकासिक बदलांचा शास्त्रीय अभ्यास म्हणजेच मानवविकास.

लॉरा बर्क (२००७) यांच्या मते बालविकास हे क्षेत्र मानवाची दृढता आणि गर्भधारणेपासून किशोरावस्थेपर्यंत होत जाणाऱ्या बदलांच्या अभ्यासासंबंधीचे क्षेत्र आहे. ''बालविकास हा वैकासिक मानसशास्त्राचा भाग आहे किंवा असेही म्हणता येईल की आयुष्यभर होत राहणाऱ्या बदलांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानवविकास.''

बालविकासाची उद्दिष्टे आणि व्याप्ती तुम्हाला आठवतेय का?

## १.१ बालविकासाची व्याप्ती (Scope of Child Development)

- बालविकासाच्या विविध अवस्थांचा अभ्यास करणे.
- वाढ व विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
- विकासाची अंगे अभ्यासणे.
- विविध व्यवसायांना उपयुक्त.
- पालकांना व नव्याने होऊ पाहणाऱ्या पालकांसाठी उपयुक्त
- बालविकास किंवा मानवविकास या क्षेत्रात कारकिर्द करण्यासाठी उपयुक्त.




आकृती १.१ बालविकासाची उद्दिष्टे

**कृती**

(१) बालकांशी संबंधित बालविकास क्षेत्राचा अभ्यास ज्या ज्या विभागात केला जातो अशा कोणकोणत्या बालविकासाच्या क्षेत्रात हा विषय उपयुक्त आहे त्या विभागांची यादी करा. उदा. बालकांना शिकवणे.

(२) भाष्य करा : 'बालविकासाच्या अभ्यासाचा उपयोग उत्तम पालक होण्यासाठी उपयुक्त असतो.'

## वाढ आणि विकास (Growth and Development)


यापूर्वी तुम्ही बालविकास विषय अभ्यासलेला आहे. त्यानुसार वाढ आणि विकास या संज्ञांमधे काय फरक आहे हेही अभ्यासले आहेच. वाढ म्हणजे शरीरात होणारे संख्यात्मक बदल असतात तर विकास म्हणजे संख्यात्मक व गुणात्मक बदल असतात. तसेच विकास म्हणजे परिपक्वता व अध्ययन यामुळे घडून येणारी, बदलांची प्रगतीशील मालिका असते.

## विकासाची अंगे (Domains of Child Development)

**इयत्ता ११ वी मधे बालविकासाच्या पुस्तकात या आकृतीमधे रिकाम्या गोलांमधे काय लिहिले होते ते तुम्हाला आठवतय का?**

**कृती**

**गोलातील रिकाम्या जागा भरा.**




विकासाची विविध अंगे असतात. शारीरिक, कारक, बोधात्मक, भाषा, सामाजिक, भावनिक व नैतिक विकास.

**कृती**

कंसातील संदर्भ शब्दांच्या मदतीने वाक्ये पूर्ण करा.

(कारक विकास, सामाजिक विकास, नैतिक विकास, शरीर व अवयव, भाषाविकास, सकारात्मक आणि नकारात्मक भावना, मानसिक विकास)

(१) शारीरिक विकास म्हणजेच .............. चा विकास होय.

(२) मोठ्या व लहान स्नायूंचा विकास म्हणजेच .............. .

(३) मानसिक प्रक्रिया व क्षमतांचा विकास म्हणजेच .............. .

(४) शाब्दिक आणि अशाब्दिक संवाद म्हणजेच .............. चे घटक आहेत.

(५) समाजमान्य वर्तन .............. शी संबंधित असते.

(६) भावनिक विकासात .............. चा समावेश होतो.

(७) योग्य वर्तन करणे व चूक आणि बरोबर यातील फरक करता येणे म्हणजेच .............. .

## १.२ विकासाच्या अवस्था (Stages of Development)

मानवी जीवनचक्र आठ अवस्थांमधे विभागलेले आहे. ही विभागणी शारीरिक वयाच्या आधारे केलेली आहे.

**दर्पण**

दिलेल्या अवस्था व चित्रे यांच्या जोड्या लावा. (प्रसुतीपूर्व विकास, उत्तर बाल्यावस्था, तारुण्यावस्था, किशोरावस्था, मध्य प्रौढावस्था, पूर्व बाल्यावस्था, अर्भकावस्था व शैशवावस्था, उत्तर प्रौढावस्था)

**विकासाच्या अवस्था**

| | |
|---|---|
|  | ............................................................ |
|   | ............................................................ |
|  | ............................................................ |

| | |
|---|---|
|  | ........................................................ |
|  | ........................................................ |
| नोकरीसाठी मुलाखत | ........................................................ |
|  | ........................................................ |
|  | ........................................................ |

विद्यार्थ्यांनो शाब्बास! तुम्हाला जीवनचक्राच्या सर्व अवस्था ओळखता आल्या.

आता आपण बालकाच्या लवकरच्या वयातील गरजा आणि सुरुवातीच्या वर्षांचे महत्त्व याकडे आपले लक्ष देऊ.

## १.३ बालकांच्या गरजा (Needs of Children)

बालकांचे वय, अवस्था आणि विकासाची पातळी यानुसार बालकांच्या गरजा बदलत्या असतात. बालकांच्या शारीरिक, कारक, मानसिक, भावनिक किंवा सामाजिक गरजा पूर्ण करणे ही पालक, संगोपनकर्ते, शिक्षक आणि समाज यांची जबाबदारी असते. गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना वेगवेगळे मार्ग अवलंबावे लागतात, बालकाच्या सर्वांगीण विकासात या सर्वांचा मोठा वाटा असतो. बालकांच्या सभोवती आरामदायक वातावरण व परिस्थिती निर्माण करून त्यांच्या गरजा भागवाव्यात. बालके असाह्य असतात, दुसऱ्यांवर अवलंबून असतात त्यामुळे त्यांच्या गरजा भागवल्याच गेल्या पाहिजेत. बालकांबरोबर असणाऱ्या प्रौढ व्यक्तिंचे हे प्रमुख कर्तव्यच असते.


अब्राहम हॅरॉल्ड मॅस्लो हे एक मानसशास्त्रज्ञ होते. त्यांनी काही अनुकरणीय व्यक्तिंच्या सकारात्मक गुणांचा व त्यांच्या आयुष्याचा अभ्यास केला. १९५४ साली मॅस्लो यांनी मानवी गरजांची श्रेणी तयार केली. (Hierarchy of Human needs) आणि त्याबाबतचा त्यांचा सिद्धांत त्यांनी त्यांच्या 'Motivation and Personality' या पुस्तकात मांडला.

मॅस्लो यांनी मानवी गरजांची जी श्रेणी पुढे आणली त्यालाच "Maslow's Hierarchy of Needs" असे संबोधले जाते.

मॅस्लो यांच्या गरजांच्या श्रेणीप्रमाणे पुढील गरजा असतात.

### (१) जैविक व शारीरिक गरजा (Biological and Physiological Needs) :

हवा, अन्न, पाणी, निवारा, सौहार्दता, कामजीवन, झोप, शारीरिक समस्थिती, उत्सर्जन या मानवी गरजा प्राथमिक आहेत.




आकृती १.२ मॅस्लो यांची गरजांची श्रेणी

### (२) सुरक्षिततेच्या गरजा (Safety Needs) :

बाह्यघटकांपासून संरक्षण, शारीरिक सुरक्षितता, रोजगार, विविध स्रोत, नैतिकता, कुटुंब, आरोग्य, संपत्ती या गरजांची पूर्तता प्राथमिक गरजानंतर भागवावी लागते.

### (३) प्रेम व आपुलकीची / जवळीकतेची गरज (Love and Belongingness Needs) :

प्रेम व वात्सल्य यांची देवाण-घेवाण, कामजीवनाची पूर्तता, विश्वास आणि स्वीकृती, आपण एखाद्या गटाचा भाग आहोत ही भावना (कुटुंब, मित्रपरिवार, कार्यगट) निर्माण होणे.

### (४) स्व-आदर गरजा (Esteem Needs) :

मॅस्लो यांनी स्व-आदर गरजा दोन भागात विभागल्या आहेत. (अ) स्वतःबद्दल आदर असणे (आत्मसन्मान, आत्मविश्वास, संपादन, निष्णात, स्वातंत्र्य) (ब) प्रतिष्ठा मिळण्याची इच्छा असणे किंवा दुसऱ्यांनी आदर द्यावा ही इच्छा असणे. (उदा. दर्जा, नावलौकिक).

### (५) बोधात्मक गरजा (Cognitive Needs) :

ज्ञान आणि आकलन, उत्सुकता, शोध घेण्याची वृत्ती, अर्थ जाणून घेणे व अंदाज बांधणे.

### (६) सौंदर्यदृष्टीची गरज (Aesthetic Needs) :

सौंदर्याची कदर करणे आणि सौंदर्याच्या शोधात राहणे, समतोल राखणे व स्वरुप.

### (७) आत्मवास्तविकीकरण गरज (Self-actualization Needs):

नैतिकता, सर्जनशीलता, उत्स्फुर्तता, समस्यानिवारण क्षमता, पूर्वग्रह नसणे, वास्तव स्वीकारणे, स्वतःच्या क्षमतांची जाणीव, आत्मसमाधान, स्वतःच्या प्रगतीसाठी, उन्नतीसाठी प्रयत्नशील, अनुभवांची उच्च पातळी.

### (८) वैश्विक / स्वतःपलिकडील गरजा (Transcendence Needs) :

काही मूल्य व्यक्तिला स्वतःपलिकडील विचार करण्यास भाग पाडतात. सद्सद्विवेक बुद्धीची उच्चतम व सर्वसमावेशित आणि सर्वंकष पातळी म्हणजेच वैश्विक गरज.

मॅस्लो यांनी दिलेली गरजांची श्रेणी लक्षात घेता बालकांच्या गरजांचे समाधान करण्यात समाज अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो.

### बालकांच्या गरजांची पूर्ती करण्यामधे समाजाची भूमिका (Role of society in satisfying a child's needs)

- स्वीकृती
- निर्व्याज प्रेम व पाठिंबा /आधार
- योग्य मर्यादांमधे मुक्तता
- व्यक्तिविशिष्ट फरकांचा आदर
- विविध उद्दीपन कृती पुरवणे.
- प्रत्येक अवस्थेतील वैकासिक कार्य संपादीत करण्यासाठी बालकांनी मदत करणे.

## १.४ बालकांच्या आयुष्यातील सुरुवातीच्या वर्षांचे महत्त्व (Importance of early years in a child's life)

बालकाच्या आयुष्यातील सुरुवातीची वर्ष हा काळ पायाभूत विकासाचा काळ मानला जातो. पहिल्या सहा वर्षात ज्या वेगाने बालकाची वाढ आणि विकास घडतो त्यानंतर विकासाची ही गती कोणत्याच काळात आढळत नाही. सुरुवातीच्याच काळात व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व ठरते, वर्तन आणि दृष्टीकोन विकसित होतात. अध्ययनासाठी आणि कौशल्यविकासासाठीही हा काळ महत्त्वाचा असतो, त्यानुसार बालकांना संधी उपलब्ध करून द्याव्या लागतात. बालकांना जेवढ्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील तेवढ्या त्यांच्या अनुवंशिक अंगभूत क्षमता आणि कौशल्य विकसित होतील. वातावरणातून मिळणाऱ्या उद्दीपनामुळे मेंदूचा विकास चांगला होतो म्हणून बालकांना जास्तीत जास्त संधी, योग्य पोषक आहार आणि उद्दीपन द्यायला हवे, तसेच पंचेंद्रियांना चालना द्यायला हवी.

### (१) पायाभरणीचा काळ (Period of Foundation):

बालकांच्या आयुष्यातील सुरुवातीच्या काळातच वर्तन आणि दृष्टीकोन याचा पाया रचला जातो. बालकाच्या विकासावर परिपक्वता व अध्ययन याचाही

मोठा परिणाम होतो. या काळातील मेंदूचा विकासही महत्त्वाचा असतो. मिळणारा प्रत्येक अनुभव मेंदूमध्ये नोंदवला जातो. सुरुवातीच्या काळात मेंदूची रचना आणि क्षमता कृती करण्याच्या दृष्टीने पूर्णपणे समन्वयीत नसतात. मेंदू विकसनासाठी सातत्याने उद्दीपन आवश्यक असते. प्रत्येक नवा अनुभव बालकाच्या विकासाचा पाया पक्का करतो. हा अनुभव सकारात्मक असो किंवा नकारात्मक असो त्याचा बालकाच्या विकासावर परिणाम होतोच.

### (२) सुरुवातीच्या काळातील अनुभवांचा परिणाम (Effect of Initial Experiences) :

बालकांना सुरुवातीपासूनच भरपूर सकारात्मक अनुभव दिले पाहिजेत त्यामुळे पुढे शाळेतील यश मिळवण्याच्या दृष्टीने ते अधिक अनुभवसमृद्ध होतील. सकारात्मक अनुभव, समतोल आणि पुरेसा पोषक आहार यामुळे बालकाचा निकोप विकास होतो तर नकारात्मक अनुभव, पोषक आहाराचा अभाव आणि नकारात्मक, घाबरवणारे वातावरण व प्रेरणेचा अभाव या सगळ्यांचा बालकाच्या विकासावर नकारात्मक परिणाम होतो. बालकाच्या जडणघडणीत कुटुंब, पालक, शिक्षक, समवयस्क गट आणि समाज या सर्वांचा महत्त्वाचा वाटा असतो.

### (३) लवकरच्या वयातील बालविकासाचा नंतरच्या प्रौढ आयुष्यावर होणारा प्रभाव (Impact of early Child Development on adult life) :

बालविकासाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांनी विश्वास दर्शवला आहे की जर सुरुवातीच्या काळातच बालकाची वाढ व विकास सुयोग्य झाले तर नंतरच्या जीवनावर त्याचा सकारात्मक प्रभाव दिसतो. बाल्यावस्थेमध्ये अनुभव, वातावरण, नातेसंबंध यांच्याशी बालक कशी आंतरक्रिया करेल यावर प्रौढपणी त्या बालकाचे वर्तन कसे असेल हे ठरते. बाल्यावस्थेमधे मिळणारे यश किंवा अपयश नंतरच्या आयुष्यातील यश-अपयश यांच्याशी निगडीत राहते. लवकरच्या वयातील नकारात्मक अनुभव, कुपोषण याचा घातक परिणाम होतो आणि नंतरच्या आयुष्यात भावनिक आणि वर्तन समस्या निर्माण होऊ शकतात.

### शब्दसूची *Glossary*

**सौंदर्य (Aesthetic) :** सौंदर्य आणि त्यासंबंधी रसास्वाद

**विकास (Development) :** शरीरात होणारे संख्यात्मक व गुणात्मक बदल

**वैकासिक मापदंड (Developmental Milestone) :** ठराविक वयाला समाजमान्य मार्गाने ठराविक कार्य ठराविक पातळीपर्यंत किंवा क्षमतेने करता येणे.

**वाढ (Growth) :** शरीरात होणारे संख्यात्मक बदल. उदा. उंची, वजन.

**श्रेणी (Hierarchy) :** एखाद्या गोष्टीचे महत्त्व किंवा त्याचे बल लक्षात घेऊन त्यांचा क्रम लावणे किंवा त्यांची मांडणी संघटीत स्वरुपात करणे.

**लसीकरण (Immunization) :** ठराविक रोगांपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी इंजेक्शन किंवा औषधे प्रतिबंधात्मक स्वरुपात बालकांना देणे.

**आत्मवास्तविकीकरण / अचूकता (Self actualization) :** व्यक्तिला स्वतःच्या क्षमता परिपूर्ण वापरण्याची प्रेरणा मिळणे.

**वैश्विक / स्वतःपलिकडील (Transcendence) :** सर्वसाधारण मर्यादांपलिकडे जाऊन स्वतःच्या क्षमतांच्या पलिकडचा अनुभव घेणे.

## स्वाध्याय

**सूचना :** या प्रकरणाच्या शेवटी दिलेला स्वाध्याय सोडवण्यासाठी तुम्ही तुमच्या इयत्ता ११वीच्या बालविकास पाठ्यपुस्तकाचा आधार घ्यावा कारण हे प्रकरण उजळणीसाठी आहे.

**प्र. १. पुढील विधाने वाचा व विकासाच्या कोणत्या क्षेत्राशी निगडीत आहे ते लिहा.**

(१) विजयने केलेल्या ठोकळ्यांच्या रचनेला सूरजचा धक्का लागला आणि ती ठोकळ्यांची रचना ढासळली, तेव्हा सूरज विजयला क्षमा कर (सॉरी) म्हणाला.

(२) कविता अगदी सहजपणे मणी ओवू शकते तर साहील ठोकळ्यांची रचना चांगली करु शकतो.

(३) नर्सरीच्या वर्गातील बालके रांगणे, चालणे, उड्या मारणे आणि चढणे यासारख्या नैसर्गिक कृती करतात.

(४) दुधाच्या गरम पातेल्यातून येणारी वाफ शीलाने बघितली आणि शीला म्हणाली दूध गरम आहे.

(५) राजू लिंबाला चेंडू समजून त्याच्याशी खेळण्यात गुंग आहे.

(६) चिंटूला भूक लागल्यावर चिंटू 'मम-मम' शब्द उच्चारतो.

**प्र. २. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(१) वाढ म्हणजेच संख्यात्मक बदल.

(२) बालविकासाचे सर्व पैलू अभ्यासण्याची गरज नाही.

(३) सर्वांगीण विकासामध्ये वातावरणापेक्षा अनुवंशिकता महत्त्वाची असते.

(४) ठराविक काळानंतर विकास थांबतो.

**प्र. ३. गुणवैशिष्ट्ये व विकासाच्या अवस्था यांच्या जोड्या लावा.**

| अ | ब |
|---|---|
| (१) या वयात समायोजन आणि असाहाय्यता दिसते. | (अ) शैशवावस्था |
| (२) या वयात बालके आत्मकेंद्री असतात. | (ब) प्रसूतीपूर्व विकास |
| (३) बालके शाळेत जातात व शालेय कौशल्ये आत्मसात करतात. | (क) नवजात अवस्था |
| (४) या वयात विकास जलद गतीने होतो. | (ड) पूर्व बाल्यावस्था |
| (५) बालके स्वावलंबनाकडे जाऊ लागतात आणि चालणे बोलणे ही कौशल्ये आत्मसात करतात. | (इ) उत्तर बाल्यावस्था |
| | (फ) वृद्धावस्था |

**प्र. ४. यादी करा.**

(१) विकासाची उदि्दष्टे

(२) विकासाची अंगे

(३) अर्भकावस्थेच्या पायऱ्या

**प्र. ५. गटातील वेगळा शब्द ओळखा.**

(१) उंची, वजन, शरीराची प्रमाणबद्धता, बोलणे

(२) उड्या मारणे, मणी ओवणे, तोल राखणे, टुणटुण उड्या मारणे

(३) रंगवणे, चित्र काढणे, चिकटकाम, गाणे

(४) बोलणे, पळणे, चढणे, दात येणे

**प्र. ६. संज्ञा स्पष्ट करा.**

(१) आत्मवास्तविकीकरण

(२) बोधात्मक विकास

(३) नवजात अवस्था

(४) प्रौढावस्था

**प्र. ७. टीपा लिहा.**

(१) प्रसूतीपूर्व विकास

(२) वाढ व विकास

(३) बालविकासाची व्याप्ती


(४) संवादाची रुपे

**प्रकल्प / स्वयंअध्ययन**

**वाढ व विकासातील फरक दर्शवणारे मुद्दे लिहून तुमच्या पद्‌धतीने तक्त्याचे सादरीकरण करा.**

❖ ❖ ❖

# विकासाची तत्त्वे





तुम्ही इयत्ता ११वी मध्ये विकासाची तत्त्वे अभ्यासली आहेत. प्रत्येक सजीवाचा वाढ आणि विकासाचा ठराविक क्रम असतो त्याचप्रमाणे तो ठराविक क्रम मानवामध्येही आढळतो. उदा. दाताच्या विकासाच्या प्रक्रियेत दात बाहेर पडण्याचा ठराविक नमुना असतो. बालकाच्या वाढ व विकासाचा नमुना माहित असण्याचा, त्यातील प्रक्रियांचे ज्ञान असण्याचा फायदा शिक्षक-पालक यांना, बालकांना त्यांच्या अध्ययन प्रक्रियेत मार्गदर्शन करण्यासाठी होतो. बालकांच्या वाढ व विकासाचा नमुना पालक व संगोपनकर्त्यांनी माहित करून घेणे गरजेचे आहे त्यामुळे ते पालनपोषणास योग्य आणि आपुलकीचे वातावरण निर्माण करू शकतात, बालकांच्या अध्ययनास उद्दीपन मिळते. विकासाबाबतच्या सर्व पायाभूत बाबींनाच 'विकासाची तत्त्वे' असे म्हणतात.

## २.१ विकासाची तत्त्वे (Principles of Development)

तुम्हाला माहित आहेच की विकासाचा विशिष्ट नमुना असतो आणि त्यामधे वाढीची प्रक्रिया समाविष्ट असते.

### (१) विकास होताना बदल होतात (Development involves change)

शरीरामधे संख्यात्मक व गुणात्मक बदल होत असतात. शरीरामधे वजन, उंची यात होणारे बदल मापनीय असतात म्हणून त्यांना संख्यात्मक बदल म्हणतात तर शरीरात होणारे वैकासिक बदल गुणात्मक बदल असतात. उदा. कारक क्षमता, बोधात्मक क्षमता, भाषा आत्मसात करणे किंवा भावनिक विकास.





**चित्र २.१ वाढीचा नमुना**

### (२) विकास ही सतत प्रक्रिया असते (Development is continuous)

गर्भधारणा ते मृत्युपर्यंत शरीरात सातत्याने संख्यात्मक व गुणात्मक बदल होतात.

### (३) विकासाचा नमुना अंदाजयोग्य असतो / विकासाचा ठराविक नमुना असतो. (Development follows a predictable pattern)



**चित्र २.२**

विकासातील बदल होताना ते बदल एका ठराविक नमुन्यात होतात सर्व व्यक्तिंसाठी हा नमुना सारखाच असतो. विकासातील बदल दिशाक्रमाच्या नियमानुसार होतात. मस्तकानुवर्ती विकास क्रम (Cephalocaudal sequence) व अक्षानुवर्ती विकास क्रम (Proximodistal sequence)

**मस्तकानुवर्ती विकास क्रम :** डोक्याकडून पायाकडे विकास होतो. या तत्त्वानुसार डोक्याच्या भागातले नियंत्रण अगोदर येते आणि नंतर क्रमाने मान, दंड, धड आणि पाय असा विकास होतो.

**अक्षानुवर्ती विकास क्रम :** अक्षानुवर्ती विकासक्रमात शरीराच्या मध्याकडून शरीराच्या दोन्ही बाजूला बदल होत जातात.

### (४) विकास सामान्याकडून विशिष्टाकडे होतो (Development proceeds from general to specific)

विकास ही टप्प्याटप्प्याने सावकाश होणारी प्रक्रिया आहे. यामधे व्यक्ति व्यक्तिमधे फरक असतो. प्रत्येक कृतीबाबत विकास सामान्याकडून विशिष्टाकडे होतो. अगदी छोट्या बाळांचे निरीक्षण केल्यावर असे दिसते की बाळ हाताच्या हालचाली हवेमध्ये करत असते परंतु त्या हालचाली अनियंत्रित व सामान्य असतात. हळूहळू या हालचाली वैशिष्ट्यपूर्ण होऊन विशिष्टपणे वस्तू धरण्यासाठी, उचलण्यासाठी सक्षम होऊ लागते. पायाच्या हालचालीही अशाच असतात. भावनिक विकासात बालक अपरिचित आवाजाला भीतीचा प्रतिसाद देतात, अपरिचित वस्तूला सामान्य भीतीचा प्रतिसाद देतात. भावनिक विकासात पण हळूहळू ही भीती एखाद्या विशिष्ट वस्तूची वाटते.

### (५) विकासाची गती भिन्न असते. (Development proceeds at different rates)

गर्भधारणा ते मृत्युपर्यंतचा विकास ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे हे अभ्यासलेले आहेच. पण प्रत्येकवेळी विकासाची गती तीच असते असे नाही. व्यक्तिगणिकही विकासाची गती भिन्न आढळते. उदा. मुलगे आणि मुली यांच्या वाढीच्या गतीत फरक असतो. शरीराच्या प्रत्येक अवयवाच्या विकासाच्या गतीमधे प्रत्येक विकास अवस्थेत भिन्नता दिसून येते.

### (६) विकासामध्ये व्यक्तिभिन्नता असते. (There are individual differences in development)

सर्व बालकांमध्ये विकासाचा नमुना थोड्या फार फरकाने सारखाच असतो. परंतु प्रत्येक बालकाचा विकासाचा मार्ग आणि गती भिन्न असते, म्हणजेच प्रत्येक बालक विकासाची समान पातळी एकावेळी गाठत नाही. याचप्रमाणे बालकाची अनुवंशिकता आणि त्याला मिळणारे वातावरण यामुळेही व्यक्तिभिन्नता आढळते.

### (७) विकासाच्या निरनिराळ्या अंगांमध्ये परस्पर संबंध असतो. (Areas of development are interrelated)

शारीरिक, भावनिक, भाषिक, सामाजिक, बोधात्मक या सर्व विकासाच्या अंगांमधे परस्पर संबंध असतो आणि वाढ व विकासावर त्याचा एकूण परिणाम होतो.

### (८) विकास ही परिपक्वन व अध्ययन याची निष्पत्ती असते. (Development is a product of Maturation and Learning)

परिपक्वन म्हणजे जन्मतः प्राप्त गुणधर्मांची नैसर्गिकरित्या होणारी वाढ होय. विशिष्ट वयानुसार या क्षमतांमध्ये वाढ दिसते तर अध्ययन म्हणजे कौशल्य व ज्ञान आणि अनुभव व सराव यामुळे वर्तनात घडून येणारा कायमस्वरुपी बदल. सराव, अनुकरण, निरीक्षण व प्रशिक्षण यांमुळे अध्ययन घडून येते.

## २.२ परिपक्वन व अध्ययन यातील परस्पर संबंध

बालकाला अध्ययनाच्या कितीही संधी दिल्या तरी परिपक्वतेची ठराविक पातळी गाठल्याशिवाय कौशल्य आत्मसात होत नाहीत. परिपक्वन ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. ज्याच्या मदतीने अध्ययनाद्वारे ज्ञान आणि कौशल्य प्राप्त करता येतात. उदा. शारीरिक परिपक्वता आल्यावर बालकाला चालता येते. परिपक्वनाची निष्पत्ती म्हणजेच जातीविशिष्ट कार्ये (Phylogenetic functions) रांगणे, चालणे अशी कार्ये करता येतात. ही कार्ये परिपक्वतेनुसार

व वयानुसार प्राप्त होतात या कार्यांना प्रशिक्षणाची गरज नसते. व्यक्तिविशिष्ट कार्ये (Ontogenetic functions) ही अध्ययन व सरावाची निष्पत्ती असते. उदा. पोहणे, सायकल चालवणे या कार्यांवर प्रशिक्षण, सराव आणि संधी याचा परिणाम होतो.

**तुम्हाला माहित आहे का?**


**संवेदनशील काळ / शिकवण्यायोग्य क्षण (Sensitive period / Teachable moments)**

जेव्हा बालक शारीरिक व मानसिक तयारी दर्शवते तो क्षण आपण कौशल्य शिकवण्यासाठी वापरला तर तो क्षण शिकवण्यायोग्य आदर्श क्षण असतो. शिकवण्यायोग्य क्षणाचे मानसशास्त्रज्ञांनी तीन निकष सांगितले आहेत. (१) अध्ययनाची आवड (२) आवड चिरंतन टिकून राहणे (३) सुधारणा दर्शवणे

## २.३ वाढ व विकासावर परिणाम करणारे घटक (Factors influencing growth and development)

यापूर्वी अभ्यास करताना तुम्ही शिकलेलेच आहे की कोणत्याही दोन व्यक्तिंच्या वाढ आणि विकासात साम्य नसते. शारीरिक कार्यात आणि वर्तनात आढळणारी ही भिन्नता जैविक व परिस्थितीजन्य घटकांच्या आंतरक्रियेमुळे दिसते.

### (१) अनुवंशिकता (Heredity)




**चित्र २.३ रंगसूत्रे व वंशाणू**

बालकाच्या शारीरिक व व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंचा पाया म्हणजेच त्या बालकाची अनुवंशिकता असते. गर्भधारणेच्या वेळीच आई-वडिलांकडून बालकाला अनुवंशिक वारसा प्राप्त झालेला असतो. आईकडून २३ गुणसुत्रे व वडिलांकडून २३ गुणसुत्रे अशी ४६ गुणसुत्रे किंवा २३ गुणसुत्रांच्या जोड्या अनुवंशिकतेने प्राप्त होतात.

**लिंगनिश्चिती (Sex determination) :** स्त्रियांमधे गुणसुत्राच्या शेवटच्या जोडीत 'क्ष-क्ष' (XX) गुणसुत्रांची जोडी असते तर पुरुषांमधे 'क्ष-य' (XY) अशी जोडी असते. गर्भधारणेच्या वेळी स्त्रीमधील एक 'क्ष'गुणसुत्र व पुरुषामधील 'क्ष' गुणसुत्र यांची जोडी झाली तर मुलगी जन्माला येते. जर स्त्रीमधील 'क्ष' गुणसुत्राची जोडी पुरुषातील 'य' गुणसुत्राशी झाली तर मुलगा जन्माला येतो. म्हणजेच पुरुषामधील गुणसुत्रावर अवलंबून असते की मुलगा होईल किंवा मुलगी होईल.

**प्रभावी व अप्रभावी वंशाणू/जनुके (Dominant and recessive genes) :** पालकांकडून अनुवंशिकतेने जी गुणवैशिष्ट्ये बालकाला प्राप्त होतात त्याला वंशाणू/ जनुके कारणीभूत असतात. प्रभावी जनुकांमुळे प्राप्त होणारी गुणवैशिष्ट्ये दिसून येतात व अप्रभावी जनुके सुप्त राहतात.

### (२) परिपक्वता व अध्ययन (Maturation and Learning)

वाढ व विकासावर परिणाम करणारे हे दोन घटक परस्पर संबंधित असतात. परिपक्वतेमुळे कौशल्य प्राप्त करण्याची क्षमता निर्देशित होते तर अध्ययनावर ते कौशल्य कसे शिकावे हे अवलंबून राहते.

### (३) वातावरण (Environment)

**प्रसूतीपूर्व वातावरण (Prenatal environment) :** वातावरणाचा विकासावर खूप प्रभाव असतो. वय, संप्रेरकांची पातळी, आहार, आरोग्य, मातेची भावनिक स्थिती अशा घटकांचा गर्भावर परिणाम होत असतो.

**प्रसूतीनंतरचे वातावरण (Postnatal environment) :** घरातील वातावरण, आर्थिक-सामाजिक दर्जा, आहार, आरोग्यसेवा, पालकत्त्व असे वातावरणातील घटक प्रसूतीनंतर बाळाच्या जीवनावर परिणाम करतात. या घटकांचा परिणाम बालकाचे वर्तन, व्यक्तिमत्त्व, भावना आणि नातेसंबंध यावर दीर्घकाळ राहतो. पालक, शिक्षक, समवयस्क गट, समाज आणि सामाजिक बदल यांची बालकाच्या जीवनात महत्त्वाची भूमिका असते आणि या सर्वांचा सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतो.

### (४) पोषक आहार (Nutrition)


सुयोग्य वाढ व विकासासाठी पोषक आहाराची गरज प्रत्येक मानवी जीवाला असते. योग्य पोषक घटकांचा समावेश असणारा समतोल व चौरस आहार (प्रथिने, कर्बो दके, स्निग्ध, क्षार आणि जीवनसत्त्वे) वाढीच्या काळात अत्यंत महत्त्वाचा असतो. समतोल आहार व पोषक आहार यांचा अभाव असेल तर परिस्थिती कुपोषणाकडे झुकते.



चित्र २.४

**कुपोषण (Malnutrition) :** उपासमार, पोषक घटकांचा अभाव आणि अन्नाचे पचन होण्याची क्षीण क्षमता ही कुपोषणाची काही कारणे आहेत. कुपोषणामुळे वाढ खुंटते, प्रकृती खराब होते, रक्तक्षय, रातांधळेपणा, क्वाशिऑर्कर, मरॅस्मस अशा रोगांना बालके बळी पडतात.

### (५) नलिकाविरहीत/अंतःस्त्रावी ग्रंथी (Endocrine glands)




चित्र २.५

नलिकाविरहीत ग्रंथी विशिष्ट संप्रेरक निर्माण करतात व हे संप्रेरक सरळ निरनिराळे अवयव, ऊती आणि रक्तप्रवाह यात जाऊन मिसळतात. अंतःस्त्रावी ग्रंथी वाढ, विकास, प्रजनन यावर नियंत्रण ठेवतात. आंतरिक किंवा बाह्यउद्दीपकाला प्रतिसाद म्हणून अंतःस्त्रावी ग्रंथींमधून संप्रेरक स्त्रवतात. पियुषिका ग्रंथी (Pitutary gland) मेंदूच्या तळाशी स्थित असते. तिला 'प्रधान ग्रंथी' (Master gland) असेही संबोधतात. पियुषिका ग्रंथी इतर सर्व ग्रंथींचे कार्य नियंत्रित करते. कंठस्थ ग्रंथी (Thyroiod gland) गळ्यामधे स्वरयंत्राजवळ स्थित असते. चयापचय क्रियेवर कंठस्थ ग्रंथीचे नियंत्रण असते. उपकंठस्थ ग्रंथी (Parathyroid gland) शरीरातील कॅल्शियम या क्षाराचा समतोल राखते. वृक्कस्थ ग्रंथी (Adrenal gland) आणीबाणीच्या प्रसंगातील क्रियांना जबाबदार असते. स्वादूपिंड (Pancreas) ही ग्रंथी पचनसंस्थेची ग्रंथी आहे आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्याचे काम ही ग्रंथी करते. रेतपिंड (Testis) आणि अंडाशय (Ovary) या दोन्ही लैंगिक ग्रंथी आहेत, पैकी रेतपिंड पुरुषांमधे असतात व अंडाशय स्त्रीयांमध्ये असतात. या दोन्ही ग्रंथी प्रजनन पेशींच्या वाढ व विकासाला जबाबदार असतात.

### (६) आजारपण (Illness)



चित्र २.६

बालकाच्या आरोग्याचा विचार करता आरोग्यस्थिती महत्त्वाची आहे. वाढ व विकास ज्या काळात जलद गतीने होत असतो त्या काळात जर आजारपण आले तर त्याचा वाढीवर तीव्र परिणाम होतो. आजारपणामुळे बालकाच्या सामाजिक-भावनिक विकासावर परिणाम होतो, क्रियाशीलतेच्या पातळीवर विपरित परिणाम होतो आणि अध्ययनाच्या संधीही कमी होतात.

### (७) शारीरिक दोष (Physical Defects)

वेगवेगळ्या कारणांमुळे शारीरिक दोषस्थिती उद्‌भवते. काही दोष जन्मापासूनच असतात त्याचे पुढे गंभीर परिणाम होऊ शकतात तर काही दोष जन्मानंतर गंभीर आजारस्थितीमुळे निर्माण होतात, कुपोषणामुळे किंवा एखाद्या अपघातामुळेही निर्माण होतात. शारीरिक दोषस्थिती असल्यास बालकांची वातावरणाशी आंतरक्रिया कमी होते त्यामुळे कदाचित शोधप्रवृत्तीला चालना देणाऱ्या संधी कमी होतात आणि त्याचा परिणाम म्हणून सर्वांगीण विकासावर परिणाम होऊ शकतो.

### (८) विश्रांती, झोप आणि व्यायाम (Rest, Sleep and Exercise) :

शरीराचे कार्य सुरळीत चालण्यासाठी विश्रांती, झोप आवश्यक आहे. जर बालकाला पुरेशी विश्रांती आणि झोप मिळाली नाही तर त्याला थकवा जाणवेल, त्याची ऊर्जा कमी होईल, वर्तन विस्कळीत राहील आणि आजारपण उद्‌भवेल. उत्तम वाढ व विकासासाठी व्यायामही तितकाच महत्त्वाचा आहे. ज्या बालकाला नियमित व्यायामाची सवय लावली जाते ते बालक निरोगी, क्रियाशील आणि अनुकूलन करणारे परिस्थितीशी जुळवून घेणारे असते.



चित्र २.७

### (९) संस्कृती (Culture)

संस्कृती ही एक व्यापक संज्ञा आहे. ज्यामधे कुटुंब, वातावरण, सभोवतालचे सामाजिक वातावरण, मूल्य या सर्वांचा समावेश होतो. संपूर्ण जगात संस्कृतीचे विविध नमुने आढळतात. भौगोलिक स्थान, आर्थिक-सामाजिक

स्तर विविध धर्म यानुसार भिन्न संस्कृती आढळते. त्यानुसार बालसंगोपनाच्या पद्‌धतींमधे ते प्रतिबिंबित होते, बालकांना पुरवले जाणारे अनुभव, संधी, रुजवली जाणारी मूल्य असतात. बालकाच्या मानसिक विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांपैकी संस्कृती हा एक महत्त्वाचा घटक आहे.

**कृती :**

विद्‌यार्थ्यांच्या दोन गटात वादविवाद (debate) आयोजित करा.

**विषय :** ''बालकांच्या वाढ आणि विकासाच्या संदर्भात कोणता घटक जास्त परिणामकारक आहे. अनुवंशिकता की वातावरण''

**तालिका २.१ अर्भकावस्थेतील विकासाचे पैलू (Aspects of Development during Infancy)**




**शारीरिक विकास (Physical Development)**

- **उंची :** पुढे जाऊन दुसऱ्या वर्षी जी उंची असणार आहे त्या उंचीच्या बरोबर निम्मी उंची अर्भकावस्थेत असते.
- **वजन :** जन्मतेवेळच्या वजनाच्या चौपट वजन वयाच्या दुसऱ्या वर्षी असते.
- **शरीराची प्रमाणबद्‌धता :** अर्भकाच्या डोक्याचे माप त्याच्या उंचीच्या १/४ असते.
- **स्नायूविकास :** स्नायूतंतू अर्भकावस्थेत विकसित नसतात. जास्त करून स्निग्ध तंतू असतात.
- **अस्थिसांगाडा विकास :** हाडांचे खनिजीकरण (ossification) होते.
- **दातांचा विकास :** दोन वर्षाच्या शेवटी १६ ते २० दुधाचे दात येतात.
- **मेंदूचा विकास :** दोन वर्षाला प्रौढपणीच्या मेंदूच्या ७५% मेंदूचे आकारमान असते.



**कारक विकास (Motor Development)**

- मस्तकानुवर्ती व अक्षानुवर्ती विकासक्रम
- **स्थूल कारक कौशल्य –** चढणे, उड्या मारणे, तोल सांभाळणे यासारख्या कृती मोठ्या स्नायूंच्या विकासामुळे शक्य होतात.
- **सूक्ष्म कारक कौशल्य –** चित्र काढणे, मातीकाम, रंगवणे यासारख्या कृती लहान स्नायूंच्या विकासामुळे शक्य होते.




**बोधात्मक विकास (Cognitive Development)**

- अर्भकाला उद्‌दीपन देणे महत्त्वाचे आहे.
- सुरुवातीला पंचेंद्रियांच्या साहाय्याने बालक शिकते.




**भाषा विकास (Language Development)**

- संवादाच्या वाचापूर्व रुपांचा वापर करता येऊ लागतो.
- भावना शब्दात व्यक्त करायला सुरुवात करतात.




**भावनिक विकास (Emotional Development)**

- उद्दीपक, भाव, शारीरिक उद्दीपन व वर्तन हे अर्भकाच्या भावनांचे पायाभूत घटक आहेत.
- अर्भक जवळीकता दर्शवतात, दुरावण्याची चिंता आणि अनोळखी व्यक्ति समोर असण्याची चिंता दर्शवतात.
- अर्भक काही भावना प्रगट करु लागते. प्रेम व वात्सल्य, आनंद, भीती आणि राग यासारख्या विविध भावना दर्शवतात.



**सामाजिक विकास (Social Development)**

- सामाजिकरणाची प्रक्रिया सुरू होते.
- सामाजिकरणाचे मापदंड अर्भकावस्थेत प्राप्त केले जातात. उदा. सामाजिक स्मितहास्य, सामाजिक संदर्भ आणि सामाजिक संकेत.



**नैतिक विकास (Moral Development)**

- चूक-बरोबर यातील फरक करता येत नाही.

**दर्पण**

अर्भकावस्थेतील विकासाच्या विविध पैलूंवर सादरीकरण करा. सादरीकरण करताना तुमच्या आत्ताच्या वयात आणि अर्भकावस्थेतील विकासात काय फरक आहे तो पण सादर करा.

शब्दसूची *Glossary*

**सामाजिक संकेत (Cue) :** अर्भकाला कृती करण्यास उद्युक्त करणारे

**जन्मत: (Congenital) :** एखादा रोग किंवा आरोग्यस्थिती जन्मतः असणे.

**स्थूल कारक कौशल्य (Gross Motor Skills) :** मोठे स्नायू वापरून करण्याच्या शारीरिक क्षमता.

**अर्भक उद्दीपन (Infant Stimulation) :** बाळाच्या दृष्टी, आवाज, स्पर्श, चव, गंध या संवेदनांना चालना देणाऱ्या कृती म्हणजे अर्भक उद्दीपन.

**खनिजीकरण (Ossification) :** हाडांवर क्षार-कॅल्शियम आणि फॉस्फरस यांचे थर जमून हाडे कठिण होण्याची प्रक्रिया

**संवादाची वाचापूर्व रुपे (Pre-speech forms) :** पहिला शब्द उच्चारण्यापूर्वी बाळ ज्या पद्धतीने संवाद साधते.

**संवेदी-कारक अवस्था (Sensory-motor stage) :** बोधात्मक विकासाची पहिला पायरी. जन्म ते २ वर्ष असणारी अवस्था. या काळात अर्भक पंचेंद्रिय व त्यांच्या कारक हालचाली याद्वारे ज्ञान मिळवतात.

**दुरावण्याची चिंता (Separation Anxiety) :** पालक किंवा संगोपनकर्ते यांच्यापासून दूर झाल्यास अर्भक अस्वस्थ होते.

**सामाजिक संदर्भ (Social Referencing) :** अर्भक त्याच्या सभोवतालच्या वातावरणातील संकेतांचा संदर्भ घेऊन वर्तन करते.

**सामाजिक स्मितहास्य (Social Smile) :** अर्भकाकडून आपुलकी प्रदर्शित करण्यासाठी केलेले जाणीवपूर्वक वर्तन

**अनोळखी व्यक्ति समोर असण्याची चिंता (Stranger Anxiety) :** एखादी अनोळखी व्यक्ति अर्भकाच्या समोर आली तर अर्भक घाबरते किंवा काळजी व्यक्त करते.

## स्वाध्याय

**सूचना :** या प्रकरणाच्या शेवटी दिलेला स्वाध्याय सोडवण्यासाठी तुम्ही तुमच्या इयत्ता ११वीच्या बालविकास पाठ्यपुस्तकाचा आधार घ्यावा कारण हे प्रकरण उजळणीसाठी आहे.

**प्र. १. दिलेल्या पर्यायांमधून सुयोग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.**

(१) शरीराच्या मध्यापासून दोन्ही बाजूंकडे होणाऱ्या विकासाला .............. विकास म्हणतात.

(अ) मस्तकानुवर्ती विकासाचा नमुना

(ब) अक्षानुवर्ती विकासाचा नमुना

(क) विकासाचा नमुना

(२) जन्मापासून व्यक्तिमधील बंदिस्त गुणवैशिष्ट्ये मोकळी होत जाणे या प्रक्रियेला .............. म्हणतात.

(अ) परिपक्वता (ब) अध्ययन

(क) शिकवण्यायोग्य क्षण

(३) नलिकाविरहीत ग्रंथी .............. असतात.

(अ) अंत:स्त्रावी (ब) कंठस्थ

(क) संप्रेरक

(४) हाडे कठिण होण्याच्या प्रक्रियेला .............. म्हणतात.

(अ) मेंदू पेशींची जोडणी

(ब) खनिजीकरण

(क) कुर्चा

(५) अर्भक त्याच्या सभोवतालच्या वातावरणातील व्यक्तिंकडून सामाजिक संकेत घेऊन वर्तन करतात त्याला ............. म्हणतात.

(अ) सामाजिक संदर्भ

(ब) सामाजिक विकास

(क) सामाजिकरण

**प्र. २. पुढील विधाने चूक का बरोबर ते लिहून कारणे द्या.**

(१) विकास पूर्वनिर्धारित असतो.

(२) मस्तकानुवर्ती विकासक्रमात विकास डोक्याकडून पायाकडे होतो.

(३) चालणे व बसणे ही व्यक्तिविशिष्ट कार्ये आहेत.

(४) जातीविशिष्ट कार्यांना प्रशिक्षणाची गरज नसते.

(५) अनुवंशिकता आणि वातावरण हे विकासातील प्रमुख घटक आहेत.

(६) शरीराला आवश्यक असणाऱ्या पोषक घटकांचा अभाव म्हणजेच 'कुपोषण'.

(७) जी बालके नियमित व्यायाम करतात ती बालके निरोगी, क्रियाशील आणि उत्तम कारक समन्वय दर्शवतात.

**प्र. ३. जोड्या लावा.**

| ग्रंथी | कार्य |
|---|---|
| (१) स्वादुपिंड | (१) स्त्रीच्या प्रजनन संस्थेच्या वाढ विकासावर नियंत्रण |
| (२) अंडाशय | (२) चयापचयाच्या गतीवर नियंत्रण |
| (३) मस्तिष्क/पियुषिका | (३) रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवणे |
| (४) रेतपिंड | (४) वाढीवर नियंत्रण |
| (५) कंठस्थ | (५) पुरुष प्रजनन संस्थेच्या वाढ व विकासावर नियंत्रण |

**प्र. ४. यादी करा.**

(१) विकासाची तत्त्वे

(२) वाढ व विकासावर परिणाम करणारे घटक

(३) अंतःस्त्रावी ग्रंथींची नावे

(४) कुपोषणाची कारणे

(५) प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया

(६) सामाजिक संकेत

**प्र. ५. रिकामे चौकोन पूर्ण करा.**

(१) अनुवंशिकता वाहून आणणारी दोरीसारखी रचना

| | | | |
|---|---|---|---|
| गु | | सु | |

(२) विकासातील मार्गदर्शक खूण

| | | | |
|---|---|---|---|
| | प | | ड |

(३) दोन मेंदूपेशींच्या मधून रासायनिक पदार्थाद्वारे संदेश नेऊन शरीराकडे पोचवण्यासाठी असलेली बारीक फट

| | | | |
|---|---|---|---|
| सि | | | स |

**प्र. ६. टीपा लिहा.**

(१) संवादाची वाचापूर्व रूपे

(२) अर्भकावस्थेतील सामाजिक विकास

(३) प्रसूतीपूर्व वातावरण

(४) अर्भकावस्थेतील कारक विकास

(५) प्रसूतीनंतरचे वातावरण

**प्र. ७. फरक लिहा.**

(१) जातीविशिष्ट व व्यक्तिविशिष्ट कार्ये

(२) मस्तकानुवर्ती व अक्षानुवर्ती विकास

(३) विश्रांती व व्यायाम

(४) दुरावण्याची चिंता व समोर असणाऱ्या अनोळखी व्यक्तिची चिंता

**प्र. ८. संज्ञा स्पष्ट करा.**

(१) अनुवंशिकता

(२) कुपोषण

(३) अंतःस्त्रावी ग्रंथी

(४) अर्भकाचे उद्दीपन

(५) वैकासिक मापदंड

**प्रकल्प / स्वयंअध्ययन**

- **वाढ व विकासावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचा तक्ता आपापल्या पद्धतीने सादर करा आणि वर्गातील दर्शन फलकावर लावा.**

# ३ पूर्वबाल्यावस्थेची ओळख

**दर्पण**

- तुम्ही लहान होतात तेव्हाचे एखादे तुमचे आवडते खेळणे तुम्हाला आठवते का?
- तुम्ही शाळेत जाण्याच्या वयाचे होतात तेव्हा तुम्ही कोणते प्रश्न तुमच्या पालकांना विचारत होतात?
- तुमच्या बालपणात तुम्हाला जे जे अनुभव आले त्या अनुभवांचा तुमचे दृष्टीकोन, वर्तन आणि भावना यावर काही परिणाम झाला आहे असे तुम्हाला वाटते का?
- या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आपोआपच तुम्ही तुमच्या अंतरंगात डोकवाल, तुमच्या स्मरणशक्तीला ताण द्याल. तुमच्या लक्षात येईल लहानपणापासूनचा तुमचा आत्तापर्यंतचा जीवनप्रवास किती सुंदर आहे!

बर! पूर्वबाल्यावस्थेच्या काळाविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आपण २ वर्षे ते ६ वर्षे या वयोगटावर लक्ष केंद्रित करु. पूर्वबाल्यावस्थेविषयी सविस्तर जाणून घेऊ.

पूर्वबाल्यावस्था २ वर्षे वयाला सुरू होते व ६ वर्षे वयाला या अवस्थेचा काळ संपतो. पूर्वबाल्यावस्था हा जलद गतीने बालकामधे बदल होण्याचा काळ आहे. बालकांची उंची वाढते, शक्ति वाढते. विचारशक्ति, भाषाकौशल्ये विकसित होतात. बालकांच्या सवयी, वर्तन विकसित होते. बालकाचा प्रवास परावलंबनाकडून हळूहळू स्वावलंबनाकडे सुरू होतो. फ्रॉईड, एरिकसन, पियाजे आणि व्हायगॉटस्की या प्रसिद्‌ध मानसशास्त्रज्ञांच्या मते पूर्वबाल्यावस्थेचा काळ बालकाच्या पुढील आयुष्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो.

## ३.१ पूर्वबाल्यावस्थेची वैशिष्ट्ये (Characteristics of Early Childhood)

### (१) समस्या वय (Problem age / troublesome age)



**चित्र ३.१ समस्या वय**

पूर्वबाल्यावस्थेतील बालके नेहमीच हट्टी, दुराग्रही, नकारात्मकता दर्शवणारे, त्रासदायक, आज्ञा न पाळणारे वर्तन करतात. आक्रस्ताळेपणा करतात. मत्सर प्रदर्शित करतात. या सर्व प्रकारच्या वर्तनात वारंवारीता दिसते, कारण हे वर्तनप्रकार स्वाभाविकपणे पूर्वबाल्यावस्थेतच दिसतात आणि म्हणूनच या वयाला 'समस्या वय' असे संबोधतात.

### (२) खेळणी वय (Toy age)



**चित्र ३.२ खेळणी वय**

पूर्वबाल्यावस्थेतील बालके त्यांचा बराचसा वेळ खेळण्यांबरोबर खेळण्यामधे घालवतात म्हणूनच पूर्वबाल्यावस्थेला 'खेळणी वय' असेही म्हणतात.

पूर्वबाल्यावस्थेतच खेळणी वय त्याच्या उच्च पातळीला पोचते आणि उत्तर बाल्यावस्थेत हळूहळू कमी होत जाते. खेळणी व अध्यापन साहित्याचा जास्तीत जास्त वापर पूर्वबाल्यावस्थेतील बालकांसाठी केला तर अर्थपूर्ण अध्ययन घडते. लहान बालकांसाठी चालवल्या जाणाऱ्या केंद्रांमधे खेळण्यांचे महत्त्व व मूल्य लक्षात घेऊन शैक्षणिक साधने व खेळणी वापरली जातात.

सध्याच्या काळात पालक बालकांच्या हातात मोबाईल फोन (स्मार्ट फोन) गेम्स खेळण्यासाठी खूप लहान वयापासून देत आहेत. स्मार्ट फोनच्या अतिरेकी वापरामुळे बालके अधिक आक्रमक, चिडचिडे वर्तन करतात. त्यांना डोळ्यांच्या अनेक समस्या उद्‌भवतात. अवधान क्षमता कमी होते.

### (३) टोळीपूर्व वय (Pregang age)

पूर्वबाल्यावस्थेला टोळीपूर्व वय असेही संबोधतात. बालक त्यांच्या समवयस्क गटाकडून सामाजिक वर्तन शिकतात आणि त्यांच्या सामाजिक वर्तनाचा पाया याच वयात घातला जातो. सामाजिक वर्तनाचा पाया रचला गेला की पुढे प्रौढ व्यक्ति म्हणून अत्यंत संघटीत सामाजिक आयुष्य घालवले जाते.

### (४) शालापूर्व वय (Preschool age)

पालक बालकांना साधारण तिसऱ्या वर्षी बालशाळेत पाठवतात. शिक्षणतज्ञ पूर्वबाल्यावस्थेला 'शालापूर्व' वय असे संबोधतात. शालापूर्व शिक्षणाचा हेतू बालकाचा सर्वांगीण विकास हा असतो. शारीरिक, कारक, बोधात्मक, भाषा, भावनिक आणि सामाजिक या विकासाच्या अंगांना उद्दीपन विविध कृतींद्‌वारे बालशाळेत दिले जाते, अनुभव आणि संधी पुरवल्या जातात. त्याचा उपयोग विविध खेळ आणि शोधवृत्तीला उद्दीपन देण्यासाठी होतो. औपचारिक शिक्षणासाठी बालशाळा बालकांना सिद्‌ध करतात.

### (५) प्रश्नवय, शोधवय आणि कुतूहल वय (Questioning, Exploration and Curiosity age)

सभोवतालच्या जगाबद्दल आणि वातावरणाबद्दल बालकाला खूप कुतुहल असते. बालकांना जाणून घ्यायचे असते की प्रत्येक गोष्टीचे कार्य कसे चालते, त्या कार्याचा ते बालक कसा भाग होऊ शकतात. बालक त्याचे पालक, शिक्षक, संगोपनकर्ते यांना खूप प्रश्न विचारतात. कोणतेही उत्तर दिल्यावरही 'का' हा प्रश्न त्यांना पडतोच.

### (६) अनुकरण वय (Imitative age)

बालक त्यांच्या सभोवतालच्या प्रौढ व्यक्ति, शिक्षक, समवयस्क, संगोपनकर्ते यांचे वर्तन, बोलणे, कृती याचे अनुकरण करतात.




**चित्र ३.३ अनुकरण वय**

## ३.२ बालकांच्या गरजा (Needs of Children)

पहिल्याच प्रकरणात तुम्ही मॅस्लो यांनी दिलेली गरजांची श्रेणी अभ्यासली आहे. त्याचीच एक उजळणी करुया.

### (अ) शारीरिक गरजा (Physiological needs)

भूक, तहान, झोप, वस्त्र, निवारा आणि आरोग्य या पायाभूत शारीरिक गरजा आहेत. पालक/संगोपनकर्ते यांची बालकांना अन्न, वस्त्र, निवारा आणि सुरक्षितता पुरवण्याची जबाबदारी असते.




चित्र ३.४ शारीरिक गरजा

### (१) भूक (Hunger)

बालकाच्या आयुष्यात भूक या गरजेला खूप महत्त्व आहे. ही प्राथमिक गरज आहे. पोषक, समतोल, आरोग्यपूर्ण आणि पुरेसा आहार मिळणे ही प्रत्येक बालकाची गरज आहे. भूक या गरजेची पूर्तता केल्याने निकोप विकासाला चालना मिळेल.

### (२) झोप (Sleep)

बालके विविध कृतींमध्ये गुंतलेली असतात. यामुळे झोप मिळणे महत्त्वाचे असते. झोप मिळाल्यामुळे जैव-रासायनिक पातळीचा समतोल राखला जातो आणि विविध कृतींसाठी उर्जा चिरंतन राखली जाते. बालकाच्या योग्य वाढ व विकासासाठी झोप मिळणे गरजेचे आहे.

### (३) वस्त्र (Clothing)

ऋतुमानानुसार कपड्यांची निवड करावी. अंगावर चांगली बसणारी पँट, इलॅस्टिक असणारी पँट लहान बालकांना सहजपणे घालता येते. कपड्यांची बटणे मोठी असतील तर लावणे आणि बटणे काढणे बालकांना सोपे जाते. कपडे व्यवस्थित अंगावर बसणारे असतील, खूप सैल किंवा घट्ट नसतील तर बालकांना मोकळेपणाने व आरामदायीपणाने हालचाली करता येतात.

### (४) निवारा (Shelter)

कुटुंब व बालके यांच्या आयुष्यात आरोग्य व स्वास्थ्यासाठी स्थिर आणि पुरेसा निवारा महत्त्वाची भूमिका बजावतो. कुटुंबातील सुरक्षित आणि संरक्षित वातावरण बालकाच्या सामाजिक आणि शैक्षणिक पैलूंवर परिणाम करते.

### (५) आरोग्य (Health)

आजारपण आले तर बालकाच्या वाढीवर परिणाम होऊन वाढ मागे पडते. योग्य आहार, स्वच्छता आणि आरोग्यपूर्ण स्वच्छतेच्या सवयी चांगल्या आरोग्याला चालना देतात. निरनिराळ्या रोगांपासून संरक्षण मिळण्यासाठी लसीकरण करावे त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याने लसीकरण वेळापत्रक पूर्णपणे पाळले जावे.

## (ब) मानसिक-सामाजिक गरजा (Psychosocial Needs)

प्रेम, वात्सल्य, आपुलकी, स्वीकृती, मनोरंजन आणि खेळ या लहान बालकांच्या मानसिक-सामाजिक गरजा आहेत.

### (१) प्रेम व वात्सल्य (Love and affection)

प्रेम व वात्सल्य ही बालकाची पायाभूत मानसिक-सामाजिक गरज आहे. पालकांकडून प्रेम व वात्सल्य ही गरजपूर्ती झाली नाही तर बालकांना दुर्लक्षित आणि

दु:खी वाटते. पालक, संगोपनकर्ते व इतर प्रौढ व्यक्ति यांच्याकडून प्रेम, वात्सल्य आणि भावनिक सुरक्षितता दिल्यावर बालकांमध्ये विश्वास निर्माण होतो.




**चित्र ३.५ प्रेम व वात्सल्य**

### (२) स्वीकृती (Acceptance)

सामाजिक मान्यतेसाठी बालके घरातील प्रौढ व्यक्ति किंवा इतरांचे लक्ष वेधवून घेण्याचा प्रयत्न करतात. स्तुती करणे आणि दोष देणे हे स्वीकृती आणि नाकारणे याचे मार्ग आहेत. स्तुती हा बक्षिसाचा प्रकार आहे तर दोष देणे शिक्षेचा प्रकार आहे. बालके मोठी होत जातात तशी पालकांकडून मिळणारी स्वीकृती खूप महत्त्वाची असते. मुलगा किंवा मुलगी यांना त्यांच्या वयाप्रमाणे स्वीकृती मिळण्याची गरज असते.

### (३) समवयस्क गट (Peers)

बालकाच्या सर्वांगीण विकासात बालकाचे समवस्क गटाशी संबंध प्रमुख भूमिका निभावतात. समवयस्क गटाबरोबर बालके विविध कौशल्ये शिकतात. उदा. संवाद कसा साधायचा, खेळणे, भावना प्रगट करणे आणि समस्या सोडवणे. खेळणी वाटून खेळणे, खाऊ वाटून खाणे किंवा इतर वस्तूसुद्धा वाटून वापरणे या गोष्टीही बालके शिकतात. ही कौशल्ये शिकल्याने बालकांना नवीन मित्र/मैत्रिणी मिळतात, संपूर्ण शालेय वयात स्वीकृतीही मिळते.



**चित्र ३.६ समवयस्क गट**

## ३.३ बालकांचे हक्क (Rights of Children)

संपूर्ण जगात लोकसंख्येबाबत भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०११ मधील जनगणनेच्या अहवालानुसार देशातील लोकसंख्येपैकी जवळपास एक तृतीयांश लोकसंख्या १८ वर्षांखालील बालके आहेत. आपल्या देशातील बालकांच्या गरजांची पूर्तता न होणाऱ्या बालकांची संख्या मोठी आहे. बालके ही देशाची संपत्ती आहे. बालकेच देशाचे भवितव्य घडवतात. कोणत्याही प्रकारचा छळ, तस्करी आणि गैरवापर या गोष्टींपासून संरक्षण मिळण्याचा बालकांना हक्क आहे. सरकारने बालकांसाठी अनेक संविधानिक सुविधा, संधी यांची उपलब्धता केलेली आहे. ज्यामुळे बालकांच्या आवडी जपल्या जातील आणि त्यांच्या एकात्मिक विकासाला आधार मिळेल. सर्व प्रकारची शारीरिक व मानसिक हिंसा/जुलूम, इजा किंवा छळ, दुर्लक्ष, गैरवर्तणूक, गैरवापर, लैंगिक छळ यांपासून संरक्षण मिळण्याचा बालकांना कायद्याने हक्क आहे. कायद्याने मिळणाऱ्या या संरक्षणामधे बालक-पालक संबंध, कायद्याच्या पालकांशी किंवा इतरांशी असणारे नातेसंबंध, संगोपनकर्त्याशी संबंध या नात्यांमध्येही कायद्याने संरक्षण मिळते. बरीच बालके आजारपण, रोग याला बळी पडतात आणि तेही केवळ पुरेसे अन्न, निवारा, वैद्यकीय सुविधा आणि विकासाला पोषक वातावरण न मिळण्यामुळे काही बालके अनाथ असतात तर काही बालके जात, समाज, धर्म, पंथ किंवा भाषा या कारणांमुळे समाजाकडून दुर्लक्षित राहतात.

**माहिती केंद्र**

**बालकांच्या संदर्भात मार्गदर्शक**

(१) ६ वर्षे ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व अनिवार्य असणे हा हक्क आहे. (कलम २१अ)

(२) १४ वर्षे वयापर्यंत कोणताही धोकादायक रोजगार मिळवण्यापासून संरक्षण मिळण्याचा हक्क (कलम २४)

(३) आर्थिक गरज म्हणून कोणत्याही वय किंवा शक्तिपेक्षा अनुचित असणाऱ्या व्यवसायामधे छळ करुन किंवा जबरदस्तीने पाठवण्यापासून संरक्षण मिळण्याचा हक्क. (कलम ३९ (इ))

(४) बाल्यावस्थेत व तरुण वयात कोणत्याही प्रकारे नैतिक आणि भौतिक त्याग न करता निकोप विकास होणे व त्यासाठी मुक्त वातावरण मिळणे, मान मिळणारे व खात्रीने संरक्षण देणारे वातावरण मिळणे यासाठी समान संधी व सुविधा मिळण्याचा हक्क (कलम ३९ (फ))

(५) वयाची ६ वर्षे पूर्ण होईपर्यंत सर्व बालकांना बालशिक्षण व बालसंगोपन मिळण्याचा हक्क (कलम ४५)

**संदर्भ :** http://www.haqcrc.org.child.right/constitution.of.India




**चित्र ३.७ बालकांचे हक्क**

### भारतीय संविधानानुसार बालकांचे हक्क

(१) समानतेचा हक्क (कलम १४)

(२) भेदभाव विरोधी हक्क (कलम १५)

(३) कायद्याच्या चौकटीत राहून वैयक्तिक स्वातंत्र्य मिळण्याचा हक्क (कलम २१)

(४) कोणत्याही धोकादायक रोजगाराच्या ठिकाणी १४ वर्षे वयाखालील बालकांना नेमू नये. (कलम २४)

(५) बंधनकारक मजूरीसाठी जबरदस्ती करणे, बालकांची तस्करी होणे यांपासून संरक्षित करण्याचा हक्क. (कलम २९)

(६) बालकांचे हक्क संरक्षित राहण्यासाठी योग्य कायदेशीर आणि प्रशासकीय उपाय करण्याची लवचिकता सरकारला आहे. (कलम ३७)

(७) सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचा गैरवापर होण्यापासून कमकुवत गटातील लोकांना संरक्षण मिळण्याचा हक्क. (कलम ४६)

(८) पोषक आहार, चांगले राहणीमान व सुधारीत सामाजिक आरोग्य याचा हक्क. (कलम ४७)

१९७४ मध्ये भारत सरकारने बालकांसाठीचे राष्ट्रीय धोरण स्वीकारले. या धोरणामधे बालकल्याणाकडून बालविकासाकडे लक्ष केंद्रित केले होते. समाजातील कमकुवत गटावर लक्ष केंद्रित करुन बालकांसाठी शिक्षण, आरोग्य, पोषक आहार आणि करमणूक यासाठीचे उपाय सरकारने हाती घेतले. जेव्हा ३० जानेवारी २००६ मध्ये महिला व बालविकास मंत्रालय अस्तित्वात आले त्यापूर्वी मनुष्यबळ मंत्रालयाकडे बालहक्क, संरक्षण आणि बालविकास यासाठीच्या सरकारच्या उपाययोजनांचे काम होते.

### जागतिक पातळीवर बालहक्क याचे दृश्यस्वरुप (Rights of Children on the Global Scene)

बालकांच्या आवडी सुरक्षित ठेवण्यासाठी १९४६ साली 'युनिसेफ' ही संस्था उभारुन महत्त्वाचे पाऊल उचलले. सार्वत्रिक घोषित मानवी हक्क १९४८ मध्ये जनरल असेंब्लीमधे स्वीकारले गेले. या घोषित करारांची आंतरराष्ट्रीय मानवहक्क करारामधे पूर्तता करून १९६६ मध्ये स्वीकारले. बालकांना अनेक बाबतीत संरक्षण मिळाले पाहिजे हे लक्षात घेऊन स्वीकृती होती. १९५९ मध्ये घोषित केलेले युनायटेड नेशन्सचे बालहक्क यांमधे सर्वप्रथम लिहिलेले विधान बालहक्कांच्या संरक्षणाबाबत आहे. यामधे कायद्याच्या चौकटीपेक्षा नैतिकतेचे दिशादर्शक आहे.

### यू एन घोषित बालकांचे हक्क

(१) समानतेचा हक्क

(२) विशेष संरक्षणाचा हक्क

(३) नाव, राष्ट्रीयत्त्व मिळण्याचा हक्क

(४) सामाजिक सुरक्षिततेचा हक्क

(५) विशेष गरजा असणाऱ्या बालकांची विशेष काळजी घेण्याचा हक्क

(६) प्रेम व समजून घेण्याचा हक्क

(७) शिक्षणाचा हक्क


(८) संरक्षण व मदत मिळण्याचा हक्क

(९) दुर्लक्ष होणे/नाकारले जाणे, दुष्टपणा/क्रुरता, गैरवापर याच्या विविध प्रकारांपासून संरक्षण मिळणे.

(१०) भेदभाव होईल अशा सर्व पद्धतींपासून संरक्षण मिळणे.

**कृती :**

शारीरिक गरजांची नावे मोकळ्या गोलांमधे भरा व प्रत्येकाचे एक उदाहरण लिहा.



**शब्दसूची *Glossary***

**मानसिक सामाजिक गरजा (Psychosocial Needs) :** मानसिक व सामाजिक घटकांसंदर्भात गरजा. उदा. प्रेम, वात्सल्य, आपुलकी आणि भावनिक आधार

## मुद्द्यांची उजळणी करा.

### (अ) पूर्वबाल्यावस्थेची वैशिष्ट्ये

- समस्या वय
- खेळणी वय
- टोळीपूर्व वय
- शालापूर्व वय
- प्रश्नवय, शोधवय आणि कुतुहल वय
- अनुकरण वय

### (ब) बालकांच्या गरजा

**शारीरिक गरजा**

- भूक
- झोप
- वस्त्र
- निवारा
- आरोग्य

**मानसिक–सामाजिक गरजा**

- प्रेम व वात्सल्य
- स्वीकृती
- समवयस्क गट

### (क) बालकांचे हक्क

- भारतीय संविधानानुसार हक्क
- जागतिक पातळीवरील दृश्य स्वरुपातील बालकांचे हक्क

## स्वाध्याय

**प्र. १. दिलेल्या पर्यायातून सुयोग्य शब्द निवडून वाक्य पूर्ण करा.**

(१) पूर्व बाल्यावस्था दोन वर्षे वयाला सुरू होते आणि ............... वर्षे वयाला पूर्ण होते.

(अ) ८ (ब) ६

(क) १०

(२) प्रेम व वात्सल्य ही बालकांची ............... गरज आहे.

(अ) मानसिक-सामाजिक

(ब) शारीरिक

(क) सामाजिक

(३) भारत सरकारने १९७४ साली ............... ची स्वीकृती केली.

(अ) राष्ट्रीय धोरण (ब) मानवी हक्क धोरण

(क) राज्य धोरण

**प्र. २. पुढील संज्ञा स्पष्ट करा.**

(१) समस्या वय

(२) खेळणी वय

(३) प्रश्न वय

(४) अनुकरण वय

(५) बालकांचे हक्क

(६) मानसिक-सामाजिक गरजा

**प्र. ३. जोड्या लावा.**

| अ | ब |
|---|---|
| (१) शारीरिक गरजा | (अ) पूर्वबाल्यावस्था |
| (२) मानसिक-सामाजिक गरजा | (ब) बालकांचे हक्क |
| (३) प्रश्नवय | (क) स्वीकृती |
| (४) समानता | (ड) निवारा |
| | (इ) उत्तर बाल्यावस्था |

**प्र. ४. शारीरिक आणि मानसिक-सामाजिक गरजा शोधा.**

स्वीकृती, भूक, निवारा, प्रेम व वात्सल्य, वस्त्र, समवयस्क गट, तहान, झोप, विश्रांती, आरोग्य

**प्र. ५. पुढील परिच्छेद वाचा व उत्तरे लिहा.**

पालक बालकांना साधारण तिसऱ्या वर्षी बालशाळेत पाठवतात. शिक्षणतज्ञ पूर्वबाल्यावस्थेला शालापूर्व वय असे संबोधतात. शालापूर्व शिक्षणाचा हेतू बालकाचा सर्वांगीण विकास हा असतो. शारीरिक, कारक, बोधात्मक, भाषा, भावनिक आणि सामाजिक या विकासाच्या अंगांना उद्दीपन विविध कृतींद्वारे बालशाळेत दिले जाते, अनुभव आणि संधी पुरवल्या जातात. त्याचा उपयोग विविध खेळ आणि शोधवृत्तीला उद्दीपन देण्यासाठी होतो. औपचारिक शिक्षणासाठी बालशाळा बालकांना सिद्ध करतात.

(१) पूर्वबाल्यावस्थेला शालापूर्व अवस्था असे का संबोधतात?

(२) पूर्वशालेय शिक्षण बालकाला औपचारिक शिक्षणासाठी कसे तयार करते?

**प्र. ६. तुमच्या शब्दात स्पष्टीकरण लिहा.**

(१) बाल्यावस्थेचा काळ मानवी जीवनात सर्वात महत्त्वाचा का असतो?

(२) बालकांचे हक्क सविस्तरपणे स्पष्ट करा.

**प्रकल्प / स्वयंअध्ययन**

- **बालशिक्षणाविषयी सरकारी धोरणांची माहिती गोळा करा आणि अहवाल तयार करा.**

# ४ पूर्वबाल्यावस्थेतील शारीरिक आणि कारक विकास



अकरावीत विकासाच्या अंगांच्या संकल्पनेची ओळख तुम्हाला झाली आहे. आपल्याला माहित आहे की विकास हा वेगवेगळ्या घटकांमध्ये विभागलेला असतो. त्यातील अर्भकावस्थेतील शारीरिक आणि कारक विकास या घटकाचा आपण अभ्यास केला आहे. या घटकाविषयी जे ज्ञान आपल्याला आहे ते तपासून पाहू या.

**अर्भकावस्थेतील शारीरिक व कारक विकासातील वैकासिक टप्पे (Milestones of Physical and Motor development during Infancy)**

(१) आधाराने बसायला सुरुवात करणे.
(२) खेळणी धरणे आणि हलवणे.
(३) वेगाने आणि कौशल्यपूर्ण रांगणे.
(४) उभे राहणे, आधारासाठी मोठ्या व्यक्ती किंवा फर्निचरचा आधार घेणे.
(५) एकटे चालणे.
(६) चालताना ओढता येणाऱ्या आणि ढकलता येणाऱ्या खेळण्यांचा आनंद घेणे.
(७) चमच्याने खाणे.
(८) पळायला सुरुवात करणे.
(९) पळणे.
(१०) चढणे.

यापूर्वी मिळालेल्या ज्ञानाप्रमाणे हे आपल्याला स्पष्टपणे लक्षात येते की अर्भकावस्थेत वाढ खूप जलद गतीने होते. आता आपण 'शालापूर्व' काळातील शारीरिक आणि कारक विकासाविषयी सविस्तरपणे समजून घेऊयात.

**दर्पण**

तुमच्या शालापूर्व काळाबाबत विचार करा. तुमच्या असे लक्षात येईल की त्या वयात काही बालके तुमच्यापेक्षा उंच, काही बुटकी, काही जाड, काही बारीक तर काही जण बलवान तर काही जण कमजोर होती. याची कारणे कोणती असू शकतात?

## ४.१ पूर्वबाल्यावस्थेतील शारीरिक विकास (Physical Development in Early Childhood)

शारीरिक विकासामध्ये शरीरावर नियंत्रण विकसीत करणे, विशिष्ट स्नायू आणि शरीर यात समन्वय याचा समावेश होतो. शरीराची वाढ आणि कौशल्यांचा विकास यात मेंदू, स्नायू आणि ज्ञानेंद्रिय यांच्याशी संबंधित विकास असतो. उदा. बालकाच्या पंचेंद्रियांचा म्हणजे दृष्टी, स्पर्श, गंध, आवाज आणि चव यांच्या विकासाबरोबर जगाविषयी ज्ञान मिळवते. शारीरिक विकास हा आरोग्य आणि स्वास्थ्याचे महत्त्वाचे दर्शक आहेत.


## ४.२ शारीरिक विकासाचे पैलू (Aspects of Physical Development)

अनुवंश आणि वातावरण या दोन्हीचा शारीरिक विकासावर परिणाम होतो. शारीरिक विकासाच्या सर्व पैलूंमध्ये व्यक्तीभिन्नता दिसून येते.

### (अ) वजन आणि उंची (Height and Weight)

शालापूर्व अवस्थेत बालकांची वाढ स्थिर असते. प्रत्येक वर्षी सर्वसाधारण त्यांच्या उंचीत ६.३५ सेमी आणि २.२७ ते ३.१८ किलोग्रॅम वजनात वाढ झालेली

दिसून येते. शालापूर्व बालक जसे मोठे होत जाते तसे प्रत्येक वाढत्या वर्षात उंची वाढण्याचे प्रमाण वाढते तर वजन वाढण्याचे प्रमाण कमी होते. या काळात मुले आणि मुली या दोघांच्याही धडाची उंची वाढत असल्यामुळे बारीक दिसू लागतात. गुबगुबीत दिसणाऱ्या बालकांचा गुबगुबीतपणा बाल्यावस्थेच्या शेवटी कमी होतो. त्यांचे बाळसे कमी होते आणि ते लहान व बारीक दिसू लागतात. हात आणि पायाची लांबी वाढते आणि स्नायूंना बळकटी येण्यास सुरुवात होते.




**चित्र ४.१ वजन आणि उंची**

तीन वर्षाच्या शालापूर्व बालकाची वाढ सर्वसाधारणपणे उंची ९६ सेंमी आणि वजन १४.५१ किलोग्रॅम झालेले दिसते. पुढच्या तीन वर्षात, निरोगी शालापूर्व बालकाच्या उंचीत ५ ते ७ सेंमी आणि वजनात १.८१ ते २.२७ किलोग्रॅमनी प्रत्येक वर्षी वाढ झालेली दिसते. वयाच्या ६व्या वर्षी, उंची ११७ सेंमी आणि वजन २१ किलोग्रॅम झालेले दिसते. हे आकडे सर्वसाधारण आणि प्रत्येक बालकामध्ये भिन्न असतात. सामाजिक आर्थिक दर्जा, पोषण, आरोग्य आणि अनुवंश या घटकांवर ते अवलंबून असतात.

### (ब) शारीरिक प्रमाणबद्धता (Body proportion)



**चित्र ४.२ शारीरिक प्रमाणबद्धता**

बालकाचे बाळसे नाहीसे होते. चेहऱ्याची ठेवण लहानच राहते. शरीराचा आकार शंकूप्रमाणे दिसू लागतो. खांदे रुंद होऊ लागतात. हात आणि पायाची लांबी वाढू लागते आणि पंजा व पावले मोठी होऊ लागतात. पूर्वबाल्यावस्थेत शरीराच्या बांधणीमधील फरक प्रथमच दिसून येऊ लागतो. काही बालके स्थूलप्रधान (Endomorphic) काही स्नायूप्रधान (Mesomorphic) तर काही अस्थिप्रधान (Ectomorphic) दिसू लागतात.


### (क) स्नायूंचा विकास (Muscular Development)

बालकांचे स्नायू मोठे, बळकट आणि त्यांच्या वजनात वाढ होताना सुरुवात झालेली दिसते. लहान आणि मोठ्या स्नायूंच्या विकासाला जलदगतीने सुरुवात होते. बालके स्थूल (मोठ्या) स्नायूंची कौशल्ये जसे चालणे, उड्या मारणे, चढणे आणि तोल सांभाळणे या क्रिया करायला शिकतात. शिवाय ते सूक्ष्म (लहान) स्नायूंची कौशल्ये जसे चित्र काढणे, मणी ओवणे, रंगवणे या क्रिया देखील करायला शिकतात.

### (ड) अस्थिसांगाड्याचा विकास (Skeletal Development)

अस्थिंमध्ये खनिजीकरण प्रक्रिया (ossify) शरीराच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या गतीने होते. संपूर्ण बाल्यावस्थेत अस्थि हळूहळू कठीण होत जातात. खनिजीकरणाची गती मुले आणि मुलींमध्ये वेगवेगळी असते.

### (इ) मेंदूचा विकास (Brain Development)




**चित्र ४.३ मेंदूचा विकास**

मेंदू आणि मज्जासंस्थेचा सतत होणारा विकास पूर्वबाल्यावस्थेत होणाऱ्या शारीरिक विकासातील एक सर्वात महत्वाचा विकास आहे. जरी पूर्वबाल्यावस्थेत

मेंदूची वाढ सतत होत असली तरी अर्भकावस्थेत त्याची जेवढी जलद गतीने वाढ होते तेवढी पूर्वबाल्यावस्थेत गती नसते.

तिसऱ्या वर्षात पोहचेपर्यंत बालकाच्या मेंदूचे आकारमान प्रौढांच्या मेंदूच्या १/३ होते. तर ६व्या वर्षात पोहचेपर्यंत त्याचे आकारमान प्रौढांच्या मेंदूच्या आकारमानाच्या ९५% झालेले असते. मेंदूतील काही अंतर्गत बदलामुळे डेन्ड्राईट (dendritic) जोडणीमध्ये वाढ होते. मज्जापेशीवरील आवरण व मज्जापेशीवरील मेदाचे आवरण तयार होण्याच्या प्रक्रियेला माएलिनेशन (myelination) म्हणतात. माएलिनेशनची प्रक्रिया मज्जासंस्थेकडून होणाऱ्या संदेशवहनाची गती आणि कार्यक्षमता यांची वाढ करण्यास जबाबदार असते. बालकांच्या अनेक क्षमतांच्या विकासामध्ये ही प्रक्रिया महत्त्वाची असते. अर्भकावस्था आणि शैशवावस्था यामध्ये सुरू झालेला मेंदूचा विकास संपूर्ण पूर्वबाल्यावस्थेत सतत सुरुच राहतो.

शरीराच्या इतर अवयवांपेक्षा मेंदूची वाढ जास्त जलद गतीने होते. पूर्वबाल्यावस्थेच्या शेवटापर्यंत मेंदूच्या काही भागात महत्त्वपूर्ण वाढ झालेली दिसते. उदा. महासंयोजी पिंड (Corpus Callosum) ज्यामुळे मज्जातंतूच्या गठ्ठ्याने मेंदूचे दोन्ही अर्धगोल जोडलेले असतात, ते जाडसर होतात. पूर्वबाल्यावस्थेत महासंयोजी पिंडाची संपर्कस्थाने सिनॅप्स् (synapse) आणि माएलिनेशन (myelination) यांची निर्मिती उच्च पातळीवर असलेली दिसते. महासंयोजी पिंडामुळे शरीराच्या दोन्ही बाजूंच्या हालचालींमध्ये समन्वय राहतो. विचाराबाबतचे घटक आकलन, अवधान, स्मरण, भाषा तसेच समस्या परिहार यासारख्या महत्वाच्या कार्यासाठी आधार मिळतो.

मेंदूचे बाह्यावरण (cortex of the brain) दोन भागांचे बनलेले असते. त्यांना अर्धगोल (hemisphere) म्हणतात. हे अर्धगोल विविध कार्य नियंत्रित करतात. वयाच्या ३ ते ६ या वर्षात डाव्या अर्धगोलामध्ये (Left Hemisphere) विद्युतवाहक कृती सर्वात जलद गतीने चालू असलेल्या दिसून येतात. डावा अर्धगोल हा शाब्दिक क्षमता जसे बोलणे, वाचणे, विचार करणे आणि कारणमीमांसा याला जबाबदार असतो. उजवा अर्धगोल (Right Hemisphere) हा अशाब्दिक क्षेत्र जसे अवकाशविषयक क्षमता, अंतराविषयी अंदाज करणे, नकाशावाचन, भौतिक आकाराची ओळख, चित्रकला, संगीत आणि भावनांची अभिव्यक्ती या क्षमता विकसीत करते. डावखोऱ्या व्यक्तींमध्ये मात्र ही संरचना नेमकी विरुद्ध असते.

हस्तता (Handedness) किंवा एका विशिष्ट हाताचा वापर पूर्वबाल्यावस्थेपर्यंत निश्चित झालेला नसतो. लहान मेंदू / अनुमस्तिष्काला (Cerebellum), मेंदूच्या बाह्यपटलाच्या फ्रंटल (Frontal) आणि परायटल (Parietal) लोब्ज् (lobes)शी जोडणाऱ्या तंतूची वाढ होऊन त्यावरील माएलिनचे आवरण तयार होते यामुळे पूर्वबाल्यावस्थेमधील कारक समन्वय किंवा स्नायूंतील समन्वयामध्ये लक्षवेधी वाढ झालेली दिसते.

### (फ) दातांचा विकास (Development of teeth)

बहुतेक सर्व बालकांमध्ये वयाच्या अडीच वर्षापर्यंत दुधाचे /अस्थायी वीस दात आलेले दिसतात. त्यातील दहा दात वरच्या जबड्यात व दहा दात खालच्या जबड्यात असतात. जशी बालकाची वाढ होते तसा त्याचा जबडा मोठा होऊ लागतो व दुधाच्या / अस्थायी दातांमध्ये फटी दिसतात. ज्यामुळे कायमस्वरूपी दातांसाठी जागा निर्माण होते.

वयाच्या ६व्या वर्षानंतर अस्थायी किंवा दुधाचे दात पडून त्याची जागा कायमस्वरुपी दात घेऊ लागतात. सर्वसाधारणपणे पूर्वबाल्यावस्थेच्या शेवटी बालकांमध्ये पुढचे एक किंवा दोन कायमस्वरूपी दात येतात आणि पडलेल्या दातांच्या जागी कायमस्वरूपी दात येतात.

## ४.३ शारीरिक विकासावर परिणाम करणारे घटक (Factors influencing Physical Development)

### (अ) स्वास्थ्य (Health)

सर्वसाधारणपणे शालापूर्व अवस्थेमधील बालके निरोगी असतात. पण त्यांच्यात आरोग्याबाबत काही समस्या निर्माण होऊ शकतात. जसे सर्दी, खोकला, पोटदुखी यासारखे किरकोळ आजार होऊ शकतात. त्यांचा कालावधी दोन आठवड्यापेक्षा जास्त नसतो.

फुप्फुसे अजून पूर्णपणे विकसित झालेली नसल्यामुळे सर्वसाधारणपणे या वयात बालकांना श्वसनाचे आजार झालेले दिसतात. बाल्यावस्थेतील बहुतेक आजारांना डॉक्टर किंवा नर्सच्या परिचर्याची गरज नसते. उलट सर्दी, खोकल्यासारखे किरकोळ आजार बालकांना शारीरिक ताण, शारीरिक स्वास्थ्यासंबंधी जुळवून घेण्याचे कौशल्य शिकण्यास मदत करतात.

### (ब) पोषण (Nutrition)

वाढ आणि विकासासाठी शालापूर्व अवस्थेतील बालकांना पोषक आहाराची आवश्यकता असते. दूध हा कॅल्शियम (Calcium) चा सर्वात उत्तम स्रोत आहे. बळकट आणि निरोगी दात व अस्थि यांच्या विकासासाठी कॅल्शियमची गरज असते. चोथा / तंतू हा पोषणाचा अजून एक महत्त्वाचा स्रोत आहे. फळ, भाज्या, धान्य आणि कडधान्य हे तंतूमय / चोथायुक्त पदार्थ आहेत. स्वास्थ्यपूर्ण आहाराच्या सवयी आणि चांगल्या पोषणाची निवड ही सामान्य विकासासाठी आवश्यक आहे. कुपोषणामुळे पूर्वबाल्यावस्थेतील वाढ आणि विकास कमजोर होतो. त्यामुळे पालक आणि संगोपनकर्त्यांनी बालकाचे पोषण योग्य आहाराने पूर्ण करणे आवश्यक आहे.

### (क) लसीकरण (Immunization)

बालकांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या आजारांपासून संरक्षण होण्यासाठी 'लसीकरण' एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम आहे. वैद्यकीय प्रतिबंध करण्यासाठी लसीकरण ही सेवा प्रत्येक बालकासाठी सुचवलेली आहे. ज्या बालकांना लवकरच्या वयात लसीकरण केले जाते त्यांची वाढ लसीकरण न केलेल्या बालकांपेक्षा जलद गतीने होते.

### (ड) विश्रांती (Rest)

पूर्वबाल्यावस्थेमध्ये बालकाला १० ते १२ तास झोप मिळणे गरजेचे असते. कारण बालक ज्यावेळी झोपते त्यावेळी त्याच्या वाढीस आवश्यक संप्रेरके रक्तात स्त्रवण्याची पातळी सर्वात जास्त असते. बालकाच्या शरीराला झोप आवश्यक असते. बालक झोपेपासून वंचित राहिल्यास वाढीसाठी आवश्यक संप्रेरके कमी स्त्रवतात. ज्याचा परिणाम शारीरिक वाढीवर झालेला दिसू शकतो.

### (इ) वातावरण (Environment)

संपूर्ण आयुष्यात कुटुंब, हवामान, अन्न, भौगोलिक वातावरण, सामाजिक-आर्थिक दर्जा यासारखे वातावरणीय घटक बालकाच्या वाढ आणि विकासावर परिणाम करतात.

### (फ) अनुवंश (Heredity)

व्यक्तीगत शारीरिक विकासावर अनुवंशिकता जास्त प्रभाव टाकते. जनुके हे खऱ्या अर्थाने अनुवंशिकता एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वाहून नेणारे असतात. ही जनुके उंची, वजन, त्वचेचा रंग, डोळ्याचा रंग, केस आणि मधुमेह, हृदयविकार, दमा यासारख्या अनुवंशिक आजार या घटकांचे वहन करतात.

## ४.४ पूर्वबाल्यावस्थेतील कारक विकास (Motor Development in Early Childhood)

कारक विकास (Motor Development) शारीरिक वाढ, हाडांची व स्नायूंची बळकटी, हालचालींची क्षमता आणि वातावरणातील गोष्टींना स्पर्श करणे याच्याशी संबंधित असतो.

**हे तुम्हाला माहिती आहे का?**

१९७८ साली जागतिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत लसीकरण कार्यक्रमाची भारतात प्रथम ओळख झाली. घटसर्प (Diphtheria), पेट्र्युसीस (Petrussis), धर्नुवात (Tetanus), पोलिओ (Polio), गोवर (Measles), बालवयातील क्षयरोग (Childhood Tuberculosis), हिपॅटॅटीस ब (Hepatitis B), हिमोफेलिक इन्फुन्झा (Heamophilic influenza Type B) टाईप ब आणि अतिसार (Diarrhoea) या सात आजारांवर भारत सरकारतर्फे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लसीकरण केले जाते.

पूर्वबाल्यावस्था हे कौशल्य शिकण्यासाठीचे आदर्श वय आहे. या वयात बालकांना पुनरावृत्ती करायला आवडते. या वयात बालकांना आव्हाने स्वीकारायला आवडते. तसेच त्यांचे शरीर अजूनही लवचिक असते. परिपक्वतापूर्ण तयारी, संधी व मार्गदर्शन ही कौशल्य शिकण्यासाठी आवश्यक असते. यावर बालकांनी काही विशिष्ट कौशल्ये शिकणे काही प्रमाणात अवलंबून असते. सर्वसाधारणपणे पूर्वबाल्यावस्थेत जी हस्त व पाद कौशल्ये आत्मसात केली जातात ती खालीलप्रमाणे –

### (अ) हस्त/हाताची कौशल्ये (Hand Skills)

पूर्वबाल्यावस्थेमध्ये बालके दात घासणे, केस विंचरणे, आंघोळ करणे, चेंडू फेकणे व पकडणे, कागद कापणे, मातीकाम, लिहिणे, चित्र काढणे आणि रंगवणे यासारख्या कौशल्यांमध्ये निष्णात होतात. वयाच्या तिसऱ्या वर्षी बालकांमध्ये स्नायूंवरील नियंत्रण आणि समन्वय विकसीत झालेला असतो. चार वर्षाच्या बालकांमध्ये समन्वयाची क्षमता आणि हाताचा जास्तीत जास्त कार्यक्षमतेने वापर दिसून येतो.

### (ब) पाद/पायाची कौशल्ये (Leg skills)

एकदा बालकाला चालता यायला लागले की त्यांचे लक्ष पायाच्या इतर हालचाली शिकण्याकडे केंद्रीत होते. पूर्वबाल्यावस्थेच्या शेवटी, बालके पळणे, टुणटुण उड्या मारणे, दोरीवरच्या उड्या मारणे आणि चढणे या कृती जास्त सफाईदारपणे करायला शिकतात. याशिवाय तोल सांभाळणे, कोलांट्या उड्या मारणे, स्केटींग, नृत्य करणे, सायकल चालवणे यासारखी कौशल्ये आत्मसात करतात.

## ४.५ कारक विकासावर परिणाम करणारे घटक (Factors influencing Motor Development)

### (अ) शरीराचे आकारमान (Body size)

शरीराचे आकारमान विविध कारक कौशल्ये शिकण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. जी बालके स्नायूप्रधान (Mesomorphic) शरीर यष्टीची असतात अशा बालकांना विशिष्ट कौशल्ये विकसित करण्यास पुरेशी संधी असते. अस्थिप्रधान (Ectomorhic) शरीरयष्टीच्या बालकांपेक्षा ही बालके लवकर आणि जास्त चांगल्या प्रतीची कारक कौशल्ये शिकतात. स्नायूप्रधान बालकांमध्ये जास्त ताकद व शक्ती असल्यामुळे कौशल्ये लवकर शिकतात. अस्थिप्रधानमध्ये ताकद आणि सहनशक्ती कमी असते. त्याचवेळी मेदप्रधान (Endomorphic) शरीरयष्टी

**कृती :**

**पूर्वशालेय अवस्थेतील बालकांमध्ये हस्तकौशल्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील कृती आयोजित करु शकतात. या काही साध्या कृती तुम्ही करून बघू शकता.**

- सोपी चित्रकोडी (jigsaw puzzles) सोडवणे.
- खडू किंवा तेलकट खडू वापरून रंगवणे.
- वाळूचा किल्ला करणे.
- वेगवेगळ्या आकाराच्या भांड्यामध्ये पाणी ओतणे.
- बाहुलीला कपडे घालणे.
- चांदणी किंवा हिऱ्याच्या आकारासारखे भौमितिक आकार छापणे किंवा गिरवणे.
- ब्रश आणि बोटांच्या साहाय्याने रंगवणे.
- मातीकाम
- बरेच ठोकळे वापरून गुंतागुंतीची रचना करणे.

बेडौल आणि बेढब असते. स्थूल शरीर आणि कमजोर स्नायूंमुळे बालके लवकर दमतात.

### (ब) तयारी (Readiness)

विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी नसा आणि स्नायू यांचे परिपक्वन असणे आवश्यक असते. एखादे विशिष्ट कौशल्य शिकण्यास जेव्हा बालक शारीरिकदृष्ट्या तयार होते तेव्हा ते कौशल्य लवकर शिकते. उदा. जोपर्यंत बालक तेलकट खडू किंवा पेन्सिल धरण्यावर नियंत्रण विकसित करत नाही तोपर्यंत ते चित्र काढू किंवा मुळाक्षरे लिहू शकत नाही.

शारीरिक तयारी बरोबरच बालकाची मानसिक तयारी आणि उपलब्ध वातावरण सुद्‌धा कौशल्ये शिकण्यास फायदेशीर ठरते. विविध कारक कौशल्ये जलद गतीने विकसित करण्यास कुटुंबातील व पूर्व प्राथमिक शाळेतील आधार किंवा पाठिंबा देणारे वातावरण बालकाला समर्थ बनवते.

### (क) प्रेरणा (Motivation)

विविध कौशल्ये जलद गतीने विकसित करण्यात पालक, संगोपनकर्ते आणि वडीलधारी व्यक्ती यांनी केलेले कौतुक आणि दिलेली प्रेरणा महत्त्वाची भूमिका पार पाडते.

### (ड) मार्गदर्शन (Guidance)

संगोपनकर्त्याकडून मिळणारे योग्य मार्गदर्शन, बालकास नवीन कारक कौशल्ये जास्त कौशल्यपूर्णरित्या विकसित करण्यास प्रेरीत करते.

### (इ) अवधान (Attention)

सर्व कारक कौशल्ये शिकताना एकाग्रता मूलभूत आधार असते. कौशल्ये आत्मसात करताना आणि त्याचा सराव करताना बालकाची कृतीमध्ये एकाग्रता असणे गरजेचे असते.

### (फ) अभिप्राय / प्रत्याभरण (Feedback)

बालकाने एखादे कौशल्य शिकल्यावर त्याला मिळणारा सकारात्मक अभिप्राय त्याच्यात उर्जा आणि उत्साह निर्माण करतो.

### (ग) संधी (Opportunities)

पालक आणि संगोपनकर्त्यांनी विविध कारक कौशल्ये शिकण्यासाठी बालकांना संधी पुरवणे आवश्यक असते.

### (ह) सराव (Practice)

नव्याने शिकलेल्या कारक कौशल्यात प्रभुत्व मिळवण्यासाठी जास्तीत जास्त वेळा सराव करणे आणि प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर किती वेळा सराव केला त्यापेक्षा तो कशा दर्जाचा होतो हे तितकेच महत्त्वाचे आहे.

### कृती

**तुमच्या शेजारी राहणाऱ्या पूर्वशालेय गटातील बालकांना कारक विकासाच्या काही कृती करण्यास सांगू शकता. खालील काही कृती तुम्ही करून बघू शकता.**

**कारक विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या कृती**

१. चेंडू फेकणे, तीन चाकी सायकल चालवणे आणि पेन्सिल वापरणे.
२. स्वतःचे कपडे घालणे आणि काढणे.
३. जेवणानंतर टेबलावरील ताटे उचलणे.
४. चित्र काढणे, मणी ओवणे, कात्रीने कागद कापणे यासाठी बालकांना सराव देणे.
५. खेळणे, झोका खेळणे, पळणे आणि उड्या मारणे.
६. स्वतःचे स्वतः मोजे आणि बूट घालणे.

## ४.६ कारक कौशल्ये (Motor skills)

कारक कौशल्ये शरीराच्या हालचालींची क्षमता आणि वस्तू कौशल्यांनी हाताळणे याच्याशी संबंधित असतात. पूर्वबाल्यावस्थेत कारक कौशल्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली दिसून येते. स्थूल कारक आणि सूक्ष्म कारक असे दोन मूलभूत प्रकार दिसून येतात. या दोन्ही प्रकारच्या कौशल्यांत या वयात खूप जास्त प्रमाणात सुधारणा झालेली दिसून येते. कारक कौशल्यांचा विकास मेंदू आणि संपूर्ण मज्जासंस्थेशी जोडलेला असतो. कारक कौशल्यांच्या विकासात जनुकांचा सहभाग, परिपक्वन आणि वातावरण यांचे योगदान असते.

### (अ) स्थूल कारक कौशल्ये (Gross Motor Skills)

स्थूल कारक कौशल्ये शरीरातील मोठ्या स्नायूंच्या गटावर केंद्रीत असतात. उदा. हात आणि पाय. तोल सांभाळणे, पळणे, उड्या मारणे यासारख्या मोठ्या हालचालींमध्ये त्यांचा समावेश होतो.

तिसऱ्या वर्षापर्यंत उड्या मारणे, पळणे आणि दोरीवरच्या उड्या मारणे यासारख्या विविध कौशल्यांवर प्रभुत्व मिळवतात. चार ते पाच वर्षापर्यंत त्यांचे स्नायूंवर नियंत्रण आलेले असते. उदा. चौथ्या वर्षापर्यंत, बालक त्यांनी फेकलेला चेंडू त्याचा मित्र पकडू शकेल इतपत अचूकपणे चेंडू त्याच्याकडे फेकू शकतो. पाच वर्षाला तीनचाकी सायकल चालू शकते आणि पायऱ्या चढू शकते. स्थूल स्नायूंच्या समन्वयाच्या विविध घटकांबाबत मुले आणि मुलींमध्ये फरक दिसून येतो. उदा. सारख्या वयाच्या बालकांमध्ये मुले मुलींपेक्षा जास्त चांगल्या रितीने चेंडू फेकतात तसेच जास्त उंच उडी मारतात.

### (ब) सूक्ष्म कारक कौशल्ये (Fine motor skills)

यामध्ये मुख्यतः हात, बोटे, अंगठा व डोळे यांच्या लहान हालचाली आणि लहान कृतींमधील समन्वयातील समर्थता याचा समावेश होतो.

सूक्ष्म कारक कौशल्ये यात विविध कृती; जसे बटणे लावणे, काटा-चमच्यांचा वापर करणे, कात्रीच्या साहाय्याने कापणे, बुटाची लेस बांधणे, खेळणे पकडणे, पेन्सिलने लिहिणे, माळा तयार करणे, मणी ओवणे किंवा फुले तोडणे यांचा समावेश होतो.

**अब्लर्ट बँड्यूरा (Albert Bandura's)** यांच्या **'सामाजिक निरीक्षणात्मक अध्ययन सिद्धांतांनुसार'** बालकांमधील नवीन कौशल्यांच्या विकासासाठी खालील कृती फायदेशीर असतात.

(१) इतरांच्या वर्तनाचे निरीक्षण करणे.

(२) वर्तनाची मानसिक प्रतिमा तयार करणे.

(३) वर्तनाचे अनुकरण करणे.

(४) वर्तनाचा सराव करणे.

(५) वर्तनाच्या पुनरावृत्तीसाठी प्रेरीत करणे.



**चित्र ४.४ स्थूल कारक कौशल्ये**

## मुद्द्यांची उजळणी करा.

**शारीरिक विकासाचे पैलू**

- वजन आणि उंची
- शरीराची प्रमाणबद्धता
- स्नायूंचा विकास
- अस्थिसांगाड्याचा विकास
- मेंदूचा विकास
- दातांचा विकास

**शारीरिक विकासावर परिणाम करणारे घटक**

- स्वास्थ्य
- पोषण
- लसीकरण
- विश्रांती
- वातावरण
- अनुवंश

**कारक विकास**

- हस्तकौशल्य
- पादकौशल्य

**कारक विकासावर परिणाम करणारे घटक**

- शरीराचे आकारमान
- तयारी
- प्रेरणा
- मार्गदर्शन
- अवधान
- संधी
- सराव

**कारक कौशल्ये**

- स्थूल कारक कौशल्ये
- सूक्ष्म कारक कौशल्ये

### शब्दसूची *Glossary*

**महासंयोजी पिंड (Corpus Callosum) :** नसातंतूचा गठ्ठा जो मेंदूच्या दोन्ही अर्धगोलांना जोडलेला असतो.

**अस्थिप्रधान (Ectomorphic) :** बारीक शरीरयष्टी, हडकुळा

**मेदप्रधान (Endomorphic) :** स्थूल (जाड) शरीरयष्टी

**स्नायूप्रधान (Mesomorphic) :** स्नायूयुक्त शरीरयष्टी

**कारक कौशल्ये (Motor skills) –** शरीराच्या हालचालींची क्षमता आणि वस्तूंची योग्य पद्धतीने हाताळणी.

## स्वाध्याय

**प्र. १. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा.**

(१) बाळाचे बाळसेदार दिसणे ............... मध्ये दिसेनासे होते.

(अ) अर्भकावस्था (ब) पूर्वबाल्यावस्था

(क) उत्तर बाल्यावस्था

(२) वयाच्या ............... वर्षी, प्रौढांच्या मेंदूच्या आकाराच्या ९५% मेंदू विकसित झालेला असतो.

(अ) ६ (ब) १०

(क) ८

(३) वयाच्या .............. वर्षांनंतर, बालकाचे दूधाचे (अस्थायी) दात पडून कायमस्वरुपी दात येतात.

(अ) ४ (ब) ५

(क) ६

(४) कौशल्ये शिकण्यासाठी ............... हे आदर्श वय आहे.

(अ) पूर्वबाल्यावस्था (ब) उत्तर बाल्यावस्था

(क) अर्भकावस्था

**प्र. २. संज्ञा स्पष्ट करा.**

(१) कारक कौशल्ये

(२) स्थूल कारक कौशल्ये

(३) सूक्ष्म कारक कौशल्ये

(४) शारीरिक प्रमाणबद्धता

(५) हस्तता

(६) पोषण

(७) लसीकरण

(८) कारक विकास

(९) हस्तकौशल्ये

(१०) पादकौशल्ये

**प्र. ३. जोड्या लावा.**

| अ | ब |
|---|---|
| (१) मेदप्रधान | (अ) बुटाची लेस बांधणे |
| (२) स्नायूप्रधान | (ब) मेदयुक्त शरीर |
| (३) अस्थिप्रधान | (क) उड्या मारणे |
| (४) स्थूल कारक कौशल्ये | (ड) स्नायूयुक्त शरीर |
| (५) सूक्ष्म कारक कौशल्ये | (इ) बारीक शरीर |
| | (फ) बुटका |

**प्र. ४. संकेताच्या आधारे उलट–सुलट दिलेल्या शब्दापासून योग्य मांडणी करून शब्द लिहा.**

(१) खऱ्या अर्थाने अनुवंशिकता एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वाहून नेणारे ............... **(केजनु)**

(२) स्थूल शरीरयष्टी .............. **(धादमेप्रन)**

(३) मेंदूचे बाह्यावरण दोन .............. पासून बनलेले असते. **(लर्धअगो)**

**प्र. ५. पहिल्यातील सहसंबंध लक्षात घेऊन दुसऱ्यातील सहसंबंध पूर्ण करा.**

(१) **शाब्दिक क्षमता :** डावा अर्धगोल : : अवकाशीय क्षमता : ?

(२) **कागद कापणे :** हस्त कौशल्य : : स्केटींग : ?

**प्र. ६. खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

शरीराच्या इतर अवयवांपेक्षा मेंदूची वाढ जास्त जलद गतीने होते. पूर्व बाल्यावस्थेच्या शेवटापर्यंत मेंदूच्या काही भागात महत्त्वपूर्ण वाढ झालेली दिसते. उदा. महासंयोजी पिंड (Corpus callosum) ज्यामुळे मज्जातंतूच्या गठ्ठ्याने मेंदूचे दोन्ही अर्धगोल जोडलेले असतात ते जाडसर होतात. पूर्वबाल्यावस्थेत महासंयोजी पिंडाची संपर्कस्थाने सिनॅप्स् (Synapse) आणि माएलीनेशन (Myelination) यांची निर्मिती उच्च पातळीवर असलेली दिसते. महासंयोजी पिंडामुळे शरीराच्या दोन्ही बाजूंच्या हालचालींमध्ये समन्वय राहतो. विचाराबाबतचे घटक, आकलन, अवधान, स्मरण, भाषा तसेच समस्या परिहार यासारख्या महत्त्वाच्या कार्यासाठी आधार मिळतो. मेंदूचे बाह्यावरण (cortex of the brain) दोन भागांचे बनलेले असते. त्यांना अर्धगोल (hemispheres) म्हणतात. जे विविध कार्य नियंत्रित करतात. वयाच्या ३ ते ६ या वर्षात डाव्या अर्धगोलामध्ये (left hemispheres) विद्युतवाहक कृती सर्वात जलद गतीने चालू असलेल्या दिसून येतात. डावा अर्धगोल हा शाब्दीक क्षमता जसे बोलणे, वाचणे, विचार करणे आणि कारणमीमांसा ह्याला जबाबदार असतो. उजवा अर्धगोल (Right hemispheres) हा अशाब्दिक क्षेत्र जसे अवकाशविषयक क्षमता जसे अंतराविषयी अंदाज करणे, नकाशावाचन, भौतिक आकाराची ओळख, चित्रकला, संगीत आणि भावनांची अभिव्यक्ती या क्षमता विकसीत करते.

(१) महासंयोजी पिंडाची भूमिका स्पष्ट करा.

(२) डावा अर्धगोल आणि उजवा अर्धगोल यातील फरक स्पष्ट करा.

प्रकल्प / स्वयंअध्ययन

- **शालापूर्व अवस्थेतील दहा ते पंधरा बालकांच्या लसीकरणाबाबत सर्वेक्षण करा.**

❖ ❖ ❖

## ५ बोधात्मक विकास आणि भाषा विकास



इयत्ता ११वी मध्ये बोध म्हणजे काय हे तुम्ही शिकलात. त्याच्या बरोबरीने पियाजे यांनी दिलेली बोधात्मक विकासाची पहिली पायरी आणि त्यामधील पायाभूत संकल्पना शिकलात. भाषाविकासातील काही मनोरंजक तथ्यही शिकलात. आता बोधात्मक विकास व भाषाविकास याबद्दल आणखी माहिती जाणून घेण्यापूर्वी एकदा थोडी उजळणी करुया.

**'बोध'**ही विचार, अनुभव आणि पंचेंद्रिय याद्वारे माहिती व आकलन प्राप्त करण्याची मानसिक क्रिया किंवा प्रक्रिया आहे.

बोधामधील मानसिक प्रक्रियांची मदत आपल्याला सभोवतालचे जग माहित करून घ्यायला व त्याविषयी आकलन व्हायला, अंदाज बांधायला, निर्णय घ्यायला आणि आपले ज्ञान व आकलन इतरांसमोर मांडायला होते.

**कृती**

बोधामध्ये समाविष्ट विविध मानसिक प्रक्रियांची यादी करा.

(१)

(२)

(३)

(४)

(५)

(६)

जाँ पियाजे यांनी दिलेली बोधात्मक विकासाची पहिली पायरी 'संवेदी-कारक अवस्था' (Sensory Motor stage) आपण अभ्यासलेली आहे. या पायरीमध्ये किंवा अवस्थेमध्ये असताना बालक त्याच्या सभोवतालचे जग पंचेंद्रिय व कारक हालचाली याद्वारे जाणून घेते. याच अवस्थेमध्ये 'वस्तूस्थिती न बदलणे' (object permanence) ही संकल्पना तयार होते. संवेदी-कारक अवस्था जन्म ते २ वर्ष असते.

**कृती**

तुमच्या वर्गमित्र / मैत्रिणीबरोबर भाषेच्या कार्याची चर्चा करा.

संवादाची वाचापूर्व रुपे लिहा.

१

२

३

४

५

## ५.१ बोधात्मक विकासात समाविष्ट मानसिक प्रक्रिया (Mental Process involved in Cognition)

बोधात्मक विकासात मानसिक प्रक्रिया सविस्तरपणे समजावून घेऊ.

### अ) विचारशक्ति (Thinking)

आता एक कृती करून बघू. तुम्ही डोळे मिटा आणि तुमचा कॉलेजचा पहिला दिवस कसा होता आठवून पहा किंवा तुमचा आवडता पदार्थ आठवा किंवा तुम्ही उद्या काय करायचे ठरवले आहे. आता तुम्ही विचार करून बघा की या कृती करताना तुम्ही नेमका कोणता विचार केलात.

तुम्ही भाषा, प्रतिमा, आवाज, गंध, स्मृती, संकल्पना, कल्पना, चिन्ह, खुणा यांचा वापर, रचना करून किंवा पुर्नरचना करून किंवा माहिती हाताळून विचार करता होय ना?

सभोवतालच्या परिसरातून मिळणारी माहिती आणि स्मृतीमधे जतन झालेली चिन्हे यातून मानसिक पुर्नरचना व माहितीची हाताळणी हे विचारप्रक्रियेतील घटक मानता येतील.

विचारप्रक्रिया ही एक सजग प्रक्रिया आहे आणि त्यासाठी आपण मानसिक प्रतिमा व चिन्हे यांचा वापर करतो.

### ब) विमर्शन व समस्या सोडवणे (Reasoning and problem solving)

एखादी समस्या सोडवण्यासाठी किंवा निष्कर्ष काढण्यासाठी विमर्शन ही एक मानसिक प्रक्रिया आहे. विमर्शन यामधे कारण व परिणाम यातील संबंधाचे विश्लेषण करण्याची क्षमता याचाही समावेश असतो. ध्येयाच्या दिशेने विचार असतो आणि उपलब्ध माहितीमधून निष्कर्षाप्रत येण्याची क्षमता असते.

सुरुवातीला बालके प्रयत्न-प्रमाद पद्धतीने (trial and error method) समस्या सोडवतात. उदा. एखाद्या दीड वर्षाच्या बालकाला उंच टेबलावर ठेवलेले खेळणे हवे असेल तर तिथे पोहोचण्यासाठी बालक खुर्चीवर चढेल, टेबलक्लॉथ ओढेल किंवा शेवटी प्रौढांच्या मदतीसाठी रडायला सुरुवात करेल.

जसजसे बालक मोठे होत जाईल तसतसे त्याच्या आजूबाजूच्या वातावरणातील अनेक गोष्टी मोठ्या प्रमाणावर त्याच्या समोर आणि सान्निध्यात येऊ लागतात, संकल्पना विकसित होतात. प्रत्येक वस्तू कशी काम करते हे प्रयत्न-प्रमाद पद्धतीने समजून घेतात, भाषा शिकतात, विविध गोष्टींमधील कारण-परिणाम यांच्यातील संबंध शिकतात. उदा. मी जर मोठ्यांदा रडलो / रडले तर मला जे हवे आहे ते लगेच मिळते. मी जर नळ सोडला तर पाणी वाहते. मी जर दिव्याचे बटण दाबले तर दिवा लागतो.

हळूहळू बालक नियमांचे सामान्यीकरण करते. बालकाला हे समजते की बटण दाबले की दिवा लागतो, पंखा लागतो आणि टी. व्ही. सुद्धा लागतो.

पियाजे यांच्या सिद्धांतामधून बालक त्याची विमर्शन क्षमता कशी वापरते याबद्दल काही मनोरंजक वास्तव त्यांनी सांगितले आहे. विमर्शन क्षमतेला बोधात्मक विकासाचा आधार असतो. याबद्दल याच प्रकरणात अधिक पुढे पाहू.

### क) संवेदन (Perception)

संवेदन हा ज्ञानाचा प्राथमिक स्रोत आहे. आपल्या सभोवतालचे जग आपण पंचेंद्रियांद्वारे जाणून घेतो. पंचेंद्रिय सातत्याने माहिती गोळा करण्याचे काम करत असतात. आपल्याला मिळालेल्या माहिती स्वरुपातील इंद्रिय उद्दीपनातून आपण अर्थपूर्ण माहिती लक्षात घेतो.

**उदा.**

मी तपकीरी रंगाचे फळ पाहिले आणि मला तो चिक्कू वाटला.

मी काहीतरी गोड चवीचे खाल्ले आणि मला ती चिक्की वाटली.

इंद्रियांकडून प्राप्त माहितीला आपण अर्थ देतो तेव्हा त्यासाठी आपण आपले पूर्वज्ञान, संकल्पना, अनुभव, श्रद्धा आणि दृष्टीकोन याचा वापर करतो. त्यामुळे माहितीच्या संवेदनात वैयक्तिक फरक आढळतात.

संवेदन याला इंग्रजी परिभाषेत (perception) असा शब्द आहे तो (perceive) या क्रियापदावरून आला आहे. याचाच अर्थ जागरुक होणे, विशेष करून आपल्या इंद्रियांकडून आलेल्या माहितीबाबत आपण जागरुक असतो.

## ड) स्मरण (Memory)

माहितीची नोंद करणे, साठवणे आणि आठवणे ही क्षमता म्हणजे स्मरण. आपण जे काही शिकले आहे ते साठवून ठेवण्यासाठी स्मरणशक्ति असते. स्मरणाचे ३ भाग असतात.

(१) पंचेंद्रियांच्या साहाय्याने आकलन होणे व नोंद होणे (Sensory Register)

(२) अल्पकालीन स्मरण (Short Term Memory)

(३) दीर्घकालीन स्मरण (Long Term Memory)

### पंचेंद्रियांच्या साहाय्याने आकलन होणे व नोंद होणे (Sensory register)

पंचेंद्रियांच्या साहाय्याने आपण ज्ञान मिळवतो. पंचेंद्रियांद्वारे प्राप्त माहिती पुढे मेंदूकडे पाठवली जाते. मेंदूकडे माहिती पाठवली तरी अल्प कालावधीसाठी ती माहिती पंचेंद्रियांमधे साठवून ठेवली जाते. याच कार्याला 'पंचेंद्रियांच्या साहाय्याने आकलन होऊन नोंद होणे' (Sensory register) म्हणतात.

### अल्पकालीन स्मरण (Short term memory)

स्मरणाच्या केंद्रात फक्त २० ते ३० सेकंदांपुरती माहिती साठवली जाते त्याला अल्पकालीन स्मरण म्हणतात.

### दीर्घकालीन स्मरण (Long term memory)

स्मरणकेंद्रामधे माहिती आठवडा, महिना, वर्ष किंवा पूर्ण आयुष्यासाठी साठवली जाते यालाच दीर्घकालीन स्मरण म्हणतात.

तुम्हाला असे वाटते का मिळणारी माहिती नुसती साठवणे पुरेसे आहे? जेव्हा गरज आहे तेव्हा माहिती वापरता येण्याने आपल्याला मदत होऊ शकते का?

आपल्याला मिळालेली माहिती आपल्याला हवी असेल तर ती पुन्हा प्राप्त होते. पुन:प्राप्ती (Retrieve) म्हणजेच पुन्हा ती माहिती कोठून तरी आपल्याला मिळते. माहितीच्या पुन:प्राप्तीचे दोन मार्ग आहेत आठवणे आणि ओळखणे.

### आठवणे (Recall)

आठवणे या प्रक्रियेमध्ये आपण माहिती स्मरणातून बाहेर ओढून काढतो.

### ओळखणे (Recognition)

स्मरणातील माहिती पुर्ननिर्मित नसते, परंतु उपलब्ध पर्यायांमधून माहिती निवडली जाते.

## इ) कल्पनाशक्ति (Imagination)

कल्पनाशक्ति म्हणजेच निरनिराळ्या कल्पनांची निर्मिती करण्याची क्रिया. या प्रकारे केलेल्या कल्पनानिर्मितीमधील प्रतिमा कोठेही अस्तित्वात नसतात किंवा आपल्या अनुभवासही आलेल्या नसतात. आपले पुर्वानुभव आणि संकल्पना यांचे एकत्रिकरण आणि आपल्या सर्जनशीलतेचा पुरेपूर वापर करून कल्पना निर्माण होतात.

विचार, विमर्शन, समस्या सोडवणे आणि सर्जनशील प्रगटीकरण यांमधे कल्पनाशक्तिचा भरपूर वापर होतो आणि तो उपयुक्त असतो.



**चित्र ५.१ कल्पनाशक्ति**

## फ) अवधान कक्षा (Attention Span)

आपल्यावर वेगवेगळ्या उद्दीपकांचा सातत्याने मारा होत असतो आणि अर्थातच हे उद्दीपक आपल्या पंचेंद्रियांना चालना देत असतात. आपल्याला ऐकू येणारा आवाज, दिसणाऱ्या हालचाली, येणारा गंध, बदलणारे तापमान या प्रत्येक गोष्टीची आपण दखल घेऊ लागतो तर सभोवतालचे जग जाणून घेणे मुश्किल होईल.

ज्या कार्याची बालकाची क्षमता असते आणि ज्या कार्यात बालकाला रस असतो अशा कार्यांवर बालके दीर्घ कालावधीसाठी अवधान कक्षा दर्शवतात. योग्य प्रमाणात अवधान कक्षा असणे हा वर्गातील अध्ययनासाठी आवश्यक महत्त्वाचा पैलू आहे.

त्यामुळे निवडक उद्दीपकांकडे लक्ष केंद्रित करून इतर उद्दीपकांकडे दुर्लक्ष करून आपल्याला नक्की कशा प्रकारे संवेदन हवे आहे नेमकेपणाने तेवढेच घेणे.

अवधान म्हणजेच कोणत्याही प्रकारे लक्ष विचलित होऊ न देता व थकवा न येता एखाद्या गोष्टीवर ठराविक कालावधीसाठी लक्ष केंद्रित करणे. कोणत्याही कार्यावर ठराविक वेळ लक्ष केंद्रित करणे म्हणजेच अवधान होय.

खूप लहान बालके अत्यंत अल्प कालावधीसाठी लक्ष केंद्रित करू शकतात. लगेच विचलित होतात. सर्वसामान्यपणे बालकाच्या प्रत्येक वयानुसार त्याची अवधान कक्षा ३ ते ५ मिनिटे असते. म्हणून २ वर्षे वयाच्या बालकाला प्रत्येक कार्यावर किमान ६ मिनिटे अवधान देता आले पाहिजे आणि बालशाळेत प्रवेश घेणाऱ्या बालकाला किमान १५ मिनिटे लक्ष केंद्रित करता आले पाहिजे.

### ग) संकल्पना निर्मिती (Concept Formation)

पंचेंद्रियांच्या विविध अनुभवातून आणि विस्तृतीतून व एकत्रिकरणातून निरनिराळ्या संकल्पना उगम पावतात. आपल्या पंचेंद्रियांकडून आपल्याला उद्दीपक व माहिती मिळत असते. हे सर्व उद्दीपक व माहिती यांचे एकत्रिकरण होऊन एखाद्या वस्तूबद्दल किंवा अनुभवाबद्दल आपली कल्पना तयार होते.

उदा. केळ या फळाच्या संकल्पनेमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असतो : केळ हे फळ आहे, जेव्हा केळ कच्चे असते तेव्हा हिरवे असते, जेव्हा पिकते तेव्हा त्याचा रंग पिवळा होतो, त्याला विशिष्ट वास असतो, चव असते, ते आपल्याला कोठून मिळते, त्याचा पोत कसा आहे. ते आपण विविध पद्धतीने कसे खातो ? ही आणि अशीच आणखी माहिती आपल्याकडे असते.

आकलनाचा पाया संकल्पनांमुळे रचला जातो. पंचेंद्रियांना उद्दीपन, कारक हालचालींद्वारे हाताळणी, वाचन, अध्ययन, प्रसार माध्यमे हे सर्व संकल्पनांचे स्रोत आहेत.

### ह) निर्णय घेणे (Decision Making)

निर्णय घेणे ही अत्यंत महत्त्वाची मानसिक प्रक्रिया व जीवन कौशल्य आहे. निर्णय घेणे या प्रक्रियेचे मूल्य, प्राधान्यक्रम आणि श्रद्धा यांच्या आधाराने व्यक्तिने पर्याय शोधणे, निवडणे याच्याशी असतो.

## ५.२ शालापूर्व अवस्थेतील बोधात्मक विकास– पियाजे यांची बोधात्मक विकासाची दुसरी पायरी. (Cognitive Development in preschool years - Piaget's 2nd stage of Cognitive Development)

'बोध' यांमधे समाविष्ट सर्व मानसिक प्रक्रियांमधील सातत्यपूर्ण बदल म्हणजेच बोधात्मक विकासाची सावकाश गतीने घडणारी प्रक्रिया आहे.

**कृती**

'बाग' या विषयाची तुमची संकल्पना शोधा. 'बाग' या विषयाशी संबंधित तुम्हाला असलेली माहिती, शब्द लिहून काढा. त्याच्याशी निगडीत सर्व पंचेंद्रियांशी संबंधित अनुभव आणि कल्पना यांचाही समावेश त्यामधे करा.

वर्ग मित्र/मैत्रिणींनाही ते दाखवा. तुमच्या सगळ्यांच्या संकल्पना अगदी सारख्या आहेत का? जर नसतील तर तुमच्या संकल्पनांना विविध पैलू का आहेत? चर्चा करा.

पियाजे या स्विस तत्ववेत्त्याने बोधात्मक विकासाचा सिद्धांत १९३६ साली मांडला. या सिद्धांतानुसार त्यांनी स्पष्ट केले आहे की बालक त्याच्या सभोवतालच्या जगाचे मानसिक नमुनाचित्र कसे तयार करते. ज्ञान मिळवण्यासाठी वातावरणाशी क्रियाशील आंतरक्रिया बालकांद्वारे केली जाते. बोधात्मक विकासाच्या चार पायऱ्या पियाजे यांनी दिल्या आहेत. ज्यामध्ये बोधात्मक विकासाची दुसरी पायरी २ वर्ष ते ६ वर्ष या वयोगटात असते.

**मनोरंजक तथ्य**

पियाजे यांनी स्वतःच्या तीन मुलांच्या बौद्धिक विकासाचा अभ्यास केला आणि बालके बुद्धिमत्ता आणि औपचारिक विचारांचा विकास होताना वेगवेगळ्या पायऱ्यांमधून पुढे जातात हा सिद्धांत मांडला.

याला संक्रियापूर्व अवस्था **(Preoperational Stage)** म्हणतात.

## संक्रियापूर्व अवस्थेतील बालकांची वैशिष्ट्ये

### १. चिन्हांचे कार्य (Symbolic Function)

चिन्ह किंवा मानसिक प्रतिमा वापरण्याची क्षमता म्हणजेच चिन्ह (symbols) यांमधे शब्द, अंक आणि अर्थपूर्ण प्रतिमा यांचा समावेश होतो.



**चित्र ५.२ चिन्ह प्रतिमांचा खेळ**

बालके हे चिन्ह कार्य,

- चिन्ह प्रतिमांबरोबर खेळणे (symbolic play)
- भाषा (language)

यांद्वारे दर्शवतात.

चिन्ह प्रतिमांच्या खेळात बालक कोणत्यातरी वस्तूला वेगळी प्रतिमा देऊन त्याच्याशी खेळते. उदा. बाळ म्हणून बाहुलीशी खेळते किंवा काठी घेऊन घोडा घोडा खेळते.

भाषा ही चिन्ह वापरण्याची सार्वत्रिक प्रणाली असते. विचारप्रक्रियेला सुरुवात होते आणि बालके आतल्या आत शब्द व खुणा यांच्या साहाय्याने विचार करतात.

### २. श्रेणीप्रमाणे वर्गीकरण करण्यास अवघड (Difficulty with Hierarchical Classification)

बालके या अवस्थेत गटातील वस्तूंचे वर्गीकरण करू शकतात. उदा. प्राणी, फुले, पक्षी, भाज्या, वाहने पण बालके या गटातील वर्गीकरणाचे उपगट पाडू शकत नाहीत. उपगट साम्य आणि भेदानुसार करावे लागतात.

पियाजे यांनी केलेल्या प्रयोगामधे त्यांनी बालकांना ६ निळी फुले आणि १२ पिवळी फुले दिली आणि त्यांना प्रश्न विचारला? कोणती फुले जास्त आहेत? बालके पिवळी फुले हे उत्तर देऊन मोकळी होतात. पण त्यावेळी ते विसरतात की ही दोन्ही फुलेच आहेत.

### ३. परिवर्तनशील तर्क (Transductive Reasoning)

बालकांच्या बोलण्यात तुम्ही पुढील प्रकारची विधाने कधी ऐकली आहेत का?

''आपण झोपतो म्हणून अंधार पडतो.''

''तू मला रागावलीस म्हणून मला लागलं.''

यामधे बालकाला वाटते आहे की झोप हे अंधार पडण्याचे कारण आहे किंवा त्याला इजा होण्याचे कारण आईचे रागावणे हे आहे.

एखादा प्रसंग हा त्याचवेळी दुसरा प्रसंग घडण्यासाठी कारणीभूत आहे हा विचार बालके करतात ते ऐकणे मनोरंजक असते. यालाच परिवर्तनशील तर्क (transductive reasoning) असे म्हणतात. तुम्हाला अशी काही उदाहरणे सुचतायत का?

## ४. जैववादी विचार (Animistic thinking)

बालकांच्या विचारानुसार निर्जिव वस्तूंमध्येसुद्धा सजीवांचे गुण उदा. भाव, हेतू असतात आणि या वस्तू जिवंत असतात. बालक कदाचित असाही विचार करते की जी प्रत्येक वस्तू हलते ती जिवंत असते. कधी बालकाला कशामुळे लागते. उदा. टेबलाचा अडथळा आला आणि लागले तर त्या टेबलाला 'हात रे' असे म्हणून आपण मारले तर बालकाला खरच वाटत असते की या टेबलाला शिक्षा झाली पाहिजे.



**चित्र ५.३ जैववादी विचार**

## ५. आत्मकेंद्री विचार (Egocentrism)

संक्रियापूर्व बालकांविषयी (preoperational children) जेव्हा 'आत्मकेंद्री' ही संज्ञा वापरली जाते तेव्हा दुसऱ्याच्या नजरेतून समोरच्या प्रसंगाकडे बघण्याची बालकांची अक्षमता आहे असा संदर्भ असतो.


उदा. बालक स्वतः डोळे मिटून घेते व आईला सांगते, "मला शोध." बालकाला वाटत असते त्याने डोळे मिटून घेतल्यामुळे ज्याप्रमाणे त्याला काहीच दिसत नाही तसेच त्याच्या आईलाही काही दिसत नाही.

## ६. संधारण (Conservation)

संवेदी-कारक अवस्थेतील अर्भक हळूहळू समजू लागते की एखादी वस्तू नजरेला दिसत नसेल तरीही त्या वस्तूचे अस्तित्व आहे. परंतु प्रत्येक वस्तूचे असे कित्येक पैलू असतात की वस्तूमधे बदल झाला तरी ते पैलू स्थिर असतात. यालाच वस्तूचे संधारण (conservation) असे म्हणतात.

वस्तूच्या बाह्यस्वरुपात बदल झाला तरी भौतिक गुणधर्मात बदल होत नाही.

व्यक्ति, वस्तू यांच्या रचना, आकारमान किंवा बाह्यस्वरुप बदलले तरी त्यांच्या मूलभूत गोष्टींमध्ये बदल होत नाहीत ही संकल्पना म्हणजेच संधारण (conservation) होय.




**चित्र ५.४ संधारण**

- **प्रमाणाचे संधारण (Conservation of Quantity)**

बालकाला एकाच आकारमानाचे दोन मातीचे चेंडू दाखवले. बालकाला विचारण्यात आले की दोन्ही चेंडूमधे एकाच प्रमाणात माती असेल का? बालकाचेही यासाठी होकारार्थी उत्तर होते. त्याच्यासमोरच त्यातला एक चेंडू चपटा केला, आणि पुन्हा तोच प्रश्न बालकाला विचारण्यात आला. जे बालक संक्रियापूर्व बोधात्मक अवस्थेत असते ते बालक चपट्या चेंडूमधे माती जास्त आहे असे उत्तर देईल कारण तो गोळा पसरला गेल्यामुळे मोठा दिसतो. ७ वर्षे वयाच्या पुढचे बालक उत्तर देईल की दोन्ही गोळे सारख्याच प्रमाणाचे आहेत. जेव्हा बालकाला याचे आकलन होईल की दोन वस्तूंच्या आकारात किंवा दिसण्यात फरक केला तरी प्रमाण तेच राहते तेव्हाच बालक बरोबर उत्तर देऊ शकते. त्यालाच 'प्रमाणाचे संधारण' असे म्हणतात.

- **द्रवपदार्थाचे संधारण (Conservation of Liquids)**

एकसारख्या भांड्यातच बालकाला द्रवपदार्थ दाखवले. बालकालाही पटले की दोन्हीमधे समान प्रमाणातच द्रव आहे. नंतर त्याच्याच समोर एका भांड्यातील द्रव उंच, अरुंद दिसणाऱ्या भांड्यात ओतला. निमुळत्या, उंच भांड्यामधे द्रवाची पातळी वाढल्यासारखी दिसते. त्यानंतर बालकाला विचारले कोणत्या भांड्यात पाणी जास्त आहे तर अर्थातच बालक उत्तर देईल उंच, निमुळत्या भांड्यात पाणी जास्त आहे.

जेव्हा बालकाला आकलन होईल कोणत्याही आकाराच्या भांड्यात पाणी भरले तरी त्याचे प्रमाण तेवढेच आहे तेव्हाच त्याला 'द्रवपदार्थाचे संधारण' म्हणता येते. संक्रियापूर्व अवस्थेतील बालकांच्या हे लक्षात येत नाही.



**चित्र ५.५ द्रवपदार्थाचे संधारण**

- **संख्येचे संधारण : (Conservation of Numbers)**

बालकाला समान संख्येतच गोट्यांचे दोन संच दाखवले, त्यांची एकाच पद्धतीने ओळीत रचना करून मांडणी केली.

बालकाच्या समोरच एका संचातील गोट्या थोड्या जास्त अंतरावर मांडून दुसऱ्या ओळीत बदल केला. त्यामुळे त्या संचाची ओळ थोडी लांब दिसायला लागली. बालकाला प्रश्न विचारला गेला की कोणत्या संचात गोट्या जास्त आहेत? यावर बालकाचे उत्तर हेच होते की लांब अंतरावर मांडलेल्या संचात जास्त संख्येने गोट्या आहेत. संक्रियापूर्व अवस्थेतील बालकाला अंकांचे, संख्येचे संधारण नसते.

याप्रमाणेच संक्रियापूर्व अवस्थेतील बालकाला वजन, जागा याचे संधारण नसते.

संक्रियापूर्व अवस्थेतील बालकाला संधारणेमधे अडचण का येत असेल? त्यांच्या विचारांना मर्यादा का असतात?

**संक्रियापूर्व विचारांना मर्यादा असतात याची वैशिष्ट्ये**

**अ. संवेदना आधारित आकलन (Perception bound understanding) :**

बालकाच्या दृष्टीला होणाऱ्या संवेदनाने वस्तूच्या बाह्यरुपाकडे बघणे प्रभावित असते. मातीचा चेंडू चपटा केल्याने तो पसरला म्हणून त्यामधे माती जास्त किंवा द्रव उंच ग्लासामधे भरल्याने पाण्याची पातळी बदलली म्हणून त्यातील पाणी जास्त ही उत्तरे मिळाली.

**ब. केंद्रीकरण (Centration)**

शालापूर्व बालक एकावेळी एकाच वैशिष्ट्यावर लक्ष केंद्रित करू शकते. एकावेळी अनेक वैशिष्ट्यांचे एकत्रिकरण करून वस्तूकडे बघणे त्यांना जमत नाही यालाच केंद्रिकरण म्हणतात.

दोन भांड्यातील द्रवपदार्थाच्या प्रयोगामध्ये दोन महत्त्वाचे घटक असतात. एक म्हणजे द्रवाची पातळी

आणि दुसरे म्हणजे भांड्याची रुंदी, त्यामुळे निमुळत्या भांड्यात अर्थातच द्रवाची पातळी जास्त दिसते. जर त्याच प्रमाणातला द्रव पसरट भांड्यात ओतला तर द्रवाची पातळी खाली जाईल. ही वैशिष्ट्य शालापूर्व बालकाच्या लक्षात येत नाहीत. त्यामुळे बालक फक्त द्रवाची पातळी या एकाच वैशिष्ट्याकडे लक्ष देते.

### ७. बालक परिवर्तनापेक्षा स्थितीकडे लक्ष केंद्रीत करते. (The child focuses on states rather than transformation)

द्रवपदार्थाचा प्रयोग, अंक-संख्येचा प्रयोग किंवा प्रमाणाच्या संधारणाचा प्रयोग या सर्वांमध्ये परिवर्तनाच्या अवस्था आहेत. त्या पायऱ्या म्हणजे मातीचा गोळा चपटा करणे, द्रवपदार्थ उंच, निमुळत्या भांड्यात ओतणे, आणि मांडलेल्या गोट्यांच्या रचनेत केलेला बदल. जरी हे बदल बालकाच्या समोर केले होते तरी बरोबर उत्तर देण्यास बालक असमर्थ होते.

**संक्रियापूर्व अवस्थेतील बालक एखाद्या प्रक्रियेच्या पहिल्या आणि शेवटच्या पायरीवर लक्ष केंद्रित करतात आणि होणारे मधले परिवर्तन लक्षात घेत नाही.**

### ८. अपरिवर्तनीय विचार (Irreversibility of thought)

**एखाद्या समस्येमध्ये ज्या छोट्या छोट्या पायऱ्यांचा विचार करून मग परत सुरुवातीच्या पायरीकडे जायचे असते त्याबाबतीतील अक्षमता म्हणजेच अपरिवर्तनीय विचार.**

अंकांच्या संधारणेचे उदाहरण बघू.

जर मोठ्या बालकांसमोर ही समस्या ठेवली जी प्रयोग म्हणून लहान बालकांसमोर ठेवली होती तर मोठ्या बालकांच्या विचाराच्या पायऱ्या असतात.

- दोन्ही ओळीतील गोट्यांची संख्या सारखीच आहे.
- दुसऱ्या ओळीतील गोट्या थोड्या लांब लांब अंतरावर मांडल्या आहेत.
- म्हणून ओळ लांब दिसते आहे.
- जर या गोट्या मी परत जवळ आणल्या तर पुन्हा पहिल्यासारखेच दिसेल.

विचारप्रक्रियेतील ही शेवटची पायरी म्हणजेच परिवर्तनीय विचार आहे.

संक्रियापूर्व अवस्थेतील बालक हा परिवर्तनीय विचार करू शकत नाही.

## शालापूर्व अवस्थेतील भाषाविकास (Language development during preschool years)

पहिल्या दोन वर्षात भाषाविकासाचा पाया कसा रचला जातो हे आपण पाहिले आहे. यावर आधारित पुढे शालापूर्व अवस्थेत भाषेला आणखी कंगोरे प्राप्त होतात.

शालापूर्व अवस्थेत भाषेचे दोन प्रकार आढळतात.

१. **ग्रहणशील भाषा (Receptive language) :** ग्रहणशील भाषा म्हणजेच बोललेली किंवा लेखी भाषा याचे आकलन होय.

२. **उत्पादनक्षम भाषा (Productive language) :** बालक जी भाषा बोलते त्याला उत्पादनक्षम भाषा म्हणतात.

भाषेचे दोन्ही प्रकार एकाचवेळी विकसित होत असतात. ग्रहणशील भाषा थोडी लवकर विकसित होते.

## शालापूर्व अवस्थेतील भाषा विकासाच्या पायऱ्या (Steps in Language Development in Preschool Years)

**तालिका ५.१ शालापूर्व अवस्थेतील भाषेची परिपूर्णता पुढील क्षेत्रात वर्गीकृत करतात. (Language accomplishments in the preschool years.)**

| शब्दसंपत्ती (Vocabulary) | उच्चारण (Pronunciation) | वाक्यरचना (Sentence formation) | आकलन (Comprehension) |
|---|---|---|---|
| साडेतीन वर्षापर्यंत ५० शब्दापर्यंत शब्दसंपत्ती वाढते.<br><br>पुढील वर्षांसाठी शब्दसंपत्ती वाढण्याची प्रक्रिया चालू राहते.<br><br>वय वर्षे ४ पर्यंत १९०० शब्द २२०० शब्दांचे अर्थ ५व्या वर्षापर्यंत समजू लागतात.<br><br>६ वर्षाचे वय होईपर्यंत एखाद्या शब्दाचे दोन अर्थ असू शकतात हे त्यांना समजते.<br><br>संवाद साधताना क्रिया आणि हातवारे यापेक्षा शब्द जास्त वापरतात. | शालापूर्व अवस्थेमधे बालकांच्या आवाजातील अविष्कार आणि बोलण्याची लय प्रौढांसारखी होऊ लागते.<br><br>बालकांनी केलेल्या चुकीच्या उच्चारांची दुरुस्ती किती वेळा केली जाते यांवर बालकांचे उच्चारण अवलंबून असते. | बालके गुंतागुंतीची वाक्यरचना करायला सुरुवात करतात. त्यामधे कसे, केव्हा, कोण या उपशब्दांचा वापर करतात आणि संयुक्त वाक्यरचना करू शकतात.<br><br>मोठी वाक्यरचना करता येते.<br><br>वेगवेगळ्या वयाच्या श्रोत्यांना ऐकता येईल अशा पद्धतीने स्वतःचे बोलणे जुळवून घेतात.<br><br>असे आढळले आहे की शालापूर्व बालके जेव्हा बाळांशी बोलतात तेव्हा खूप सोपी भाषा वापरतात. परंतु जेव्हा प्रौढ व्यक्तिंशी बोलतात तेव्हा मोठी वाक्य वापरतात आणि गुंतागुंतीची व्याकरणासहित वाक्यरचना करतात. | ३ वर्षे वयापर्यंत परिस्थितीनुसार शब्दांची रचना बदलते हे समजू लागते.<br><br>३ वर्षे आणि ४ वर्षे वयापर्यंत खूप प्रश्न विचारतात.<br><br>तर्कसुसंगत गोष्ट सांगू शकतात.<br><br>प्रमाणासंबंधी विचारलेल्या प्रश्नांना सुयोग्य प्रतिसाद देतात (किती, केवढ्याला), वेळेसंबंधी (किती वेळ), अंतरासंबंधी (किती लांब-दूर, जवळ), घड्याळी वेळ (केव्हा) |

## भाषा प्राप्त करणे (Acquisition of Language)

आपण भाषा कशी शिकतो? या प्रश्नावर आधारित खूप संशोधने करण्यात आली आहेत. भाषा नक्की कशी प्राप्त होते यावर भरपूर विवाद आहेत. परंतु या प्रक्रियेत तीन प्रमुख घटक असतात.

(१) अनुकरण (Imitation)

(२) दृढीकरण (Reinforcement)

(३) जन्मजात असणारी भाषा संरचना (Innate Language Structure)

## अनुकरण (Imitation)

भाषा विकासात अनुकरणाचा खूप मोठा वाटा असतो. बालकांनी ऐकलेले, शिकलेले बरोबर शब्द, बालक अनुकरण करून त्याचा बरोबर उच्चार करून शब्दसंपत्तीमध्ये वाढ करत असते. बालकांचा पहिला शब्द अर्थातच श्रवण आणि अनुकरण यातूनच प्राप्त होतो.

## दृढीकरण (Reinforcement)

दृढीकरण हे अध्ययनाचे अत्यंत सशक्त साधन आहे, आणि भाषेच्या काही पैलूंना त्याची मदत होते. स्मितहास्य, मिठी आणि प्रौढांनी जास्तीत जास्त लक्ष देणे यातून भाषा अध्ययनाला ठराविक प्रमाणात प्रोत्साहन मिळते.

बालक काही वेगवेगळे आवाज काढते, त्याला पालकांकडून आनंदाने प्रतिसाद मिळतो. यामुळे बालके प्रेरित होऊन तेच वर्तन पुनःपुन्हा करतात.

अनुकरण आणि दृढीकरण या दोनच गोष्टी वाक्यरचना करता येण्यासाठी पुरेशा नसतात. भाषा शिकताना काही गोष्टी प्रोत्साहीत केल्या किंवा केल्या नाहीत तर दृढीकरण शक्य होत नाही.

## जन्मजात असणारी भाषा संरचना (Innate Language Structure)

नॉम चॉम्स्की (१९५९) या भाषातज्ञाने सर्वात प्रथम अनुकरण व दृढीकरण या सिद्धांतावर भाष्य केले. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रत्येक मानव, भाषा प्राप्त करण्यासाठी एक मानसिक संरचना घेऊनच जन्माला येतो. या संरचनेला चॉम्स्की यांनी **"Language Acquisition Device"** (LAD) 'भाषाप्राप्तीचे साधन' असे म्हटले आहे.

या साधनाच्या मदतीनेच बालक त्याच्या वातावरणातून प्राप्त झालेल्या भाषेच्या माहितीवर प्रक्रिया करते आणि स्वतःचे व्याकरणाचे नियम ठरवते.

बालक लोकांना बोलताना ऐकते, गोष्ट ऐकते, रेडिओ किंवा टी. व्ही. ऐकते हे सर्व भाषेचा अंतर्भाव **(input)** करणारे घटक आहेत.

यातून निवडक गोष्टींवर भाषाप्राप्तीच्या साधनांद्वारे प्रक्रिया होते आणि बालक भाषेचे, व्याकरणाचे स्वतःचे नियम बनवते.

## बोधात्मक व भाषाविकासासाठी उद्दीपनाचे महत्त्व (Importance of stimulation in cognitive and language development)

बोधात्मक विकासाच्या सर्व क्षेत्रांसाठी भाषिक उद्दीपन म्हणजे पायाच असतो.

बालकाच्या सभोवतालच्या वातावरणाचा बोधात्मक व भाषिक विकासावर नाट्यात्मक परिणाम होतो. पुढे बालक आणि प्रौढ म्हणून कसा व किती चांगला विचार करेल हे सुरुवातीच्या काळातील मेंदूच्या विकासावर अवलंबून असते.

पहिल्या वर्षात बाळाच्या मेंदूमधे सर्व पेशींच्या जोडणीचे जाळे तयार होत असते. या मेंदू पेशींच्या जोडणीलाच सिनॅप्सेस म्हणतात. अर्भकाला किती उद्दीपन मिळते त्यावर सिनॅप्सेस किती तयार होतील हे अवलंबून असते. सातत्यपूर्ण व पुनरावृत्तीने दिलेले उद्दीपन मेंदूतील पेशींची जोडणी बळकट व कायमस्वरुपी करत असते.

जेव्हा बालके प्रतिसाद देण्यामधे, भाषा-समृद्ध अनुभवांमधे असतात त्यातून त्यांची भाषा उत्तम प्रकारे विकसित व्हावी हीच अपेक्षा असते.


भाषा उद्दीपन बालकांचे संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी आत्यंतिक उपयुक्त आहे.

भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी काही सूचना


- त्यांच्याशी बोलावे.
- त्यांनी चुकीचे बोललेले वाक्य बरोबर करून पुन्हा बोलावे.
- आजूबाजूच्या गोष्टींची नावे, माहिती पुरवावी.
- त्यांना गोष्टी सांगाव्यात.
- गाणी म्हणावीत.
- गोष्टी वाचून दाखवाव्यात.
- चालू असलेल्या कृतीबद्दल गप्पा माराव्यात.
- वातावरणातील, परिसरातील गोष्टींबद्दल बोलावे.
- वेगवेगळ्या ठिकाणी भेटीसाठी, सहलीसाठी न्यावे.
- नाट्यात्मक खेळासाठी संधी द्याव्यात.
- समवयस्कांबरोबर खेळण्याची व आंतरक्रियेची संधी द्यावी.
- क्षेत्र भेटीस न्यावे.
- त्यांनी पाहिलेल्या, ऐकलेल्या, चित्र काढलेल्या गोष्टींचे वर्णन करण्यास सांगावे.
- त्यांचे भाव प्रगट करण्याची परवानगी द्यावी.
- सर्जनशील नाट्यकृती.

## मुद्द्यांची उजळणी करा.

(अ) मानसिक प्रक्रिया




(ब) संक्रियापूर्व विचारशक्तिची वैशिष्ट्ये



## मुद्द्यांची उजळणी करा.

**(क) संक्रियापूर्व विचारांच्या मर्यादा**

- **संक्रियापूर्व विचारांच्या मर्यादा**
  - (१) संवेदनाआधारित आकलन
  - (२) केंद्रीकरण
  - (३) परिवर्तनापेक्षा स्थितीकडे लक्ष
  - (४) अपरिवर्तनीय विचार

**(ड) शालापूर्व अवस्थेतील भाषा विकासाच्या पायऱ्या**

- **भाषाविकासाच्या पायऱ्या**
  - शब्दसंग्रह
  - उच्चारण
  - वाक्यरचना
  - आकलन

**(इ) भाषाप्राप्ती**

- **भाषाप्राप्ती**
  - अनुकरण
  - दृढीकरण
  - जन्मजात भाषा संरचना

## शब्दसूची

**जैववादी विचार (Animism) :** निर्जिव वस्तूंमध्येही सजीवता असते यावर विश्वास.

**अवधान (Attention) :** मानसिक क्रिया लक्ष केंद्रित करण्याची प्रवृत्ती

**केंद्रीकरण (Centration) :** एकावेळी एकाच पैलूवर लक्ष केंद्रीत करण्याची क्षमता.

**बोध (Cognition) :** सभोवतालचे जग माहित करून घेणे व समजून घेण्याची प्रक्रिया

**बोधात्मक विकास (Cognitive Development) :** बौद्धिक क्षमतांची वाढ आणि त्यातील सातत्यपूर्ण बदल

**संकल्पना निर्मिती (Concept Formation) :** पंचेंद्रियांकडून मिळणाऱ्या तुकड्या तुकड्यातील माहितीला आणि अनुभवांना एकसंधपणाने बांधणे.

**सर्जनशीलता (Creativity) :** नविन कल्पनांची निर्मिती

**आत्मकेंद्रीकरण (Egocentrism) :** एकाच दृष्टीकोनातून म्हणजेच फक्त स्वतःच्या दृष्टीकोनातून समोरच्या गोष्टींकडे पाहण्याची क्षमता.

**अपरिवर्तनीय (Irreversibility) :** एखाद्या कृतीबाबत विचाराबाबत उलट सुलटपणा करता येण्याची क्षमता नसणे.

**स्मरण (Memory) :** मिळालेल्या माहितीवर प्रक्रिया करणे, साठवणे आणि आठवणे.

**मानसिक प्रक्रिया (Mental process) :** आपल्या मानसिक क्रिया

**संवेदन (Perception) :** पंचेंद्रियांकडून मिळणाऱ्या माहितीचा अन्वयार्थ (interpretation) लावणे.

## स्वाध्याय

**प्र. १ टीपा लिहा.**

(१) स्मरण

(२) अवधान कक्षा

(३) संकल्पना निर्मिती

(४) संख्या/अंक संधारण

**प्र. २ पुढील संज्ञा स्पष्ट करा.**

(१) बोध

(२) संवेदन

(३) आत्मकेंद्रीकरण

**प्र. ३ पुढील संज्ञांसंबंधी उदाहरणे द्या.**

(१) परिवर्तनशील तर्क

(२) जैववादी विचार

(३) कल्पनाशक्ति

(४) ग्रहणशील भाषा

**प्र. ४ लहान बालकांच्या भाषेला आपण कसे प्रोत्साहन देऊ शकतो याबद्दल उदाहरणांसहित सविस्तर लिहा.**

## प्रकल्प / स्वयंअध्ययन

- **बालकांची स्मरणशक्ति, कल्पनाशक्ति, सर्जनशीलता अधिक समृद्ध करण्यासाठी व अवधानकक्षा विकसित करण्यासाठी कृती व खेळ तयार करा.**

❖ ❖ ❖

# ६ भावनिक आणि सामाजिक विकास आणि शिस्त



मानव हा सामाजिक प्राणी आहे. जन्मानंतर लगेच बालक सभोवतालच्या व्यक्तींबरोबर सामाजिक सहसंबंध प्रस्थापित करते. असे असले तरी आंतरक्रिया वाटून घेणे आणि संवाद साधणे हे शिकण्याचा प्रवास हा खूप मोठा असतो. स्वतःच्या भावना समजणे आणि समाजमान्य मार्गांनी त्या व्यक्त करणे ही सुद्‌धा एक लांबलचक प्रक्रिया आहे.

अर्भकावस्थेपासून शालापूर्व वर्षापर्यंत बालकाची सामाजिक व भावनिक कौशल्ये विकसीत करण्यातील प्रगती सतत चालू असते. शालापूर्व वर्षामध्ये सुरुवातीला मिळणारे उत्तम प्रतीचे सामाजिक अनुभव आणि भावनिक आधार याचा बालकाचा सामाजिक-भावनिक विकासावर खूप जास्त प्रभाव दिसतो.

शालापूर्व बालकांमधील सामाजिक-भावनिक विकासावर नजर टाकण्यापूर्वी, अर्भकावस्थेतील सामाजिक-भावनिक विकासाबाबत आपण ज्या काही चित्तवेधक गोष्टी पाहिल्या त्या परत आठवून बघूयात.

वैयक्तिक वर्णन आणि आंतरव्यक्तीक संबंध ह्यावर भावनिक-सामाजिक विकासाच्या एकत्रिकरित्या परिणाम होतो.

### अ. भावनांचे मूलभूत चार घटक

- उद्दीपक (Stimuli)
- भावना (Feelings)
- शारीरिक उत्तेजना (Physiological arousal)
- वर्तन (Behaviour)

प्राथमिक संगोपनकर्त्याशी संलग्नता (attachment) विकसित झाल्यामुळे जो बंध निर्माण होतो त्यामुळे अर्भकाला सुरक्षिततेची भावना आणि आनंद मिळतो. संगोपनकर्त्याच्या अनुपस्थितीत अर्भक अपरिचित व्यक्तीविषयी भिती आणि दुरावण्याची चिंता दर्शवते.

> अर्भकांमध्ये दिसून येणाऱ्या चार प्रकारच्या भावनांची यादी तुम्ही करु शकता का?
>
> (१)
>
> (२)
>
> (३)
>
> (४)

हे आपल्याला माहितच आहे की, सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्‌वारे आपण सभोवतालच्या व्यक्तींबरोबर आंतरक्रिया करणे, समाजाला अपेक्षीत वर्तन करणे आणि सामाजिक संबंध विकसित करणे हे शिकतो.

### ब. अर्भकावस्थेतील महत्त्वाचे वैकासिक टप्पे म्हणजे

- सामाजिक हास्य (Social smile)
- सामाजिक संदर्भ (Social Referencing)
- सामाजिक संकेत (Cueing)



आंतरक्रिया, कृतीशील सहभाग आणि बंध विकसित करणे याद्वारे अर्भकातील सामाजिक विकासात कुटुंब आणि समाज यांची भूमिका निर्णायक असते.

### क. ३ ते ६ वर्षातील सामाजिक-भावनिक विकासातील वैकासिक टप्पे :

शालापूर्व बालकांचा सामाजिक-भावनिक विकास म्हणजे फक्त भावना व्यक्त करणे एवढेच नसून स्वावलंबन, संधी मिळणे, समवयस्कांबरोबरची आंतरक्रिया, भावना नियंत्रित करणे आणि स्व-प्रतिमा तयार करणे याचाही समावेश होतो.

विविध कारक कौशल्ये संपादन करण्यामुळे शालापूर्व बालके घराबाहेर जातात, खेळतात आणि शोध घेतात. बोधात्मक आणि भाषा क्षेत्रांत महत्त्वपूर्ण विकास झालेला असल्यामुळे लोकांबरोबर आंतरक्रिया स्वतःला व इतरांना समजून घेणे, भावना व्यक्त करतांना जास्तीत जास्त समाजमान्य मार्गांचा अवलंब करणे यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा पुरवला जातो.

आता आपण सामाजिक-भावनिक विकासातील विविध घटकांतील वैकासिक टप्पे बघूयात.

खालील दिलेल्या क्षेत्रामध्ये बालक समज आणि कौशल्ये विकसित करते.

### (१) स्व-जाणीव (Self-awareness)

स्वतःला समजून घेणे ही एका रात्रीत घडणारी प्रक्रिया नाही. या प्रवासात शालापूर्व बालके पुढे दिलेल्या वैकासिक टप्प्यातून जातात.

- **बालके स्व-संकल्पना विकसित करण्यास सुरुवात करतात. (Children start developing self-concept) :** आपण कोण आहोत हे समजून घ्यायला सुरुवात करतात. यामध्ये मुख्यतः कसे दिसतो, नाव, स्वतःच्या मालकीचे काय याविषयी समजून घेणे याचा समावेश होतो.
- **लिंग ओळख (Gender Identity) :** आपण मुलगा आहे का मुलगी याविषयी स्पष्ट भावना विकसित होते.
- **लिंग भूमिका समजून घेण्यास सुरुवात होते. (They start developing an understanding of sex roles) :** मुलगा आणि मुलगी याविषयी समाजमान्य भूमिका समजून घेण्यास सुरुवात करतात.

**सामाजिक-भावनिक विकासाच्या घटकांतील महत्त्वाचे वैकासिक टप्पे**
**(Milestones as important aspects of Socio-emotional Development)**



- **बालके जास्त स्वावलंबी व्हायला सुरुवात करतात (They start showing more independence) :** बालके खेळण्याबरोबर स्वतंत्ररित्या खेळायला सुरुवात करतात. खाणे, बूट घालणे, कपडे घालणे यासारखी स्वमदत कौशल्ये विकसित होतात.

**स्व-संकल्पना :** आपले दिसणे, गुण आणि क्षमता यांची मानसिक प्रतिमा

**कृती**

मला माझ्या रुपातील कोणत्या गोष्टी आवडतात याचा विचार करा.

(१)

(२)

मला माझ्यातील आवडणारे गुण

(१)

(२)

मला काय करायला आवडते याचा विचार करा.

(१)

(२)

### (२) इतरांबरोबरचे संबंध (Relationship with others)

शालापूर्व बालके पालक किंवा संगोपनकर्ते यांच्याशिवाय इतर व्यक्तींबरोबर संबंध विकसित करतात.

- आता बालके इतर बालकांबाबत आवड दर्शवतात आणि नवीन मित्र बनवतात.
- वाटून घेणे किंवा संधीची वाट पाहणे याविषयी जास्त चांगले वर्तन करतात.
- मित्रांसारखे बनायला बघतात.
- मुख्यतः पालक आणि संगोपनकर्ते यांच्याकडून आराम आणि मान्यता मिळवण्याच्या शोधात असतात.

### (३) खेळ (Play)

- शालापूर्व बालके सहकार्यात्मक खेळ (co-operative) खेळायला सुरुवात करतात. एकटेच खेळण्यापेक्षा शालापूर्व बालकांना आता इतर बालकांबरोबर खेळण्यात मजा येते.
- इतर बालकांबरोबर काल्पनिक खेळ (imaginative play) खेळण्यात मजा येते. उदा. शाळा-शाळा किंवा घर-घर खेळणे.
- खेळात साधे सोपे नियम वापरून खेळू लागतात.

**कृती**

- तुम्ही तुमच्या शालेय दिवसांत कोणते विविध खेळ खेळत होता ते तुम्हाला आठवते का?
- तुम्हाला आठवत असलेल्या जास्तीत जास्त खेळांची यादी करा.
- त्यांचे घरात खेळण्याचे खेळ आणि घराबाहेर खेळण्याचे खेळ असे वर्गीकरण करा.
- तुम्हाला सगळ्यात जास्त कोणता खेळ आवडत होता? का?

### (४) भावना समजून घेणे आणि त्यांचे नियमन (Understanding and regulating emotions)

शालापूर्व बालकांमध्ये भावना तीव्र असतात. बालके क्षुल्लक आणि गंभीर प्रसंग दोन्हीलाही सारख्याच तीव्रतेने प्रतिसाद देतात. उदा. शालापूर्व बालक पडले किंवा त्याला आईने फुगा घेऊन द्यायला हवा आहे किंवा त्याच्या तेलकट खडूचे दोन तुकडे झाले तरी सगळ्या प्रसंगांत ते सारख्याच तीव्रतेने रडते.

बालके त्यांच्या भावना वारंवार दाखवतात. काही वेळा त्यांच्या भावना त्यांच्या वर्तनातून दिसून येतात. काही बालके मात्र प्रत्यक्ष प्रतिक्रियेतून भावना दर्शवत नाही. पण अस्वस्थता, दिवास्वप्न, बोलण्यातील समस्या, वर्तनातून चिंता जसे नखे खाणे, अंगठा चोखणे, अंथरुण ओले करणे यासारख्या समस्या अप्रत्यक्षरित्या दर्शवतात.

शालापूर्व बालकांचा भावनिक विकास हा मूलभूत भावना व्यक्त करणे इतपतच मर्यादित नसतो. मत्सर, सहअनुभूती (empathy) यासारख्या विस्तृत स्वरुपाचे अनुभव असणाऱ्या भावना पण दर्शवतात.

- बालके त्यांच्या भावनांविषयी जास्त चांगल्या प्रकारे बोलू शकतात.
- बालके त्यांचा आनंद, आपुलकी मोकळेपणी व्यक्त करतात.
- प्रसंग घडण्यापूर्वी बालके भिती किंवा चिंता व्यक्त करु शकतात. उदा. डॉक्टरांकडे जाण्यास नाखुशी दर्शवतात.
- बालके नवीन भिती दर्शवतात. उदा. भूत, अंधार, कुत्रा यांच्याविषयीची भिती
- इतर व्यक्तींच्या भावनांविषयी अधिक जाणीव दर्शवतात. बालके हे समजू शकतात की त्याच्या मित्राला वाईट वाटते आहे म्हणून ते रडते आहे.

जी बालके भावनिकरित्या निरोगी असतात ती मोठ्या व्यक्ती आणि समवयस्क यांच्याबरोबर सकारात्मक संबंध प्रस्थापित करू शकतात.

## ड. भावनांचे प्रकार (कारणे, अभिव्यक्ती, हाताळणी) (Causes, Expression, Handling)

बालके ज्या सर्वसामान्य भावना अनुभवतात त्या सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारच्या असू शकतात. सकारात्मक भावना तुम्हाला आनंद देऊ शकतात. त्याचवेळी नकारात्मक भावना अवघड आणि काही वेळा दुःख देणाऱ्या असू शकतात.

आपण ज्या भावना अनुभवतो त्यातील काही भावना इथे दिल्या आहेत........ त्याचे तुम्ही सकारात्मक आणि नकारात्मक असे वर्गीकरण करू शकता का? अशा अजून काही भावनांचा तुम्ही विचार करू शकता का?

व्यथित, सहअनुभूती, अभिमान, वाईट वाटणे, लाजीरवाणे, आनंद, आशावादी, तिरस्कार

| सकारात्मक भावना | नकारात्मक भावना |
|---|---|
| १. | १. |
| २. | २. |
| ३. | ३. |
| ४. | ४. |
| ५. | ५. |
| ६. | ६. |

चला आता, शालापूर्व बालके ज्या काही सकारात्मक भावना अनुभवतात त्या बघूयात.

**सकारात्मक भावना (Positive Emotions) :**

### (१) प्रेम आणि आपुलकी (Love and Affection) :

ही भावना व्यक्ती, प्राणी किंवा वस्तूंच्या प्रति दर्शवली जाते. ही भावना मानवामध्ये स्वतःच्या मालकीचे काही असणे आणि इतरांबरोबर असणे यातून निर्माण झाली आहे. या भावनेचे सामाजिक आणि वैयक्तिक समायोजनात योगदान आहे.

| स्त्रोत | अभिव्यक्ती | समृद्धाता |
|---|---|---|
| बालकांना जे आवडतात आणि जे त्यांच्याबरोबर मैत्रीपूर्ण संबंध ठेवतात. अशाबरोबर बालके जास्त आपुलकीने वागतात.<br><br>सर्वसाधारणपणे आई, कुटुंबातील सदस्य, शिक्षक, पाळीव प्राणी यांच्याविषयी जवळीकता दर्शवतात. उबदारपणा आणि महत्त्वपूर्णता दर्शवतात. | मिठी मारणे, पापी घेणे, हसणे, ज्या व्यक्ती विषयी आपुलकी वाटते त्यांच्याबरोबर राहणे यातून व्यक्त करतात. | बालकाबाबतची आपुलकी व प्रेम व्यक्त करा. शारीरिक अभिव्यक्ती बरोबरच प्रेमात शाब्दीक अभिव्यक्ती तेवढीच महत्त्वाची आहे. अडथळा न येऊ देता बालकाकडे लक्ष देण्याचा प्रयत्न करा. |

### (२) आनंद (Joy) :

ही आनंददायक भावना आहे. याचे सौम्य रुप म्हणजे सुखावणे, सुख, आनंद होय. यामुळे बालकाचे सामाजिक आणि वैयक्तिक समायोजन शक्य आणि योग्य होते. तसेच ही भावना चिंतामुक्त होण्यासाठी, कौशल्यपूर्ण हालचाली करणे शक्य होण्यासाठी मदत करते. आनंदी बालके स्व-संकल्पना विकसित करण्यास प्रेरीत असतात.

| स्त्रोत | अभिव्यक्ती | समृद्धाता |
|---|---|---|
| अशा कृती ज्यात बालकांच्या मित्रांचा सहभाग असेल,<br><br>मुक्त खेळ,<br><br>आवडणारे खाद्यपदार्थ,<br><br>ज्यांच्यावर प्रेम करतात अशांचा सहवास,<br><br>आडदांड आणि कोलांट्या उड्या मारणारे खेळ,<br><br>लक्ष वेधून घेणे आणि कौतुक,<br><br>यश, भेटवस्तू मिळणे. | हसणे, स्मित करणे, टाळ्या वाजवणे, खाली आणि वर उड्या मारणे, आनंद देणाऱ्या व्यक्ती, प्राणी, वस्तू यांना मिठी मारणे. यातून आनंद मिळतो. | बालकांकडे प्रेमळपणे लक्ष देणे.<br><br>बालकांच्या कृतीमध्ये रस दाखवणे.<br><br>आडदांड आणि कोलांट्या उड्या मारण्याच्या खेळाला आणि मुक्त खेळासाठी भरपूर संधी उपलब्ध करून देणे.<br><br>विकासाला योग्य कृती जी ते पूर्ण करू शकतील यामुळे त्यांना यशाची भावना मिळते.<br><br>बालकांबरोबर वेळ घालवणे.<br><br>बालकांची प्रशंसा करणे. |

## नकारात्मक भावना (Negative Emotions)

### (१) भीती (Fear) :

भिती ही वस्तुनिष्ठ प्रतिक्रिया असते. जेव्हा एखाद्या भितीदायक प्रसंगाला तोंड दिले जाते. त्यावेळी शारीरिक चेतना निर्माण होते. बालकांमध्ये भिती ही सर्वसाधारणपणे त्यांच्या भूतकाळातील आठवणी आणि अनुभव यातून निर्माण होते. काही भिती या प्रत्यक्ष अनुभवातून निर्माण होतात तर काही दुसऱ्यांच्या अनुकरणातून शिकतात.

| कारणे | अभिव्यक्ती | हाताळणी |
|---|---|---|
| अंधार, मोठा आवाज, डॉक्टर, दंतवैद्य, प्राणी, पाणी, सिनेमा किंवा दूरदर्शनवरील पात्रे, काल्पनिक प्राणी | हुंदके देऊन रडणे, रडणे किंवा किंचाळणे, संगोपनकर्त्याला बिलगणे, दूर जातात.<br><br>वस्तू किंवा प्राणी भितीदायक परिस्थिती टाळण्याचा प्रयत्न करतात.<br><br>भीती जेव्हा खूप जास्त असते तेव्हा बालकांना भीतीदायक स्वप्न पडणे,बालक आजारी पडू शकते किंवा बालक अति आक्रमक वर्तन दर्शवू शकते. | बालकाचा उपहास/चेष्टा करू नये.<br><br>बालकाला भीतीदायक परिस्थिती किंवा वस्तूंला तोंड देण्यासाठी जबरदस्ती करू नये.<br><br>भीतीदायक गोष्टी किंवा दूरदर्शनवरील कार्यक्रम कमी बघू द्यावेत.<br><br>बालकाला भीती दाखवण्यासाठी अंधार, राक्षस यांचा वापर करू नये.<br><br>ज्यावेळी बालकाला अंधाराची भिती वाटत असेल त्यावेळी ज्या खोलीत राक्षस लपला असेल असे वाटते त्याठिकाणी तुमच्याबरोबर प्राणी शोधायला त्याला प्रेरित करा. |

### (२) राग (Anger) :

राग ही भावना अगदी मूलभूत भावनांपैकी एक आहे. ज्या मागे सर्वसाधारणपणे काही विशिष्ट कारण असते. प्रत्येक मानवाला रागाचा अनुभव येत असतो पण बालकांना त्यांचा राग समाजमान्य मार्गाने व्यक्त करण्यात अडचण येते. शालापूर्व अवस्थेत प्रामुख्याने रागाची प्रतिक्रिया ही आक्रमकता किंवा आक्रस्ताळेपणातून व्यक्त केली जाते. मोठ्या व्यक्ती, पालक तसेच शिक्षक यांना याला तोंड देणे अवघड असते.

| कारणे | अभिव्यक्ती | हाताळणी |
|---|---|---|
| कृतीमध्ये अडथळा आणल्यास<br><br>इच्छा पूर्णत्वाला न जाणे.<br><br>अक्षमतेमुळे विशिष्ट ध्येयामध्ये उच्च स्थान न मिळाल्यास नैराश्य येणे.<br><br>पालक जर भावंड/ समवयस्कामध्ये तुलना करत असतील तर<br><br>शारीरिक शिक्षा<br><br>बालक अपमानीत झाल्यास, त्याचा पाणउतारा झाल्यास किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल्यास. | किंचाळणे, मारणे, लाथा मारणे, वस्तूंची फेकाफेक करणे, रुसून बसणे, आक्रस्ताळेपणा करणे, आक्रमकता | बालकाच्या रागामागील कारण समजून घेणे. बालकाकडे दुर्लक्ष होते आहे का? ध्येय साध्य करण्यासाठी बालकावर खूप जास्त दबाव टाकला जातो आहे का?<br><br>बालकाला याची जाणीव द्यावी की राग येणे ठीक आहे पण आक्रमक वर्तन हे समाजमान्य वर्तन नाही हे त्याला ठामपणे सांगावे.<br><br>बालकाला त्याचा राग शाब्दिकरित्या व्यक्त करण्यास प्रोत्साहित करावे.<br><br>तीव्र शारीरिक आणि कारक कृतीतून राग बाहेर पडू शकतो. भरपूर शारीरिक कृती करण्याची संधी पुरवावी.<br><br>मध्येच अडथळा आणून बालकाचे विरोधी वर्तन ताबडतोब थांबावे.<br><br>एकमेकांशी तुलना करणे टाळावे. पक्षपातीपणा दाखवू नये. बालकाचा अपमान/पाणउतारा करू नये.<br><br>बालकांसमोर योग्य आदर्श ठेवावा. बालकाला शारीरिक शिक्षा देणे किंवा बालकाला दुखवेल असे शब्द न वापरता तुमचा राग शाब्दीक मार्गाने व्यक्त करावा.<br><br>बालकाला भरपूर प्रेम आणि आपुलकी द्यावी.<br><br>बालकांना त्यांच्या रागाच्या भावनेविषयी बोलू द्यावे. |

राग हा आक्रमतेसाठी समानार्थी शब्द नाही. राग ही भावना आहे आणि आक्रमकता म्हणजे रागाचा वर्तनात्मक प्रतिसाद असतो.

आक्रमकता म्हणजे एखादया व्यक्ती, प्राणी, वस्तू याला इजा पोहचवण्याच्या उद्देशाने दिलेली शारीरिक किंवा शाब्दिक अभिव्यक्ती होय. यामध्ये व्यक्तीला मार देऊन शारीरिक इजा करणे किंवा अपमान करणे आणि वस्तूंची मोडतोड करणे/नष्ट करणे यांचा समावेश होतो.

**दर्पण**

तुम्हाला राग येणाऱ्या १० गोष्टींचा विचार करा...... यादी करा. राग आल्यावर तुम्ही कसा प्रतिसाद देता? नोंद करा.

### (३) मत्सर (Jealousy) :

वास्तविक, गृहीत धरणे किंवा आपुलकी कमी असणारी धमकी याला दिलेला हा प्रतिसाद असतो. मालकी/हक्क गाजवण्याच्या इच्छेशी संबंधित भितीशी हे संबंधित असते.

शालापूर्व अवस्थेत मत्सराचे सर्वात सर्वसामान्य कारण म्हणजे भावंडांचे आगमन. भावंडांच्या जन्मानंतर बालकांमध्ये मत्सर दिसण्याची कारणे कोणती आहेत?

- दुसऱ्या बालकाचा जन्म होईपर्यंत पहिले बालकच कुटुंबाच्या/घराच्या केंद्रस्थानी असते. नवीन बाळाचा जन्म झाल्यावर ते बालक केंद्रस्थानी होते. त्यामुळे मोठ्या बालकाला दुर्लक्षित वाटते.
- नातेवाईक आणि शेजारी मोठ्या बालकाकडे दुर्लक्ष करून नवीन बाळात रस दाखवतात.
- नवीन आलेल्या बाळाला जास्तीत जास्त वेळा द्यावा लागतो त्यामुळे मोठ्या बालकाला वेळा आणि लक्ष अगदी कमी मिळाते.
- अचानकपणे बालकाने मोठ्या भावा/बहिणीप्रमाणे वागावे असे अपेक्षित केले जाते.
- इतर व्यक्ती आणि कुटुंबीय बालकांच्या दिसण्याविषयी तुलना करायला सुरुवात करतात.

भावंडांविषयीच्या मत्सराला 'भावंडांतील चढाओढ' (Sibling Rivalry) म्हणतात.

| कारणे | अभिव्यक्ती | हाताळणी |
|---|---|---|
| नवीन भावंडांच्या जन्मानंतर न आवडणारी तुलना<br><br>मोठ्यांकडून होणारा पक्षपात | लक्ष वेधून घेणारे वर्तन जसे गोंधळ घालणारे /किरकिर करणारे.<br><br>अंगठा चोखणे, नखे खाणे किंवा अंथरुण ओले करणे यासारख्या वैफल्य दर्शवणाऱ्या सवयी दर्शवतात.<br><br>मत्सराचा प्रत्यक्ष प्रतिसाद ज्यात बाळाला शारीरिक इजा उदा. मारणे, चिमटे काढणे केले जाते. 'मला हे बाळ आवडत नाही' किंवा 'बाळाला हॉस्पीटलमध्ये परत पाठवून दे.' यासारख्या वाक्यातून शाब्दिकरित्या दर्शवू शकतात. | नवीन बाळ येण्याआधी बालकाच्या मनाची तयारी करणे. त्याला त्याच्या लहानपणीचे चित्र दाखवा आणि बाळ किती आगतिक असते आणि प्रत्येक गोष्टीत त्याला मदतीची गरज असते हे समजून द्यावे. तुलना करणे / भिती दाखवणे टाळावे.<br><br>अशा तयारीनंतर ही काही प्रमाणात मत्सर दिसतो तो मोठ्या व्यक्तींनी स्वीकारावा.<br><br>जेव्हा नवीन बाळाचे आगमन होते त्यानंतर थोडावेळ तरी 'खास' मोठ्या बालकांसाठी द्यावा.<br><br>बालकांमध्ये तुलना टाळावी.<br><br>बाळाच्या काळजी घेण्याच्या कृतीमध्ये बालकाचा सहभाग घ्यावा त्यामुळे त्याला जबाबदारी आणि हवे असण्याची भावना निर्माण होईल. |

| | | |
|---|---|---|
| | | बालकाच्या बालीश वर्तनाची चेष्टा/ उपहास करु नये.<br>त्याला लहान बाळाची काळजी घेण्याच्या कृतीत सहभागी करून घ्यावे.<br>बालकाला शाब्दिक आणि शारीरिक मार्गांनी वारंवार तुमच्या प्रेमाची खात्री पटवून द्यावी. हे अतिशय महत्त्वाचे आहे. |

### इ. सामाजिकरण (Socialization) :

सामाजिकरण म्हणजे अशी प्रक्रिया ज्यामध्ये बालक समाजमान्य वर्तन करायला शिकते. सामाजिक वर्तन हे अर्जित वर्तन म्हणजे शिकलेले वर्तन असते. इतर व्यक्तींबरोबर कशी आंतरक्रिया साधायची हे नवजात बालकास माहित नसते. व्यक्तीच्या अनुभवातून, निरीक्षणातून आणि अनुकरणातून हळूहळू बालक कोणत्या प्रकारचे वर्तन मान्य आहे हे शिकते.

### सामाजिक घटक (Socializing agents) :

महत्वाचे सामाजिक घटक म्हणजे

- कुटुंब (Family)
- समवयस्क गट (Peer group)
- समाज (Community)

### कुटुंब, शाळा आणि समाज यांची सामाजिकरणातील भूमिका (Role of Family, School and Community in Socialization)

### (१) कुटुंब (Family)

बालकाच्या कुटुंबाचा प्रकार आणि आकार याची बालकाच्या सामाजिकरणात खूप महत्त्वाची भूमिका असते. कुटुंबातील सदस्यांची संख्या, त्यांचे दृष्टीकोन आणि आंतरक्रिया याचा प्रत्यक्ष प्रभाव वाढणाऱ्या बालकांवर दिसतो. जे संभाव्य बंधाबाबतचे अनुभव जे विभक्त कुटुंबात मिळतात ते एकत्र विस्तारीत कुटुंबात मिळणाऱ्या अनुभवापेक्षा पूर्णपणे वेगळ्या प्रकारचे असतात. बालकाला घडवताना पालक आणि कुटुंबाच्या अपेक्षा याची पण प्रभाव टाकण्यात महत्त्वाची भूमिका असते.

### (२) शाळा, शिक्षक आणि समवयस्क (School Teachers and Peers)

घराबाहेर शाळा आणि शिक्षक हे पहिले प्रभाव टाकणारे घटक असतात. बालकामध्ये आरामदायी आणि सुरक्षितेची भावना विकसित होण्यासाठी शाळेतील सुरक्षित आणि सहज वातावरण हे अतिशय महत्त्वाचे असते. उबदार संगोपन आणि आनंदी शालेय वातावरण हे बालकात आत्मविश्वास आणि शाळेची आवड विकसित करण्यास मदत करते. शिक्षकांनी केलेले कौतुक, प्रोत्साहन आणि प्रबलीकरण हे शाळेविषयीचे सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यास बराच काळ मदत करते.

### (३) समाज (Community)

बालकाच्या सुरुवातीच्या वर्षात बालकाला आकार देण्यात समाज एखाद्या आधारासारखी (pivotal) भूमिका बजावतो. वडीलधारी व्यक्ती, समवयस्क, समाजातील इतर महत्त्वाच्या व्यक्ती यांच्यात घडणारी आंतरक्रिया, सामाजिक दृष्टीकोन आणि वर्तन नमुना यावर खूप मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकते. बालके सामाजिक मूल्य, सामाजिक कौशल्ये प्राप्त करणे आणि घराबाहेरील मोठ्या वर्तुळातील व्यक्तीबरोबर आंतरक्रिया शिकतात. भाषा विकासात आणि भावनिक समतोल विकसित होण्यात वडीलधाऱ्या व्यक्ती आणि समवयस्क यांच्याकडून मान्यता आणि कौतुक हे खूप महत्त्वाचे असते.

## फ. सामाजिक वर्तन प्रकार (Forms of Social Behaviour)

### (१) चढाओढ/स्पर्धा (Rivalry)

इतरांपेक्षा चांगले करण्याच्या प्रेरणेतून हा वैशिष्ट्यपूर्ण वर्तन प्रकार दिसतो. भावंड किंवा मित्रांसमोर शेखी मिरवणे किंवा कुणीतरी वेगळे आहोत असे दाखवणे अशा वर्तनातून बरेचदा चढाओढ दाखवली जाते. वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत बालकांना त्यांच्या क्षमतांची जाणीव होऊ लागते आणि मित्रांपेक्षा आपण चांगले करू शकतो याची थोडीफार कल्पना येऊ लागते. पालकांच्या पक्षपाती वृत्तीमुळे बरेचदा भावंडांमधील चढाओढ दिसते. ज्यावेळी चढाओढ बालकाला अजून चांगले करण्यास प्रेरित करते. तेव्हा शिकण्याचा नवीन मार्ग म्हणून अनुकूलता दर्शवली जाते. असे असले तरी खूप जास्त चढाओढीमुळे कमी प्रतीचे सामाजिकरण घडते.

### (२) भांडण (Quarrelling)

सर्वसाधारणपणे रागाने वाद घालणे किंवा बालक निष्कारण दुसऱ्यावर हल्ला करते याची निष्पत्ती म्हणून भांडण दिसते. विकासाच्या या अवस्थेत, भांडण हे कारण नसतांना एकमेकांना आवडत नसण्यातून दिसून येते. वादावादी कमी वेळा टिकते आणि लवकर त्याच्यावर तोडगा निघतो. बालके सहजपणे मनात काहीही न ठेवता लवकरच आनंदी आणि मैत्रीपूर्ण होऊन सुरुवात करतात. बालकाने केलेले काम नष्ट करणे/फाडणे, खेळणी ओढून घेणे, रडणे, लाथा मारणे किंवा किंचाळणे याचा भांडणात समावेश असतो. भांडण किती वारंवार आणि तीव्रतेने होते यावर कृतींचे स्वरुप अवलंबून असते.

### (३) नकारात्मकता (Negativism)

विशिष्ट पद्धतीने वागण्यास ज्यावेळी दुसऱ्याकडून विरोध किंवा दबाव टाकला जातो तेव्हा हा वर्तनप्रकार दिसून येतो. वयाच्या ३ ते ६ वर्षात 'नकारात्मकतेची' उच्च पातळी गाठलेली दिसते. खूप जास्त दबावाला तोंड देण्यासाठी 'नकारात्मकता' हा उत्तम मार्ग आहे. बालके हे चटकन शिकतात. विनंतीला मान न देणे, ऐकले नाही असे दाखवणे, दैनंदिन जीवनासंबंधीच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणे यातून 'नकारात्मकता' दर्शवली जाते. वयाच्या ४ ते ६ वर्षामध्ये शारीरिक विरोध कमी होऊन शाब्दिक मार्गाने तो दर्शवायला सुरुवात होते. कोणताही सल्ला, प्रश्न किंवा विनंती याला बालकाचे उत्तर 'नाही' असते.

### (४) आक्रमकता (Aggression)

इतरांकडून चिथावणी मिळाल्यामुळे जी वास्तविक किंवा धमकी देणारी कृती होते त्याला 'आक्रमकता' असे म्हटले जाते. बालकांपेक्षा जे लहान किंवा कमजोर आहेत अशांशी शारीरिक किंवा शाब्दिकरित्या आक्रमकता दर्शवली जाते. वयाच्या ४ ते ५व्या वर्षी त्याची उच्च पातळी गाठली जाते. ज्या व्यक्ती किंवा वस्तू बालकाला अडथळा निर्माण करतात अशा वेळी नैराश्याची निष्पत्ती म्हणून आक्रमकता दर्शवली जाते. ज्या बालकांना पालकांचा नकार किंवा व्यक्ती किंवा वस्तूविषयीची नाराजी प्रत्यक्षरित्या व्यक्त करता येत नाही. अशी बालके आक्रमक वर्तन दर्शवतात. महत्त्वाच्या व्यक्तींकडून होणारे दुर्लक्ष, असुरक्षितेपासून स्वतःचा बचाव करण्याची गरज किंवा मत्सर यामुळे आक्रमक वर्तन दिसून येते. तणावामुळे येणारा मानसिक ताण हे पण आक्रमकतेचे छुपे कारण असू शकते.

### (५) लाजाळूपणा (Shyness)

अपरिचित व्यक्ती किंवा परिस्थितीच्या भितीमुळे दूर जाण्यासाठी हा वर्तन प्रकार दर्शवला जातो. ज्या व्यक्ती जास्त ताकदवान, आकाराने मोठ्या किंवा जास्त शक्तीशाली असतात. अशांना कसा प्रतिसाद द्यायचा याबाबत खात्री नसते अशावेळी बरीच बालके लाजतात. एखादी नवीन गोष्ट करण्याच्या सर्वसामान्य बुजरेपणामुळे बालकांमध्ये लाजाळूपणा दिसून येतो. लाजाळू बालकांना नेतृत्वाची भूमिका पार पाडणे खूप अवघड असते कारण अशा बालकांमध्ये प्रभावी संभाषण आणि इतरांबरोबर काम करण्याची अक्षमता असते. खूप लाजाळू बालके अप्रिय असतात कारण ते इतरांबरोबर बोलायला घाबरतात आणि स्वतःमध्ये गुंग राहतात.

### (६) सहकार्य (Co-operation)

सर्वसाधारणपणे वयाच्या चौथ्या वर्षापासून, बालके समवयस्कांबरोबर खेळायला आणि काम करायला शिकतात. चांगले सामाजिक संबंध बनवण्यासाठी त्यांना सहकार्याने/सहयोगाने आणि एकत्रित काम करण्याची

जितकी जास्त संधी मिळेल तितके चांगले संबंध प्रस्थापित करण्याची संधी मिळते.

### (७) आक्रस्ताळेपणा / आकांडतांडव (Temper tantrum)

सर्वसाधारणपणे लहान बालकांमध्ये रागाचा हिंसक उद्रेक हा व्यक्ती, वस्तू किंवा घटनेच्या विरुद्ध निर्देश असतो. हे आक्रस्ताळेपणा/ आकांडतांडव नावाने ओळखले जाते. लाथा मारणे, किंचाळणे, डोके आपटणे, जमिनीवर लोळण घेणे, ठोसे मारणे किंवा मारणे यासारख्या शारीरिक प्रतिसादातून दर्शवले जावू शकते.

सर्वसाधारणपणे वयाच्या चौथ्या वर्षापासून रागाला प्रतिसाद देताना बालके भाषेचा वापर करायला सुरुवात करतात. ज्यावेळी बालकांना मुक्त खेळाला आणि भावनांची अभिव्यक्तीसाठी संधी मिळत नाही तेव्हा बालके आक्रस्ताळेपणा/आकांडतांडव करतात. हुकुमशाही पालक, खूप जास्त अपेक्षा, सतत चांगलीच कामगिरी करण्याचा सतत दबाव अशी काही कारणे आहेत. ज्यामुळे बालके आक्रस्ताळेपणा करतात. जशी त्यांना भावनांची अभिव्यक्ती समाजमान्य मार्गाने व्यक्त करतांना मदतीची गरजच असते. तशीच त्यांना भावनांचे नियमन करण्यासाठी वेळ आणि मोकळीकतेची गरज असते. आक्रस्ताळेपणा हा जसा हानीकारक होऊ शकतो तसा तो स्वतःचा मार्ग ठरवताना साधन म्हणून वापरायला शिकतात.

### (८) परोपकार (Altruism)

परोपकारालाच जनहितासाठी केलेले वर्तन असेही म्हणतात. ऐच्छिकतेने, सकारात्मक, स्वीकृतीदर्शक आणि मदतीसाठी कार्य करण्याची क्षमता म्हणजे परोपकार वृत्ती. परोपकार वृत्ती अनेक स्वास्थ्यपूर्ण घटकांशी निगडीत असते.

## ग) शिस्त (Discipline)

शिस्त हा शब्द लॅटीन भाषेतील 'डिसीप्लीना' (disciplina) या शब्दापासून आला आहे. त्याचा अर्थ 'सूचना देणे'. काही जणांचा असा विश्वास आहे की शिस्त विकासाला चालना द्यायला मदत करते, तर बाकीच्यांचा असा विश्वास आहे की शिस्त ही प्रशिक्षण आणि शिकण्याची अशी प्रक्रिया आहे. ज्यामुळे बालकाची वाढ आणि विकास वाढीस लागतो. तुम्हाला असे लक्षात येईल की हे दोन्ही मार्ग जवळजवळ सारखेच आहेत. शिस्तीचे असे ही वर्णन करता येईल की ही अशी प्रक्रिया आहे ज्यात समाज मान्य नसणारे पण बाह्य निरीक्षणात्मक वर्तन, अभिवृत्ती आणि 'सद्सद्विवेकबुद्धी'चा विकास याला मार्गी लावणे किंवा त्यामध्ये बदल घडवणे. दुसऱ्या शब्दात, शिस्त हे असे साधन आहे जे बालकाला सामाजिक मान्यता, प्रेम आणि प्रोत्साहन मिळवण्यासाठी सामाजिक नियम व मापक अंगभूत करण्यास मदत करते.

### शिस्तीचे महत्त्व (Importance of Discipline)

औपचारिकरित्या असा विश्वास आहे की, वर्तन नियंत्रित करण्यासाठी शिस्तीची गरज असते. असे असले तरी, आधुनिक दृष्टीकोन असे सांगतो की, वैयक्तिक दिशा मिळण्यासाठी त्याला मार्गदर्शन व सामर्थ्य देण्यासाठी, स्वतःविषयी आणि इतरांविषयी समग्र दृष्टीकोन विकसित करण्यासाठी तसेच दैनंदिन जीवनात विशिष्ट पातळीचा आत्मविश्वास आणि समाधान मिळवण्यासाठी शिस्तीची गरज असते.

प्रत्येक संस्कृती आणि उपसंस्कृती ही त्यांच्या सदस्यावर विशिष्ट प्रकारच्या मागण्या लादत असते. जे एका संस्कृती कडून स्वीकारले जाते ते दुसऱ्या संस्कृतीकडून स्वीकारले जातेच असे नाही. असे असले तरी, सामाजिक-आर्थिक दर्जा, कुटुंबाचे आकारमान, बालकांची संख्या आणि पालकांचा दृष्टीकोन याचा शिस्त कोणत्या मार्गानी हाताळली जाणार आहे यावर प्रभाव टाकते. शिस्तीची कार्य ही कमी-जास्त प्रमाणात सारखीच असतात.

- सामाजिक मान्यता, कदर करणे आणि प्रशंसा हे शिस्तीमुळे मिळते. हे बालकांच्या प्रेम आणि सुरक्षितता या गरजांचे समाधान करते.
- बालक समाजमान्य आणि समाजाला मान्य नसणारे वर्तन यात फरक करायला शिकल्यावर शिस्त समाजमान्य वर्तनास प्रेरीत करते.
- बालके गैरवर्तन टाळण्यास शिकतात आणि ज्या कृतींमुळे त्यांच्या पालकांच्या कपाळावर आठ्या

येतील अशा कृती करण्यात सहभागी होत नाहीत. त्यामुळे अपराधीपणाची भावना सहजपणे टाळली जाते किंवा महत्वपूर्णरित्या कमी होते.

- शिस्त सद्सद्विवेकबुद्धीला मदत करते यामुळे बालक प्रयत्न आणि प्रमादांचा वापर करून नियम अंगभूत करतात, स्वनियंत्रण शिकतात आणि बाह्यनियंत्रणाच्या गरजेसाठी कमी अवलंबून राहतात.

प्रत्येक बालकाच्या गरजा वेगळ्या असतात. सारख्याच वयाच्या बालकांमध्ये अनुवंशिकता आणि परिपक्वताचा वेग वेगळा असल्यामुळे त्यांच्यात भिन्नता दिसते. एखाद्या बालकाच्या विकासासाठी एखादी गोष्ट योग्य असेल तर तीच दुसऱ्या बालकासाठी योग्य ठरेलच असे नाही. मोठ्या वयाच्या बालकांना सांगून किंवा आज्ञा देऊन एखादी गोष्ट करणे यापेक्षा स्पष्टीकरण आणि कारणमीमांसेची ते मागणी करू शकतात. दिवसाची कोणती वेळ आहे आणि बालके कोणत्या कृतीमध्ये गुंतलेली आहेत त्याप्रमाणे शिस्तीच्या गरजेत फरक होऊ शकतो. वयाप्रमाणे वारंवारितेमध्ये फरक होऊ शकतो. दिलेले उदाहरण हा मुद्दा स्पष्ट करण्यास मदत करू शकते.

बालक खेळतांना धोकादायक उंचीवरून उडी मारण्याचा प्रयत्न करते. त्यावेळी शाब्दिकरित्या ठामपणे 'नको' सांगणे बालकांना थांबवू शकते, पण दुसऱ्याला शारीरिकरित्या थांबवावे लागेल किंवा उडी मारण्यापासून परावृत्त करावे लागेल.

त्याचप्रमाणे, कारणमीमांसा काही जणांसाठी काम करते तर बाकींच्यासाठी करेलच असे नाही. खाणे, झोपणे, अभ्यास करणे किंवा रात्री उशीरापर्यंत मित्रांबरोबर बाहेर राहणे यासारख्या दैनंदिन कृतीमध्ये शिस्तीचा वापर करणे गरजेचे असते. मोठ्या बालकांना विस्तृत कारणमीमांसा, स्पष्टीकरण आणि व्यवहारचार्तुयाची गरज असू शकते. जसे बालक मोठे होत जाते तसे सामाजिक अपेक्षाविषयी गुणात्मकता याविषयी पालक-बालक संवाद आणि समजून घेणे वाढीस लागते.

**तुम्हाला माहित आहे का?**

**बक्षिस आणि लाच हे सारखे नाही!**

बऱ्याच प्रौढ व्यक्ती बालकाने काही सफलता मिळवल्यास किंवा समाजमान्य रितीने वर्तन केल्यास त्याला बक्षिस देत नाहीत कारण त्यांच्या दृष्टीने ती 'लाच' असते. बक्षिस आणि लाच सारखीच आहे का? नाही, नक्कीच नाही! एखादे हवे असणारे वर्तन घडण्यासाठी पैज म्हणून वापरणे किंवा गाजर दाखवणे (dangling carrot) म्हणजे लाच देणे होय. बालकाने एखादी कृती करणे आणि त्या बदल्यात त्याला बक्षिस देण्याचे वचन देणे किंवा वस्तू स्वरुपात देणे ही जणू वस्तूविनिमय पद्धती (barter system) प्रमाणे आहे. लाच वर्तनात बदल घडवते. पण तो बदल फार काळ टिकत नाही. लवकरच बालक त्याने दर्शवलेल्या प्रत्येक वर्तनाच्या बदल्यात काहीतरी मिळण्याची अपेक्षा करायला लागते. यात आंतरिक नियंत्रणाला किंवा मान्यतेला वाव राहात नाही आणि कोणत्याही प्रकारची जबाबदारी मानण्याची गरज वाटत नाही. बक्षिस किंवा विशेष अधिकार हे कृतीनंतर किंवा समाजमान्य वर्तनानंतर दिलेले दिसून येते. त्यामुळे मान्य असणारे वर्तन पुन्हा-पुन्हा करण्यास बालकास प्रोत्साहित व प्रेरीत करते. असे असले तरी हे खरे आहे की, बालक जर बक्षिस आणि लाच यात फरक करण्यास परिपक्व नसेल तर वस्तूद्वारे बक्षिस याचा काटकसरीने वापर करावा.

### ह) सर्वसामान्य शिस्तीची तंत्रे (Common Disciplining Techniques)

पालकांकडून सर्वसामान्यपणे तीन प्रकारच्या शिस्तीची तंत्रे जास्ती करून वापरली जातात. चला आता ते कसे कार्य करतात आणि त्याच्या वापराचा कसा परिणाम होतो हे पाहूयात.

### (१) हुकुमशाही शिस्त (The Authoritarian Technique)

नियम खूप कडक असणे आणि त्याची अंमलबजावणी खूप ताठरतेने होणे ही हुकुमशाही शिस्तीची वैशिष्ट्ये आहेत. या तंत्रांत निष्ठुर शिक्षा आणि अपेक्षित दर्जाप्रमाणे राहण्यात अपयश याचा समावेश होतो. त्याशिवाय यात बालकाने अपेक्षित दर्जा गाठण्याचा प्रयत्न केला तरी मान्यतेच्या खुणा दिसत नाहीत. हुकुमशाही शिस्त नियंत्रण, बाह्य दबाव किंवा शारीरिक शिक्षा दर्शवते. जे पालक हुकुमशाही पद्धत वापरतात आणि त्याच्या वापराबाबत ताठर असतात, त्यात बदल करण्यात सहसा यशस्वी ठरत नाहीत किंवा बालक मोठे झाले तरी पूर्णपणे सोडून देऊ शकत नाहीत.

#### बालक कशी प्रतिक्रिया देते? (How does a child react?)

हुकुमशाही शिस्तीच्या तंत्रात स्वतःच्या वर्तनावर नियंत्रण ठेवायला शिकणे किंवा निर्णय घेणे यासाठी कोणत्याही प्रकारची संधी उपलब्ध नसते. बालकाबाबतचे बहुतेक सर्व निर्णय घेतले जातात आणि त्याच्या इच्छेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. जी बालके या शिस्तीचा अनुभव घेतात ती सहसा बुजरी किंवा खूप जास्त बंडखोर होतात.

काही बालके चांगले असण्याचे ढोंग करतात पण त्यांच्यात दडलेली चीड दर्शवू शकतात. खूप जास्त शिस्त असणाऱ्या बालकाला सगळे जग विरोधी वाटते. संवेदनशील बालक हे त्याच्या कोषात जाऊ शकते. अशी बालके आक्रमक वर्तन दर्शवू शकतात खास करून जे स्वतःचे रक्षण करू शकत नाहीत. याची निष्पत्ती म्हणून असामाजिक वर्तन दिसून येऊ शकते. सतत दहशत, दुःखी आणि भिती दिसते. अशी बालके हट्टी/ दुराग्रही आणि सर्वसाधारणपणे नकारात्मक अभिवृत्ती विकसित झालेली असतात.

### (२) लोकशाही शिस्त (The Democratic / Authoritative Technique)

पालक जे बालकांना स्पष्टीकरण देतात किंवा कारणे सांगतात आणि चर्चा करतात ज्यामुळे एखादे वर्तन/वागणे विशिष्ट पद्धतीने करणे का अपेक्षित आहे हे समजण्यास बालकास मदत होते.

एखाद्या समस्येविषयी बालकाचा दृष्टीकोन आणि भावना लक्षात घेऊन त्या परिस्थितीविषयी साधक आणि बाधकता स्पष्ट करतात. या प्रकारच्या तंत्रात शारीरिक शिक्षा किंवा इतर कोणतेही दंडात्मक उपाय न वापरणे हे वैशिष्ट आहे. पालक बालकांची शक्ती कृतींच्या योग्य नियोजनातून वळवतात. ज्यामुळे बालकाची शक्ती समाजमान्य मार्गाकडे प्रत्यक्षरित्या वळवली जाते.

#### बालक कशी प्रतिक्रिया देते? (How does a child react?)

लोकशाही शिस्त बालकाला नियम अंगभूत करण्यास आणि सामाजिक अपेक्षांचे महत्त्व समजून घेण्यास मदत करते. बालक जेव्हा कायमस्वरुपी दर्जा आणि अपेक्षांवर राहतात. तेव्हा बालकांना मान्यता आणि प्रशंसा मिळते. बालके जास्त चांगले सकारात्मक सामाजिक आणि वैयक्तिक समायोजन करतात. बालकामध्ये वैचारिक स्वातंत्र्य आणि वास्तविक व सकारात्मक स्व-संकल्पना विकसित होते. अशी बालके सहसा उत्स्फूर्त, बाहेर जायला आवडणारी, जबाबदार असतात.

त्यांना ज्याप्रमाणे स्वातंत्र्याचा अनुभव मिळतो त्यामुळे येणाऱ्या समस्यांना दहशतीशिवाय तोंड देण्याची संमती मिळते. ते उबदार आणि मैत्रीपूर्ण आणि समवयस्क आणि त्यांच्या सभोवती असणाऱ्या मोठ्या व्यक्तींबरोबर सहकर्त्याचे संबंध असतात.

### (३) अतिमोकळीक (The Permissive Technique)

हे तंत्र सहसा ज्या पालकांना स्वतःला खूप ताठर किंवा कडक शिस्त अनुभवायला लागली असेल त्यांच्यात दिसून येते, त्यामुळे ते स्वतःच्या बालकांसाठी अतिमोकळीक हे तंत्र वापरणे अधिक पसंत करतात. अतिमोकळीक शिस्त म्हणजे काही प्रमाणात शिस्तीची अनुपस्थिती असणे.

काही पालक स्वतःच्या बालकांनी प्रयत्न आणि प्रमाद पद्धतीने गोष्टी शोधण्यात याला पसंती देणारे असतात. ते मार्गदर्शन करत नाहीत आणि बालकांवर ते काय करत आहेत यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवत नाहीत. बालकांसाठी कोणत्याही मर्यादा किंवा सीमारेषा ठरवलेल्या नसतात आणि बालकाला स्वतःचे निर्णय स्वतः

ला घ्यायला संमती असते आणि त्याला जी पद्धत योग्य वाटते त्या पद्धतीने तो वागू शकतो.

ज्या पालकांना बालके नाराज होण्याची भीती वाटत असते किंवा बालके कशी प्रतिक्रिया देतील याविषयी खात्री नसते त्यावेळी अशा शिस्तीला पसंती देऊन पालक बालके ज्या कृतीत गुंतलेली आहेत त्यात अडथळा आणत नाहीत.

**बालक कशी प्रतिक्रिया देते? (How does a child react?)**

ज्या बालकाला अशा मार्गाने शिस्त लावलेली असते अशी बालके गोंधळलेली आणि असुरक्षित असतात. याची निष्पत्ती म्हणजे बालके चिंताग्रस्त, आक्रमक आणि अतिशय घाबरलेली असतात. अशा वेळी मार्गदर्शन करण्याची आणि त्याने केलेल्या चुका सुधारण्याची गरज त्याला जास्त वाटू लागते. ज्या बालकांना मर्यादा आणि सीमा माहित नसतात, त्यांना काहीच माहित नसल्यामुळे ते दिशाहीन होतात. चिंताग्रस्तता आणि अगतिकता वाटणे हे सर्वसामान्य आहे. पालकांना आपल्यामध्ये यथार्थपणे रस नाही असे बालकांना वाटते.

**मुद्द्यांची उजळणी करा.**

**अ)**

- भावनिक आणि सामाजिक विकास हातात हात घालून जातात.
- भावनांचे मूलभूत चार घटक - उद्दिपक, भावना, शारीरिक उत्तेजना, वर्तन
- अर्भकावस्थेतील महत्त्वाचे वैकासिक टप्पे म्हणजे - सामाजिक हास्य, समाजिक संदर्भ, सामाजिक संकेत.

**ब)** **सामाजिक - भावनिक विकासाचे घटक**

- स्व-जाणीव
- इतरांबरोबरील संबंध
- खेळ
- भावना समजून घेणे आणि त्याचे नियमन करणे.

**क)** **भावनांचे प्रकार**

- **सकारात्मक**
  - प्रेम आणि आपुलकी
  - आनंद
- **नकारात्मक**
  - भीती
  - राग
  - मत्सर

## मुद्द्यांची उजळणी करा.

ड)

**सामाजिक वर्तन प्रकार**

- चढाओढ
- भांडण
- नकारात्मकता
- आक्रमकता
- लाजाळूपणा
- सहकार्य
- आक्रस्ताळेपणा
- परोपकार

इ)

**सर्वसामान्य शिस्तीची तंत्रे**

- हुकुमशाही
- लोकशाही
- अतिमोकळीक

### शब्दसूची

**पक्षपातीवृत्ती (Favouritism) :** अयोग्य फायदा घेऊ देणे किंवा योग्य नसणारे पक्षपात दाखवणे

**लिंग ओळख (Gender identity) :** याचा संबंध व्यक्ती पुरुष/स्त्री/इतर असण्याशी आहे.

**पाणउतारा करणे (Humiliate) :** लाजिरवाणे

**उद्दीपक (Stimulus) :** कृती करण्यास कारणीभूत असणारे

## स्वाध्याय

### प्र. १ योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.

(१) पूर्वशालेय अवस्थेत .............. प्रकारच्या खेळात बालके गुंतलेली दिसतात.

(अ) समांतर (ब) सहकार्यात्मक

(क) एकट्याने खेळणे

(२) बालके त्यांच्या भावना .............. व्यक्त करतात.

(अ) वारंवार (ब) कधीतरी

(क) कधीच नाही

(३) जी बालके भावनिकदृष्ट्या निरोगी सुरक्षित असतात ते इतरांबरोबर .............. सहसंबंध प्रस्थापित करू शकतात.

(अ) नकारात्मक (ब) तटस्थ

(क) सकारात्मक

(४) प्रौढ व्यक्ती .............. भावना समाजमान्य मार्गाने व्यक्त करतात पण शालापूर्व बालकांना ते अवघड जाते.

(अ) भीती (ब) मत्सर

(क) राग

### प्र. २ खालील विधाने चूक का बरोबर ते सांगून कारणासहित स्पष्ट करा.

(१) वर्तन आणि आंतरव्यक्तिक संबंधाचा भावनिक आणि सामाजिक विश्वासावर परिणाम होतो.

(२) बालके वारंवार अप्रत्यक्ष मार्गांनी भावना व्यक्त करतात.

(३) पूर्वशालेय अवस्थेतील बालके भावना नेहमीच समाजमान्य मार्गाने व्यक्त करतात.

(४) बालकांना शिस्त लावताना लाच हे सगळ्यात उत्तम साधन आहे.

(५) पूर्वशालेय अवस्थेतील बालके दुसऱ्यांच्या भावना समजू शकतात.

### प्र. ३ संज्ञा स्पष्ट करा.

(१) सामाजिकरण

(२) स्व-संकल्पना

(३) सामाजिक-भावनिक विकास

(४) आक्रस्ताळेपणा

### प्र. ४ खालील परिच्छेद वाचून त्यात शिस्तीचे कोणते तंत्र दिसून येते ते सांगून त्या तंत्रांचा बालकांवर कसा परिणाम होतो ते सांगा.

**घटना (१)**

इराच्या आईने इराच्या मैत्रिणीच्या वाढदिवसाला जातांना इराने कोणते कपडे घालायचे ते आधीच ठरवले आणि भेटवस्तू पण आणून ठेवली तसेच इराने कुणाशी खेळायचे आणि कसे वागायचे हे पण तिने सांगितले.

**घटना (२)**

साहिल त्याच्या वर्गमित्राच्या वाढदिवसाला इकडे-तिकडे पळत होता आणि ग्लास सांडत होता. टेबलावर साहिलला मिळालेल्या भेटवस्तू होत्या त्या घेऊन त्या उघडल्या त्यावेळी त्याची आई त्याच्याकडे फक्त बघत होती.

**घटना (३)**

पूर्वाने विचारले की, ''मी माझ्या खास मैत्रिणीच्या वाढदिवसाला कोणते कपडे घालू?'' त्यावेळी तिच्या आईने 'तुझ्याकडे असलेल्या कपड्यापैकी तुझ्या आवडीचे छान कपडे घाल' असे सांगितले. तसेच आईने भेटवस्तू विकत घेताना पूर्वाला खेळण्याच्या दुकानात विचार करुन ठरवायला सांगितले.

**प्र. ५ शालापूर्व बालकांमध्ये खाली दिलेल्या भावनांच्या उद्दीपनांची कारणे लिहा.**

(१) मत्सर

(२) भीती

(३) राग

(४) आक्रमकता

**प्र. ६ खालील दिलेल्या भावना समृद्ध करण्यासाठी (enhanced) मार्ग सूचवा.**

(१) प्रेम आणि आपुलकी

(२) आनंद

**प्र. ७ टीपा लिहा.**

(१) भांडण

(२) लाजाळूपणा

(३) नकारात्मकता

**प्र. ८ उदाहरणे देऊन स्पष्ट करा.**

(१) शिस्तीचा अर्थ आणि महत्त्व

(२) सामाजिकरण प्रक्रियेतील घटक

(३) स्व-जाणीव

(४) भावना समजणे आणि भावनांचे नियमन

**प्रकल्प / स्वयंअध्ययन**

**तुमचे कुटुंब, शेजारी आणि सभोवतालचे लोक यांचे निरीक्षण करा.**

- **स्त्रिया व पुरुष यांच्या वेगवेगळ्या भूमिकांचे वर्णन करा.**
- **तुम्हाला असे वाटते का, की स्त्रिया व पुरुष यांनी विशिष्ट भूमिका बजवाव्यात?**
- **असे तुम्हाला का वाटते?**

❖ ❖ ❖

# ७ खेळातून सर्वांगीण विकास



## ७.१ खेळाची संकल्पना समजून घेणे (Understanding the concept of 'Play')

आई रोहितला हाक मारून म्हणाली, ''रोहित तू काय करतोयस? घरी जायचय नां, मी तुझी वाट बघते आहे.'' ''मी खूप बिझी आहे'' रोहित जोरात तिच्यावर ओरडला आणि त्याने खेळ पुढे चालू ठेवला. तो आणि त्याचा मित्र खेळात पुन्हा दंग झाले.

'खेळ' हा मुलांच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे. बालकाच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि बौद्धिक विकास म्हणजेच सर्वांगीण विकासासाठी खेळ अत्यंत आवश्यक आहे. बालकाच्या कल्याणामध्येही त्याचा सहभाग असतो. बालकांबरोबर पूर्ण गुंतवणूक होण्यासाठी पालक आणि संगोपनकर्ते यांच्यासाठी ही आदर्श संधी असते.

बालकांमध्ये खेळ हा नैसर्गिक आणि सहजतेने येतो. खोक्यात लपणे, झाडावर चढणे, चिखलात खेळणे, घरी जातांना लाथेने दगड उडवत जाणे किंवा आई-बाबांचे कपडे घालणे यासारख्या अनेक कृतींपैकी या काही कृती आहेत ज्यातून बालके स्वतःची करमणूक करतात आणि आनंद मिळवतात.

### व्याख्या (Definitions)

आता आपण विविध तज्ञ व्यक्तींनी दिलेल्या काही व्याख्या जवळून पाहू या.

स्टुअर्ट ब्राऊन (Stuart Brown २०१८) यांच्या म्हणण्यानुसार,'' खेळ हा खेळासाठीच असतो. हे ऐच्छिक, आनंददायक, गुंतवणुकीची भावना देणे आणि वेळ कसा गेला हे न कळणारे असते. यात शेवट काय असणार यापेक्षा प्रक्रिया महत्त्वाची असते.''

कॅथरीन गार्व्हे (Catherine Garvey १९७७) यांच्या म्हणण्यानुसार, ''खेळ अशी कृती आहे ज्यामधून निर्भेळ आनंद मिळतो. खालील पाच मुद्द्यांच्या आधारे बालकांमधील खेळाची व्याख्या करता येते.''

(१) यातून आनंद व मनोरंजन मिळते.
(२) खेळात कोणतीही बाह्य उद्दिष्ट नसतात.
(३) खेळ हा उत्स्फूर्त आणि ऐच्छिक असतो.
(४) खेळात क्रियाशील सहभाग असतो.
(५) यात बालकांचे काही काल्पनिक खेळ गुंतलेले असतात.

फ्रेड्रीक फ्रोबेल (Friedrich Froebel १७८२-१८५२) यांनी खेळाचे वर्णन करतांना खेळ हा अध्ययनाचा प्राथमिक मार्ग आहे असे म्हटले आहे. त्यांचे असेही म्हणणे आहे की, 'खेळ हे वास्तव अध्ययनाचे इंजीन आहे.'

लेव्ह व्हायगॉटस्की (Lev Vygotsky १९७८) या रशियन मानसशास्त्रज्ञांनी असे सांगितले आहे की खेळ ही अशी कृती आहे जी बालके स्वेच्छेने करतात. यात काल्पनिक वातावरण आणि खेळाबाबतचे नियम असू/नसू शकतात.

### 'खेळा' बाबतच्या काही रंजक गोष्टी

१ फेब्रुवारी २०१३ ला 'युनायटेड नेशन समितीने' बालकांच्या हक्काबाबत (CRC) असे सांगितले की, 'प्रत्येक बालकाला विश्रांती, फुरसतीचा वेळ, खेळ, मनोरंजनाच्या कृती आणि सांस्कृतिक व कलात्मक कृतींमध्ये मुक्त आणि पूर्ण सहभागाचा हक्क आहे.

खेळ हे माहितीचे एकत्रीकरण आणि अध्ययन याचा मार्ग आहे. असे खेळाचे वर्णन अनेक शिक्षणतज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांनी केले आहे. त्यांचा असा विश्वास आहे की बालकांसाठी खेळ हे काम असते. यात अशा सुसंगत कृती केल्या जातात. ज्यात स्वकरमणुकी बरोबरच वर्तनात्मक, सामाजिक व मनोशारीरिक बक्षिसांचा समावेश असतो. त्या बालकांनी ठरवलेल्या असतात आणि बक्षिस हे प्रत्येक बालकांना वैयक्तिकरित्या स्वतःच्या आतून मिळते. हे नेहमीच आनंददायक आणि उत्स्फूर्त असे असते.

स्केल्स् आणि इतर यांच्या मते (१९९१) – ''खेळ ही अशी कृती आहे जी बालकांना पूर्णपणे गुंतवून ठेवणारी कृती आहे. ज्यात बालके स्वेच्छेने, उत्स्फूर्तपणे आणि बेबंदपणे सहभागी होतात.''

खेळ म्हणजे अशी शारीरिक, मानसिक आणि मनोरंजनात्मक कृती आहे ज्यामध्ये निर्भेळ आनंद देणे याशिवाय दुसरे कोणतेही उद्दिष्ट नसते असे मानसशास्त्र सांगते.

### खेळाची गरज दर्शवणारे निर्देशक (Factors indicating the need for play)

खरे पाहता बालके ऐच्छीकरित्या खेळात भाग घेतात आणि क्वचितच खेळण्यासाठी त्यांना लाडीगोडी लावावी लागते. बालकांच्या मैदानावर /घराबाहेर खेळण्याच्या गरजेचे गुपीत फोडणाऱ्या अनेक सांकेतिक खुणा असतात. अशी गरज दर्शवणारे कोणते निर्देशक आहेत ते आता आपण पाहूयात.

- लवकर दमतात आणि चटकन निराश होतात.
- समन्वयात सुधारणा करण्याची गरज असते. उदा. पटकन पडतात किंवा घसरतात.
- स्थूल कारक वैकासिक टप्पे गाठू शकत नाहीत.
- अल्प अवधान कक्षा असते.
- शांत झोपू शकत नाहीत किंवा पुरेसा आहार घेत नाहीत.
- भावनांच्या नियमनामध्ये अडचणी येतात.
- सभोवताली जे चालू आहे त्याविषयी सुस्तावलेले किंवा रस न घेणारे.

हे खरे आहे की सर्वांगीण विकासाच्या सर्व अंगाचा विकास होताना खेळाच्या विविध पायऱ्या या फायदेशीर असतात. सामाजिक खेळातून बालके सामाजिक कौशल्ये आत्मसात करतात.

आता बालकांमध्ये दिसून येणाऱ्या खेळाच्या विविध पायऱ्या समजून घेण्याचा प्रयत्न करुयात.

## ७.२ खेळाच्या पायऱ्या (Stages of Play)

पार्टन (Parten १९२९) यांनी सामाजिक खेळाच्या सहा प्राथमिक पायऱ्या सांगितल्या आहेत.

### १. अनऑक्यूपाईड खेळ (Unoccupied Play)

बालक जेव्हा कोणत्याही खेळण्याबरोबर किंवा इतर बालकांबरोबर खेळत नसते पण एखाद्या चालू असणाऱ्या कृतीचे ते निरीक्षण करते किंवा काही काळासाठी त्यावर लक्ष केंद्रीत करते त्याला अनऑक्यूपाईड खेळ असे म्हणतात.

उदा. बाळ निर्हेतूक हालचाल करते किंवा बालक पावसाळ्यात साचलेल्या चिखलाच्या पाण्यात उड्या मारते.



चित्र ७.१

### २. एकटे खेळणे (Solitary play)

काही वेळा असे दिसून येते की बालक स्वत:शीच एकटेच खेळते. अशा खेळामुळे बालकाला विचार करणे, शोध घेणे, निर्माण करणे आणि एकाग्र होणे यासाठी वेळ मिळतो. त्याशिवाय भावनांचे नियमन करण्यासाठी पण खेळाची मदत होते.



चित्र ७.२

### ३. बालके 'प्रेक्षकांची' भूमिका बजावते (Onlooker Play)

बालके दुसऱ्याकडे बघून शिकतात. स्वतः खेळात सहभागी न होता इतर बालके काय करतात हे बघण्यात त्यांना जास्त रस असू शकतो. बरेच वेळा बालके प्रत्यक्ष खेळाच्या कृतीत सहभागी न होता सामाजिक आंतरक्रिया जसे संभाषण, प्रश्न विचारणे किंवा सूचना /मत देणे यामध्ये गुंतलेली दिसतात.



चित्र ७.३

### ४. समांतर खेळ (Parallel play)

ही अशी पातळी आहे ज्यामध्ये बालक इतर बालकांबरोबर न खेळता त्यांच्या शेजारी खेळतात. यामध्ये बालक सहसा एकमेकांशी काही न बोलता शेजारी जे बालक खेळत असेल त्याच्यासारखेच दुसरे खेळणे घेऊन खेळतात किंवा तोच खेळ खेळतात.



चित्र ७.४

### ५. बालके 'संबंध' जोडून खेळ खेळतात (Associative Play)

या पायरीत, बालके दुसऱ्याच्या मदतीने खेळतात. थोडक्यात एकत्र खेळतात पण विशिष्ट ध्येयाला धरून एकत्र खेळत नाहीत.



चित्र ७.५

### ६. बालके 'सहकारात्मक /सामाजिक' खेळ खेळतात (Co-operative or Social Play)

या पायरीमध्ये, बालके सहकार्य, विशिष्ट ध्येय गाठण्यासाठी एकत्र काम करणे, मोठ्या गटाचा सदस्य/भाग होणे आणि नेत्याची किंवा अनुयायाची भूमिका स्वीकारणे यासारखी कौशल्ये शिकतात. आता खेळामध्ये एखादी रचना किंवा सोपे नियम पाळावे लागतात.



चित्र ७.६

ज्यावेळी आपण खेळाच्या विकासाला मुख्य सहा पायऱ्यामध्ये विभागतो तेव्हाच आपण खेळाच्या कृती या क्रियाशील आणि अक्रियाशील खेळ अशा दोन मुख्य प्रकारात विभागू शकतो. तसेच क्रियाशील खेळ आपल्याला वर्गात / वर्गाबाहेर दोन्ही ठिकाणी दिसू शकतात. अक्रियाशील खेळ वर्गातच खेळतांना दिसून येतात.

## ७.३ खेळाचे प्रकार (Types of Play)

**खेळाचे प्रकार**

**क्रियाशील**
- मुक्त आणि उत्स्फूर्त
- नाट्यात्मक खेळ
- रचनात्मक

**अक्रियाशील**
- संगीत ऐकणे
- वाचणे
- दूरदर्शन पाहणे
- मोबाईलवरचे खेळ

### (अ) क्रियाशील खेळात खालील कृतींचा समावेश होतो (Active play involves the following)

- **मुक्त आणि उत्स्फूर्त खेळ (Free and spontaneous play)**


या प्रकारच्या खेळाची सुरुवात बालके नेहमी स्वतः करतात. नावातून सुचवल्याप्रमाणे या प्रकारात कोणतेही नियम आणि नियमन पाळावे लागत नाही आणि जोपर्यंत त्यात रस आणि आनंद टिकून आहे तोपर्यंत तो चालू राहतो.



चित्र ७.७

- **नाट्यात्मक खेळ (Dramatic play)**

या प्रकारचा खेळ 'नक्कल करणे' किंवा 'काल्पनिक' खेळ या नावाने पण ओळखला जातो. अशा बालकांची नैसर्गिक बोधात्मकता जसे कल्पना करणे आणि सृजनात्मक विचार करणे विकसित होते तसे बालके भूमिका साकारण्यात आनंद घेऊ लागतात आणि त्यांच्या कल्पनेतील परिस्थिती किंवा प्रसंग साकारु शकतात. उदा. पोलीस रहदारीला दिशा देत आहे, अग्निशामक दलाच्या व्यक्ती, आई भांड्यांचा वापर करून कुटुंबासाठी स्वयंपाक करते आहे किंवा टेबलावर बसून चहा पिणे.




चित्र ७.८

- **रचनात्मक खेळ (Constructive Play)**

या खेळाचे वैशिष्ट्य म्हणजे यात बालके त्यांच्या अवती-भवती असलेल्या वस्तूंचा वापर करून रचना तयार करतात. ज्यातून त्यांना खूप मजा वाटते आणि आनंद मिळतो. उदा. रिकामी खोकी, पुठ्ठ्याची खोकी आणि कागदाच्या प्लेट गोळा करून त्यापासून लांब ट्रक आणि त्याची चाके तयार करू शकतात.

इतर कृती जसे शोध लावणे, खेळ खेळणे किंवा पक्ष्यांची पिसे, चमकणारे दगड किंवा स्टीकर यासारख्या काही कुतुहलपूर्ण वस्तू गोळा करणे याचा समावेश होऊ शकतो.



चित्र ७.९

## (ब) अक्रियाशील खेळ (Passive Play)

ज्या खेळात कृतीशील सहभाग नसतो त्याला अक्रियाशील खेळ म्हणतात. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे :

- **संगीत ऐकणे (Listening to music)**

संगीत ऐकणे हे आनंद आणि मनोरंजनाचा स्त्रोत म्हणून लोकप्रिय आहे. बालके जशी मोठी होत जातात तशी हळूहळू या कृतींमध्ये वाढ झालेली दिसते.



चित्र ७.१०

- **वाचन (Reading)**

अक्रियाशील खेळाचा वाचन हा अजून एक प्रकार दिसून येतो. वाईट हवामान, खेळाला पुरेशी जागा नसणे किंवा खेळण्यास सवंगडी नसणे यासारखे घटक या कृतीत वेळ घालवण्यावर प्रभाव टाकतात.



चित्र ७.११

- **दूरदर्शन पाहणे किंवा रेडिओ ऐकणे (Watching television or listening to the radio)**

सध्याच्या काळात रेडिओ ऐकणे हे फार कमी झालेले दिसते. त्याऐवजी दूरदर्शन पाहण्यात वेळ घालवणे, व्हिडिओवर खेळ खेळणे किंवा इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे (electronic media) वापरणे हे करमणुकीचे स्त्रोत म्हणून जास्त लोकप्रिय झालेले दिसतात. बालक अक्रियाशील खेळाच्या या प्रकारात जास्तीत जास्त वेळ घालवत असलेले दिसून येतात.



चित्र ७.१२

## ७.४ खेळाची मूल्ये (Values of Play)

खेळ हे सराव, पुन्हा पुन्हा करणे आणि जगाला विस्तृतरित्या समजून घेण्याचे अतिशय उत्कृष्ट माध्यम आहे. थोडक्यात 'खेळण्यातून शिक्षण होते' आणि 'खेळणे म्हणजे शिकणे आहे.' खेळातून बालकांना बहुमूल्य आणि उच्च दर्जाचे शिकण्याचे विविध अनुभव मिळतात. जसे प्रयोग करणे, शोध घेणे, हाताचा कुशलतेने वापर करणे आणि त्यांच्या पंचेंद्रियांचा वापर करून शोध घेणे. असे असले तरी पालकांच्या दृष्टीने खेळ म्हणजे निव्वळ वेळ घालवणे असते. त्यांना आपल्या बालकांनी तो वेळ अभ्यास किंवा इतर काहीतरी ठोस स्वरुपाचे कार्य करण्यात घालवावा असे वाटत असते.

### कॅप्लन (Caplan १९७३) यांनी सांगितलेली खेळाची मुल्ये (Values of Play as given by Caplan 1973)

- खेळातून वाढीला चालना मिळते आणि शरीराचा तोल व समन्वय अधिक समृद्ध होतो.
- शारीरिक 'स्व'वर प्रभुत्व येण्यासाठी खेळामुळे संधी प्राप्त होते.
- खेळ जगण्यात चैतन्य निर्माण करते.
- खेळ ही ऐच्छिक कृती आहे आणि ती बालकांना निवड करण्याचे आणि कृती करण्याचे स्वातंत्र्य देते.
- बालकाला प्रभुत्व मिळवता येईल असे काल्पनिक जग खेळामुळे निर्माण होते.
- प्रौढांची भूमिका शिकण्याचा खेळ हा एक मार्ग आहे.
- खेळामध्ये साहस हा एक घटक असतो.
- खेळ सामाजिक आंतरक्रिया आणि निर्भेळ आंतरव्यक्तीक कौशल्ये विकसित करण्यास प्रोत्साहीत करते.
- खेळातून भाषा विकासाला मदत होते.
- खेळातून आवड आणि एकाग्रता विकसित होते.
- भावनांना मोकळीक मिळण्यासाठी आणि अभिव्यक्तीसाठी खेळ हा एक उत्तम मार्ग आहे.
- खेळाला उपचारात्मक मूल्य आहे. शरीराचा तोल सकारात्मक मार्गाने ठेवण्यासाठी खेळाची मदत होते.

**तुम्हाला हे माहित आहे का?**

समुपदेशनामध्ये प्ले थेरपी हा एक प्रकार आहे. यामध्ये बालकांना अभिव्यक्त होण्यास किंवा त्यांच्या भावना व्यक्त करण्यास खेळाच्या माध्यमातून मदत घेतली जाते.

**कृती**

लहानपणी कोणता मैदानी खेळ/कृती सगळ्यात तुमची आवडती होती ते आठवा. तुम्हाला आणि तुमच्या मित्रमैत्रिणींना सगळ्यात जास्त काय करायला आवडत होते? पूर्वशालेय बालकांना तुम्ही कोणती कृती करण्यास प्रोत्साहीत कराल? का?

**समग्र किंवा सर्वांगीण विकास म्हणजे काय? (What is holistic or all round development?)**

ज्यावेळी बालके शारीरिकरित्या निरोगी, मानसिकरित्या तत्पर, मानसिकरित्या सुरक्षित, सामाजिकरित्या सक्षम, शिकण्यास योग्य, सांस्कृतिक जाणीव आणि सौंदर्यदृष्ट्या सर्जनशील होतात. त्यावेळी बालके समग्र /सर्वांगीण विकास साध्य करू शकतात. ते मोठे होताना जबाबदार आणि उत्पादनक्षम प्रौढ व्यक्ती होऊ शकतात.

## ७.५ समग्र/सर्वांगीण विकासासाठी खेळाची साधने आणि साहित्य (Play material and equipment for Holistic Development)

आता आपण आपले लक्ष सर्वांगीण विकासाच्या विविध अंग/घटकाच्या विकासासाठी प्रोत्साहन देण्यासाठी कशाची निवड करू शकतो याकडे वेधूयात.

**तालिका ७.१ सर्वांगीण विकासासाठी खेळसाहित्य व साधने**
**(Play material and equipment for Holistic Development)**

| विकासाचे क्षेत्र | खेळाचे साहित्य |
|---|---|
| शारीरिक विकास | जंगलजीम, घसरगुंडी, झोका, ओढणे आणि ढकलण्याची खेळणी, तीनचाकी सायकल, शिडी |
| स्थूल कारक विकास | तीन चाकी सायकल, दोरीवरच्या उड्या, चेंडू, वाळूतील खेळाची साधने |
| सूक्ष्म कारक विकास | पेग बोर्ड, कात्री, लेसिंग कार्ड, मोडतोड/जोडण्याची खेळणी, खडू, तेलकट खडू, रंग, मणी, मोती, लहान ठोकळे, सुतारकामाचे साहित्य. |
| भाषा विकास | चित्रांची पुस्तके, चित्रांची कार्डस्, शब्दकोडी, माहितीची पुस्तके |
| बोधात्मक विकास | कोडी, खेळ आणि कृती |
| सर्जनात्मक आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | रंग, माती, वाळू, पाण्याचे खेळ, संगीत आणि हालचाली, ठोकळे |
| सामाजिक-भावनिक विकास | अशी खेळणी जी गटात वाटून घेता येतील, साधे बोर्ड खेळ, विविध कृती, ठोकळे, डॉक्टरांचा सेट, विविध कपडे घालून तयार होणे, बाहुली घर |

सर्वांगीण विकासासाठी खेळाला प्रोत्साहित करणे त्यासाठी उपयुक्त वातावरणाचे महत्त्व आणि असंख्य मूल्य आता आपल्याला समजले आहे. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की असे अनेक घटक आहेत की जे बालकांच्या खेळाच्या स्वरुपावर प्रभाव टाकतात.

खेळाची जागा, विकासाला योग्य साहित्याबाबत पालकांची जागरुकता, कौटुंबिक रचना/कुटुंबाचा प्रकार, आर्थिक स्त्रोत आणि विविध खेळांचे योग्य साहित्याची उपलब्धता या काही घटकांचा यात समावेश होतो.

**कृती**

अशी कल्पना करा की तुम्ही एका खेळाच्या दुकानात आहात आणि लहान बालकासाठी तुम्हाला एखादी भेटवस्तू/खेळणे निवडायचे आहे. तुम्ही खेळाच्या योग्य साधनांची निवड कशी कराल?

## ७.६ खेळणी आणि खेळाच्या साधनांची निवड (Selection of toys and play material)

त्यासाठी अगदी सोपी तपाससूची दिली आहे जी तुम्हाला खेळाचे योग्य साधन/खेळणे ठरवतांना मदत करेल.

(१) खेळाचे साधन /खेळणे आकर्षक आणि रंगीत आहे का? ☐

(२) विकासास योग्य आहे का? ☐

(३) बालकांच्या क्षमता तपासण्यासाठी प्रेरणादायी करणारे आहे का? ☐

(४) ही साधने बहुकार्यिक आहेत का?

(५) ते दणकट आणि टिकाऊ आहे का?

(६) त्याच्याबरोबर खेळणे सुरक्षित आहे का?

(७) त्यासाठी जो रंग वापरला आहे तो बिनविषारी आहे का?

(८) सुरक्षिततेच्या दृष्टीने खेळण्याच्या कडा गोलाकार आहेत का?

(९) ते सर्वांगीण विकासाच्या विविध अंगांच्या विकासाला प्रोत्साहित करणारे आहे का?

वरील सर्व प्रश्नांची उत्तरे जर 'हो' असतील तर तुम्ही योग्य निवड केली आहे याबाबत खात्री बाळगा.

**याबाबत विचार करा!**

ही अतिशय चांगली कल्पना आहे की खेळणी घेतांना 'लिंगभावावर आधारित' घेण्याचे टाळावे. जसे गाड्या आणि सैनिक असणारी खेळणी मुलांकरता आणि बाहुली मुलींकरता.

तसेच खेळाची साधने आणि खेळणी ही नेहमीच महागाची आणि विकत आणण्याची गरज नाही. खेळांची लायब्ररी जिथून आपण खेळणी आणू शकतो आणि विविध प्रकारची खेळणी खेळू शकतो. हे सध्या खूप लोकप्रिय होत आहे. अशा प्रकारची लायब्ररी तुम्हाला उपलब्ध असणाऱ्या स्रोतातून तुम्ही सुरू करू शकता. ज्यामुळे तुमच्या बालकाला योग्य खेळाची साधने उपलब्ध होऊ शकतील.

**कृती**

प्रभावी खेळणी तयार करण्यासाठी स्थानिक पातळीवर कोणती साधने उपलब्ध होऊ शकतात याची यादी करा. उदा. बाटलीची झाकणे, घरी तयार केलेली कापडी खेळणी, करवंट्या, अंड्यांची रिकामी खोकी अशा स्वरुपाच्या अजून साधनांचा विचार करा.

**दर्पण**

बांधकामाच्या ठिकाणी खेळणाऱ्या बालकांचे निरीक्षण करून ते खेळाची कोणती साधने वापरतात? किती वेळ खेळतात? एकमेकांबरोबर आंतरक्रिया करण्याचे स्वरुप काय आहे? त्यांची नोंद करा.

## ७.७ खेळाला प्रोत्साहन देण्यातील पालकांची भूमिका (Role of parents in encouraging play)

संशोधनातून असे दिसून आले आहे की, जे लगेच प्रतिसाद देणारे पालक असतात ते बालकांना खेळाच्या दरम्यान मार्गदर्शन करतात आणि नवीन आव्हाने स्वीकारायला लावतात किंवा नवीन कल्पना देतात ते बालकांना त्यांच्या भावनिक समस्या हाताळण्यास, सामाजिक कौशल्य निर्माण करण्यास आणि विकसित करण्यास योग्य संधी देतात. पालकांनी नेहमी 'बालकाने पुढाकार घेतलेली खेळण्याची कृती बालकेंद्रित आहे' याची खात्री करून घ्यावी. खूप जास्त लुडबुड करणे किंवा सतत बालकाच्या खेळात सूचना करणे यामुळे त्या खेळातील मजा आणि आनंद हिरावून घेतला जातो. खेळांचे सर्व फायदे माहित असूनही आजकाल पालक त्यांच्या पाल्यांना मुक्त व उत्स्फुर्त खेळासाठी पुरेसा वेळ देत नाहीत. धावपळीची जीवनशैली, बदलती कौटुंबिक रचना, शैक्षणिक कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करणे आणि बालकांच्या समृद्ध संगोपनाकडे लक्ष देणे अशा घटकांमुळे खेळासाठी वेळ मिळत नाही.

## मुद्द्यांची उजळणी करा.

### खेळाचे महत्त्व

- सर्वांगीण विकासासाठी आदर्श
- सुखप्रद
- उत्स्फूर्त
- आनंददायक

### खेळाची गरज दर्शवणारे निर्देशक

- लवकर दमतात आणि चटकन निराश होतात.
- स्थूल स्नायूंची वैकासिक टप्पे गाठू शकत नाहीत.
- अल्प अवधान कक्षा असते.
- शांत झोपू शकत नाहीत किंवा पुरेसा आहार घेत नाहीत.
- समन्वयात सुधारणा करण्याची गरज.
- सुस्तावलेले
- भावनांच्या नियमनामध्ये अडचण येणे.

### खेळाची मूल्ये

- वाढीला चालना
- स्वतःच्या शरीराच्या कार्यावर प्रभुत्व
- चैतन्य आणणे
- निवडीचे स्वातंत्र्य
- प्रौढ व्यक्तींची भूमिका शिकणे
- साहस हा एक घटक
- सामाजिक आंतरक्रिया
- भाषा विकास
- एकाग्रता
- उपचारात्मकता

## मुद्द्यांची उजळणी करा.

### खेळाच्या पायऱ्या

(१) → अन्‌ऑक्युपाईड
(२) → एकटे खेळणे
(३) → 'प्रेक्षकांची' भूमिका बजावणे.
(४) → समांतर
(५) → संबंध जोडून
(६) → सहकारात्मक

### खेळाचे प्रकार

**क्रियाशील**
- मुक्त आणि उत्स्फूर्त
- नाट्यात्मक
- रचनात्मक

**अक्रियाशील**
- दूरदर्शन पाहणे
- वाचणे
- संगीत ऐकणे

### खेळण्यांच्या निवडीचे निकष

- सुरक्षित
- टिकाऊ
- आकर्षक
- रंगीत
- विकासास योग्य
- बहुकार्यिक
- प्रेरीत करणारे
- बिनविषारी रंग
- कडा गोलाकार

### पालक/संगोपनकर्त्यांची भूमिका

- प्रतिसाद देणारे
- गरजेप्रमाणे मार्गदर्शन
- आव्हाने पुरवणे
- बालकांच्या पुढाकाराने कृती सुरू करण्याची खात्री करणे.

**शब्दसूची *Glossary***

**बेबंद (Abandon) :** अडथळ्यांचा आणि निर्बंधाचा पूर्णपणे अभाव

**भाग (Chunk) :** मोठा भाग

**बाह्य (Extrinsic) :** बाहेरून

**सुस्तावलेला (Lethargic) :** निष्क्रिय, मंद

**हाताने कुशलतेने वापरणे (Manipulate) :** विशिष्ट पद्धतीने हाताचा कौशल्यपूर्व वापर

**मानसकारक (Psychomotor) :** मानसिक कृतीतून घडलेली कारक कृती

**उत्स्फुर्त (Spontaneous) :** नैसर्गिक, अप्रेरित

**उपचारात्मक (Therapeutic) :** एखाद्याला आरामदायी वाटण्यासाठी मदत करणे, जखम भरून येण्याची प्रक्रिया

**चैतन्यपूर्ण (Vitalizing) :** जीवन देणे, ऊर्जा देणे

## स्वाध्याय

**प्र. १ योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

(१) खेळ हे वास्तव अध्ययनाचे इंजिन आहे असे ............... यांनी म्हटले आहे.

(अ) फ्रेड्रीक फ्रोबेल (ब) स्टुअर्ड ब्राऊन

(क) लेव्ह व्हायगॉटस्की

(२) सामाजिक खेळाच्या सहा पायऱ्या ............... यांनी सांगितल्या आहेत.

(अ) कॅथरीन गार्व्हे (ब) पार्टन

(क) स्केल्स् आणि इतर

(३) ज्या कृतीत क्रियाशील सहभाग नसतो त्याला ............... खेळ म्हणतात.

(अ) मुक्त (ब) क्रियाशील

(क) अक्रियाशील

(४) पालकांनी नेहमी खेळण्याची कृती ही 'बालकाने पुढाकार घेतलेली' आणि ........... केंद्रित आहे.

(अ) पालक (ब) स्व

(क) बालक

**प्र. २ खाली दिलेल्या तालिकेमध्ये कंसात दिलेल्या साधनसाहित्याचे वर्गीकरण विकासाच्या अंगांनुसार करा.**

. (दोरीवरच्या उड्या, शब्दकोडी, कात्री, तीनचाकी सायकल, माहितीची पुस्तके, पेग बोर्ड, वाळूचे खेळ, तेलकट खडू, चेंडू, चित्रांची पुस्तके)

| स्थूल कारक | भाषा | सूक्ष्म कारक |
|---|---|---|
| | | |

**प्र. ३ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

(१) रचनात्मक खेळ

(२) अक्रियाशील खेळ

(३) खेळ

**प्र. ४ खेळाची गरज दाखवणाऱ्या घटकांची यादी करा.**

**प्र. ५ बालकांमधील खेळाला प्रोत्साहन आणि उद्दीपन करण्यातील पालकांची भूमिका काय आहे?**

**प्र. ६ कॅप्लन यांनी सांगितलेल्या खेळाच्या मूल्याचे सविस्तर वर्णन करा.**

**प्र. ७ बालकांमधील खेळाचा अर्थ आणि महत्त्व थोडक्यात स्पष्ट करा.**

**प्र. ८ खालील उतारा वाचून खेळाची कोणती पायरी आहे ते वर्णनावरून ओळखा.**

(अ) कविता तिच्या शेजाऱ्यांकडे गेली असता तिथे सुजय आणि विजय ठोकळ्यांशी खेळत होते. तिने त्यांना दाराशीच उभे राहून 'काय करता असे विचारले?' .............

(ब) नर्सरीतून घरी जाताना शाळेच्या बाहेर रस्त्याच्या कडेला वाळूचे ढीग होते त्यावर चढून बालके खाली उड्या मारत होती. ...........

(क) सविता आणि कुणाल दोघेही तीन चाकी सायकल चालवत फेऱ्या मारत होते .............

(ड) ५ वर्षाची बालके ठोकळे गोळा करून खेळताना त्यांनी घर, गॅरेज असे तयार करायचे ठरवले व त्याप्रमाणे कुणी काय करायचे याची चर्चा केली. .............

(इ) मुक्त खेळाच्या वेळी काही बालके बाहुलीघरात खेळात मग्न झाली होती. .............

**प्रकल्प / स्वयंअध्ययन**

- **बालके विविध परिस्थितीमध्ये खेळत आहेत त्याची चित्रे गोळा करा. उदा. बागेत, शाळेच्या मैदानावर, मनोरंजन केंद्र, शेजारी – तुम्हाला खेळाची पायरी किंवा प्रकार ओळखता येतात का?**
- **तुमच्या स्वत:च्या चिकटवहीमध्ये खेळाच्या पायऱ्या आणि प्रकाराची चित्रे चिकटवा. तुमच्या संग्रहात वाढ करत राहा. तुम्ही त्याचे रेखाटन (sketch) करण्याचा पण प्रयत्न करू शकता.**

❖ ❖ ❖

# ८ वर्तन समस्या



बालकांचे निरीक्षण करतांना तुम्ही कधी बालकांचे वेगवेगळे वर्तन पाहिले आहे का?

- वारंवार रागवणे किंवा निराश होणे.
- सतत रागावलेले, रूसलेले असणे.
- दुसऱ्यावर दोषारोप करणे.
- नियम पाळण्यास नकार देणे.
- वाद घालणे.
- आक्रस्ताळेपणा करणे.
- अपयशाची हाताळणी करण्यात अडचण येणे.
- मित्रांकडील आकर्षक खेळणी आणि लेखन साहित्य न विचारता घेणे.
- एखाद्या ध्येयावर खूप काळ लक्ष केंद्रित करण्याची क्षमता नसणे.
- वारंवार शिवीगाळ करणे.
- आक्रमक वर्तन
- हवे ते मिळवण्यासाठी खोटं बोलणे किंवा रडणे.
- पालकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी, राग आलेला दाखवण्यासाठी पळून जाऊन लपून बसणे.
- राग व्यक्त करण्यासाठी अन्न/खेळणी/वस्तू फेकणे.

पूर्वबाल्यावस्थेला 'समस्या वय' म्हणून ओळखले जाते. उदा. एखादे मूल पालकांसमोर सभ्य वर्तन करते पण त्यांच्या नजरेआड गेल्यावर अचानक खूप मस्ती करते, काही वेळा त्यांना काही वैयक्तिक समस्या असू शकतात. बालके वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळे वर्तन करतात. बालकांच्या वर्तनावर कुटुंब, शाळा, शेजारी, समवयस्क, संस्कृती, प्रसारमाध्यमे हे प्रभाव टाकतात. बालके पालक, वडीलधाऱ्या व्यक्ती, शिक्षक, समवयस्क आणि संगोपनकर्ते यांच्या वर्तनाचे अनुकरण करू शकतात. वर्तन समस्या म्हणजे चुकीचे वर्तन स्वीकारणे.

वर्तन समस्या म्हणजे 'विशिष्ट पद्धतीचे वर्तन स्वीकारलेले' नसणे. प्रत्येक बालक कधी ना कधी अशा प्रकारचे वर्तन करते. म्हणजेच वर्तन समस्येमध्ये बालकांचे वर्तन एका विशिष्ट नमुन्यामध्ये दिसून येते. योग्य हाताळणीच्या मार्गाचा वापर करून आपण ते हाताळू शकतो.

## ८.१ वर्तन समस्यांची व्याख्या (Definition of Behavioural Issues)

वर्तन समस्या म्हणजे असे वर्तन जे वैयक्तिक विकास आणि सामाजिक समायोजनात अडथळा निर्माण करते.

**हे तुम्हाला माहित आहे का?**

ब्रिस्टॉल विद्यापीठाने सप्टेंबर २०१९ मध्ये केलेल्या अभ्यासानुसार अतिक्रियाशीलता, अवधान समस्या आणि समस्यात्मक वर्तन याचा गर्भावस्थेमध्ये पॅरासिटॉमॉल (paracetamol) घेण्याशी संबंध असतो असे सांगितले आहे.

## ८.२ बालकांमध्ये सर्वसामान्यपणे दिसून येणाऱ्या वर्तन समस्या (Behavioural issues commonly seen in Children)

### (अ) आक्रमकता (Aggression)



**चित्र ८.१ आक्रमकता**

दुसऱ्या व्यक्तीने काहीही त्रास दिलेला नसतांनाही त्याला घाबरवणारे वर्तन म्हणजे आक्रमक वर्तन होय. आक्रमकतेची नीट हाताळणी झाली नाही तर त्या वर्तनाचे असामाजिक वर्तनात परिवर्तन होऊ शकते. शालापूर्व अवस्थेतील बालकांचे मौखिक प्रगटीकरण मर्यादित असते, ते लवकर त्रासिक होतात आणि स्वत:ला व्यक्त करू शकत नाहीत त्यामुळे ते आक्रमक वर्तन दर्शवू शकतात. शालापूर्व बालके हे बरेचदा वस्तू फेकून मारण्यातून आक्रमकता दर्शवतात किंवा मारणे, लाथा मारणे, ओरडणे, हवी असलेली वस्तू हिसकावून घेणे यातून आक्रमकता दर्शवतात. तसेच बालके त्यांच्या पालकांच्या आक्रमक वर्तनाचे सुद्धा अनुकरण करतात. सर्वसाधारणपणे वयाच्या दुसऱ्या वर्षापासून बालके आक्रमकता दर्शवायला सुरुवात करतात. तिसऱ्या वर्षी आक्रमकतेची तीव्रता सर्वात उच्च असते.

#### आक्रमकतेची कारणे (Causes)

- असुरक्षिततेची भावना असणे किंवा

  मत्सर वाटणे
- कडक शिस्तीचे आणि प्रभुत्व गाजवणारे पालक असणे.
- पालकांच्या उच्च अपेक्षा / खूप जास्त अपेक्षा आणि योग्य मार्गदर्शनाचा अभाव असणे.
- सगळ्या कृतींमध्ये पालकांचा अडथळा/ढवळाढवळ असणे.
- आक्रमक वर्तन करणाऱ्या पालकांचा आदर्श समोर असणे.
- चिंता आणि निराशा हे शब्दातून व्यक्त करण्यात अडचण येणे.

#### आक्रमकता हाताळणे (Handling)

- बालकांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यास मदत करणे.
- आक्रमक वर्तन कशामुळे होते आहे हे पालकांनी/संगोपनकर्त्यांनी ओळखणे.
- बालक जेव्हा व्यक्त होत असते तेव्हा शांत राहणे.
- योग्य वर्तनासाठी योग्य बक्षिस शोधणे.

### (ब) आक्रस्ताळेपणा / आकांडतांडव (Temper Tantrums)

आक्रस्ताळेपणा म्हणजे तीव्रतेने व उद्रेक होऊन राग व्यक्त होणे. यामध्ये मारणे, लाथा मारणे, फेकून मारणे आणि श्वास कोंडणे असे वर्तन दिसते. २ ते ४ वर्षे वयाला हे नैसर्गिक वर्तन असते. त्यापैकी तिसऱ्या वर्षी आक्रस्ताळेपणाच्या वर्तनाची उच्च पातळी गाठली जाते. त्यानंतर हळूहळू कमी होते. वयाच्या चार वर्षापर्यंत आक्रस्ताळेपणाचे वर्तन दिसत राहिले तर ती वर्तन समस्या समजली जात नाही पण नंतरच्या वयात सतत दिसून येत असल्यास ती समस्या समजली जाते. जसे बालकाचे भाषा कौशल्य विकसित होते तसा आक्रस्ताळेपणा कमी होतो.



चित्र ८.२ आक्रस्ताळेपणा / आकांडतांडव

### आक्रस्ताळेपणाची कारणे (Causes)

- लक्ष वेधून घेण्यासाठी.
- बालक खूप दमलेले असेल.
- बालकाने पुरेसा आहार घेतला नसेल.
- बालकाची परिस्थिती आरामदायी नसेल.
- बालकाला मैदानावर खेळायची संधी मिळत नसेल.
- बालकावर खूप बंधने असल्यास किंवा त्याचे खूप लाड होत असल्यास.
- बालकाला स्वतःच्या भावना नियंत्रित करायची संधी मिळत नसल्यास.
- पालक जर बालकांच्या गरजा भागवू शकत नसतील तर

### आक्रस्ताळेपणाची हाताळणी (Handling)

- पालकांनी बालकाकडे पुरेसे लक्ष आणि सुरक्षित आधार द्यावा.
- बालक नाटक करत नाही ना याची पालकांनी खात्री करून घ्यावी.
- बालकाच्या आक्रस्ताळेपणाकडे पालकांनी दुर्लक्ष करावे.
- योग्य वर्तनासाठी बालकाला बक्षिस द्यावे.
- पालकांनी स्वतःच्या वर्तनावर प्रमाणात नियंत्रण ठेवावे.
- बालकांचे आक्रस्ताळी वर्तन त्याच्या शारीरिक समस्येमुळे नाही ना हे पालकांनी डॉक्टरांकडून तपासून घ्यावे.

## (क) असहकार्य (Non Co-operation)

वयाच्या ३$^{१/२}$ (साडेतीन) वर्षापासून बालके असहकार्य दाखवायला सुरुवात करतात. ज्या वेळी बालके असहकार दर्शवतात त्यावेळी बरेचदा त्यामागे काही विशिष्ट कारणे असलेली दिसतात.

### असहकारामागची कारणे (Causes)

- दिलेले ध्येय हे बालकाच्या क्षमतेपेक्षा जास्त असणे.
- बालकाला समजेल अशा सूचना नसणे / न देणे.

### असहकार हाताळणे (Handling)

- मुक्त खेळाला प्रोत्साहन देणे.
- सहानुभूती आणि सहकार्याचा आदर्श समोर ठेवणे.
- प्रत्येक बालकाला आळीपाळीने खेळण्याची संधी देणे.
- प्रत्येक बालकाला गटामध्ये लहान जबाबदारी देणे.

## (ड) चढाओढ (Rivalry)



चित्र ८.३ चढाओढ

दुसऱ्यांबरोबर स्पर्धा करणे किंवा मात करणे यातून चढाओढ निर्माण होते. चढाओढीमुळे भावाबहिणींमध्ये मत्सर, स्पर्धा आणि मारामारी दिसते. भावंडांमधील चढाओढ सर्वसाधारणपणे संपूर्ण बाल्यावस्थेमध्ये दिसून येते. चढाओढ ही समस्या घरामध्ये सर्वसाधारणपणे दुसऱ्या बाळाच्या जन्मापासून सुरू होते. जेव्हा बालके आक्रमक, नकारात्मक, आदर न करणारे, इतरांवर प्रभुत्व गाजवणारे, सतत अपयशाला सामोरी जाणारी, नैराश्यग्रस्त असणारी असतात, त्यावेळी चढाओढ निरोगी रहात नाही.

### चढाओढीची कारणे (Causes)

- घरामध्ये नवीन बाळाचा जन्म होणे.
- सतत तुलना करणे.

### चढाओढ हाताळणे (Handling)

- बालकांमध्ये तुलना करणे टाळावे.
- पालकांनी प्रत्येक बालकाची प्रतिभा आणि यश वैयक्तिक पातळीवर स्वीकारावे.
- बालकांना स्पर्धेपेक्षा सहकार्य करायला सांगावे.
- एकमेकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी सकारात्मक मार्गाचा वापर करायला बालकांना शिकवावे.
- सर्वांचे मनोरंजन होईल, मजा येईल अशा कौटुंबिक कृतींचे आयोजन करावे.
- प्रत्येक बालकांना स्वतःचा वेळ आणि मोकळीक (space) मिळते आहे ना याविषयी खात्री करावी.

### (इ) भांडण (Quarrelling)



चित्र ८.४ भांडण

आक्रमकतेची पुढील अवस्था म्हणजेच भांडण होय. आक्रमकता वैयक्तिक पातळीवर व्यक्त होते तर भांडणांमध्ये दोन किंवा जास्त व्यक्तींचा सहभाग असतो. दोन बालकांमध्ये जेव्हा भांडण होते तेव्हा दोघांमध्ये नकारात्मक भावना असतात किंवा त्यातील एक जण बचावात्मक भूमिका घेतो. भांडण वयाच्या कोणत्याही वर्षात दिसून येते. ज्यावेळी व्यक्तीला उद्दीपीत केले जाते त्यावेळी नैसर्गिक कृती म्हणून भांडणाचे वर्तन दिसते. बालक मारते, लाथा मारते, चिमटे काढते किंवा ढकलून देते. या कृती समाजमान्य नाहीत. तसेच बालक किंचाळून किंवा गैरमार्गाने प्रतिक्रिया देऊ शकते. बालक वस्तू किंवा खेळणी फेकते किंवा इतरांकडून हिसकावून घेते.


### भांडणाची कारणे (Causes)

- प्रभुत्व गाजवणारे मित्र किंवा समवयस्क गट असणे.
- मित्र किंवा भावंडांबाबत मत्सराची भावना असणे.
- मित्र किंवा इतरांकडून चिडवणे /इतरांनी गुंडगिरी करणे.
- राग आणणारी परिस्थिती निर्माण होणे.
- बालकांची खेळणी वाटून घ्यायची तयारी नसेल / आवडत नसेल तर.

### भांडण हाताळणे (Handling)

- जर खेळणी वाटून घेण्याच्या कारणांवरून बालके भांडत असतील तर मोठ्या व्यक्तींनी योग्य प्रकारे खेळणी वाटून घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.
- बालकांचे लक्ष भांडणाच्या कारणावरून दुसरीकडे वेधून घ्यावे.
- कुणी बालकाची चेष्टा करत असल्यास ते टाळावे किंवा एकमेकांना चिडवत असल्यास ते न करण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करावे.
- एखादे बालक वारंवार भांडणाचे वर्तन दाखवत असेल तर त्यामागील मूळ कारण शोधावे.
- बालकांमध्ये तुलना करू नये.

### (फ) लाजाळूपणा (Shyness)



**चित्र ८.५ लाजाळूपणा**

या वर्तन प्रकारात बालक सामाजिक परिस्थितीपासून दूर जाते. लाजाळू बालक अनोळखी वातावरणात किंवा इतर व्यक्तींबरोबर आंतरक्रिया साधताना चिंताग्रस्त असतात किंवा प्रतिबंध करतात. लाजाळू बालके एखाद्या कृतीत भाग घेण्यापेक्षा ती लांबून बघण्यात जास्त आरामदायी असतात. लाजाळूपणा हा बालकाच्या विकासावर नकारात्मक परिणाम करते.

वयाच्या ५ व्या ते ६ व्या महिन्यापासून बालक लाजाळूपणा दर्शवायला लागते. हे वर्तन तीन वर्षापर्यंत सतत दिसते. ज्या बालकामध्ये आत्मविश्वासाची कमी किंवा अभाव असतो अशांमध्ये लाजाळूपणा दिसतो. ज्या बालकांमध्ये कमी किंवा अजिबात आत्मविश्वास नसतो अशांमध्ये लाजाळूपणा विशेषतः दिसून येतो. अशी बालके सामाजिक परिस्थिती किंवा लोकांना टाळतात, नजरेला नजर देणे टाळतात, संवाद साधताना भाषा ओघवती नसते, अतिचिंतीत असतात आणि यांना मित्र कमी असतात.


#### लाजाळूपणाची कारणे (Causes)

- अपरिचित व्यक्ती, परिस्थितीची भिती
- असुरक्षिततेची भावना
- हुकुमशाही शिस्तीची पद्धत
- पालकांच्या अवास्तव अपेक्षा
- अतिसंरक्षित पालकत्वाची पद्धती
- शिक्षेकरता चुकीच्या शारीरिक पद्धतीचा वापर
- सातत्याने टिका
- अपयशाची भिती

#### लाजाळूपणा हाताळणे (Handling)

- बालकांवर छोट्या छोट्या जबाबदाऱ्या सोपवणे. उदा. खेळणी आवरून ठेवणे, बूट किंवा कपडे जागेवर ठेवणे.
- लहान गटात मुलांना मिसळण्याची संधी देणे.
- लोकांबरोबर एकत्र येण्याची संधी देणे.
- शिस्तीच्या योग्य पद्धतींचा वापर करणे.
- अतिसंरक्षण टाळावे.
- बालकाने काही साध्य केल्यास त्याचे कौतुक करणे.
- बालकाला 'लाजाळू' असे नामकरण करू नये.
- बालकांबाबत आधार देणे, सहानुभूतीपूर्ण आणि समजून घेणारे असावे.
- बालकांसमोर आदर्श ठेवतांना आत्मविश्वासपूर्ण वर्तन आणि योग्य उदाहरण समोर ठेवावे.

### (ग) बुजरेपणा (Timidity)



**चित्र ८.६ बुजरेपणा**

सामाजिक वातावरणाच्या भीतीमुळे बुजरेपणा येतो. बुजरे बालक नेहमी सामाजिक परिस्थिती, कार्य किंवा गटातील कार्यक्रम टाळायला बघते. बुजरे बालक

लोकांशी आंतरक्रिया करण्याचे टाळते, इतरांबरोबर अगदी कमी किंवा अजिबात संवाद साधत नाही आणि सामाजिक वातावरण व जागा टाळते.

### बुजरेपणाची कारणे (Causes)

- बालकांमध्ये तुलना करणे.
- हुकुमशाही शिस्तीची पद्धत
- सामाजिकरण आणि सामाजिक वातावरणात सहभागी होण्याची संधी न मिळणे.
- वर्तनाला योग्य शिक्षा न मिळणे.

### बुजरेपणाची हाताळणी (Handling)

- लोकशाही पद्धतीच्या शिस्तीचा वापर करणे.
- शिक्षा, खास करून शारीरिक शिक्षा टाळाव्यात.
- गरज असेल तेव्हा मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रोत्साहन द्यावे.
- योग्य अपेक्षा ठेवाव्यात.

## (ह) अंथरुण ओले करणे (Bedwetting)

अंथरुण ओले करणे हे खासकरुन वैद्यकीय आजारापेक्षा सामाजिक अस्वस्थतेमुळे दिसून येते. यामुळे बालकाची स्व-प्रतिमा आणि आत्मविश्वास यावर आघात होऊ शकता बऱ्याचशा बालकांमध्ये वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत मूत्रविर्सजनावर नियंत्रण येते. हे नियंत्रण रात्रीपेक्षा दिवसा आधी आलेले दिसून येते. वयाच्या ५व्या वर्षानंतर बालकांला अनैच्छिकरित्या अंथरुण ओले होत असेल तर त्यासाठी ही संज्ञा वापरली जाते. रात्रीच्या कोणत्याही वेळी बालके अंथरुण ओले करू शकतात पण सर्वसाधारणपणे झोपल्यानंतर पहिल्या काही तासात हे घडलेले दिसून येते.

### अंथरुण ओले करण्याचे प्रकार (Types of Bedwetting)

प्राथमिक आणि दुय्यम असे अंथरुण ओले करण्याचे दोन प्रकार दिसून येतात.

#### (अ) प्राथमिक अंथरुण ओले करणे (Primary Bedwetting)

प्राथमिक अंथरुण ओले करणे म्हणजे पूर्व बाल्यावस्थेपर्यंत ही कृती खंड न पडता सतत दिसून येते. कारण उत्सर्जनावर नियंत्रण नसते. या प्रकारात रात्री अंथरुण कधीच कोरडे नसते. त्याला काळाची निश्चिती नसते.

#### (ब) दुय्यम अंथरुण ओले करणे (Secondary bedwetting)

उत्सर्जन प्रक्रियेवर नियंत्रण आल्यावर बालकाने सहा महिने अंथरुण ओले केले नाही व नंतर अंथरुण ओले केले तर त्याला दुय्यम अंथरुण ओले करणे म्हणतात.

### अंथरुण ओले करण्याची कारणे (Causes)

- **भावनिक समस्या –** घरातील तणावपूर्ण आयुष्य, घरात जर आई-वडिलांमध्ये संघर्ष असेल तर अशा काही वेळा मुले अंथरुण ओले करतात. त्याशिवाय मोठे बदल जसे नव्याने शाळेत जाण्यास सुरुवात होते, घरात नवीन बाळाचा जन्म, नवीन घरात राहायला जाणे किंवा इतर काही ताणतणाव यामुळे बालके अंथरुण ओले करतांना दिसतात. ज्या बालकांचे शारीरिक किंवा लैंगिकदृष्ट्या शोषण होते. त्यांच्यात पण काही वेळा अंथरुण ओले करण्याचे वर्तन दिसून येते.
- अनुवंशिकतेचे घटक
- मज्जासंस्थेशी संबंधित आजार

### अंथरुण ओले करण्याची हाताळणी (Handling)

- बालकांना दोष देणे, शिक्षा देणे किंवा उपहासात्मक बोलणे टाळावे.
- पालकांचे वर्तन संयमी व आधार देणारे असावे. बालकाला वारंवार खात्री द्यावी आणि प्रोत्साहीत करावे. प्रत्येक वेळी अंथरुण ओले केल्यावर त्याचा गाजावाजा करू नये.

- कुटुंबातील इतर व्यक्तींसमोर बालकाच्या अंथरुण ओले करण्याविषयी चर्चा करू नये.
- अंथरुण कोरडे ठेवणे ही बालकाची जबाबदारी आहे, पालकांची नाही हे समजण्यासाठी त्याला मदत करावी. या समस्येतून बालकाला बाहेर काढण्यासाठी त्याला/तिला मदत करायची इच्छा आहे याची खात्री द्यावी.
- संध्याकाळी कॅफीन असणारे अन्न/पेय, मीठ युक्त खाद्यपदार्थ, साखरमुक्त पेय याचे मर्यादित प्रमाणात सेवन करावे.
- दिवसा (दर दोन ते तीन तासांनी) आणि रात्री झोपण्यापूर्वी मूत्रविसर्जनासाठी जाऊन येण्यासाठी बालकांना प्रोत्साहीत करावे.
- झोपायला जाण्यापूर्वी १५ मिनिटे आधी आणि अगदी झोपायला जातांना बालकांना मूत्रविसर्जनासाठी जाण्यास प्रोत्साहित करावे.
- बालकाची झोप पूर्ण होते आहे ना याची खात्री करावी.
- जर नकळत अंथरुण ओले झाले तर शिक्षा करू नये त्यामुळे बालकाला लाज वाटते आणि अंथरुण ओले केले तर ते लपवण्याची कृती होते. उलट बालकाला शक्य असेल तेवढे स्वच्छ करण्यात त्याची मदत घ्यावी.

### (ख) चोरी करणे (Stealing)

चोरी करणे म्हणजे एखाद्या व्यक्तीची वस्तू तिला न विचारता घेणे. बालके साधारणपणे वयाच्या ५ ते ६व्या वर्षानंतर चोरी करताना दिसतात. बालके सर्वसामान्यपणे घरी, शेजारी, शाळा इथून वस्तू चोरताना दिसतात. वयाच्या ५-६व्या वर्षापूर्वी वैयक्तिक संपत्ती ही संकल्पना विकसित झालेली नसते. त्यामुळे दुसऱ्या मुलांच्या वस्तू घेणे हे त्यांच्या दृष्टीकोनातून चोरी नसते.

#### चोरी करण्याची कारणे (Causes)

- ज्यावेळी बालकांना वाटते की, एखादी गोष्ट मिळणे माझा हक्क आहे आणि ते ज्यावेळी मिळत नाही त्यावेळी ते चोरी करते.
- असुरक्षित वाटत असल्यास
- काही वेळा बालकांना चोरी करणे हे साहसी कृत्य वाटते.
- काहीतरी खळबळजनक केल्याची भावना (Sense of excitement)
- जर बालकाच्या गरजा पूर्ण होत नसतील तर बालके चोरी करतात.
- घरामध्ये हुकुमशाही शिस्त असल्यास

#### चोरी करण्याची हाताळणी (Handling)

- बालकांनी चोरी केली असे पालकांच्या लक्षात आले तरी पालकांनी त्याविषयी तीव्र प्रतिक्रिया देऊ नये.
- बालकांना शिस्त लावताना पालकांनी त्यात सातत्य ठेवावे.
- पालकांनी वस्तू चोरणे आणि मागून घेणे यातील फरक बालकांना समजावून सांगावा.
- कुटुंबामध्ये पालकांनी बालकांना प्रेम आणि सुरक्षितता पुरवावी.
- दुसऱ्यांची वस्तू घेणे चूक असते याची बालका-बरोबर चर्चा करून त्यांना स्पष्ट करावे.
- बालकांना जी वस्तू हवी आहे ती त्यांनी मागावी हे पालकांनी त्यांना सुचवावे.
- बालकांबरोबर संवाद साधण्याचा पालकांनी सर्वतोपरी प्रयत्न करावा.
- बालकांच्या प्रत्येक प्रामाणिक वर्तनाचे पालकांनी कौतुक करावे.
- बालकामध्ये चोरी करण्याची प्रवृत्ती जर तीव्र स्वरुपात दिसत असेल तर पालकांनी समुपदेशकाचा सल्ला घ्यावा.

### (ज) मोबाईल / स्मार्टफोनचे व्यसन (Screen addiction)

बालकाला स्वतःच्या घरी नवीन खेळण्याच्या तुलनेत स्मार्ट फोन सहज उपलब्ध होतो. तर्कसंगत निर्णय घेण्याएवढे बालकाचे वय झालेले नसते. त्यामुळे त्यांना सहज व्यसन लागू शकते. सर्वसाधारणपणे नोकरी करणारे पालक सुरक्षिततेच्या आणि संरक्षणाच्या कारणासाठी बालकांना स्मार्टफोन देतात. ज्या बालकांना स्मार्टफोनचे व्यसन जडते त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासात समस्या आलेल्या दिसून येतात.

मानसिक विकासासंबंधीच्या समस्या म्हणजे मानसिक अस्थिरता, एकाग्रता नसणे, नैराश्य, राग आणि नियंत्रणात कमतरता तर शारीरिक समस्या म्हणजे दृष्टी आणि श्राव्य दोष, स्थूलपणा, शरीरात समतोल नसणे, मेंदू विकासात कमतरता यांचा समावेश होतो.

संपूर्ण आयुष्यात जर स्मार्टफोनचे व्यसन कायम राहिले तर बालकाचे वैयक्तिक आणि सामाजिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे पालक आणि समाजाने हे व्यसन मुलांना जडू नये म्हणून प्रतिबंधक उपाय करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

### मोबाईल / स्मार्टफोनच्या व्यसनाची हाताळणी (Handling)

- पालकांनी बालकांबरोबर जास्तीत जास्त वेळा घालवावा.
- बालकांचे स्वतःवर नियंत्रण कमी असते त्यामुळे पालकांनी नियंत्रण ठेवण्याची गरज असते.
- स्मार्ट फोन आणि स्क्रीनच्या व्यसनाला प्रतिबंध करण्याचे ध्येय ठेऊन बालकांना त्याबाबत योग्य शिक्षित करावे.
- पालकांनी बालकांवर स्मार्ट फोनचा जो तीव्र प्रभाव आहे तो ओळखून त्यापासून बालकांना दूर ठेवण्यासाठी योग्य पावले उचलणे आवश्यक आहे.

**दर्पण**

बालकांमध्ये कोणत्याही प्रकारच्या स्क्रीन वापरावर मर्यादा घालण्यासाठी कोणत्या विशिष्ट कृती तुम्ही सुचवाल?

## मुद्द्यांची उजळणी करा.

### वर्तन समस्या

| अ. क्र. | वर्तन समस्या | कारणे | हाताळणी |
|---|---|---|---|
| (अ) | आक्रमकता | • असुरक्षिततेची भावना असणे.<br>• मत्सर वाटणे.<br>• पालकांच्या उच्च अपेक्षा / खूप जास्त अपेक्षा आणि योग्य मार्गदर्शनाचा अभाव असणे.<br>• आक्रमक वर्तन करणाऱ्या पालकांचा आदर्श समोर असणे.<br>• चिंता आणि निराशा शब्दातून व्यक्त करण्यात अडचण येणे. | • बालकांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यास मदत करणे.<br>• आक्रमक वर्तन कशामुळे होते आहे हे पालकांनी / संगोपनकर्त्यांनी ओळखणे.<br>• बालके जेव्हा व्यक्त होत असते तेव्हा शांत राहणे. |
| (ब) | आक्रस्ताळेपणा | • लक्ष वेधून घेण्यासाठी<br>• बालकाला मैदानावर खेळायची संधी मिळत नसेल.<br>• बालकावर खूप बंधने असल्यास किंवा त्याचे खूप लाड होत असल्यास.<br>• बालकाला स्वतःच्या भावना नियंत्रित करायची संधी मिळत नसल्यास | • पालकांनी बालकाकडे पुरेसे लक्ष आणि सुरक्षित आधार द्यावा.<br>• बालकाच्या आक्रस्ताळेपणाकडे पालकांनी दुर्लक्ष करावे.<br>• योग्य वर्तनासाठी बालकाला बक्षिस द्यावे.<br>• पालकांनी स्वतःच्या वर्तनावर प्रमाणात नियंत्रण ठेवावे. |
| (क) | असहकार्य | • दिलेले ध्येय हे बालकाच्या क्षमतेपेक्षा जास्त असणे.<br>• बालकाला समजेल अशा सूचना नसणे/ न देणे. | • सहअनुभुती आणि सहकार्याचा आदर्शच समोर ठेवणे.<br>• प्रत्येक बालकाला संधी देणे.<br>• प्रत्येक बालकाला गटात लहान जबाबदारी देणे. |
| (ड) | चढाओढ | • घरात नवीन बाळाचा जन्म होणे.<br>• सतत तुलना करणे. | • बालकांमध्ये तुलना करणे टाळावे.<br>• बालकांना स्पर्धेपेक्षा सहकार्य करायला सांगावे.<br>• प्रत्येक बालकांना स्वतःचा वेळ आणि मोकळीक मिळते आहे ना याविषयी खात्री करावी. |

| अ. क्र. | वर्तन समस्या | कारणे | हाताळणी |
|---|---|---|---|
| (इ) | भांडण | • मित्र किंवा भावंडांबाबत मत्सराची भावना असणे.<br>• मित्र किंवा इतरांकडून चिडवणे / इतरांनी गुंडगिरी करणे.<br>• राग आणणारी परिस्थिती निर्माण होणे. | • बालकांचे लक्ष भांडणाच्या कारणावरून दुसरीकडे वेधून घ्यावे.<br>• एखादे बालक वारंवार भांडणाचे वर्तन दाखवत असेल तर त्यामागील मूळ कारण शोधावे. |
| (फ) | लाजाळूपणा | • अपरिचित व्यक्ती, परिस्थितीची भिती.<br>• असुरक्षितेची भावना.<br>• शिक्षेकरता चुकीच्या/शारीरिक पद्धतीचा वापर<br>• तीव्र स्वरुपाची टिका | • लोकांबरोबर आंतरक्रिया करण्याची संधी देणे.<br>• अतिसंरक्षण टाळावे.<br>• बालकाने काही साध्य केल्यास त्याचे कौतुक करावे.<br>• बालकाला 'लाजाळू' असे नामकरण करू नये. |
| (ग) | बुजरेपणा | • हुकुमशाही शिस्तीची पद्धत<br>• सामाजिकरण आणि सामाजिक वातावरणात सहभागी होण्याची संधी न मिळणे. | • लोकशाही पद्धतीच्या शिस्तीचा वापर करणे.<br>• शिक्षा, खास करून शारीरिक शिक्षा टाळाव्यात.<br>• मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रोत्साहन द्यावे.<br>• योग्य अपेक्षा ठेवाव्यात. |
| (ह) | अंथरुण ओले करणे | • भावनिक समस्या<br>• अनुवंशिक घटक<br>• मज्जासंस्थेशी संबंधित आजार | • बालकांना दोष देणे, शिक्षा देणे किंवा उपहासात्मक बोलणे टाळावे.<br>• पालकांचे वर्तन संयमी व आधार देणारे असावे.<br>• अंथरुण कोरडे ठेवणे हे बालकाला त्याची जबाबदारी आहे, पालकांची नाही हे समजण्यासाठी त्याला मदत करावी. या समस्येतून बालकाला बाहेर काढण्यासाठी त्याला / तिला मदत करण्याची इच्छा आहे याची खात्री द्यावी.<br>• झोपायला जाण्यापूर्वी १५ मिनिटे आधी आणि अगदी झोपायला जाताना बालकाला मूत्रविसर्जनासाठी जाण्यास प्रोत्साहीत करावे. |

| अ. क्र. | वर्तन समस्या | कारणे | हाताळणी |
|---|---|---|---|
| (ख) | चोरी करणे | • असुरक्षित वाटत असल्यास<br>• अन्यायाविरुद्ध बंड<br>• काहीतरी खळबळजनक केल्याची भावना.<br>• जर बालकांच्या गरजा पूर्ण होत नसतील तर<br>• घरात हुकूमशाही शिस्त असल्यास | • बालकांना शिस्त लावतांना पालकांनी त्यात सातत्य ठेवणे.<br>• वस्तू चोरणे आणि मागून घेणे यातील फरक पालकांनी बालकांना समजून सांगावा.<br>• पालकांना बालकांना प्रेम आणि सुरक्षितता द्यावी.<br>• बालकांबरोबर संवाद साधण्याचा पालकांनी सर्वतोपरी प्रयत्न करावा.<br>• बालकामध्ये चोरी करण्याची प्रवृत्ती जर तीव्र स्वरुपात दिसत असेल तर पालकांनी समुपदेशकाचा सल्ला द्यावा. |
| (ज) | मोबाईलचे व्यसन | • बालकांना स्मार्टफोन सहज उपलब्ध होतात.<br>• सर्वसाधारणपणे नोकरी करणारे पालक सुरक्षिततेच्या आणि संरक्षणाच्या कारणासाठी बालकांना स्मार्टफोन देतात. | • पालकांनी बालकांबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवावा.<br>• बालकांवर स्मार्टफोनचा जो तीव्र प्रभाव आहे तो पालकांनी ओळखून त्यापासून बालकांना दूर ठेवण्यासाठी योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. |

**शब्दसूची Glossary**

**आक्रमकता (Aggression) :** आक्रमकता म्हणजे दुसऱ्या व्यक्तीने काहीही त्रास दिलेला नसतांनाही घाबरवण्याचे वर्तन.

**अंथरुण ओले करणे (Bedwetting) :** वयाच्या पाचव्या वर्षानंतरही अनैच्छिकरित्या रात्री झोपेत अंथरुण ओले करणे.

**वर्तन समस्या (Behavioural Issues) :** असे वर्तन जे वैयक्तिक वाढ आणि सामाजिक समायोजनात अडथळे आणते.

**जुनाट (Chronic) :** बऱ्याच काळासाठी सतत चालू असणारे किंवा पुन्हा पुन्हा सतत दिसणारे वर्तन

**चुकीच्या मार्गाने स्वीकारलेले (Maladaptive) :** वेगवेगळ्या परिस्थितीप्रमाणे बदल करण्याची क्षमता नसणे.

**प्राथमिक अंथरुण ओले करणे (Primary Bedwetting) :** पूर्वबाल्यावस्थेपर्यंत अंथरुण ओले करणे हे वर्तन खंड न पडता चालू राहणे.

**भांडण (Quarrelling) :** हे आक्रमकतेचे विस्तारीत रुप आहे.

**चढाओढ (Rivalry) :** दुसऱ्याबरोबर स्पर्धा करणे किंवा दुसऱ्यावर मात करणे.

**दुय्यम अंथरुण ओले करणे (Secondary bedwetting) :** उत्सर्जन प्रक्रियेवर नियंत्रण आल्यावर बालकाने सहा महिने अंथरुण ओले केले नाही व नंतर परत अंथरुण ओले करणे.

**लाजाळूपणा (Shyness):** असे वर्तन ज्यामुळे सामाजिक वातावरणापासून बालक दूर जाते.

**चोरी करणे (Stealing) :** एखाद्याची वस्तू त्या व्यक्तीला माहित नसतांना / न विचारता घेणे.

**आक्रस्ताळेपणा /आकांडतांडव (Temper tantrum) :** वयाच्या २ ते ४ वर्षामध्ये रागाचा अनियंत्रित उद्रेक होणे.

**बुजरेपणा (Timidity) :** सामाजिक वातावरणाची भिती.

## स्वाध्याय

**प्र. १ खालील दिलेल्या पर्यायांपैकी सर्वात योग्य पर्याय निवडून लिहा.**

(१) पूर्वबाल्यावस्था ................. वय म्हणून ओळखली जाते.

(अ) भावनिक (ब) शिकण्याचे

(क) समस्या

(२) रागाच्या अनियंत्रित उद्रेकाला ................. म्हणतात.

(अ) भांडण (ब) आक्रस्ताळेपणा

(क) आक्रमकता

(३) जर ................. ची हाताळणी नीट झाली नाही तर त्याचे रुपांतर असामाजिक वर्तनात होऊ शकते.

(अ) आक्रमकता (ब) आक्रस्ताळेपणा

(क) असहकार्य

(४) असे वर्तन ज्यामध्ये बालक स्वतःला सामाजिक वातावरणापासून दूर ठेवते याला ................. म्हणतात.

(अ) लाजाळूपणा (ब) आक्रस्ताळेपणा

(क) असहकार्य

**प्र. २ जोड्या लावा :**

| अ | ब |
|---|---|
| (१) आक्रस्ताळेपण | (अ) मत्सर |
| (२) असहकार्य | (ब) नजरेला नजर न भिडवणे |
| (३) भांडण | (क) न समजणाऱ्या सूचना देणे. |
| (४) बुजरेपणा | (ड) आक्रमकतेचे विस्तारीत रूप |
| (५) चढाओढ | (इ) मारणे, लाथ मारणे, श्वास / दम कोंडणे |
| | (फ) शिक्षा देणे किंवा उपहासात्मक बोलणे. |

**प्र. ३ वेगळा शब्द ओळखा.**

चोरी करणे, आक्रमकता, चढाओढ, आक्रस्ताळेपणा, खोटे बोलणे, अध्ययन अक्षमता, असहकार्य

**प्र. ४ पहिल्यातील सहसंबंध लक्षात घेऊन दुसऱ्यातील सहसंबंध सांगा.**

(१) आक्रस्ताळेपणा : रागाचा अनियंत्रित उद्रेक : : लाजाळूपणा : ?

(२) आक्रमकता : वैर : : चढाओढ : ?

**प्र. ५ संज्ञा स्पष्ट करा.**

(१) आक्रस्ताळेपणा

(२) चोरी करणे

(३) आक्रमकता

(४) भांडण

(५) चढाओढ

(६) लाजाळूपणा

(७) बुजरेपणा

**प्र. ६ खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

दुसऱ्या व्यक्तीने काहीही त्रास दिलेला नसतांनाही त्याला घाबरवणारे वर्तन म्हणजे आक्रमक वर्तन होय. आक्रमकतेची नीट हाताळणी झाली नाही तर त्या वर्तनाचे असामाजिक वर्तनात परिवर्तन होऊ शकते. शालापूर्व अवस्थेतील बालकांचे मौखिक प्रगटीकरण मर्यादित असते, ते लवकर त्रासिक होतात आणि स्वतःला व्यक्त करू शकत नाहीत त्यामुळे ते आक्रमक वर्तन दर्शवू शकतात. शालापूर्व अवस्थेतील बालकांचे मौखिक प्रगटीकरण मर्यादित असते, ते लवकर त्रासिक होतात आणि स्वतःला व्यक्त करू शकत नाहीत. त्यामुळे ते आक्रमक वर्तन दर्शवू शकतात. शालापूर्व बालके हे बरेचदा वस्तू फेकून मारण्यातून आक्रमकता दर्शवतात किंवा मारणे, लाथा मारणे, ओरडणे, हवी असलेली वस्तू हिसकावून घेणे यातून आक्रमकता दर्शवतात. तसेच बालके त्यांच्या पालकांच्या आक्रमक वर्तनाचे सुद्धा अनुकरण करतात. सर्वसाधारणपणे वयाच्या दुसऱ्या वर्षापासून बालके आक्रमकता दर्शवायला सुरुवात करतात. तिसऱ्या वर्षी आक्रमकतेची तीव्रता सर्वात उच्च असते.

(१) योग्य उदाहरणे देऊन आक्रमकता ही संज्ञा स्पष्ट करा.

(२) बालक आक्रमक वर्तन कधी दर्शवते?

(३) आक्रमक वर्तनामागील कारणे लिहा.

**प्रकल्प / स्वयंअध्ययन**

- **ज्या बालकांना वर्तन समस्या आहेत अशा पाच बालकांचे निरीक्षण करा. त्यांच्या वर्तनाचे वर्णन थोडक्यात लिहा.**

# ९ पालक व शाळा सहयोग

**प्रतिबिंब / दर्पण**

- तुम्हाला तुमच्या शाळेतील पालकसभा आठवते का?
- तुमचा काय अनुभव आहे? थोडक्यात लिहा.

## पालक, शिक्षक सहयोग बांधणी



चित्र ९.१

**कृती**

**खेळ खेळा – चक्र फिरवणे**

**खेळासाठीची तयारी**




- खेळ खेळण्याची पद्धत
- वर्गाची दोन गटात विभागणी करा.
- दोन गटासाठी दोन प्रमुख ठरवा.
- प्रत्येक गटातून एक बालक संगीत/टाळ्या वाजवण्यासाठी निवडा.
- दोन गट प्रमुखांमध्ये 'पासिंग द पार्सल' (Passing the parcel game) हा खेळ खेळायला सुरुवात करा.
- विरुद्ध गटातील एक बालक पुढे येईल. वर्गाकडे पाठ करून ते टाळ्या/संगीत वाजवायला सुरुवात करेल.
- २–३ मिनिटांनी संगीत थांबवावे.
- ज्या गटाकडे पार्सल (parcel) आहे तो गट उत्तर देईल.


- शिक्षक चक्र फिरवतील.
- चक्र थांबल्यानंतर ज्या गटाकडे पार्सल (parcel) आहे तो गट बाणासमोर जो शब्द आला असेल त्याप्रमाणे उत्तर देईल. शब्द पाहिल्यावर काय आठवते हे गटाने स्पष्ट करायचे आहे.

पालकांचा सहभाग (Parental involvement) हा बालकाच्या समग्र विकासामध्ये (holistic development) मोजमाप करता येण्याजोगा बदल घडवतो. आपल्याला माहित आहेच की, पालक हे बालकांचे पहिले शिक्षक असतात. जेव्हा शाळा पालक-बालक संबंधाविषयी मूल्य व आदर दाखवते आणि बालकाच्या शिक्षणात बरोबरीचा भागीदार म्हणून पालकांचे स्वागत करते अशावेळी पालक व शिक्षकांना मुलांचे सकारात्मक आणि परिपूर्ण आयुष्य घडवण्यासाठी मिळालेली संधी असते.

शाळा व कुटुंब यामध्ये घट्ट सहसंबंध असतील तर बालक तसेच पालक दोघांनाही त्याचा खूप फायदा झालेला दिसतो. हे सिद्ध झाले आहे की बालकांच्या शालेय प्रगतीमध्ये पालकांचा सहभाग असल्यास मुले जास्त चांगली प्रगती करून ध्येय साध्य करू शकतात. तसेच पालकांचे जर शाळेतील शिक्षकांबरोबर सकारात्मक संबंध असतील तर, बालकांबद्दलच्या काही चिंता/समस्या असतील तर त्यांची उकल लवकर होऊ शकते. आपल्या बालकांना चांगले शिक्षण मिळाले आहे याविषयी पालकांची खात्री पटते आणि सहसंबंधाबरोबरच शाळेबद्दल विश्वास आणि आदरही विकसित होतो.

## ९.१ पालक - शाळा सहयोगाचे महत्त्व आणि गरज (Importance and Need of Parent School collaboration)

शालेय पातळीवर पालकांचा सहभाग हा घटक पालक - शाळा सहसंबंधात खूप मदत करतो. शाळा व घर यांच्यातील संबंध आणि सहयोग निर्माण होण्यासाठी मूर्त स्वरुपातील प्रयत्नांची गरज असते.




चित्र ९.२

या सर्व प्रक्रियेत शाळा आणि घर यांच्या सहयोगाला महत्त्व /ओळख मिळण्याची गरज असते. शाळा व घर या दोन्ही ठिकाणच्या प्रसंगाचा शैक्षणिक निष्पत्तीवर परिणाम होतो. शाळा व घर यांच्यातील भागीदारीचा परिणाम बालकांच्या वर्गातील वर्तनावर होतो.

बालकांना शिक्षण देण्यामध्ये शाळा व घर या दोन स्वतंत्र प्रणाली, त्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या निभावत असतात. शाळा - घर यांच्या यशस्वी सहयोगासाठी पालक व शिक्षकांनी प्रक्रियेमध्ये अडथळा आणणारे सर्व घटक काढून टाकावे. आर्थिक-सामाजिक दर्जा, घरातील संघर्षमय वातावरण, सांस्कृतिक फरक, पालकांचे शिक्षण असे काही घटक अडथळे आणतात.

पालक-शिक्षकांमधील निरोगी संबंधाचे महत्त्व का आहे? बालकांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये सुधारणा दिसणे, सामाजिक क्षमता विकसित होणे आणि भावनिक स्वास्थात सुधारणा होणे हे पालक-शिक्षकांमधील सकारात्मक

संबंधामुळे घडते असे दिसून आले आहे. पालक-शिक्षक जेव्हा एकमेकांचे भागीदार म्हणून काम करतात तेव्हा बालके शाळा व घर या दोन्हीही ठिकाणी प्रगती दर्शवतात.

## ९.१ (अ) घर व शाळा यांच्यातील जवळकीच्या संबंधाची गरज (Need for a close relationship between home and school)

- संवाद साधण्यासाठी (To communicate)

  शाळा व घर यांच्यातील संबंध नियमित, द्विमार्गी व अर्थपूर्ण असावा.

- पालकत्वाची कौशल्ये विकसित करणे (To develop parenting skills)

  पालकत्वाच्या कौशल्यांना चालना द्यावी व पाठिंबा द्यावा.

- अध्ययन प्रक्रिया समृद्ध करणे (To enhance learning process)

  बालकांच्या अध्ययन मूल्यमापन प्रक्रियेत पालकांची भूमिका खूप महत्त्वाची असते.

- पालक सहभागाला प्रोत्साहन देणे (To promote parent's involvement)

  शाळेच्या उपक्रमात पालकांच्या उत्स्फूर्त सहभागाचे स्वागत करावे.

- निर्णय घेण्यात भागीदारी असणे (To become a partner in decision making)

  निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत पालक भागीदारी करू शकतात.

- समाजाबरोबर सहयोग असणे (To collaborate with the community)

  शाळेचे प्रबलीकरण, कुटुंब आणि बालकांचे अध्ययन यासाठी समाजातील साधनांचा वापर करणे.

### गरजांमागील मूलभूत तत्त्वे (Basic principles behind these needs)

- बालकांचे उत्तम शिक्षण आणि चांगल्या जीवनाची सुरुवात करण्यासाठी शाळा आणि घर यांनी जबाबदारी विभागून घ्यावी.
- काही समस्या निर्माण होण्यापूर्वी शाळांनी कुटुंबाचा समावेश करून मदत घ्यावी.
- निर्णय प्रक्रियेत शाळा कुटुंबांना समाविष्ट करून घेईल.
- शाळा बालकांसाठी, अर्थपूर्ण अनुभवांचे आयोजन करेल.
- कुटुंब बालकांच्या हजेरीवर लक्ष ठेवेल.
- साक्षरतेच्या अनुभवामध्ये कुटुंब गुंतलेली राहतील.
- शाळेतील शिक्षक व इतर घटकांबरोबर कुटुंबे रुळतील.
- निर्णय प्रक्रियेमध्ये कुटुंबे सहभागी होतील.
- शाळा व घर यात परिणामकारक द्विमार्गी संवाद घडेल.
- बालकांना कशी मदत करावी हे शिकण्याची कुटुंबांना संधी मिळेल.

शाळा व घर यांच्यातील संबंध ही नुसती एक कृती नसून तो एक दृष्टीकोन आहे. ज्यामध्ये पालक व शिक्षक यांनी सारखीच ध्येय समोर ठेवलेली असतात आणि दोघेही प्रक्रियेमध्ये योगदान देतील. यशस्वी सहयोग निर्माण होण्यासाठी परिणामकारक संवादाची आवश्यकता असते.

शाळा व घर यांच्यातील यशस्वी संबंधाच्या पायऱ्या असतात.

#### (१) ओळख (Introduction)

- सकारात्मक संबंध प्रस्थापित करणे.
- केंद्रीत वर्तन - ध्येय, उद्‌दिष्टे
- समस्यांवर लक्ष केंद्रीत करणे.

(२) तादात्मीकरण (Identification)

- असलेल्या समस्यांचे वैयक्तिक संवेदन
- ध्येयामधील साधर्म्य शोधणे.
- अपेक्षित निष्पत्ती.

(३) उत्तर शोधणे (Solution)

- ध्येयप्रेरित वर्तन.
- अपेक्षित निष्पत्तीसाठी स्रोत शोधणे.

(४) अंमलबजावणी (Implementation)


- ध्येय कशी ठरवली जातात.
- ध्येयपूर्ती - ध्येयाच्या दिशेने वर्तन व कृती
- शोधलेल्या उत्तरांवर चर्चा, ध्येयपूर्ती झालेली नसल्यास एकमेकांना दोष न देता ध्येयांमध्ये सुधारणा व बदल करणे.
- पालकांबद्दल आत्मीयतेची भावना पुन्हा एकदा निर्माण करणे.
- शिक्षकांच्या वर्तनाकडे पालक आधार देणारे व काळजी घेणारे वर्तन या दृष्टीकोनातून बघतात.
- शाळा व घर यांच्यात चांगले संबंध व चांगला संवाद प्रस्थापित होण्यास मदत होते.
- बालकांच्या गरजांची पूर्तता होण्याची वचनबद्धता निर्माण होते.
- बालकांना पाठिंबा दिला जातो व आत्मविश्वास विकसित होण्यास मदत केली जाते.
- एकमेकांना सकारात्मक संदेशांची देवाण-घेवाण केली जाते.
- चिरंतन टिकणारे सहसंबंध निर्माण होतात.
- शाळा व घर सहसंबंध बालकांना ज्ञान, कौशल्य आणि दृष्टीकोन पुरवतात.
- शिक्षणासाठी समान संधी पुरवल्या जातात.




चित्र ९.३

९.१ (ब) महत्त्व (Importance)

- शाळा व घर यांच्या सहयोगामुळे प्रौढ व बालक यांच्यात सकारात्मक सहसंबंध निर्माण होतात.
- जवळकीच्या संबंधातून शारीरिक व मानसिक सुरक्षितता पुरवली जाते.
- बांधीलकीची भावना निर्माण होते.




चित्र ९.४

**Evans (1971)**

'Parental involvement refers to some degree of participation at all major stages of an early education programme : Planning, execution, evaluation and modification.'

**इव्हान्स् Evans (1971)**

पूर्वशैक्षणिक अभ्यास कार्यक्रमात : नियोजन, संयोजन, मूल्यमापन आणि बदल किंवा सुधारणे या महत्त्वाच्या पायऱ्या मध्ये काही प्रमाणात सहभागी होणे म्हणजे 'पालक सहभाग' (Parental involvement) होय.

## ९.२ पालक – शाळा सहयोगाच्या पद्‌धती (Methods of Parent School collaboration)

आजच्या काळातील कुटुंबाची जीवनशैली पालकांच्या पारंपरिक भूमिका बदलण्यास किंवा सुधारण्यास भाग पाडतात. पालक कामासाठी घराबाहेर पडतात. बालके खूप वेळासाठी घरामध्ये राहात नाहीत. बरीच बालके बालसंगोपन केंद्रातील शिक्षक व संगोपनकर्ते यांच्याबरोबर विभागली जाते.

आजच्या काळातील बालकांच्या स्थितीला पालक व शिक्षक दोघेही तितकेच कारणीभूत असतात. त्यांच्या भूमिकाही समान असतात. त्यामुळे त्यांनी एकत्र काम केले पाहिजे. म्हणजेच पालकांचा सहभाग कधीच संपत नाही. उलट पालक व शिक्षकांनी एकत्र काम केल्यामुळे बालकांमध्ये अनपेक्षित बदल दिसून येतात. पालक शिक्षकांकडून बालकांची योग्य हाताळणी शिकू शकतात.

कोणताही शैक्षणिक कार्यक्रम किंवा बालसंगोपन कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आजच्या काळात पालकांची बालकांमधील गुंतवणूक आणि बालकांबरोबर आंतरक्रिया होणे आवश्यक आहे.

### पालक सहभागाची संकल्पना (Concept of Parent involvement)

'पालक सहभाग' म्हणजे काय? हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बालकांसाठी चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही केंद्रातील खूप गोष्टी ऐकणे ते निर्णय घेणे या सर्वामध्ये पालकांचा सहभाग असतो.

### पालक व शाळा सहयोगाचे फायदे (Advantages of Parent School collaboration)

- पालक व शिक्षक यांच्यात जवळीकता निर्माण होते.
- पालकांकडून शिक्षकांना प्रत्यक्ष मदत मिळते.
- पालक स्रोत किंवा मदतनीस म्हणून मदत करू शकतात.
- पालकांपासून पालकांपर्यंत असा कार्यक्रम घेऊ शकतो, ज्यामुळे ते एकमेकांना माहिती देऊ शकतात.
- पालक केंद्रातील सभांमध्ये तज्ज्ञांनी घेतलेल्या सभांमुळे पालकांना फायदा होतो.
- घर आणि केंद्र यांच्यामध्ये पालक दुवा ठरू शकतात.
- संगोपन आणि हाताळणीसाठी शिक्षक ज्या पद्‌धतींचा वापर करतात ते घरी वापरल्यास पालकांना फायदा होतो.
- पालकांचा अर्थपूर्ण सहभाग मुलांच्या विकासात नक्कीच महत्त्वाचे योगदान ठरते.
- बालकांमध्ये आत्मविश्वास वाढवण्यास पालकांच्या सहभागाची मदत करतो.
- बालकांमध्ये कौशल्य विकसित करण्यास मदत होते.

#### (१) केंद्रातील सभा (Meetings in the centre)

केंद्रामध्ये सभा आयोजित केल्यास पालकांचा सहभाग हा त्या सभेसाठी महत्त्वाचा असतो.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- पालक हे उत्साही श्रोता असावेत.
- पालक शिक्षकांना आळीपाळीने सभांचे आयोजन करण्यासाठी मदत करू शकतात.
- पालक तज्ज्ञ व्यक्तींबरोबर संवाद साधण्यास, पाहुण्यांना आमंत्रण देणे यात मदत करू शकतात.
- तज्ज्ञ व्यक्ती जिथे राहतात तेथून त्यांना घेऊन येणे आणि नेऊन सोडणे यात पालक मदत करू शकतात.
- सभेत चहा आणि अल्पोपहार देण्याची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी पालक घेऊ शकतात.
- सभेत होणाऱ्या चर्चासत्रात पालक नेतृत्व करू शकतात.
- स्वतःच्या कल्पना सांगणे आणि सहभागी असणे यात पालक नेतृत्व करू शकतात.
- दैनंदिन जीवनात बालकांच्या संदर्भात येणाऱ्या समस्या सोडवण्याविषयीचे मार्ग एकमेकांना सांगू शकतात.
- सभेदरम्यान पालक शिक्षकांना त्यांच्या गरजा सांगू शकतात.

### (२) स्नेहसंमेलन (Gatherings)

स्नेहसंमेलन हे बालकांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम असतो. बहुतेक सर्व मुले स्नेहसंमेलनाच्या काळात उत्साही असतात.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- मुलांकडे लक्ष ठेवण्यासाठी पालक मदत करू शकतात.
- सजावट करण्यासाठी पालक जबाबदारी घेऊ शकतात.
- प्रेक्षक वर्गाची व्यवस्था पाहण्यास मदतनीस म्हणून पालक काम करू शकतात.
- कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यास पालक मदत करू शकतात.
- बालकांकडून कार्यक्रमाचा सराव करून घेण्यास पालक मदत करू शकतात.
- कार्यक्रमादरम्यान मुलांना खाऊ देण्याचे काम काही पालक करू शकतात.
- बालकांची ने-आण करण्यासाठी पालक स्वतःची वाहने पुरवू शकतात.
- पालक स्नेहसंमेलनात सहभागी होऊन बालकांसाठी कार्यक्रमाचे सादरीकरण करू शकतात.
- बालकांची रंगभूषा आणि वेषभूषेची जबाबदारी पालक घेऊ शकतात.

### (३) सण साजरे करणे (Festival celebration)

भारतात साजरे होणारे बहुतेक सर्व प्रकारचे सण केंद्रात साजरे केले जावे. केंद्रामध्ये वेगवेगळ्या सामाजिक गटातील मुले असतात. केंद्रात सण साजरे करण्यामागील मुख्य उद्देश भारतातील विविध संस्कृतींची बालकांना जाणीव करून देणे हा आहे.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- सजावट करू शकतात.
- सण साजरे करण्यासाठी लागणारे साहित्य पुरवू शकतात.
- वेगवेगळ्या सामाजिक गटातील पालक विशिष्ट सणांमध्ये सहभागी होऊ शकतात.
- पालक येऊन सणांविषयी माहिती देऊ शकतात.
- विशिष्ट गटात विशिष्ट सण कशाप्रकारे साजरा केला जातो त्याविषयी चित्र, फोटोग्राफ्स, सिडी आणून बालकांना दाखवू शकतात.

- बालके सण साजरे करतांना पारंपरिक पोषाख घालू शकतात. त्या विशिष्ट पोषाखासाठी पालक मदत करू शकतात.
- मुख्यतः एकमेकांना भेटण्यासाठी, शुभेच्छा देण्यासाठी आणि आनंदासाठी सण साजरे केले जातात. पालक येऊन सणांची प्रथा शिकवू शकतात.
- विशिष्ट सणांसाठी असणारे विशिष्ट पदार्थ पालक बालकांना देऊ शकतात.

### (४) सहल (Picnic)

सहल मुख्यतः दोन उद्देशांनी आयोजित केली जाते – मजा आणि शिक्षण. बालके सहलीसाठी जेव्हा केंद्राबाहेर जातात तेव्हा त्यांना असुरक्षित वाटू शकते. अशा वेळी त्यांना मदतीची गरज असते. मात्र शिक्षिका एका वेळी सगळ्या वयोगटातील बालकांकडे लक्ष देऊ शकत नाही. अशावेळी पालक मदत करू शकतात.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- पालक सहलीसाठी स्थळ किंवा जागा सुचवू शकतात.
- सहलीला जाण्यासाठी वाहने पुरवू शकतात.
- सहलीसाठी लागणारे खाद्यपदार्थ पुरवू शकतात.
- बालकांची व्यवस्था पाहण्यासाठी केंद्रावर जाऊ शकतात.
- जर केंद्राला आवश्यकता वाटत असेल तर सहलीसाठी काही आर्थिक सहाय्य करू शकतात.
- सहलीच्या ठिकाणी बालकांसाठी काही मनोरंजनाच्या कृती घेऊन बालकांचे सहलीचे क्षण आनंददायी बनवू शकतात.

### (५) प्रदर्शन (Exhibitions)

पालकांच्या शिक्षणासाठी किंवा काही वेळा बालकांसाठी प्रदर्शन आयोजित केली जातात. अशा वेळी पालक प्रदर्शनाचे नियोजन आणि प्रदर्शनात स्पष्टीकरण देण्याची मदत नक्की करू शकतात. प्रदर्शनाची मांडणी करणे आणि प्रदर्शन संपल्यावर आवरणे हे खूप दमवणारे काम असते.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- प्रदर्शनाच्या जागेची सजावट करणे.
- प्रदर्शनाला लागणाऱ्या साहित्याची निर्मिती करणे.
- तक्ते तयार करणे.
- प्रदर्शनाची मांडणी व रचना करणे.
- प्रदर्शनासाठी जागेची सोय करणे.
- तक्त्यांचे स्पष्टीकरण देणे.
- प्रदर्शनासाठी प्रारुप तयार करणे.
- प्रदर्शनासाठी आमंत्रणपत्र तयार करणे.
- प्रदर्शनासाठी आवश्यक तो पत्रव्यवहार करणे.

### (६) स्पर्धा (Competitions)

खूप लहान बालकांसाठी केंद्रामध्ये स्पर्धा आयोजित केल्या जाऊ नयेत. पण मोठ्या बालकांसाठी आयोजित केल्या जाऊ शकतात. लहान बालकांसाठी मनोरंजनात्मक कृती असाव्यात.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून येऊ शकतात.
- बक्षिसांसाठी प्रायोजक म्हणून मदत करू शकतात.
- प्रत्यक्ष स्पर्धेच्यावेळी पालक शिक्षकांना मदत करू शकतात.
- स्पर्धेच्या वेळी मिठाई किंवा खाऊ पुरवू शकतात.

### (७) बालमेळावा (Balmela)

बालमेळावा ही पण बालकांसाठी मनोरंजनात्मक कृती आहे. इथे बालके आयोजित केलेले खेळ आणि कृतींचा मोकळेपणी आनंद घेऊ शकतात. इथे कृतींसाठी

कोणतीही ठराविक अशी चौकट नसते. याचे आयोजन कसे करावे हे पूर्णपणे शिक्षिकेच्या सर्जनशीलतेवर अवलंबून असते.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- बालमेळाव्यासाठी पालक शिक्षकांना कल्पना सुचवू शकतात.
- विविध स्टॉल्स्‌वर मदत करू शकतात.
- बालकांची व्यवस्था पाहणे व त्यांच्याकडे लक्ष ठेवणे.
- खाद्यपदार्थांचे स्टॉल ठेवू शकतात.
- गोष्ट सांगणे, बाहुलीनाट्य अशा संवाद स्टॉल्सवर तज्ञ व्यक्ती म्हणून काम करू शकतात.
- बालकांसाठी शारीरिक कृती, खेळ यांचे आयोजन करू शकतात.

### (८) बाहुलीनाट्य / गोष्ट सांगणे (Puppet show/ Story telling)


बाहुलीनाट्य हे गोष्ट सांगण्याचे तंत्र आणि कौशल्य आहे. ज्यामुळे बालके गुंग होऊ शकतात. बाहुलीनाट्याद्वारे मनोरंजनात्मकरित्या शिक्षणही दिले जाऊ शकते.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- पालक तज्ञ व्यक्ती म्हणून काम करू शकतात.
- पालक नाट्याचे लेखन करू शकतात.
- बाहुल्या तयार करणे व त्याचा वापर करणे यासाठी बालकांची कार्यशाळा घेऊ शकतात.
- केंद्रातील मोठ्या बालकांना बाहुल्या करणे आणि त्याचा वापर करायला शिकवू शकतात.
- बाहुलीनाट्यासाठी गोष्टी सुचवू शकतात आणि बालकांच्या गरजांनुसार नवीन गोष्टी लिहू शकतात.

**मुद्द्यांची उजळणी करा.**

**पालक – शाळा सहयोग**



**शब्दसूची *Glossary***

**सहयोग (Collaboration) :** ध्येयपूर्ती किंवा उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दोन किंवा जास्त व्यक्ती किंवा संस्था एकत्रित काम करतात त्या प्रक्रियेला सहयोग म्हणतात.

**प्रभावी संभाषण (Effective communication) :** प्रभावी संभाषण म्हणजे दोन किंवा जास्त व्यक्तींमध्ये योग्य मार्गाने संदेश देणे, घेणे आणि समजून घेणे.

**पालकांचा सहभाग (Parent involvement) :** पालकांचा सहभाग म्हणजे बालकांच्या प्रत्यक्ष जीवनात आणि शालेय जीवनात पालक किती प्रमाणात सहभाग आहे.

## स्वाध्याय

**प्र. १ जोड्या लावा.**

| अ | ब |
|---|---|
| (१) ध्येय कशी ठरवली जातात | (अ) तादात्मीकरण |
| (२) सकारात्मक संबंध प्रस्थापित करणे | (ब) उत्तर शोधणे |
| (३) ध्येयामधील साधर्म्य शोधणे | (क) अंमलबजावणी |
| (४) अपेक्षित निष्पत्तीसाठी स्त्रोत शोधणे | (ड) ओळख |

**प्र. २ टीपा लिहा.**

(१) केंद्रातील सभा

(२) स्नेहसंमेलन

(३) प्रदर्शन

(४) बालमेळावा

(५) स्पर्धा

**प्र. ३ खालील कृतींमधील पालक सहभागाविषयी लिहा.**

(१) सण साजरे करणे

(२) सहल

(३) स्पर्धा

(४) बाहुलीनाट्य

**प्र. ४ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) पालक - शाळा सहयोगाची गरज स्पष्ट करा.

(२) पालक - शाळा सहयोगाच्या गरजेमागची मूलभूत तत्त्वे लिहा.

(३) पालक - शाळा सहयोगाचे फायदे लिहा.

(४) पालक - शाळा सहयोगाचे महत्त्व लिहा.

(५) केंद्रातील पालक सभेत पालकांचा सहभाग कशाप्रकारे असू शकतो ?

**प्र. ५ रिकामे चौकोन पूर्ण करा.**

(१) गोष्ट सांगण्याचे तंत्र

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | हु | | | ट्य |

(२) बालकांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्ने | | सं | | | न |

(३) पालकांना शिक्षित करण्यासाठी आयोजित केले जाते.

| | | | |
|---|---|---|---|
| | द | | न |

## प्रकल्प / स्वयंअध्ययन

### पालकसभा आयोजित करा.

#### भाग – १

- विषय : ....................................................................................................
- विषयतज्ज्ञ : ..............................................................................................
- दिनांक : ......................   दिवस / वार : ..........................
- वेळ : ......................
- स्थळ : ......................

#### भाग – २

### पुढील मुद्दे सविस्तर लिहा.

- पालकांसाठी सूचनापत्र : ....................................................................
- विषयतज्ज्ञांसाठी आमंत्रण पत्रिका : .........................................................
- फर्निचर रचना व खोलीची रचना : ..........................................................
- अल्पोपहाराची व्यवस्था : ....................................................................

❖ ❖ ❖

# १० विशेष गरजा असणारी बालके



सक्षम बालकांपेक्षा जी बालके शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या, बौध्दिकदृष्ट्या, भावनिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या वेगळी असतात व ज्या बालकांना विशिष्ट सेवांची गरज असते, विशेष निवासी व्यवस्था लागतात व शालेय शिक्षणाच्या नेहमीच्या पद्धतींमध्ये बदल करावे लागतात अशा बालकांसाठी ''विशेष गरजांनुसार शिक्षण'' असते. (Special Needs Education) उदा. शारीरिक अक्षमता म्हणजेच पायाच्या अक्षमता असणाऱ्या व्यक्तिंसाठी म्हणून जिन्याच्या जोडीने उतार असायला हवेत किंवा अध्ययन अक्षम बालकांसाठी अभ्यासाचा मनोनकाशा तयार करणे, अभ्यास कौशल्य पद्धती अशी तंत्रे गरजेची आहेत.

शिक्षण क्षेत्रामध्ये ''विशेष गरजा'' अशी संज्ञा ज्या विद्यार्थ्यांसाठी वापरली जाते तेव्हा त्यांच्यासाठी ''वैयक्तिक शिक्षण नियोजन'' (Individual Education Plan - IEP) तयार केले जाते. त्यालाच ''वैयक्तिक कार्यक्रम नियोजन'' (Individual Programme Plan) असे संबोधले जाते.

इंडिव्हिज्यूअल विथ डिसॲबिलिटी एज्यूकेशन ॲक्ट (IDEA) या अमेरिकन संस्थेनुसार अक्षम विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण, रोजगार आणि स्वावलंबी जीवनमान यासाठी तयार करायला हवे. युनायटेड नेशन्स यांनी सांगितल्यानुसार आज जगात सद्यस्थितीत १ अब्ज लोक अक्षम आहेत. विविध घटकांमुळे ही संख्या वाढत चालली आहे.

आता जागतिक आरोग्य संस्थेने (WHO) काही संज्ञांचे वर्णन व अर्थ दिला आहे तो समजून घेऊ.

**दोषस्थिती (Impairment)**

It is defined as any loss or abnormality of psychological, physiological or anatomical structure or function.

दोषस्थिती म्हणजेच मानसिक शारीरिक किंवा शरीरकार्य करण्यासाठी लागणाऱ्या रचनेमध्ये दोष निर्माण होणे किंवा तो भाग अनुपस्थित असणे.

**उदा.:** दृष्टी नसणे, ऐकू न येणे.

**अक्षम स्थिती (Disability)**

Disability develops as a consequence of impairment. It is also the inability to carry out certain activities, which are considered as normal for a particular age or sex.

अक्षम स्थिती हा दोषस्थितीचा पुढचा परिणाम असतो. अक्षमता म्हणजेच काही कारणांमुळे ठराविक कृती, कार्य करता येण्यास असमर्थ असणे आणि बरेचदा ही स्थिती कोणत्याही वयाला किंवा स्त्री – पुरूष कोणाहीमध्ये येऊ शकते.

**उदा.:** पाय नसण्यामुळे किंवा पायातील दोषामुळे एखादी व्यक्ती चालण्यास असमर्थ असते.

**माहिती केंद्र**

१९९२ मध्ये युनायटेड नेशन्सच्या सर्वसाधारण सभेत ३ डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय 'अक्षम व्यक्तिदिन' म्हणून (Day of Persons with Disabilities) जाहीर केला. विशेष गरजा असणाऱ्या व्यक्तिंबद्दल जनजागृती करणे, त्यांना समजून घेणे व त्यांना स्वीकारणे हा यामागचा प्रमुख हेतू होता. अक्षम व्यक्तिदिन जाहिर झाल्यामुळे विशेष गरजा असणाऱ्या व्यक्तिंना त्यांची मते व्यक्त करण्यास प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीत सुधारणा घडवण्यास चालना मिळणे हे घडेल हाही हेतू होता.

## अपंग स्थिती (Handicap)

It develops as a consequence of the disability. It is difined as a disadvantage for a given individual resulting from an impairment or a disability, that limits and prevents the fulfilment of a role which is normal for that individual, depending on age, sex, social and cultural factors.

अपंग स्थिती ही अक्षम स्थितिचाच पुढचा परिणाम असते. एखाद्या अपंग व्यक्तीची व्याख्या करताना जसे म्हटले जाते की अपंग स्थिती ही त्या व्यक्तिबाबत दोषस्थिती किंवा अक्षम स्थितीतून उद्‌भवली आहे, जी स्थिती त्या व्यक्तिला तिच्या वय, लिंग, सामाजिक व सांस्कृतिक घटकांनुसार सामान्य वर्तन व त्याची भूमिका बजावण्यावर मर्यादा घालते.

**शारीरिक अक्षमता :**

ज्या व्यक्तिंना पंचेंद्रिय सोडून इतर शारीरिक मर्यादा आहेत किंवा आरोग्य समस्या आहेत ज्या समस्यांमुळे बालकांच्या शालेय उपस्थितीमध्ये किंवा अध्ययनामध्ये विशेष सेवांचा अंतर्भाव करावा लागेल, प्रशिक्षणाची गरज पडेल, विशिष्ट साधने, साहित्य लागेल किंवा सुविधा पुरवाव्या लागतील अशा व्यक्तिंना शारीरिक अक्षमता असणाऱ्या व्यक्ति म्हणतात.

### (१) अस्थि अक्षमता (Orthopaedic disability)

### अ. खुरटा पाय (Clut Foot)

मांडीचे हाड खुब्यात ज्या ठिकाणी पक्के बसलेले असते (ball and socket between the femoral head and acetabulum) त्या ठिकाणी व्यत्यय येऊन पायाच्या उंचीत फरक असणे म्हणजे खुरटा पाय. हा परिणाम जास्त करून स्त्रीयांपेक्षा पुरुषांमध्ये आढळतो, परंतु ही अनुवंशिक जनुकीय रचना नाही.

**विशेष गरजांचे वर्गीकरण**
**Classification of Special Needs**

- शारीरिक Physical
- बौध्दिक Intellectual
- अध्ययन अक्षमता Learning disabilities
- असामान्यत्व Gifted
- भावनिक Emotional

**शारीरिक अक्षमता**

**(१) अस्थि अक्षमता**
- (अ) खुरटा पाय (club foot)
- (ब) फाटलेला ओठ (cleft palate)
- (क) स्नायू विकृती (muscular dystrophy)

**(२) चेतासंस्था अक्षमता**
- (अ) प्रमस्तिष्क घात (Cerebral palsy)
- (ब) स्नायूताठरता (Spasticity)
- (क) अपस्मार (Epilepsy)
- (ड) पाठीच्या कण्यातील दोष (Spina bifida)
- (इ) हात पाय लुळे पडणे (Polio)

**(३) दृष्टी अक्षमता**
- (अ) अंधत्व (Blind)
- (ब) रंगांधत्व (Colour blindness)
- (क) रातांधळेपणे (Night blindness)

**(४) श्रवण अक्षमता**

कर्णबधीर – ऐकू न येणे (Hard of hearing) व अत्यल्प कर्णबधिरत्व (Varying degree of auditory disability)

### ब. फाटलेला ओठ (Cleft Palate)

जन्मत:च जबड्याच्या भागात आढळणारा दोष आहे. नाकाच्या तळापर्यंत वरचा ओठ फाटल्यासारखा असतो. गर्भ गर्भाशयात असताना ६ ते ८ आठवड्याच्या दरम्यान जबड्याचा वरचा भाग तयार होत असतो तेव्हा ओठाचा भाग जुळून येत नाही या न जुळलेल्या भागालाच 'फाटलेला' किंवा 'क्लेफ्ट' (Cleft) असे म्हणतात.

### क. स्नायू विकृती (Muscular Dystrophy)

स्नायूतंतूंचा ऱ्हास झाल्यामुळे स्नायूविकृती निर्माण होते. स्नायूविकृतीमध्ये स्नायू उती बारीक व अशक्त होणे ही स्थिती प्रामुख्याने दिसते.

#### वैशिष्ट्ये

- स्नायूविकृतीचा बौध्दिक कार्यावर कोणताही परिणाम होत नाही.
- पालक, भावंडे, शिक्षक आणि समवयस्क हे सर्व बालकाच्या स्नायूविकृतीला कोणत्या प्रकारे प्रतिक्रिया देतात यावर अशा व्यक्तिंचे सामाजिक आणि अंतर्गत संबंध कसे असतील हे अवलंबून असते.
- शारीरिक अक्षमता म्हणजे लज्जास्पद गोष्ट आहे असे समजून ते लपवण्यामध्येच शारीरिक अक्षम व्यक्तिची उर्जा खर्च होते. संशोधनातून असे सिध्द झाले आहे की शारीरिक अक्षम बालकांचा मौखिक बुध्यांक सरासरीपेक्षा कमी असतो.
- पालक व इतर कुटुंब सदस्य बालकांच्या शारीरिक अक्षमतेबद्दल एकमेकांना दोष देऊ शकतात, त्या बालकाला नाकारू शकतात किंवा बालकाला अतिसंरक्षण देण्याची शक्यता असते.
- शारीरिक अक्षमतेचे योग्य व्यवस्थापन करणे व योग्य ठिकाणी बालकांना मदत देणे यातून बालकांना त्यांची अक्षमता स्वीकारायला व सुसमायोजित आयुष्य जगण्यास शिकवले जाते.

### (२) चेतासंस्थाअक्षमता(Neurological Disability)

चेतासंस्था अक्षमता निर्माण होण्यामध्ये मध्यवर्ती मज्जासंस्थेला अपाय होणे किंवा ऱ्हास होणे ही सर्वसामान्य कारणे असतात. मध्यवर्ती मज्जासंस्थेमध्ये मेंदू व कणा हे दोन अवयव समाविष्ट असतात. अपाय होणे म्हणजेच बालकांच्या संवेदना नाहीशा होतात. हालचालींवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता नाहीशी होते आणि एखाद्या अवयवाची हालचाल किंवा जाणीव होणे याबाबत अक्षमता येते.

### अ. प्रमस्तिष्क घात (Cerebral Palsy)

मेंदूला अपाय झाल्याकारणाने व्यक्तिच्या कारक क्रियांमध्ये अडथळा निर्माण होणे किंवा कार्यात बिघाड होणे म्हणजे प्रमस्तिष्क घात होय. प्रमस्तिष्क घात हा जन्मत:च असणारा किंवा वाढत जाणारा असा कोणताही रोग नाही. उलट अयोग्य उपचारांमुळे या स्थितीमधील गुंतागुंत वाढत जाऊ शकते.

#### दृष्टीकोन

- बंधने कमी असणाऱ्या वर्गांमध्ये प्रमस्तिष्क घात असणाऱ्या बालकांना फायदा होतो.
- प्रमस्तिष्क घात असणाऱ्या बालकांसाठी त्यांचे समावेशन होऊ शकेल अशी रचना वर्गात असावी.
- विशेष शिक्षणतज्ञ, व्यावसायिक प्रशिक्षित व्यक्ति, उपचारतज्ञ आणि समुपदेशक यांचा गट शाळेमध्ये उपस्थित असायला हवा.

### ब. स्नायूताठरता (Spasticity)

स्नायूताठरता या स्थितीमध्ये सातत्याने स्नायू आखडतात. स्नायू आखडले गेल्यामुळे स्नायूंना कडकपणा किंवा घट्टपणा येतो आणि नेहमीच्या हालचालींमध्ये अडथळा निर्माण होतो, बोलण्यावर परिणाम होतो आणि चालण्याची ढब बदलते.

#### दृष्टीकोन

- स्नायूताठरतेची लक्षणे कमी करण्याचे प्रयत्न करणे.
- स्नायू आखडल्यामुळे होणाऱ्या वेदना व वेदनांची वारंवारिता कमी करणे.
- चालण्यामध्ये सुधारणा करणे, आरोग्यपूर्ण स्वच्छता राखणे, दैनंदिन जीवन जगण्याच्या कृतींची काळजी घेणे.

- वस्तूपर्यंत पोचणे, वस्तू उचलणे, वस्तू एका जागेवरून उचलणे व दुसऱ्या जागेवर ठेवणे यांसारख्या ऐच्छिक कारक क्रियांमध्ये सुधारणा करणे.

### क. अपस्मार (Epilepsy)

अपस्मार हा मेंदूचा विकार आहे. मेंदूतील चेतापेशींच्या कार्यात अडथळा येण्याने झटका (Seizure) येतो. अपस्मार अनुवंशिक विकार असू शकतो किंवा मेंदूवर आघात होणे, स्ट्रोक यामुळे मेंदूला इजा पोचणे यांमुळेही अपस्मार हा विकार जडू शकतो.

#### दृष्टीकोन

- अपस्माराचा झटका एखाद्या बालकाला आल्यास शांत राहून बालकाला आरामदायक स्थितीत ठेवावे.
- झटका येऊन गेल्यावर त्या बालकाला झोपण्यास परवानगी द्यावी.
- बालकाच्या पालकांना झटका आल्याची माहिती द्यावी.

### ड. स्पायना बिफिडा (Spina bifida)

स्पायना बिफिडा जन्माच्या वेळी दिसून येणारी विकृती आहे. प्रसूतीपूर्व काळात पाठीचा कणा नीट विकसित न झाल्यामुळे ही विकृती निर्माण होते. यामुळे निर्माण होणारे व्यंग डोक्यापासून पाठीच्या कण्याच्या शेवटच्या टोकापर्यंत कोठेही असू शकते. मूत्राशयावर नियंत्रण ठेवणाऱ्या कण्यातील शिरा नीट विकसित न झाल्याने बालकांना मूत्राशयात मूत्र धरून साठून ठेवणे व नंतर उत्सर्जन प्रक्रियेने रिकामे करणे यामध्ये अडथळा येतो.

### इ. हात – पाय लुळे होणे (Polio)

५ वर्षांच्या आतील बालकांच्या शरीरावर परिणाम करणारा विषाणूजन्य रोग आहे. पोलिओचा विषाणू पाठीचा कणा / मेंदू येथील चेताऊतींवर विपरित परिणाम करतो त्यामुळे पांगळेपणा (Crippling) येतो. हा विषाणू जास्त करून दूषित पाण्यातून पसरतो. पोलीओ बरा करण्यासाठी उपचार किंवा औषधे नाहीत परंतु होऊ नये यासाठी बचावात्मक उपाय म्हणून त्याचे डोस लसीकरण वेळापत्रकाप्रमाणे द्यायचे असतात. २०१४ साली भारत पोलीओमुक्त झाल्याची घोषणा जागतिक आरोग्य संघटनेने केली आहे.

#### दृष्टीकोन

- निदान लवकरात लवकर झाले पाहिजे.
- संपूर्ण विश्रांती, वेदना नियंत्रित करणे आणि पोषक आहार ही आधारात्मक उपाययोजना करणे.
- स्नायू नष्ट होण्यामुळे दिसून येणारी दीर्घकालिन लक्षणे शारीरिक उपचारांनी कमी करणे.

## (३) दृष्टी अक्षमता (Visual Disability)



**चित्र १०.१ दृष्टी दोष**

### अ. अंधत्व (Blind)

संपूर्ण दृष्टी जाणे. अगदी कमी दृष्टी असणे.

#### दृष्टीकोन

- दृष्टीदोष असणाऱ्या बालकांना दृष्टी असणारी बालके अभ्यासात मदत करू शकतात.
- आंतरवैयक्तिक आंतरक्रिया करण्यासाठी समावेशन करावे.
- नियमित समुपदेशन
- ब्रेल लिपी वाचनाचे प्रशिक्षण देणे किंवा टेप्स, रेकॉर्डींग्ज ऐकवून शिकवणे.

### ब. रंगांधत्व (Colour Blindness)

अनुवंशिकतेने प्राप्त होणारी स्थिती आहे. काही ठराविक रंगांमध्ये फरक करता न येणे किंवा ती क्षमता कमी असणे अशी स्थिती रंगांधत्वामध्ये असते. रंगांधत्वालाच दुसरे नाव रंग दृष्टी अभाव (Colour vision deficiency) असे आहे. स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये रंगांधत्व जास्त आढळते.

### क. रातांधळेपणा (Night blindness)

रातांधळेपणाला 'नायटॅलोपिया' असेही म्हणतात. मंद प्रकाशात किंवा रात्री दिसण्याची अक्षमता म्हणजेच रातांधळेपणा होय.

#### दृष्टीकोन

- जीवनसत्व 'अ'युक्त आहार देणे.

### (४) श्रवण अक्षमता (Auditory disability)

श्रवणाचे संवेदन, संप्रेषण आणि भाषेचा उपयोग या दोन्हीचा अभेद्य भाग असते. श्रवण संवेदनामुळे व्यक्ति माहिती ऐकू शकते आणि त्याला प्रत्युत्तर करू शकते.

ठराविक तीव्रतेचा किंवा त्यापेक्षा वरचा आवाज ज्या बालकांना ऐकू येत नाही त्या बालकांमध्ये श्रवणदोष आहे असे मानले जाते. श्रवणसंवेदन डेसिबल (dB) या एककाने मोजतात.

श्रवणदोषाच्या ५ श्रेणी आहेत. कमीत कमी (अत्यल्प), सौम्य, मध्यम, तीव्र, आणि पूर्णत: दोष.

#### दृष्टीकोन

- श्रवणयंत्र (hearing aid) वापरणे.
- वर्गामध्ये श्रवणदोष असणाऱ्या बालकांना पुढच्या बाकावर बसवणे.
- ओष्ठ वाचन करायला शिकवणे (lip reading)
- नियमित समुपदेशन



**चित्र १०.२ श्रवणदोष**

**बौद्धिक अक्षमता (Intellectual disability)**

**बौद्धिक अक्षमता (Intellectual disability)**

(१) **अत्यल्प अक्षमता (Borderling disability)** ७० ते ७९ इतका बुध्यांक

(२) **सौम्य अक्षमता (Mild disability)** ५० ते ६९ इतका बुध्यांक

(३) **मध्यम अक्षमता (Moderate disability)** ३६ ते ४९ इतका बुध्यांक

(४) **तीव्र अक्षमता (Severe disability)** २५ ते ३५ इतका बुध्यांक

(५) **पूर्णत: अक्षमता (Profound disability)** २० पेक्षा कमी बुध्यांक

जन्माच्या वेळी किंवा अर्भकावस्थेत लक्षणीयरित्या बौद्धिक कार्यात सरासरीपेक्षा कमी पातळी आढळते तेव्हा त्याला बौद्धिक अक्षमता असे संबोधले जाते. बौद्धिक अक्षमतेमुळे नेहमीच्या क्रिया /कृती किंवा दैनंदिन जीवनातील क्रिया / कृती करण्यामध्ये मर्यादा येतात.

वेश्लर (१९५८) यांच्या मते बुद्धीमत्ता ही व्यक्तिची सर्वसामान्य व जागतिक पातळीवरची क्षमता आहे. या क्षमतेच्या आधारे व्यक्ति सहेतूक कृती / क्रिया करते, तर्कसुसंगत विचार करते आणि वातावरणाबरोबर परिणामकारकपणे समायोजित होते / आंतरक्रिया करते.

$$IQ = \frac{MA}{CA} \times 100$$

$$\text{बुध्यांक} = \frac{\text{मानसिक वय}}{\text{शारीरिक वय}} \times १००$$

Key

IQ – Intelligence Quotient – बुध्यांक

MA – Mental Age – मानसिक वय

CA – Chronological Age – शारीरिक वय

**अध्ययन अक्षमता (Learning disability)**

इंडिव्हिज्यूअल विथ डिसॲबिलिटीज् एज्यूकेशन ॲक्ट (IDEA) १९९० नुसार अध्ययन अक्षमता ही अशी मानसिक विकृती आहे ज्यामध्ये एक किंवा त्यापेक्षा जास्त मानसिक प्रक्रिया समाविष्ट आहेत. या मानसिक प्रक्रिया म्हणजेच मौखिक किंवा लेखी भाषा वापर किंवा त्याचे आकलन कमी पडते त्यामुळे श्रवण, विचार, बोलणे, वाचणे, लिहिणे, स्पेलिंग करणे किंवा गणिती आकडेमोड करणे या क्षमतांच्या अविष्कारात अक्षमता दिसते.

एकूण चार प्रकारच्या अध्ययन अक्षमता दिसूत येतात.

### १. वाचन अक्षमता (Dyslexia)

योग्य सूचना मिळून, पुरेशी बुद्धीमत्ता असूनही आमि सामाजिक सांस्कृतिक संधी मिळूनही वाचायला शिकण्यामध्ये अडथळे येतात तीच वाचन अक्षमता आहे.

**वैशिष्ट्ये**

- ज्या उताऱ्याचे वाचन करतात त्याचे आकलन होण्यामध्ये कठिण जाते.
- दिशेचे भान नसते. उदा. डावी, उजवी यामध्ये गोंधळ होतो.
- शब्दातील अक्षरांचा क्रम आठवता येत नाही.

- आकृती आणि पृष्ठभाग यातील भेद समजत नाही.
- अतिक्रियाशील, लहरी, चित्त विचलीत होणारे आणि अल्प अवधान कक्षा असणारी बालके असतात.

### दृष्टीकोन

- अत्यंत सखोलतेने हस्तक्षेपाची (Intervention) गरज असते.
- मित्र - प्रणाली, समवयस्कांकडून शिकणे सोपे जाते.
- विशिष्ट शैक्षणिक साधनांचा वापर आवश्यक - स्पेल चेक लेखन सुधारण्यासाठी
- विद्यार्थी व पालक यांना समुपदेशन करणे.

## २. लेखन अक्षमता (Dysgraphia)

लेखन हे संप्रेषणातील अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. परंतु लेखन सर्वात शेवटी शिकले जाते. लेखी प्रगटीकरणातील अक्षमता म्हणजेच लेखन अक्षमता होय.

### वैशिष्ट्ये

- काही अक्षरे / अंक लिहायचे लक्षात रहात नाही.
- इंग्रजीमध्ये मोठी अक्षरे (Capital) व लहान अक्षरे (Lower case) यातील फरक करता येत नाही.
- खोडणे किंवा एकावर एक लिहिण्याची सवय असते.
- लिहिताना रेघेचा पाया कायम ठेवणे जमत नाही. शब्द लिहिताना एकाच अक्षराची पुनरावृत्ती केली जाते.

### दृष्टीकोन

- सखोल हस्तक्षेप आवश्यक
- बालकाचे मूल्यमापन तोंडी घ्यावे.
- पालक, शिक्षक यांना समुपदेशन करावे.

## ३. गणन अक्षमता (Dyscalculia)

मेंदूच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील पेशींचा ऱ्हास झाल्याने प्रामुख्याने गणन अक्षमता दिसते. गणन अक्षमता हा विकार रचनेतील आहे आणि अनुवंशिकही आहे.

### वैशिष्ट्ये

- श्रवणक्षमतेचा अभाव
- गणिती संकल्पनांचा अर्थ लावणे अवघड
- मन एकाग्र करणे अवघड जाते कारण एका जागी लक्ष केंद्रित करण्यामध्ये अडथळे असतात.
- संवेदनात चुका होतात.
- डावे - उजवे यात गोंधळ होतो.

**उदा.**

```
  २६   ✓        २ ६   ✗
+ ४           + ४
-----         ------
  ३०           २१०
```

### दृष्टीकोन

- गणितासाठी अधिक तयारी करून घ्यायला हवी.
- समोरा - समोर एकट्या विद्यार्थ्याबरोबर किंवा एक शिक्षक आणि अक्षम विद्यार्थी असे अध्यापन हवे.
- विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्यासाठी बोर्ड पातळीवरील परीक्षेत गणित विषयात सूट मिळवणे.
- पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांना समुपदेशन करणे.

## ४. कारक अक्षमता (Dyspraxia)

ज्या कारक कृती व हालचालींसाठी समन्वयाची आवश्यकता असते अशा हालचालींवर नियंत्रण ठेवणारा मेंदूतील भाग अविकसित राहणे आणि त्यामुळे हालचालीही डौलदार नसणे हे कारक अक्षमता या विकारात दिसते. पालक निरोगी असेल तरीही ही समस्या आढळते. कारक अक्षमता ही चेतासंस्थेचा विकार आहे.

### वैशिष्ट्ये

- बालकांना नेहमी भाषेच्या समस्या असतात.
- विचार व संवेदन यांची सांगड घालणे अवघड जाते.
- शरीराचा तोल आणि ठेवण यात ताळमेळ नसतो त्यामुळे हालचालीत डौल नसतो.
- हस्त - नेत्र असमन्वय असतो.

### दृष्टीकोन

- व्यवसाय उपचारपध्दती (Occupational therapy) याचा उपयोग शाळा व घर दोन्ही ठिकाणी दैंनदिन कार्यात होतो.
- संवाद / संप्रेषण परिणामकारक होण्यासाठी बोलणे व भाषा यासाठी उपचारपद्धतींचा अवलंब
- संवेदी - कारक, प्रशिक्षण, बालकांची भाषा सुधारणे, डोळ्यांच्या हालचाली व श्रवणकौशल्य सुधारणे.
- पालक व बालक यांना समुपदेशन करणे.

### असामान्यत्व (Gifted)

बौध्दिक, सर्जनशील काम, नेतृत्व गुण कलांमध्ये पारंगत विशिष्ट शिक्षण क्षेत्राची क्षमता असणे आणि शिक्षणातील नेहमीच्या सुविधांपेक्षा वेगळ्या सुविधांची व सेवांची गरज भासणे म्हणजेच असलेल्या क्षमतांना खतपाणी मिळेल अशी सर्व बालके असामान्यत्व या वर्गात येतात.

### वैशिष्ट्ये

- असामान्य बालके खूप वाचन करतात. झपाट्याने वाचतात, सखोल वाचतात आणि त्यांच्याकडे खूप शब्दसंपत्ती असते.
- खूप लवकरच्या वयात ते स्वतंत्रपणे काम करू शकतात आणि कामावर जास्त वेळ लक्ष केंद्रित करू शकतात.
- त्यांच्याकडे कामासाठी प्रचंड उर्जा असते. खूपदा त्याचे निदान अतिक्रियाशील असे चुकीचे होऊ शकते.
- ही बालके समवयस्क गटापेक्षा त्यांच्यापेक्षा मोठी बालके किंवा प्रौढ यांच्या सहवासाला प्राधान्य देतात.
- अध्ययनामध्ये खूप प्रेरणा असते, नविन मार्ग शोधतात आणि वापरून बघतात.
- कोणतेही काम आणि समस्या अतिशय सुसंघटीत पद्धतीने ध्येय प्रेरणेने व अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडतात.
- बौध्दिक कामात कायम रस दाखवतात.
- एखादे कारण व त्याचा परिणाम हा सहसंबंध लगेच जाणतात.
- सौंदर्य आणि सुंदर कलाकृती याबाबत संवेदनशील असतात.
- लवचिक, ओघवते आणि स्वत:चे विचार मांडू शकणारे असतात.

### भावनिक विकार (Emotionally disturbed)

यासाठी भावनिक दोषस्थिती हा शब्दही वापरतात. भावनिक विकार या संज्ञेमध्ये अनेक मानसिक व भावनिक आरोग्य समस्या समाविष्ट होतात. चिंता विकार, खाण्याचे विकार हाही त्याचाच भाग आहे.

### वैशिष्ट्ये

- अस्वस्थ
- भीती
- चलबिचल
- श्वासाची गती जास्त असणे
- झोपेच्या समस्या

### दृष्टीकोन

- समुपदेशन
- कॉगनीटीव्ह बिहेवियर थेरपी (CBT)

**विकासावर व्यापक परिणाम करणारी विसंगती (पर्व्हेसिव्ह डेव्हलपमेंट डिसऑर्डर PDD)** हा विसंगतीचा एक संच / गट आहे. या विसंगती बाल्यावस्थेत आढळतात. यांमध्ये विविध क्षेत्रांचे गंभीर दोष दिसून येतात.

### स्वमग्नता (Autism)

स्वमग्न बालकांना संवाद साधणे जमत नाही हाच मोठा दोष असतो, सामाजिक आंतरक्रियांमधील कौशल्य व देवाण - घेवाण अवघड असते, त्यांच्यामध्ये वर्तनाचा ठराविक व साचेबंद नमुना दिसतो, त्यांच्या आवडी व कृतीसुद्धा ठराविकच असतात.

### वैशिष्ट्ये

- सभोवतालच्या लोकांच्या डोळाला डोळा देऊ शकत नाहीत.
- कृतींची पुनरावृत्ती करतात. शब्दांचा उच्चार, मागे - पुढे डोलत राहणे, हाताची बोटे वर खाली करणे, हात दंडापासून गोल फिरवणे.
- लोकांचे बोलणे ऐकत नाहीत.
- रोबोटसारखे खर्जातल्या आवाजात बोलतात किंवा गाणे गायल्यासारखे बोलतात.
- दैनंदिन दिनक्रमात बदल झाल्यास स्वीकारत नाहीत.
- आवाज, स्पर्श आणि वास याबाबत अतिसंवेदनशील असतात.

### दृष्टीकोन

- लवकरच्या वयातील हस्तक्षेप यांमुळे बालकाच्या विकासात लक्षणीय प्रगती दिसते.

**दर्पण**

विशेष गरजांची सर्व क्षेत्रे अभ्यासल्यावर तुम्ही स्वत:ला प्रश्न विचारा - शिक्षणाचे प्राथमिक ध्येय काय आहे किंवा कोणते असावे? तुम्ही तुमचे मत लिहून ठेवा व प्रत्येकवेळी अभ्यासलेल्या प्रकरणांचे पुन:पुन्हा वाचन करा.



चित्र १०.३ सर्वसमावेशन

बालकांबरोबर काम करणारे खूपसे व्यावसायिक विशेष गरजा असणाऱ्या सर्वत्र बालकांना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना एकात्मिक करणे आणि त्यांचे समावेशन करणे यावर भर देण्यास सांगतात.

### सर्वसमावेशन म्हणजे काय? (What is Inclusion?)

बुई, क्वर्क, अल्माझॅन आणि व्हॅलेंटी (२०१०) यांनी सांगीतले आहे, जेव्हा कोणत्याही क्षेत्रातील अक्षम विद्यार्थी सुयोग्य वयानुसार सर्वसामान्य शिक्षणप्रवाहानुसार त्या त्या वर्गात घातले जातील आणि त्यांच्या वर्गातील इतर बालकांप्रमाणेच उच्च दर्जाचे अध्यापन, हस्तक्षेप – मध्यस्थी (Intervention) आणि आधार त्यांना मिळेल व अभ्यासक्रमातील यश प्राप्त होईल अशा सर्वांचा समावेशनात सहभाग असतो.

### थोडक्यात

- समावेशन ही संधी नसून हक्क आहे.
- समावेशन म्हणजेच असलेल्या वर्गातच सोयीसुविधा उपलब्ध करून देणे. गटाबाहेर ठेवून कोणत्याही सुविधा नकोत.
- समावेशन म्हणजे इतरांकडून स्वीकृती मिळणे व आपलेपणा वाटणे.
- सामाजिक गटाचा क्रियाशील सदस्य असण्याचा हक्क असणे म्हणजे समावेशन.
- समावेशनामध्ये प्रत्येकाची व्यक्तिविशिष्टता लक्षात घेतली जाते. उदा. बालकाची सर्व दुर्बलता आणि बलस्थाने.
- त्यांच्यासाठी सर्वंकष, सर्वसमावेशक नियोजन केले जाते त्याचा उपयोग बालकांमध्ये वैकासिक बदलासाठी आणि सामाजिक वर्तन बदलासाठी होतो.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अक्षम बालकांचा शिक्षणात समावेश करण्याच्या मुद्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

१९९५ मध्ये सुधारित कलमानुसार प्रत्येक बालकाला वय वर्ष १८ पर्यंत मोफत शिक्षण व सुयोग्य वातावरणातील शिक्षण मिळावे असे विधान लिहिले गेले.

२०१६ मधील राईट्स ऑफ पर्सन्स विथ डिसॲबिलिटी बील याने १९९५ च्या कायद्यात पर्यायी जागा घेतली त्या बीलानुसार योग्य सरकार या गोष्टीला जबाबदार राहील की ते अक्षम व्यक्तिंसाठी योग्य त्या उपचारांनी खात्री देतील ज्यामुळे अक्षम व्यक्तिसुद्धा इतरांबरोबर समानतेने त्यांच्या हक्कांचा आनंद घेऊ शकतील.

**तुम्हाला माहित आहे का?**

द नॅशनल सेंटर ऑन डिसॲबिलिटी ॲक्ट जर्नेलिझम (NCDJ) २०१८, अरिझोना स्टेट युनिव्हर्सिटी यांनी अक्षमता (डिसॲबिलिटी) यासंबंधी वापरण्याच्या संज्ञांसाठी मार्गदर्शनपर सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही मानहानीकारक शब्दांचा वापर न करता स्वीकारल्या जाणाऱ्या संज्ञा असाव्यात. उदा. मेंटल रीटार्डेशन याजागी आता इंटलेक्च्यूअली डिसेबल्ड (बौध्दिक अक्षमता) ही संज्ञा वापरली जाते.

**शब्दसूची *Glossary***

**डेसिबल (Decibel) :** आवाजाची तीव्रता मोजण्याचे एकक

**अपस्मार (Epilepsy) :** मेंदूतील अपसामान्य हालचालींमुळे येणारी फीट, म्हणून हा मध्यवर्ती मज्जासंस्थेचा विकार आहे.

**चेतासंस्थेचे अपंगत्व (Neurological handicap) :** मज्जासंस्थेचा विकार.

## मुद्द्यांची उजळणी करा.

### विशेष गरजांचे वर्गीकरण

- **शारीरिक**
  - अस्थि अक्षमता
  - चेतासंस्था
  - दृष्टी
  - श्रवण
- **बौद्धिक**
  - अत्यल्प अक्षमता
  - सौम्य अक्षमता
  - मध्यम अक्षमता
  - तीव्र अक्षमता
  - पूर्णपणे अक्षमता
- **अध्ययन अक्षमता**
  - वाचन अक्षमता
  - लेखन अक्षमता
  - गणन अक्षमता
  - कारक अक्षमता
- **असामान्यत्व**
- **भावनिक अस्थिरता**
  - चिंता विकार
  - खाण्याच्या सवयींमधील विकार

## स्वाध्याय

**प्र. १ दिलेल्या पर्यायातून सर्वात योग्य पर्याय निवडा.**

१) स्नायू ऊती बारीक होणे म्हणजे ............ .

अ) स्पायना बिफिडा ब) स्नायू विकृती
क) स्नायूताठरता

२) सर्वसमावेशन म्हणजेच .......... .

अ) मर्यादा ब) समानता
क) भेदभाव

३) बालकांमध्ये जन्मत:च सापडणारे व्यंग ........... हे असते.

अ) फाटलेला ओठ
ब) स्नायू बारीक होऊन नष्ट होणे
क) खुरटे पाय

४) गणन अक्षमता म्हणजेच .................

अ) डिसग्राफीया ब) डिसप्रॅक्सिया
क) डिसकॅलक्यूलिया

**प्र. २ संज्ञांच्या व्याख्या लिहा.**

१) दोषस्थिती

२) अक्षम स्थिती

३) अपंग स्थिती

४) वाचन अक्षमता

५) सर्वसमावेशन

६) स्वमग्नता

**प्र. ३ पुढील अक्षमतांच्या प्रकारांची यादी लिहा.**

१) अस्थि अक्षमता

२) भावनिक विकार

३) चेतासंस्था अक्षमता

४) बौध्दिक अक्षमता

५) श्रवण अक्षमता

**प्र. ४ टीपा लिहा.**

१) सर्वसमावेशन

२) लेखन अक्षमता व त्याची वैशिष्ट्ये

३) भावनिक विकार

**प्र. ५ सविस्तर लिहा.**

१) दोषस्थिती, अक्षम स्थिती, अपंग स्थिती या तिन्हीचे स्पष्टीकरण उदाहरणांसहित लिहून त्यातील फरक लिहा?

२) बौध्दिक अक्षमता याचे स्पष्टीकरण लिहा?

### प्रकल्प / स्वयंअध्ययन

- सर्वसमावेशन असणाऱ्या शाळेला भेट द्या व त्यावर भेटीचा अहवाल तयार करा.
- १० वर्ष ते १३ वर्ष वयोगटातील अध्ययन अक्षम बालकाची मुलाखत घ्या. कोणत्या क्षेत्रातील अध्ययन अक्षमता आहे ते शोधून काढा व त्या बालकासाठी, त्याच्या स्थितीत बदल घडवण्यासाठी अभ्यासक्रमात बदल करण्यासाठी कोणते मार्ग अवलंबावे ते सुचवा.
- विशेष गरजा असणाऱ्या बालकांची चित्रे जमवून विशेष गरजांचे वर्गीकरण दर्शवणारा तक्ता तयार करा.

❖ ❖ ❖

# ११ बालकांसाठी केंद्रे



**तुमचे निरीक्षण लिहा.**

- तुम्ही कधी अर्भक किंवा शिशुला सकाळी पाळणाघर किंवा बालसंगोपन केंद्रात जाताना पाहिले आहे का?
- त्यांच्या चेहऱ्यावर कोणते भाव असतात किंवा त्यांचे त्यावेळी हातवारे कसे असतात?
- त्यांच्या प्रतिक्रिया कशा असतात?

आजच्या काळात आपल्याला आपल्या अवती भोवती काम करणाऱ्या भरपूर स्त्रिया आढळतात. त्यामुळे बालकांकडे लक्ष देण्याची आणि त्यांची काळजी घेण्याची गरज वाढली आहे. आता हे दृश्य फक्त शहरांपुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातही दिसून येते.

**कृती**

- आजच्या घडीला शहरांमधून कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या स्त्रिया करत आहेत आणि किती तास त्या स्त्रिया कामासाठी घराबाहेर घालवतात त्याची यादी करा.
- आजच्या घडीला ग्रामीण भागातून कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या स्त्रिया करत आहेत आणि किती तास त्या स्त्रिया कामासाठी घराबाहेर घालवतात त्याची यादी करा.

## १.१. बालसंगोपन आणि बालशिक्षण याचा इतिहास (History of Child rearing and Child education)

जुन्या काळात नेमके काय घडले आणि त्याबरोबरीने प्रगती कशी होत गेली हे आपल्याला इतिहासामुळे कळते. या पृथ्वीवर जे जे निर्माण झालेले आहे त्या प्रत्येक गोष्टीमागे इतिहास असतो, हीच गोष्ट बालविकास, बालसंगोपन आणि बालशिक्षण या क्षेत्रांशी निगडीत आहे. इतिहास माहित करून घेणे आणि आपण सध्याच्या घडीला कोठे आहोत हे जाणून घेणे मनोरंजक ठरेल.

बालविकास, बालसंगोपन आणि बालशिक्षण या विषयाचा जागतिक पातळीवर घेतलेला आढावा लक्षात घेता हे तीनही विषय एकत्रित गृहीत धरले जातात.

- गेल्या अनेक शतकात बाल्यावस्थेच्या काळाचा वेगळा विचार केला जात नव्हता. ११ ते १६ या शतकामध्ये बालके म्हणजे मानवाची प्रतिकृती आहे असे मानले जात होते. उदा. बालकांचे कपडे मोठ्या माणसांप्रमाणे असायचे. बालकांचे लहानपण असते अशा संकल्पना विचारातही नसायच्या.
- मध्ययुगीन बालकांकडून गुराढोरांना किंवा शेतावरील प्राण्यांना चारा घालणे, घरातील भांडी घासणे किंवा लहान भावंडांची दिवसभर काळजी घेणे याची अपेक्षा असायची. बालकांची खेळणी कुटुंबाने हातानेच बनवलेली असायची. ही खेळणी म्हणजे बाहुल्या, भोवरे, ठोकळे अशी असायची.
- मध्ययुगीन बालकांना कुटुंबाकडून किंवा समाजाकडून महत्त्व दिले जात नव्हते. बालकांच्या आयुष्याचे अर्भकावस्था, शैशवावस्था असे भाग पाडलेले नव्हते.
- शाळा सुटल्यानंतर पालक आपल्या बालकांना बाहेर खेळण्यासाठी सोडत होते. खेळताना बालकांवर कोणाचीही देखरेख नसायची. सर्व बालके स्वतःच्या मोठ्या भावंडांबरोबर किंवा इतर मोठ्या बालकांबरोबर खेळत असत. या खेळण्यामध्ये पळणे, उड्या मारणे, दोरीवरच्या उड्या मारणे, झाडावर चढणे, तोल सांभाळण्याचे खेळ खेळणे, आणि इतरही बरेच खेळ यांचा समावेश होता.

- मध्ययुगीन काळात वात्सल्य या भावनेचा मोठ्या प्रमाणावर अभाव होता. याला आधारभूत काही उदाहरणे म्हणजे सर्रासपणे गर्भपात करणे, अर्भक मृत्युदर जास्त, बालमजुरी, अति कडक शिस्त. याचप्रमाणे गाणी म्हणणे, नृत्य करणे, शिकार करणे, मासे पकडणे या गोष्टी आवडीने केल्या जात असत.

**तुमचे मत लिहा.**

आत्ताच्या घडीला आधुनिक युगात बालके कसे राहणीमान जगत आहेत?

बालविकासाच्या इतिहासानुसार बालशिक्षणाचा इतिहास मनोरंजक आहे. बालशिक्षणात बदल घडत असतानाच हळू हळू बालकांकडे बघण्याचा दृष्टीकोनही बदलत गेला. खूप तत्त्ववेत्ते आणि शिक्षणतज्ञ यांना बालकांबद्दल आस होती. त्यांनी अभ्यास करून त्यांची मते जगासमोर मांडून त्यांचे योगदान दिले आहे.

- पहिली अशी व्यक्ती जी बालशिक्षणाच्या क्षेत्रामध्ये प्रथम स्थापक मानली जाते, त्यांचे नाव जॉन कोमिनस. त्यांनी बालशिक्षणाकडे बघण्याचा शास्त्रीय दृष्टीकोन दिला.
- बालकांचे वर्गीकरण त्यांनी त्यांच्या वैयक्तिक फरकांनुसार केले.
- मातांनी खूप सुरुवातीपासून बालकांकडे विशेष लक्ष देऊन त्यांना इंद्रिय शिक्षण द्यावे या मताचे ते होते.
- शालेय कामकाजाचे तास कमी असावेत.
- सकारात्मक शिस्तीला प्रोत्साहन द्यावे.
- शालेय काम आणि जीवन यांचा एकमेकांशी जवळचा संबंध असावा.




**जॉन कोमिनस** युरोपियन शिक्षणतज्ञ (१५९२ – १६७०) आधुनिक शिक्षणातील पितामह.

बालशिक्षणाचा सर्व इतिहास जॉन कोमिनस यांच्यापासून सुरू झाला आणि त्यानंतर अनेक पाश्चिमात्य आणि पौर्वात्य तत्त्ववेत्त्यांनी बालके आणि बालशिक्षण याविषयी स्वत:ची मते व विचार मांडले.

**पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांचे शिक्षणविचार (EDUCATIONAL THOUGHTS BY WESTERN PHILOSOPHERS)**

| अनु. क्र. | तत्त्ववेत्त्यांचे नाव | शिक्षणविचार |
|---|---|---|
| १. | **रुसो** फ्रेंच तत्त्ववेत्ता  (१७१२–१७७८) | • 'एमिल' हे प्रसिद्ध पुस्तक लिहिले.<br>• देव सर्व गोष्टी बनवतो यावर दृढ विश्वास होता.<br>• मानव शिक्षणाने संस्कारित होतो.<br>• इंद्रिय शिक्षण सर्वात महत्त्वाचे.<br>• खेळाद्वारे शिक्षण या पद्धतीचा उपयोग बालशिक्षणात व्हावा.<br>• विज्ञान शिकवण्यासाठी नसून बालकांनी ते 'शोध घेऊन' शिकावे.<br>• शिक्षकांनी बालकांचा सखोल अभ्यास करावा.<br>• प्रत्येक गोष्ट करून बघावी आणि अध्ययन करावे हे महत्त्वाचे. |

| | | |
|---|---|---|
| २. | **जॉन पेस्टॉलॉझी**<br>स्वीस शिक्षणतज्ञ<br><br>(१७४६-१८२७) | • शिक्षण म्हणजे माणसाच्या अंगी असणाऱ्या सर्व शक्ती आणि क्षमतांचा नैसर्गिक, प्रगतीशील आणि लयबद्ध विकास.<br>• बालकांचा सखोल अभ्यास करून त्यानुसार योग्य अध्यापन पद्धतींचा अवलंब करावा.<br>• इंद्रिय संवेदन महत्त्वाचे आहे.<br>• निसर्ग सर्वात उत्तम शिक्षक आहे.<br>• बालकांना स्वयंनियंत्रणासाठी मार्गदर्शन करा.<br>• बालकांना प्रेम व वात्सल्य द्या. |
| ३. | **जॉन फ्रेडरिक हर्बार्ट** (पेस्टॉलॉझी यांचे अनुयायी) जर्मन शिक्षणतज्ञ<br><br>(१७७६-१८४१) | • बालकांच्या मनातील विशिष्ट व लक्षात येण्यासारख्या कल्पनांशी मिळते जुळते शिक्षण असावे.<br>• बालकांना सुचणाऱ्या नवीन कल्पना टिकवण्यासाठी शिक्षकांनी मदत करावी.<br>• बालकाचे मन शिक्षकाला जाणता आले पाहिजे.<br>• अध्यापनातील औपचारिक पायऱ्या सांगणारा प्रणेता<br>➢ तयारी<br>➢ सादरीकरण<br>➢ उपयोजन<br>• शिक्षणाचे प्रमुख कार्य सदाचरण हेच असावे. |
| ४. | **फ्रेडरिक फ्रोबेल** (पेस्टॉलॉझी यांचे अनुयायी) जर्मन शिक्षणतज्ञ<br><br>(१७८२-१८५२) | • बालकांसाठी खेळण्याच्या वस्तूंचा शोध लावला त्याला बक्षिस (गिफ्ट) असे म्हटले.<br>• १८४० मध्ये किंडरगार्टन नावाची शाळा सुरू केली.<br>• बाल्यावस्थेमध्ये बालकाची स्वतःची सृजनशीलता असते.<br>• बालकाचा आतला आत्मा आणि बालकाला शिक्षणातून मिळणारे अनुभव यांचा ताळमेळ असावा.<br>• बालकाच्या उत्स्फुर्त विकासासाठी खेळ आवश्यक आहे.<br>• गाणी, हालचाली, रचना यांच्यात संबंध आहे या तिन्हीच्या समन्वयातून हावभाव आकाराला येतात. |
| ५. | **हर्बार्ट स्पेन्सर** इंग्लिश शिक्षणतज्ञ<br><br>(१८२०-१९०३) | • परिपूर्ण आयुष्य जगण्यास शिकवणे हा शिक्षणाचा प्रमुख हेतू असावा<br>• शिक्षणातील महत्त्वाची अनुभव वचने सांगितली<br>➢ सोप्याकडून अवघडकडे<br>➢ ओळखीकडून अनोळखीकडे<br>➢ मुर्ताकडून अमूर्ताकडे |


| | | |
|---|---|---|
| ६. | **जॉन ड्युई** अमेरिकन शिक्षणतज्ञ<br><br>(१८५७-१९५०) | • शिक्षणामध्ये प्रगतीवाद आणि प्रयोगवाद ही तत्वे असावीत.<br>• शिकागो येथे प्रयोगशाळा म्हणून पूर्वप्राथमिक शाळा चालवल्या.<br>• प्रत्येकाकडे वैयक्तिक क्षमता असतात ज्याद्वारे ते स्वतः भोवतीचे वातावरण नियंत्रणात ठेऊ शकतात.<br>• वाढीच्या प्रक्रियेत शिक्षणाची मदत होते.<br>• शाळेमधील कृती अत्यंत सोप्या व सरळ असाव्यात ज्यामुळे वाढ व विकासाला मदत होईल.<br>• शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे.<br>• शाळेच्या अभ्यासक्रमात सामाजिक आयुष्य प्रतिबिंबित व्हावे.<br>• कृतियुक्त शिक्षण हे पायाभूत तत्त्व असावे.<br>• सामाजिक शिस्त लावावी.<br>• शिक्षकाने योग्य वातावरण पुरवावे.<br>• वास्तववादी विचार विकसित करावेत.<br>• बालकांच्या आवडीचा विचार करावा. |
| ७. | **मारिया माँटेसरी**<br>इटालियन डॉक्टर शिक्षणतज्ञ तत्त्ववेत्त्या<br><br>(१८७०-१९५२) | • प्रयोगवाद आणि प्रगतीवाद याचा शिक्षणात वापर केला.<br>• माँटेसरी शिक्षण पद्धतीच्या प्रणेत्या.<br>• मानसिकदृष्ट्या दुर्बल बालकांसाठी खूप काम केले.<br>• रंग, वास, चव, आवाज शिकवण्यासाठी त्यांनी साहित्य तयार केले. उंची, लांबी, जाडी शिकवण्यासाठी विटा तयार केल्या.<br>• इंद्रिय शिक्षणाला खूप महत्त्व दिले.<br>• शिक्षकाने बालकाला प्रेम आणि मुक्तता द्यायला हवी.<br>• शिस्तीचा बडगा दाखवून, भीती दाखवून बालकाचे व्यक्तिमत्त्व खुजे करू नये.<br>• वस्तू स्वरुपात बक्षीस किंवा शिक्षा देऊ नये.<br>• स्वयंअध्ययनावर भर.<br>• सूक्ष्म कारक कौशल्यांवर भर.<br>• शालापूर्व बालकांना परीकथा सांगू नयेत. |
| ८. | **अर्नोल्ड जिसेल**<br>अमेरिकन<br>बालमानसशास्त्रज्ञ<br><br>(१८७८-१९५८) | • पूर्वप्राथमिक शिक्षणातील खूप संशोधने केली.<br>• प्रौढ वयात दिसून येणाऱ्या काही मानसिक आजारांची मुळे बाल्यावस्थेत असतात असा निष्कर्ष काढला.<br>• सुरुवातीच्या वर्षात योग्य शिक्षण दिले गेले तर हे मानसिक आजार टाळता येतात. |

| | | |
|---|---|---|
| ९. | **जे. बी. वॉटसन**<br>अमेरिकन मानसशास्त्रज्ञ<br><br>(१८८०-१९६१) | • अध्ययनाबाबत प्रयोग केले.<br>• प्रयोगातून दोन तत्त्वांचा निष्कर्ष काढला.<br>➢ सरावाचे तत्त्व<br>➢ अगदी नव्याने शिकून लक्षात ठेवलेल्या गोष्टी हे तत्त्व<br>• या तत्त्वांनुसार या दोन तत्त्वांच्या पुनरावृत्तीमुळे यशप्राप्ती होते. |
| १०. | **जाँ पियाजे**<br>स्वीस मानसशास्त्रज्ञ<br><br>(१८९६-१९८०) | • बालकांच्या विचारक्षमतेबाबत क्रांतिकारी विचार मांडले.<br>• बालक निरनिराळ्या वैकासिक अवस्थांमधून जात असते.<br>➢ शोधवृत्ती<br>➢ सराव<br>➢ प्रेरणा<br>➢ स्मरण<br>➢ ज्ञान गोळा करणे आणि नवीन ज्ञानाला मध्यवर्ती मज्जासंस्थेत जागा करणे.<br>• बालकांना प्रशिक्षण द्यायला खूप महाग वस्तूंची गरज नाही.<br>• सुसुत्र आणि सुनियोजित अध्ययन अनुभवांची गरज बालकांना असते. |

## पौर्वात्य तत्ववेत्त्यांचे शिक्षणविचार (EDUCATIONAL THOUGHTS BY ESTERN PHILOSOPHERS)

### भारतीय तत्ववेत्ते (INDIAN PHILOSOPHERS)

| अनु क्र. | तत्ववेत्त्यांचे नाव | शिक्षणविचार |
|---|---|---|
| १. | **स्वामी दयानंद (आर्य**<br>समाजाचे आद्यप्रवर्तक)<br><br>(१८२४-१८८३) | • ज्ञान प्राप्त केलेच पाहिजे.<br>• प्रेम व विश्वास ही मुल्ये रुजवावीत.<br>• शारीरिक विकास महत्त्वाचा आहे.<br>• 'गुरु' म्हणजेच शिक्षक हा बालकांचा दुसरा पालकच असतो. |

| | | |
|---|---|---|
| २. | **गुरु रवीन्द्रनाथ टागोर**  (१८६१-१९४१) | • निसर्गाच्या सान्निध्यातच शिक्षण चांगले होते.<br>• बालकाच्या जागृत बुद्धिपेक्षा त्याची नकळत असणारी बुद्धिमत्ता अधिक प्रभावी ठरते.<br>• मानवी नात्यांमध्ये शिक्षकाने विश्वास दाखवावा. |
| ३. | **स्वामी विवेकानंद** (रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य)  (१८६३-१९०२) | • माणसातील अचूकतेचा अविष्कार म्हणजेच शिक्षण होय.<br>• आपण बालकांना सकारात्मक कल्पना पुरवल्या पाहिजेत.<br>• मन एकाग्र करणे व ध्यानधारणा यातून मानसिक विकास होतो. |
| ४. | **महात्मा गांधी**  (१८६९-१९४८) | • पहिल्या पाच वर्षात बालक जे शिकते व आत्मसात करते त्या गोष्टी नंतरच्या आयुष्यात ते शिकत नाही.<br>• शिक्षण म्हणजे बालकामधील चांगल्या गोष्टी चौफेर विकसित करणे.<br>• नयी तालीम- म्हणजे स्वयं अध्ययन हा शिक्षणातील महत्त्वाचा भाग आहे.<br>• श्रम प्रतिष्ठेला मुल्य असते. |
| ५. | **आरोबिंदो घोष**  (१८७२-१९५०) | • त्यांचा दृष्टीकोनच एकात्मिकतेवर भर देणारा होता त्यामुळे त्यांच्या तात्त्विकतेला एकात्मिक तात्त्विकता म्हणतात.<br>• मानवी व्यक्तिमत्त्वातील भौतिक आणि अध्यात्मिक बाजूंचे एकात्मीकरण झाले पाहिजे असे त्यांचे मत होते.<br>• त्यांच्या मते (१९७२ भाग १७ पी-203) शिक्षणाचा खरा पाया म्हणजे मानवी मनाचा अभ्यास, अर्भक, किशोरवयीन मुले/मुली, आणि प्रौढ आहेत.<br>• शिक्षणाचा हेतू आयुष्याच्या हेतूशी संबंधित असावा. |

| | | |
|---|---|---|
| ६. | **गिजुभाई बधेका**<br><br>(१८८५-१९३९) | • मॉंटेसरी पद्धतीमध्ये खूप रस घेऊन अभ्यास केला.<br>• मॉंटेसरी मॅडम यांनी दिलेली पूर्व प्राथमिक शाळेची आदर्श उद्दिष्टे आणि शाळेचे तत्वज्ञान यांचा सखोल अभ्यास केला.<br>• १९२० साली गुजराथमध्ये दक्षिणामूर्ती बालमंदिर सुरू केले.<br>• गुजराथ, महाराष्ट्र व इतर प्रांतांमध्ये गिजुभाईंच्या कामाने अनेक व्यक्ती प्रभावित झाल्या त्यापैकी एक ताराबाई मोडक होत्या. |
| ७. | **ताराबाई मोडक**<br><br>(१८९२-१९७३) | • विकासवाड्या सुरू केल्या.<br>• भारतातील पूर्वप्राथमिक शिक्षण व बालकल्याणाचा पाया रचला.<br>• ग्रामीण भागामध्ये सर्वात अगोदर अंगणवाड्या सुरू केल्या.<br>• नूतन बालशिक्षण संघाची स्थापना केली. |
| ८. | **पद्मश्री अनुताई वाघ**<br><br>(१९१०-१९९२) | • ताराबाई मोडक यांनी घालून दिलेल्या तत्वांच्या अनुयायी.<br>• १९८२ साली ग्राममंगल संस्थेची स्थापना केली.<br>• पूर्वप्राथमिक प्रशिक्षण केंद्र उभारणी केली.<br>• मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी चांगले बालशिक्षण असावे असे मत मांडले.<br>• 'कोसबाडच्या टेकडीवरून' हे पुस्तक लिहिले. |

**तुमचे मत**

आत्ता वाचलेल्या सर्व तत्ववेत्त्यांनी व शिक्षणतज्ञांनी मांडलेल्या मतांपैकी कोणती मते तुम्हाला आजच्या काळातील शाळांमधून आढळतात?

## १.२ लहान बालकांसाठी निरनिराळ्या केंद्रांची गरज (Need for various centers for young children)

**कृती :**

तुमच्या शहरात किंवा गावात चालवल्या जाणाऱ्या बालकांसाठीच्या केंद्रांची यादी पूर्ण करा.

आजच्या काळात समाजरचनेत आणि कुटुंब पद्धतीत खूप बदल झाले आहेत. आधुनिकीकरण, जागतिकीकरण आणि शहरीकरण या सगळ्यामुळे लोकांच्या राहणीमानाच्या गरजा पूर्ण बदलत्या आहेत. निश्चितच याचा बालकांवरही खूप प्रभाव पडलेला आहे. यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या राहणीमानानुसार आवश्यक ते समायोजन बालकांना करावे लागते. उदा. पालकांचे लक्ष नसणे, प्रेम व वात्सल्य याचा अभाव, भावनिक सुरक्षिततेसारख्या गरजांचे अंशतः समाधान होणे, खेळायला कमी जागा असणे किंवा सामाजिकरणाची संधी कमी मिळणे.

या सर्व कारणांमुळे हळू हळू बालकांसाठी विविध प्रकारची केंद्रे उघडण्याची गरज निर्माण झाली. अशी कोणकोणती केंद्रे आहेत जी बालकांना त्यांच्या आयुष्याचे व्यवस्थापन करण्यास उपयुक्त ठरणार आहे त्यांची माहिती आपण करून घेऊ.

या केंद्रांचा अभ्यास करण्यासाठी ती केंद्रे आपण तीन भागात विभागू.

लहान बालकांसाठी केंद्रे


(अ) बालसंगोपन केंद्र

(ब) बालशिक्षण केंद्र

(क) करमणूक केंद्रे

## १.३ निरनिराळी केंद्रे आणि त्यांची उद्दिष्टे (Various Centers and their objectives)

### (अ) बालसंगोपन केंद्र (Child Day Care Centers)



**चित्र ११.१ बालसंगोपन केंद्र**

आजच्या काळात जवळपास प्रत्येक घराआड एका घरातील स्त्री नोकरीसाठी घराबाहेर जाताना आढळते. त्यामुळे पालकांच्या अनुपस्थितीत बालकांची काळजी घेतली जाण्याची गरज आहे. आजच्या काळात ही गरज बालसंगोपन केंद्रांमुळे पूर्ण होते. क्रेश (Creche) हा फ्रेंच शब्द बालसंगोपन केंद्र यासाठी किंवा पाळणाघर यासाठी वापरला जातो. जगातले सर्वात पहिले बालसंगोपन केंद्र फ्रान्स येथे १८४० साली सुरू झाले. औद्योगिक गरज म्हणून १९व्या शतकात युरोप येथे अनेक क्रेश सुरू झाली.

बालसंगोपन केंद्रामध्ये प्रशिक्षित व कुशल कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. कर्मचाऱ्यांनी नेहमी बालसंगोपन केंद्रांची उद्दिष्टे पाळली पाहिजेत.

**बालसंगोपन केंद्रांची उद्दिष्टे (Objectives of Child Day Care Centers)**

- बालक केंद्रित वातावरण पुरवणे

- बालकांच्या सर्वांगीण विकासाला पूरक वातावरण पुरवणे.
- बालकांना मोकळे आणि सुरक्षित वातावरण पुरवणे.
- सर्व वयोगटातील बालकांच्या गरजा पूर्ण करणे.
- प्रत्येक बालकाचे व्यक्तीविशिष्टत्व जपणे.
- स्वमदत कौशल्य व स्वावलंबन याला चालना देणे.
- आरोग्य, स्वच्छतापूर्ण आरोग्य सवयी व स्वच्छतेच्या सवयी रुजवणे.

**दर्पण**

- तुम्हाला स्वतःला लहानपणी बालसंगोपनकेंद्रात किंवा पाळणाघरात जाण्याचा अनुभव आहे का?
- तुमचा अनुभव थोडक्या शब्दात लिहा.
- तुमचे बालसंगोपनकेंद्र कसे होते? तिथे कोणत्या सुविधा होत्या?

## (ब) बालशिक्षण केंद्रे (Early Childhood Education Centers)

बालशिक्षण केंद्रे म्हणजेच पूर्वप्राथमिक शाळा असतात.

**कृती**

- तुमच्या शहरात, नगरात, गावात कोणत्या प्रकारच्या पूर्वप्राथमिक शाळा आहेत त्यांची यादी करा. (३ ते ६ वर्षे वयोगटाच्या शाळा)
- हे प्रकार लिहित असताना तुम्हाला एकदम काय जाणवते ते लिहा?
- जर 'हो' उत्तर असेल तर काय?
- जर उत्तर 'नाही' असेल तर परत एकदा सर्व तत्त्ववेत्त्यांची मते वाचा.

खूप कोवळ्या वयात बालके शाळेत जायला लागतात. शालापूर्व अवस्था ही जीवनातील सर्वात महत्त्वाची अवस्था आहे. इथे महत्त्वाची या शब्दाचा अर्थ असा आहे की बालके लवकरच्या वयात शाळेत जातात जेव्हा त्यांची मेंदूपेशींची जोडणी सुरू असते. म्हणून या वयाला पायाभरणीचा काळ म्हणतात. वयाची पहिली आठ वर्षे महत्त्वाची असतात हे संशोधनाअंती सिद्ध झाले आहे. याच काळात ८० % मानसिक विकास होतो. या आठ वर्षांपैकी ३ वर्षाचा काळ पूर्वप्राथमिक शाळेत जातो. तिथेच त्यांना विविध अध्ययन अनुभव प्रथमच मिळत असतात. अध्ययन करताना बालके पंचेन्द्रीयांचा वापर करतात. त्यामुळे सर्व शाळांनी उद्दीपन देणारे वातावरण पुरवावे, तसेच सुसंघटीत, सुसुत्र आणि अर्थपूर्ण अनुभव पुरवावेत. याचमुळे बालकांच्या मेंदूपेशीची जोडणी दृढ होते.

**तुम्हाला माहित आहे का?**

मज्जासंस्थेचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे चेतापेशी. सामान्य भाषेत यालाच 'मेंदूपेशी' असे संबोधतात. मानवी मेंदूमध्ये ८६ अब्ज चेतापेशी असतात. शरीरातील इतर पेशींप्रमाणे चेतापेशीची कधीच विभागणी होत नाही, त्या मरतही नाहीत किंवा त्याजागी दुसऱ्या पेशीही तयार होत नाहीत. मानवी मेंदूतील फक्त मेंदूपेशी विभागणी करू शकतात. त्या प्रक्रियेला न्यूरोजेनेसीस म्हणतात. गर्भावस्थेतील काळात ही प्रक्रिया सुरू होते ती बाळाच्या जन्मानंतरही थोडे दिवस चालू राहते.

## पूर्वप्राथमिक शाळांचे विविध प्रकार (Various Types of Preprimary schools)

- ### खेळगट (Play Group)



चित्र ११.२ खेळगट

मोठ्या सामाजिक जगतात पाऊल टाकण्यासाठी खेळगटात जाणे हा प्रवेश आहे. शाळेच्या वातावरणाशी जुळवून घेणे हा या शाळांचा प्राथमिक हेतू आहे. शाळेच्या वेळाही कमी कालावधीच्या असतात. बालकांची अवधान कक्षाही ३ मिनिटांपेक्षा जास्त नसते. यानुसार उद्दिष्टे ठरवली जातात.

खेळगटाची उद्दिष्टे (Objectives of Play Group)

- बालकांचे मनोरंजन करणे.
- बालकांना शाळेच्या वातावरणाची ओळख करून देणे.
- बालकांना वातावरणाबरोबर आंतरक्रिया करण्यास मदत करणे.
- सर्वांगीण विकासास चालना देणे.
- बालकांना त्यांची अवधान कक्षा वाढवण्यास मदत करणे.

- ### बालमंदिर (Nursery school)



चित्र ११.३ बालमंदिर

१९११ साली मागरिट आणि राचेल मॅकमिलन भगिनींनी नर्सरीस्कुल ही संकल्पना अस्तित्वात आणली. कारखान्यातील कामगार स्त्रियांच्या बालकांसाठी प्रामुख्याने त्यांनी नर्सरी स्कुल सुरू केली. त्यांनी फ्रोबेल यांच्याकडून प्रेरणा घेतली आणि त्यांच्या शाळेमध्ये मानसिक विकासाच्या कृतींचा समावेश केला.

बालमंदिर याची उद्दिष्टे (Objectives of nursery school)

- आरोग्यपूर्ण वातावरण पुरवणे.
- आनंदी आणि आरोग्यपूर्ण वातावरण निर्मिती करणे.
- स्वतःसाठी चांगल्या सवयी लावून घेण्यास बालकांना मदत करणे.
- कल्पनाशक्ती विकसित होण्यासाठी संधी देणे व कौशल्य विकसित होण्यास मदत करणे.
- सामाजिक जीवनातील अनुभवांचे छोट्या प्रमाणावर आयोजन करणे.
- घरगुती जीवनाप्रमाणे शाळेचे वातावरण पुरवून एकसंधपणा मिळवणे.

## किंडरगार्टन Kindergarten (K.G.)



चित्र ११.४ किंडरगार्टन

फ्रेडरिक फ्रोबेल यांनी किंडरगार्टनची संकल्पना विकसित केली. फ्रोबेल यांची शाळा पुढील तत्त्वांवर आधारित होती. : 'एकत्रित राहणे' या तत्त्वानुसार मानव आणि निसर्ग यांना एकत्र ठेवणे घडत असते. सर्व गोष्टी ईश्वराने 'एकत्रितच निर्माण' करून पाठवल्या आहेत.

किंडरगार्टन हा जर्मन भाषेतील शब्द आहे. याचा अर्थ 'बालकांची बाग' असा आहे. शाळा ही एक बाग आहे अशी कल्पना करून शिक्षक या बागेचा माळी आहे आणि बालके म्हणजे त्या बागेतली कोवळी रोपे आहेत अशी कल्पना सांगितली आहे.

किंडरगार्टन शाळेची उद्दिष्टे (Objectives of Kindergarten)

- बालकांना शरीर सुदृढ करण्यास संधी देणे.
- इंद्रियांना सराव देणे.
- निसर्गाची ओळख बालकांना करून देणे.
- सर्वांगीण विकास समृद्ध करणे.
- बालकांचा सामाजिक विकास घडवणे.
- बालकांचा सुप्त विकास घडण्यास चालना देणे.

## अंगणवाडी (Anganwadi)



चित्र ११.५ अंगणवाडी

कोसबाडच्या टेकडीवर ताराबाई मोडक यांच्या पुढाकाराने आदिवासी बालकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम सुरू झाला. अगोदर त्यांनी कुरणशाळा सुरू केल्या. जी गुराखी बालके त्यांची चरायला सोडलेली गुरे सोडून शाळेत येऊ शकत नसत त्यांच्यासाठी कुरणात जाऊन शिक्षक शिकवत असत. हा मितौपचारिक शिक्षणाचा आदर्श प्रकार खूप वर्षांपूर्वी सुरू झाला होता. याचप्रमाणे ताराबाई मोडक यांनी अंगणवाडी शाळा सुरू केल्या. पुढे त्याला अनुताई वाघ यांनी आणखी आकार प्राप्त करून दिला.

आदिवासी पाड्यांच्या अंगणात झाडाखाली अंगणवाडी शाळा भरत असत. आदिवासी जीवनाशी निगडीत शिक्षण अंगणवाडीत दिले जात होते. सद्यस्थितीत अंगणवाडी ही संकल्पना 'एकात्मिक बालविकास सेवा' Integrated Child Development services (ICDS) या योजनेअंतर्गत १९७५-७६ सालापासून अस्तित्वात आहे. अंगणवाडी शाळा झोपडपट्टी, ग्रामीण भाग या ठिकाणी चालू आहेत. अंगणवाडी शिक्षकाला अंगणवाडी सेविका असे संबोधतात.

अंगणवाडीची उद्दिष्टे (Objectives of Anganwadi)

- सामाजिक-आर्थिकदृष्ट्या जी बालके वंचित आहेत त्यांच्यासाठी सेवा पुरवणे.
- कुपोषित बालकांसाठी पोषक आहार पुरवणे.
- दर्जेदार अन्नपुरवठा करणे.

- बालकांचा सर्वांगीण विकास साध्य करणे.
- बालकांच्या आरोग्याकडे लक्ष पुरवणे.


## १.३ करमणूक केंद्रे (Centres for recreation)

वेगळ्या हेतू व उद्‌दिष्टांनी करमणूक केंद्रे चालवली जातात. मुलांचे मनोरंजन करणे हा प्रमुख हेतू असतो. अशा प्रकारची केंद्रे आजच्या काळात मोठ्या शहरांमधून किंवा थोड्याफार ग्रामीण भागातून मनोरंजन केंद्रे आढळतात.

करमणूक केंद्रांची उद्‌दिष्टे (Objectives of Recreation centers)

- विविध खेळकृतीमधून बालकांचे मनोरंजन करणे.
- खेळण्यासाठी मोठी आणि मोकळी जागा पुरवणे.
- संरक्षित आणि सुरक्षित वातावरण पुरवणे.
- सुसंघटीत कृती पुरवणे.
- बालकांच्या मोकळ्या वेळाला योग्य दिशेला वळवणे.

## १.४ बालकांसाठी इतर केंद्रे




वर उल्लेख केलेली सर्व केंद्रे सगळीकडे उपलब्ध नसतात परंतु मोठ्या शहरात किंवा काही वेळा ग्रामीण भागातही उपलब्ध असतात. बालकांसाठी काम करायची इच्छा असलेल्यांनी अशी केंद्रे सुरू करावीत.

## शब्दसूची *Glossary*

**नवीन ज्ञानाला जागा करणे (Accommodation) :** अगोदरचे ज्ञान व नव्याने मिळवलेले ज्ञान यावर प्रक्रिया करून नवीन ज्ञानाला जागा करणे.

**ज्ञान गोळा करणे (Assimilation) :** मिळणारी माहिती समजून घेऊन मेंदूमध्ये साठवण्याची प्रक्रिया.

**बालशिक्षणाची केंद्रे (Child education centers) :** औपचारिक शिक्षणासाठी सिद्ध करणारी केंद्रे.

**बालसंगोपन केंद्र (Day care centre) :** जी बालके संपूर्णपणे स्वावलंबी नसतात अशा बालकांसाठी संगोपन व करमणूक सुविधा उपलब्ध करून देणारे केंद्र.

**प्रयोगवाद (Experimentalism) :** प्रयोगवाद म्हणजे निरनिराळ्या विषयातील संशोधनासाठी अभ्यास करणे आणि नवीन अनुभवासाठी प्रेम असणे.

**शोधवृत्ती (Exploration) :** एखादी गोष्ट शोध घेण्यासाठी केलेली कृती.

**अगदी नव्याने शिकून लक्षात ठेवलेल्या गोष्टी (Law of recency) :** अवघड गोष्टीसुद्‌धा या न्यायाने लक्षात ठेवण्याची विद्‌यार्थ्यांची खुबी.

**व्यावहारिकता (Pragmatic view) :** योग्य पद्‌धतीने, व्यवहाराला धरून व चालू काळाला अनुसरून समस्या सोडवण्याचे.

**प्रगतीवाद (Progressivism) :** प्रगतीवाद म्हणजे सामाजिक रचनेत केले जाणारे बदल.

**करमणूक केंद्र (Recreation center) :** मोकळा वेळ करमणूकीच्या कृतींद्‌वारे योग्य दिशेने व्यतीत करण्याची जागा.

**विज्ञान केंद्र (Science centre) :** बालकांच्या विज्ञान दृष्टीकोन विकासासाठी वयानुरूप योग्य विविध विज्ञान प्रयोग, वातावरणाशी आंतरक्रिया शोध घेण्याच्या वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी असलेली जागा रूपात बालकांसमोर आणण्याचे ठिकाण

**उद्‌दीपन केंद्र (Stimulation center) :** सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी ज्या कृतींचे आयोजन केले जाते अशा केंद्रांना उद्‌दीपन केंद्रे म्हणतात.

**कथा केंद्र (Story club) :** बालकांच्या भाषाविकासासाठी वयानुरूप कथा विविध रुपात बालकांसमोर आणण्याचे ठिकाण.

**प्र. १ दिलेल्या पर्यायातून सर्वात योग्य शब्द निवडा व वाक्य लिहा.**

(१) ११ ते १६ व्या शतकात बालकांना मानवाची ................. मानत होते.

(अ) प्रौढ (ब) प्रतिकृती

(क) सावली

(२) मध्ययुगीन काळातील घरांमधून बालकांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर ................. गोष्टीची कमतरता होती.

(अ) प्रेम (ब) भीती

(क) मत्सर

(३) एमिल हे पुस्तक ................. यांनी लिहिले.

(अ) फ्रोबेल (ब) रुसो

(क) पियाजे

(४) फ्रेडरिक फ्रोबेल यांनी सुरू केलेल्या शाळेला ................. म्हणतात.

(अ) नर्सरी स्कूल (ब) खेळगट

(क) किंडरगार्टन

(५) जॉन ड्युई यांनी प्रयोगासाठी शाळा ................. येथे उभारली.

(अ) शिकागो (ब) फ्रान्स

(क) भारत

(६) ताराबाई मोडक यांनी ................. सुरू केल्या.

(अ) अंगणवाडी (ब) बालवाडी

(क) विकासवाडी

(७) सर्वात पहिले बालसंगोपन केंद्र १८४० साली ................. येथे स्थापन झाले.

(अ) अमेरिका (ब) स्वीडन

(क) फ्रान्स

**प्र. २ (अ) जोड्या लावा.**

| तत्त्ववेत्ते | शिक्षणविचार |
|---|---|
| (१) फ्रेडरिक फ्रोबेल | (अ) निसर्ग हा उत्तम शिक्षक आहे. |
| (२) मारिया मॉंटेसरी | (ब) बालक विकासाच्या विविध अवस्थांमधून जात असते. |
| (३) रुसो | (क) बालकांसाठी खेळण्याच्या वस्तूंचा शोध लावला त्याला बक्षीस (गिफ्ट) |
| (४) पेस्टॉलॉझी | (ड) खेळाद्वारे शिक्षण पद्धतीचा बालशिक्षणात वापर |
| (५) पियाजे | (इ) मानसिक दुर्बल बालकांसाठी काम केले. |

(ब) जोड्या लावा.

| तत्ववेत्ते | शिक्षणविचार |
|---|---|
| (१) गुरु रवींद्रनाथ टागोर | (अ) शारीरिक विकास महत्त्वाचा आहे |
| (२) पद्‌मश्री अनुताई वाघ | (ब) नयी तालीम–स्वयंअध्ययन |
| (३) स्वामी दयानंद सरस्वती | (क) ग्राममंगलची स्थापना |
| (४) श्री आरोबिंदो घोष | (ड) निसर्गाच्या सान्निध्यात खरे शिक्षण होते |
| (५) महात्मा गांधी | (इ) शिक्षणाचा एकात्मिक विचार |

**प्र. ३ टिपा लिहा.**

(१) बालसंगोपन आणि बालशिक्षणाचा इतिहास

(२) विविध बालकेंद्रांची गरज

(३) जॉन कोमिनस

(४) पूर्वप्राथमिक शाळा

(५) करमणूक केंद्र

**प्र. ४ संज्ञा स्पष्ट करा.**

(१) अंगणवाडी

(२) किंडरगार्टन

(३) क्रेश

**प्र. ५ तालिका पूर्ण करा.**

| अनु. क्र. | शिक्षणतज्ज्ञांचे नाव | शाळांचे प्रकार |
|---|---|---|
| १. | .............................. | प्रयोगासाठी शाळा |
| २. | गिजुभाई बधेका | .............................. |
| ३. | फ्रेडरिक फ्रोबेल | .............................. |
| ४. | .............................. | अंगणवाडी |
| ५. | ताराबाई मोडक | .............................. |

**प्र. ६ रिकामे चौकोन पूर्ण करा.**

(१) शाळेचा प्रकार

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | री | | ल |

(२) आधुनिक शिक्षणाचे पितामह

| | |
|---|---|
| | न |

| | | | |
|---|---|---|---|
| | मि | | स |

(३) कोसबाडच्या टेकडीवरून या पुस्तकाच्या लेखिका पद्‌मश्री ....................

| | | | |
|---|---|---|---|
| अ | | | ई |

| | |
|---|---|
| | घ |

**प्र. ७ बरोबर उत्तरासाठी अक्षरांची उलटापालट करा.**

(१) संदर्भ : रुसो यांचे प्रसिद्ध पुस्तक

शब्द : मिएल उत्तर : ?

(२) संदर्भ : बालकांना विज्ञान शिकवू नये ते मिळवावे.

शब्द : धाशोतून उत्तर : ?

(३) संदर्भ : ताराबाई मोडक यांनी शाळा सुरू केली.

शब्द : डीविकावास उत्तर : ?

### प्र. ८ खालील विचारांवर कोणी विश्वास दाखवला.

(१) पूर्व बाल्यावस्थेच्या काळात स्वतःची सर्जनशीलता असते.

(२) ईश्वर सर्व गोष्टी चांगल्याच करतो.

(३) बालकाच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी दर्जेदार बालशिक्षण गरजेचे आहे.

(४) बालकाच्या इंद्रिय शिक्षणावर मातांनी विशेष लक्ष द्यावे.

(५) इंद्रिय संवेदन महत्त्वाचे आहे./ निसर्ग हा उत्तम शिक्षक आहे.

### प्र. ९ उद्दिष्टे लिहा.

(१) बालमंदिर (नर्सरी स्कूल)

(२) अंगणवाडी

(३) मनोरंजन केंद्र

(४) बालसंगोपन केंद्र

(५) खेळगट

### प्र.१० खालील विचार कोणी लिहिले आहेत.

(१) बालशिक्षणामध्ये खेळाद्वारे शिक्षण ही पद्धती महत्त्वाची आहे.

(२) बालकांना सुचणाऱ्या नवीन कल्पना टिकवण्यासाठी शिक्षकांनी मदत करावी.

(३) बालकांसाठी खेळण्याच्या वस्तूंचा शोध लावला त्याला बक्षीस (गिफ्ट) असे म्हटले.

(४) पंचेंद्रियांचे संवेदन महत्त्वाचे आहे.

(५) बालकाच्या उत्स्फुर्त विकासासाठी खेळ गरजेचा आहे.

(६) विकासामध्ये व्यावहारिक विचार महत्त्वाचे आहेत.

(७) 'गुरु' म्हणजेच शिक्षक हा बालकांचा दुसरा पालकच असतो.

(८) मानवी व्यक्तिमत्त्वातील भौतिक आणि अध्यात्मिक बाजूंचे एकात्मीकरण झाले पाहिजे.

(९) मन एकाग्र करणे व ध्यानधारणा यातून मानसिक विकास होतो.

(१०) मॉंटेसरी पद्धतीमध्ये खूप रस घेऊन अभ्यास केला.

### प्रकल्प / स्वयंअध्ययन

- पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा तक्ता तयार करा.
- पौर्वात्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा तक्ता तयार करा.

❖ ❖ ❖



# संबंधित कृती व प्रकल्प

## (१) स्रोतधारिका तयार करणे (Preparing a Resource File)

### १.१ सर्जनशील कृती (Creative activity)

सर्जनशीलता ही अशी एक आवश्यक प्रक्रिया आहे ज्यात नवीन कल्पना किंवा वस्तू नवीन आकारात किंवा मांडणीत सादर केली जाते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर 'प्रक्रिया' ही 'अंतिम उत्पादनापेक्षा' महत्त्वाची आहे.

'सर्जनशील कृती' आणि 'हस्तव्यवसाय' यांमध्ये फरक आहे. सर्जनशीलता ही कल्पनांची मुक्त मांडणी असते तर हस्तव्यवसायात बहुतेकवेळा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वस्तू करावयाच्या असतात.

विकासाच्या दृष्टीने योग्य वय असल्यामुळे वयाला अनुसरुन विविध पातळींवरच्या कृती शालापूर्व बालके करू शकतात.

सर्जनशील कृतीमधून मुलांना खूप 'स्व' आनंद आणि अत्युच्च समाधान लाभते.

| कृतीचे नाव | उद्दिष्टे | साहित्य | कृती |
|---|---|---|---|
| **चित्र काढणे**<br>• तेलकट खडू<br>• ओले खडू<br>• रंगीत पेन्सिल<br>• स्केच पेन<br>• कोळसा | • कारक अभिव्यक्तिसाठी माध्यम<br>• सर्जनशील अभिव्यक्ती उत्पादित करणे आणि आकारांची जाणीव होणे. | तेलकट खडू<br>ओले खडू<br>रंगीत पेन्सिल<br>स्केचपेन<br>कोळसा<br>कागद | बालकांना तेलकट खडू / ओले खडू / रंगीत पेन्सील / स्केचपेन / कोळसा आणि कागद द्यावा आणि बालकांना त्यांचा स्वतःच्या कल्पनाशक्तीचा वापर करून चित्रे काढायला सांगावीत. |
| **रंगकाम**<br>• ब्रश<br>• ब्लॉट<br>• ब्लो<br>• दोरा<br>• स्टेन्सील<br>• स्प्रे<br>• मेण (Wax) | • बालकांना ज्या भावना शब्दांद्वारे व्यक्त करणे अवघड जाते, त्या भावनांना व्यक्त करण्याची आणि विविध प्रयोग करण्याची संधी देणे.<br>• बालकांना एकट्याने काम करण्याची संधी देणे. | ब्रश (विकतचे /टाकावू वस्तूंपासून बनवलेले ब्रश)<br>दोरा<br>मेणबत्ती<br>स्ट्रॉ<br>स्टेन्सील<br>कागद<br>ओले रंग<br>वाट्या | बालकांना ब्रश, कागद आणि रंग (वाटीमध्ये) द्यावेत आणि त्यांना हे साहित्य वापरून रंगवण्यास सांगावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **ठसेकाम**<br>• अंगठा<br>• बोट<br>• भाज्या<br>• तळहात, तळपाय<br>• ब्लॉक<br>• इतर वस्तू<br>उदा. बबल रॅप | • घरामध्ये असलेल्या स्वच्छतेच्या दडपणापासून मुक्त होऊन बरबटवण्याच्या कृती करण्यासाठीचे माध्यम<br>• सर्जनशीलतेच्या अभिव्यक्तींना प्रोत्साहित करणे आणि बालकाला स्वतःहून शोध लावण्याची संधी देणे. | ओला रंग<br>कागद<br>ठसेकाम करण्याचे साहित्य | अंगठा, बोट, भाज्या व इतर कोणत्याही वस्तू रंगात बुडवून त्याचे ठसे कागदावर उमटवावेत. |
| **कागद काम**<br>• कागद फाडणे<br>• कागद चुरगाळणे<br>• कागद पिरगाळणे<br>• घडीकाम (ओरीगामी) | • स्नायूंवरील नियंत्रणासाठी आणि हस्त–नेत्र समन्वय साधण्यासाठी<br>• ताण हलका करण्यासाठी माध्यम पुरविणे | जुन्या मासिकांमधील रंगीत कागद<br>वर्तमानपत्रे<br>घोटीव व क्रेप पेपर | जुने वर्तमानपत्रे, मासिकातील कागद फाडण्यासाठी द्यावीत. घोटीव पेपर घडीकामासाठी द्यावा. क्रेप पेपर चुरगळण्यासाठी आणि पिरगळण्यासाठी द्यावा. |
| **चिकटकाम**<br>• चित्र<br>• रंगीत कागद<br>• कोलाज | • स्पर्शाचा अनुभव पुरवणे, वस्तू हाताळण्याची व समन्वयाची संधी देणे.<br>• कारक कौशल्ये प्राप्त करण्याची संधी देणे व भावनांना मोकळीक देणे. | चित्रे<br>डिंक<br>कागद<br>कापूस<br>लोकर<br>कापड<br>काड्या<br>पाने<br>फुले | कागदाच्या रंगीत तुकड्यांना / चित्रांना / विविध वस्तूंना मागे खळ लावून कागदावर चिकटवण्यास देणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **मातीकाम**<br>• शाडूकाम<br>• प्लॅस्टीसीन<br>• कणकेचा गोळा | • स्थूल व सूक्ष्म स्नायू विकास आणि हस्त–नेत्र समन्वयासाठी<br>• बरबटवण्यासाठी नियंत्रित स्वरुपात परवानगी देऊन बालकांना बरबटवण्याच्या कृतीतून मिळणाऱ्या (mess) आनंदात सहभागी करून देणे.<br>• ज्ञानेंद्रियांचा प्रत्यक्ष व सुखद अनुभव देणे. | शाडू<br>प्लॅस्टीसीन<br>गव्हाचे किंवा मैद्याचे पीठ<br>पिठापासून बनवलेला कणकेचा गोळा | • हाताला चिकटणार नाही एवढी घट्ट माती भिजवावी व बालकांना खेळायला द्यावी.<br>• कणीक /मैद्यात थोडे मीठ आणि रंग मिसळून घट्ट मळून खेळण्यास द्यावे.<br>• प्लॅस्टिसिन द्यावे. |

**सूचना :** फाईलमध्ये वरील सृजनशील कृतींची माहिती लिहून त्याचे नमुने लावावेत. मातीकामाचा नमुना अपेक्षित नाही.

### १.२ शब्दकोडी (Word Riddles)

संकल्पना दृढीकरणासाठी (ज्यात प्राणी, पक्षी, फळे आणि इतर अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो.) तसेच भाषा विकासासाठी याचा उपयोग होतो. दैनंदिन जीवनाशी निगडीत विषयांवरील शब्दकोडी असावीत. याची भाषा सोपी, यमक जुळणारी, वयाला अनुरुप अशी असावी. शब्दकोड्यामुळे कुतुहल, विमर्शन व शब्दसंपत्ती वाढायला मदत होते. यात 'मी कोण?' यासारखी रचना करता येते. कोड्याला अनुरुप अशी स्पष्ट, ठळक चित्रे जमवावीत. यासाठी चित्रे पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे यातून मिळविता येतात.

### १.३ शारीरिक व कारक कृती (Physical and Motor activities)

(अ) स्थूल आणि सूक्ष्म स्नायूंच्या विकासासाठी वैविध्य असणाऱ्या कृती आणि खेळ यांची यादी करा.

(ब) पारंपरिक खेळ आणि त्यासाठी लागणारे साहित्य यांची यादी करा. उदा. लगोरी, भोवरा वगैरे.

### १.४ लेखांचा संग्रह करणे. (Collection of articles)

(अ) विशेष गरजा असणारी बालके

(ब) पूर्वबाल्यावस्थेतील बालकांच्या भावनांची हाताळणी

(क) पालकत्व

पालकत्व या विषयांवरील वर्तमानपत्रे आणि मासिकांमध्ये आलेल्या लेखांचा संग्रह करून तुमच्या स्रोतधारिकेमध्ये (Resource File) चिकटवा.

### १.५ शिस्तीच्या पद्धतींवर आधारित मुलाखत घेणे (Interview considering disciplinary techniques )

खाली दिलेल्या प्रश्नांच्या आधारे पाच कुटुंबांची मुलाखत घ्या.

(अ) कुटुंबातील बालकांचा वयोगट.

(ब) तुम्ही बालकांना शिस्त लावतांना त्यांचा वयोगट विचारात घेता का?

(क) बालकांना शिस्त लावतांना 'ते असे का वागले असतील' याचा तुम्ही विचार करता का?

(ड) निर्णयस्वातंत्र्य किंवा मतप्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य तुम्ही बालकांना देता का?

(इ) बालकांनी जर चूक केली तर तुम्ही त्यांना शिक्षा करता का?

(फ) चांगल्या वर्तनासाठी तुम्ही बालकांना कशाप्रकारे बक्षीस देता?

(२) **बालगीतांचा संग्रह करणे (Collection of rhymes and songs)**

बालकांच्या ३ ते ६ वर्षांच्या वयोगटाला अनुसरून गाणी निवडावीत. सुरुवातीला तीन ते चार ओळींची लहान गाणी असावीत. कारण, लहान बालके मोठ्या गाण्यांना कंटाळतात. मोठ्या गटांतील बालकांसाठी मोठी गाणी घ्यावीत. गाण्यांमध्ये काही शब्दांची पुनरावृत्ती असावी. काही शब्द नवीन असले तरी बरेचसे शब्द ओळखीचे असावेत. ज्यामुळे बालकांना उत्स्फूर्त प्रतिसाद देण्यास मदत होते. गाण्याला लय असावी आणि गाण्यातून शब्दसंपदेमध्ये वाढ व्हावी.

(अ) **बोटांच्या हालचालींवर आधारित गाणी (Finger rhymes)**

(१) एक लहान बोट, एक लहान बोट, एक लहान बोट

टाळ्या वाजवा

लवकर त्याला वरती न्या

लवकर त्याला खाली न्या

हाताच्या घडीत त्याला लपवा

(हेच कडवे दोन ते पाच बोटे या क्रमाने म्हणावे)

(२) रमत गमत कोळी, भिंतीवर चढे

वरून पावसाने खाली तो पडे

सुकत जमीन सारी, ऊन ते पडे

रमत गमत कोळी परत वर चढे

(ब) **संकल्पनांवर आधारित गाणी (Concept based songs) :**

(१) अंगठा कुठे आहे? (२)

इथे मी आहे (२)

कसं काय आहे?

छान छान आहे

घरी मी जातो (२)

तर्जनी कुठे आहे? (२)

इथे मी आहे (२)

कसं काय आहे?

छान छान आहे

घरी मी जाते (२)

मधलं बोट कुठे आहे? (२)

इथे मी आहे (२)

कसं काय आहे?

छान छान आहे

घरी मी जातो (२)

अनामिका कुठे आहे? (२)

इथे मी आहे? (२)

कसं काय आहे?

छान छान आहे

घरी मी जाते. (२)

करंगळी कुठे आहे? (२)

इथे मी आहे. (२)

कसं काय आहे

छान छान आहे

घरी मी जाते (२)

सगळी बोटे कुठे आहेत? (२)

इथे आम्ही आहोत (२)

कसं काय आहे

छान छान आहे.

घरी आम्ही जातो (२)

(२) टिंगुल्याचे आहे मोठे शेत

डोंगराच्या बाजूला हो

तिथे बदकं किती आणि पिल्लं किती

त्यांच क्वॅक क्वॅक इकडे आणि क्वॅक क्वॅक तिकडे

क्वॅक क्वॅक क्वॅक क्वॅक सगळीकडे

चला चला बघायला हो

टिंगुल्याच आहे .........

डोंगराच्या ..........

तिथे चिमण्या किती आणि पिल्लं किती

(वरील प्रमाणे ओळखीचे पक्षी, पाळीव प्राणी यांची नावे घालून गाणे वाढवावे.)

(क) कथा आधारीत गाणी (Story based songs) :

मणी गिळला मणी गिळला मणी गिळला राजूने

मणी गिळला मणी गिळला मणी गिळला राजूने

पोटात दुखतय (३) राजूच्या

पोटात दुखतय (३) राजूच्या

डॉक्टरला बोलावले (३) आईने

डॉक्टरला बोलावले (३) आईने

डॉक्टरनी तपासले (३) राजूला

डॉक्टरनी तपासले (३) राजूला

ऑपरेशन (३) राजूचे

ऑपरेशन (३) राजूचे

मणी काढला (३) डॉक्टरनी

मणी काढला (३) डॉक्टरनी

थँक यू डॉक्टर (३) केले राजूने

बाय बाय डॉक्टर (३) केले राजूने

बाय बाय डॉक्टर (३) केले राजूने

(३) बालकथा संग्रह करणे (Collection of stories)

तंत्रे (Techniques)

(अ) पुस्तके (Books) :

लहान गोष्टी असणारी पुस्तके निवडावीत. वयानुरुप गोष्ट असावी. पुस्तकामध्ये रंगीत व योग्य चित्रांचा वापर केलेला असावा. पुस्तकामध्ये चित्र व मजकूर यांचा योग्य समतोल साधलेला असावा.

(ब) क्षणचित्रे (Flash cards) :

यामध्ये चित्रे विशिष्ट क्रमाने मांडलेली असतात व योग्य वेळी योग्य चित्र बालकांसमोर वापरले जाते यात एखादी गोष्ट विभागून प्रत्येक कार्डावर काढले जाते. यामध्ये कार्डांना योग्य क्रमाने लावून त्याला क्रमांक देणे आवश्यक असते. प्रत्येक कार्डाच्या मागे त्याविषयीची माहिती/ गोष्टीचा भाग लिहलेला असावा ज्यामुळे ते वापरणे सोपे होते. हे वापरतांना सोपी भाषा व योग्य हावभावांचा वापर केला जाईल याकडे लक्ष पुरवावे. कार्ड योग्य प्रकारे धरावे जेणेकरून ते सगळ्या बालकांना सहजपणे दिसू शकेल. कार्डाचा आकार ३० सेमी x ४२ सेमी (A3) असा असावा. पूर्वप्राथमिक शाळेत यांचा वापर गोष्टी सांगणे, माहिती देणे किंवा चित्रवाचन यासाठी केला जातो.

(क) स्टिक पपेट (Stick puppets) :

स्टिक पपेट तयार करायला आणि वापरायला सोपी असतात. स्टिक पपेट काड्यांचा वापर करून तयार केली जातात. म्हणून त्यांना ‘स्टिक पपेट’ असे म्हटले जाते. यात पपेटचा आकार महत्वाचा असतो. काड्यांवर चिकटवण्याची चित्र चार्टपेपरवर तयार करतात किंवा इतर साहित्यांचा देखील वापर केला जातो. चित्रांचा बाह्यआकार कापून तो काड्यांवर चिकटवला जातो. त्यामध्ये पपेट दोन्ही बाजूने सारखेच दिसेल यांची काळजी घ्यावी. मोठ्या आकारांचे पपेट बालकांना आकर्षित करतात.

### (ड) वाळूचा ट्रे (Sand tray) :

गोष्ट सांगण्यासाठी मुख्यतः या तंत्राचा वापर केला जातो. यात स्टीक पपेटचा देखील वापर केला जातो. फक्त यामध्ये ज्या बाहुल्या व काड्या वापरल्या जातात त्यांचा आकार थोडा लहान असतो. यात वाळूने भरलेला ट्रे घेऊन त्यामध्ये चित्रे लावलेल्या काड्या रोवून गोष्टीनुरुप त्यांच्या जागा बदलून गोष्ट सांगितली जाते.

### (इ) फ्लॅनेल बोर्ड (Flannel board) :

फ्लॅनेलचे कापड वापरून फलक बनविला जातो जो दर्शनी फलकाप्रमाणेच असतो. पूर्वप्राथमिक शाळेसाठी हा खूप उपयुक्त असतो. संकल्पना निर्मिती, चित्रे दाखविणे, गोष्टी सांगणे यासाठी याचा वापर केला जातो. फॅनेल बोर्डसाठी चित्रे बनविताना वेलक्रोचा तुकडा किंवा सॅण्ड पेपर चित्रांच्या मागे लावला जातो.

### (फ) हातमोजा बाहुली (ग्लोव्ह पपेट) (Glove puppets):

लहान बालकांना हातमोजा बाहुल्या खूप आवडतात. बाहुल्या आपल्याशी बोलतात ही कल्पनाच त्यांना खूप आवडते. गोष्टी सांगतांना, गाणी म्हणतांना किंवा बालकांशी संवाद साधण्यासाठी या तंत्राचा वापर केला जातो. हातमोजा बाहुल्या बनविण्यासाठी पॉपलिन कापड, टर्किश, फर किंवा केसमेंट वापरु शकतो. गाणी किंवा गोष्टींतील पात्रांप्रमाणेच बाहुल्या बनविल्या जातात. प्राणी/पक्ष्यांचे पपेट बनवितांना त्यांच्या वैशिष्ट्यांसकट बनविल्या जातात.

### (ग) नाट्यीकरण (Dramatization) :

यामध्ये एखाद्या प्रसंगाचे किंवा गोष्टीचे /कथेचे नाट्यरुपांतर केले जाते. एक एक व्यक्ती एक एक पात्र साकारते आणि बालकांसमोर त्याचे सादरीकीकरण केले जाते.

**कृती :**

क्षणचित्रांचा संच तयार करणे.

(१) माहिती देण्यासाठी

(२) गोष्ट सांगण्यासाठी

दोन्हीपैकी कोणताही एक उद्देश घेऊन त्यावर आधारित ६ ते ८ क्षणचित्रांचा संच तयार करणे.

### (४) वाद्य /खेळणे / बाहुली तयार करणे. (Preparing Musical Instrument/ Toy/ Puppet)

पुर्नवापर / पुर्नप्रक्रिया /पुर्ननिर्मिती या वस्तूंचा वापर करून वरीलपैकी कोणतीही गोष्ट तयार करणे. यासाठी नारळाच्या करवंट्या, जुने कापड, बटणे, काड्या, कापूस यासारख्या वस्तूंचा वापर करू शकतो.

### (५) भित्तीपत्रक तयार करणे (Making a Poster) :

यात लिखित मजकूर कमी आणि चित्रांचा वापर जास्त केला जातो. यातील चित्र रंगीत, आकर्षक, सहज नजरेला दिसतील अशा आकारात असावीत.

**खालीलपैकी एक विषय निवडा.**

(अ) पूर्वबाल्यावस्थेची वैशिष्ट्ये

(ब) बालकांचे हक्क

(क) बालकांच्या गरजा

(ड) पंचेद्रियांच्या उद्दीपनाविषयी चित्रे

(इ) कोणतीही एक वर्तनसमस्या व त्याची कारणे योग्य चित्रांद्वारे स्पष्ट करणे.

## (६) अहवाल तयार करणे

खालीलपैकी कोणतेही एक केंद्र निवडून दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे अहवाल तयार करा.

- पूर्वप्राथमिक शाळा
- बाल संगोपन केंद्र
- खेळाचे मैदान
- मनोरंजन केंद्र
- कृती केंद्र
- खेळण्याचे केंद्र

### ✲ केंद्राचे निरीक्षण

केंद्राचे नाव :

केंद्राचा प्रकार :

संचालकाचे नाव :

केंद्र स्थापना वर्षे :

### (१) उपलब्ध जागा

| केंद्राच्या वर्गात | |
|---|---|
| पुरेशी | अपुरी |

| केंद्राबाहेरील मैदान | |
|---|---|
| पुरेशी | अपुरी |

(२) केंद्रामधील बालकांची संख्या

(३) केंद्राच्या प्रकारानुसार उपलब्ध खेळणी व इतर साहित्य आहे का?

भरपूर / पुरेसे / थोडे / काहीच नाही.

(४) केंद्राची खोली : हवेशीर आणि भरपूर उजेड असलेली / छोटी/ अंधारी

(५) केंद्रामध्ये तक्ते / चित्रे / खेळण्याचे साहित्य यांची मांडणी : जमिनीवर / टेबलावर / भिंतीवर / टेबलाच्या शेजारी

(६) उपलब्ध साहित्य व साधनांचा वापर किती केला जातो? भरपूर / सरासरी / कमी

(७) खाली ठरविलेल्या उपक्रमांचा समतोल साधला जातो का?

(अ) बैठे व शारीरिक हालचाली यांच्या कृती

(ब) शांत व आवाज होणाऱ्या कृती

(क) वर्गातील व वर्गाबाहेरील कृती

(ड) मुक्त खेळ व शिक्षक मार्गदर्शित कृती

(इ) वैयक्तिक व समूह कृती

(फ) क्रियाशील आणि अक्रियाशील कृती

(८) सण व उत्सव साजरे केले जातात / नाही

(९) शिक्षक बालकांबरोबर कसे वागतात?

(अ) प्रेमाने व वात्सल्याने

(ब) ठामपणे

(क) अतिशिस्तीने

(ड) मित्रत्वाने

(इ) संवाद साधणारे

(१०) केंद्रातील वातावरण : लोकशाही / हुकुमशाही / अतिमोकळीक

(११) केंद्रातील उपक्रमात पालकांचा सहभाग : नेहमी / वारंवार / कमी / नाही

(१२) केंद्रात शिक्षकांसाठी कालानुरुप बदल केले जातात का?

(अ) संगणकाचा वापर

(ब) सामाजिक माध्यमे (social media)चा वापर

(क) मुलांसाठी इंटरनेटचा योग्य वापर

(ड) पालक संवादासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर

(१३) पालकांसाठी केंद्रात पालकदर्शक कोपरा (Parent corner) आहे / नाही.

(१४) शिक्षक बालकांसंदर्भातील नवीन संशोधनाचे साहित्य वाचतात / वाचत नाहीत.

(१५) शिक्षक नवनवीन प्रयोग करून बघतात का? होय / नाही

✻ **बालकांचे निरीक्षण (Observation of Children) :**

(अ) बालकाचे नाव

(ब) केंद्राचा प्रकार

(क) तारीख

(ड) वयोगट

(इ) केंद्राबद्दल थोडक्यात माहिती

(फ) खालीलपैकी कोणत्या कृती तुम्ही केंद्रात पाहिल्या त्यापुढे (✔) करा.

१. चालणे

२. पळणे

३. उड्या मारणे

४. घसरगुंडी खेळणे

५. सायकल चालविणे

६. विविध मैदानी खेळ उदा. लंगडी, लगोरी

७. ठोकळे रचणे

८. मणी ओवणे

९. रंगविणे किंवा चित्रे काढणे

१०. घडीकाम

११. गोष्टी ऐकणे

१२. गाणी म्हणणे

१३. चित्रवाचन

१४. प्रयोग करणे किंवा दाखविणे

१५. पंचेंद्रियांना चालना देणाऱ्या कृती

१६. नैसर्गिक स्त्रोतांची ओळख

१७. तुलनात्मक संकल्पना

१८. वाळूत रेषा काढणे

१९. अचूक चेंडू फेकणे / झेलणे

२०. स्पर्धा

(ग) कोणत्या साहित्य / स्रोत / साधनांचा वापर केला जातो.

(ह) तुमचे मत किंवा प्रतिक्रिया.

❖ ❖ ❖

- Abhyankar, S. Golwilkar, S. & Oke, A.: A textbook of Psychology for 12th Std: Narendra Publishers.
- Ashtaputre, M., Shivagani M. (2011). Child Development, (1st ed.). Director Vocational Education Maharashtra State: Mumbai.
- अष्टपुत्रे मनीषा (२०१७)– पाळणाघराचे संघटन व व्यवस्थापन(पहिली आवृत्ती). संचालक, व्यवसाय शिक्षण, महाराष्ट्र राज्य : मुंबई
- अष्टपुत्रे मनीषा, चिपळूणकर मुक्ता, डॉ. मिनल सोमण, श्री. मोरे एस्., श्रीमती रोडगे वंदना, श्रीमती गोहर अंजूम शाह (२०१७) : बालशिक्षणाचे संघटन व व्यवस्थापन (पहिली आवृत्ती), संचालक व्यवसाय शिक्षण, महाराष्ट्र राज्य : मुंबई.
- Baldwin, D. (1996). Child Development.
- Bee, H. & Denis, B. (2004). The Developing Child, Pearson Edn. Inc. Patparganj: New Delhi, India.
- Berk, L. (2007). Child Development: Prentice Hall of India Pvt. Ltd.: New Delhi, India
- Berk, L. (2007). Development through the life span (7th ed.)
- Charlotte J. (2009). Infancy & Childhood: McGrow Hill Companies.
- Craig, G. (1996). Human Development: Barnes and Noble Publishers.
- Crow & Crow. Child Psychology: Barnes and Noble Publishers.
- Catharei, G. (1977). The Developing Child: Pub. Harward Univ. Press play.
- Chowdhury, A., Chowdhury, R. Preschool children development care and education : New age International (P).
- Date, S., & Panna, A. (1995) Child Development, Sheth Publishers Pvt. Ltd.: Bombay.
- Date, S. Natu & Haldankar, U., A textbook of Psychology for 12th std, Nirali Publishers.
- Evelyn P., Jean F. (1971). Appleton Parent education Century Crofts educational division, Meredith Corporation: New York.
- Feldman R. (2000). Devleopment across the life span: Prentice Hall, New Jersey.
- Greenough, W. & Black J. (1992). Introduction of brain structure by experience substrates for Cognitive Development, Minnesota Symposia on Child Psychology, Vol. (24) Development behavioral neuroscience.
- George M. & Merill. The very young guiding children from infancy through the early years (4th ed.). Mcmillan publishing company.
- Hardman, Drew, Egan & Houghton Miffin Company, Human exceptionality school community and family.
- Hetherington & Parke, Child psychology : A contemporary viewpoint (3rd ed.) Mc Graw Hill book company.

- Hurlock E. (1978). Developmental Psychology (4th ed.) Mac Graw Hill Book Company.
- Hurlock, E. (1987). Child Development (6th ed.). International Student Edition: McGraw Hill Book Company, New Delhi
- Hurlock E. (1980). Developmental Psychology, A Life Span approach: Tata McGraw Hill Publishing Company Ltd., New Delhi.
- Jogi, I. & others, (2013). Child Development : Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, Pune.
- Khadse I. (2007). Balvikas Shastra Higher Secondary Std. 12th Himalaya Books Pvt. Ltd. Mumbai.
- Kulkarni S. (1988). Parent education perspectives and approaches: Rawat Publications, Jaipur.
- Lele S. & Ashtaputre, M. (1995) : Balvikas Higher Secondary Std. 12th Standard Publication, Nagpur.
- Lawton J. (1988). Introduction to child care and early childhood: Library of congress cataloging in education publication data.
- Mohanty J. (1994). Early Childhood care and education, Deep & Deep Publication, New Delhi.
- Papalia, D. Wendkos S. & Ruth, D. (2004). Human Development: The Mc Grow Hill Company Ltd., New Delhi.
- Santrock, J. (2002). Topical Approach to Lifespan Development: McGraw Hill, Boston.
- Santrock J. (2004). Lifespan Development : McGraw Hill Higher Education, Boston.
- Sand and others, (2007). Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, Pune.
- Tadsare, A textbook of Psychology for 12th Std: Phadke Publishers.
- Textbook of Child Development (2013). (1st ed.). Maharashtra State Board Secondary and Higher secondary education, Pune.
- Textbook of Child Development (2019). 11th std (1st ed.). Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Reasearch, Pune.
- Varhadpande N. (1981). Balvikas : Maharastra Vidyapeeth Granth Nirmiti Mandal Mahal, Nagpur.
- Verna. (4th ed.) Introduction to early childhood eduction : Hilderbrand.
- Venkataiah S. (2001). Basic concepts of parent education : Anmol Publication Pvt. Ltd., New Delhi, 2001.

- https:// www.unicef.org.
- https://www.who.int
- https://en.unesco.org
- https://www.smilefoundationindia.org
- https://www.psychologydiscussion.net
- https://www.cliffsnotes.com
- https://pathways.org.
- http://www.brillbaby.com/after-birth/infant-stimulation.php
- https://cchp.ucsf.edu/sites/g/files/tkssra181/f/buildbabyinten081803_adr.pdf
- https://www.gracepointwellness.org/462-child-development-parenting-early-3-7/article/1277-early-childhood-cognitive-development-introduction
- https://www.gracepointwellness.org/462-child-development-parenting-early-3-7/article/12760-early-childhood-cognitive-development-information-processing
- https://www.scholastic.com/parents/family-life/creativity-and-critical-thinking/learning-skills-for-kids/abstract-thinking-skills-kindergarten.html
- https://earlychildcareeducation.wordpress.com/about/child-development/emotional-development/concept-formation/
- https://extension.psu.edu/programs/betterkidcare/early-care/tip-pages/all/developing-memory
- www.oxforddictionaries.com.
- https://www.education.vic.gov.au/childhood/professionals/learning/ecliteracy/interactingwithothers/Pages/languagesimulations.aspx
- http://www.cdc.gov/NCBDDD/actearly/pdf/checklists/All_Checklists.pdf
- https://www.unicef.org/cwc/images/YCT.JPG
- https://childdevelopmentinfo.com/ages-stages/preschooler-development-3-6/#gs.84xrg7 |
- helpmegrowmn.org/hmg/developmilestone/socialemotionalmilestones/index.html
- https://www.Penguinrandomhouse.com
- books-play-stuart-broun
- https://www.Simplypsychology.org-vygostsky

- https://www.earlychildhoodnews.com-earlychildhood-article-view
- https://www.early-education.org.uk-about-froebel
- https://childmind.org
- https://www.healthline.com
- https://www.msdmanuals.com

☛ संदर्भ ग्रंथ सूची व वेबलिंक्सची संदर्भसूची यातून तुम्हाला मिळणाऱ्या मनोरंजक माहितीच्या नोंदी या पृष्ठावर करा.







महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४

[illegible] इयत्ता ३ री ([illegible])

₹ 102.00

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ